# ‘‘सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास’’

(सन २००१–०२ ते २०१०–११)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता करण्यात आलेला

## शोध प्रबंध


संशोधक

श्री मेटकरी संतोष मारूती

१२/५ निर्मिती गणेश, विजापूर रोड, सोलापूर

कायम नोंदणी क्र. ०२१११०००९३२

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. सुर्यवंशी अनिल बाबुराव

बी. पी. सुलाखे कॉमर्स् कॉलेज बार्शी, जि. सोलापूर.

अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा

सदस्य व्यवस्थापन परिषद

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर


ऑगस्ट २०१३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री ....................................... यांनी ''सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास'' हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर केला आहे. हा प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररीत्या पूर्ण केला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही. या विषयातील केलेले संशोधन कार्य मुळ आणि अस्सल असून ते पीएच. डी. या पदवीसाठी योग्य आहे.

ठिकाण :—

दिनांक :—

मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, ''सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावरील प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर केला आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठातील या स्वरूपात कोणीही सादर केलेला नाही. तसेच मी देखील तो अन्य विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :—

दिनांक :—

**संशोधक**

# ऋणनिर्देश

देशाच्या आर्थिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण औद्योगिकीकरणामुळे देश सामर्थ्यशाली व महासत्ता बनू शकतो. ज्यांची सुबत्ता व संपन्नता डोळे दिपवणारी आहे. अशा राष्ट्राचा आर्थिक इतिहास अभ्यासला असता असे दिसून येते की, त्या राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाची कास धरली होती. औद्योगिकरणामुळे विकासाला गती प्राप्त होते. राष्ट्रीय, दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होते. जीवनमानात वाढ, शेतीचा विकास, बेकारीचे निवारण, महत्तम उत्पादन क्षमतेला चालना इ. यातून जनजीवन सुखी समृद्धी बनते म्हणून औद्योगिकीकरण हीच आर्थिक विकासाची गुरूकिल्ली आहे. असे मानणे महत्वाचे आहे.

गेल्या ६० वर्षात भारतामध्ये औद्योगिकीकरणाचा वेग वाढला आहे. देशात अनेक प्रकारचे उद्योग उभारले गेले. भारतातील अनेक उद्योगामध्ये सूत उद्योग हा महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगाने देशात आर्थिक विकासात भर घातली आहे. देशातील शेतकरी आणि कामगारांच्या स्थितीत बदल घडवून आणला आहे. सूताची निर्यात करून परकीय चलन मिळत आहे. सूत उद्योग हा महत्वाचा असला तरी अलीकडील काळात या उद्योगाला बिकट परिस्थितीतून मार्ग काढावा लागत आहे. कारण सूत गिरण्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. असे असले तरी या समस्येवर उपाय शोधून योग्य धोरणांचा स्विकार करून काही सूत गिरण्या विकासाचा मार्ग निर्माण करीत आहेत. सोलापूर जिल्ह्याचे एक वेगळेपण व वैशिष्टयपूर्ण असणाऱ्या ***"सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास"*** व्हावा या हेतूने अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. च्या अभ्यासासाठी निवड केली आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे पीएच.डी. (अर्थशास्त्र) पदवीसाठी सदरचा शोध प्रंबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. कारण पीएच.डी. या पदवीच्या विषय निवडीपासून अखेरपर्यंत माझे आदरणीय मार्गदर्शक एक विचारवंत व बी.पी. सुलाखे वाणिज्य महाविद्यालय, बार्शी तसेच सोलापूर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सूर्यवंशी ए.बी. हे मला मार्गदर्शक म्हणून लाभले हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांच्या सखोल ज्ञानाने कुशल मार्गदर्शनाने व क्रियाशिल सहकार्यामुळे मी हा शोधप्रबंध वेळेत पूर्ण करू शकलो. तेव्हा त्यांचे आभार मानून ऋणमुक्त होण्याऐवजी पुढील कार्यासाठी त्यांचे मार्गदर्शन असेच लाभत राहावे अशी माझी इच्छा आहे. यामुळे त्यांच्या ऋणा मध्येच राहणे अधिक पसंत करतो.

तसेच मला वेळोवेळी मार्गदर्शन केलेले माझे गुरु व दैवत प्रा. बालाजी शेवाळे यांचे आभार मानुन ऋणमुक्त होण्याऐवजी पुढील कार्यासाठी त्यांचे मार्गदर्शन असेच लाभत राहावे अशी माझी इच्छा आहे. त्यामुळे त्यांच्या ऋणामध्येच राहणे अधिक पसंत करतो. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, मंद्रुपचे प्राचार्य डॉ. भांजे बी.एन., डॉ. बारबोले टी.एल., उपप्राचार्य उत्तमराव हुंडेकर सर, डॉ. एस.के. पाटील यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे व वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी हे कार्य पूर्ण करू शकलो. माझे सहकारी मित्र डॉ. प्रकाश शेटे, प्रा. महेश तानवडे, डॉ. पंडीत बन्ने, प्रा. कार्तीक पोळ, प्रा. डॉ. सिद्राम सलवदे, श्री. डॉ. वलेकर डी. एम.,प्रा. मदगोंडा वराडे, सचिव एस.डी. जावीर, प्रा. शशिकांत तिकुटे, शशिकांत जगधने, मुख्याध्यापक श्री. दिक्षीत सर, श्री. मारूती बनसोडे, श्री. सदाशिव बनसोडे, योगेश शेंडगे, ॲड. संदिप शेंडगे, प्रा. साखरे व प्रा. कसबे या सर्वांनी वेळोवेळी सहकार्य केले यामुळे मी या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

महात्मा फुले सूत गिरणीचे चेअरमन आमदार लक्ष्मणराव ढोबळे, सांगोल्याचे आमदार मा.ना.गणपतराव देशमुख, स्वामी समर्थ सूत गिरणीचे श्री राजशेखर शिवदारे, जनरल मॅनेंजर श्री. गंगाधर कुडल, सांगोला सूत गिरणीचे अकौंटंट श्री. पाटील, कामगार कल्याण अधिकारी श्री. वाघमोडे, श्री. गावडे, श्री गुज्जा तसेच सूत गिरणीतील इतर अधिकारी व कर्मचारी यांनी मला सहकार्य केले यामुळे त्यांचा मी आभारी आहे.

ज्यांच्या आशिर्वादाने मी हे काम पूर्ण करू शकलो असे माझे जन्मदाते आई-वडील, माझी भाच्ची कु. स्नेहा, कु. सुर्जन, कु. श्रेयश, कु. प्राजक्ता, भाऊ आबासाहेब, सौ. वहीनी, माझी बहिण सौ. सविता शेंडगे, श्री. योगेश शेंडगे, आणि सर्व नातेवाईक यांनी सहाकार्य केले. तसेच हा प्रबंध सुबक व सुंदर संगणकीकरण करून देण्यात प्रिन्स कॉम्प्युटर टायपिंगचे इमरान शेख यांचा मोलाचा वाटा आहे. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

दिनांक :- **मेटकरी संतोष मारुती**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे शिर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | प्रमाण पत्र | II |
| २ | प्रतिज्ञापत्र | III |
| ३ | ऋणनिर्देश | IV-V |
| ४ | तक्ता सूची | VI-IX |
| ५ | आलेख सूची | X |
| ६ | प्रकरण पहिले — सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल भारत आणि महाराष्ट्र | १ते २७ |
| ७ | प्रकरण दुसरे — संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा | २८ ते ४५ |
| ८ | प्रकरण तिसरे — सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | ४६ ते ६१ |
| ९ | प्रकरण चौथे — सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती | ६२ ते १५० |
| १० | प्रकरण पाचवे — सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक मुल्यमापन | १५१ ते १७५ |
| ११ | प्रकरण सहावे — सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षण | १७६ ते २०९ |
| १२ | प्रकरण सातवे — पंचवार्षिक योजना व जागतिकीकरणाची आव्हाने | २१० ते २४३ |
| १३ | प्रकरण आठवे — निष्कर्ष व शिफारशी | २४४ ते २६८ |
| १४ | संदर्भ ग्रंथ सूची | २६९ ते २७२ |
| १५ | परिशिष्ठ :— १) मुलाखत अनुसूची, २) प्रश्नावली अनुसूची, ३) मुलाखत घेतेवेळीचे छायाचित्र | २७३ ते २८१ |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १.१ | स्वातंत्र्य पूर्व काळातील सहकार चळवळ | ७ |
| १.२ | स्वातंत्र्य पूर्व काळातील सहकार चळवळ | ८ |
| १.३ | भारतातील सूती कापड गिरण्यांची प्रगती (खाजगी व सहकारी) | १४ |
| १.४ | भारतातील सहकारी सूत गिरण्यांची वाढ | १६ |
| १.५ | महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांचा तपशील | २० |
| २.१ | सहकारी सूत गिरण्यांची निवड | ४२ |
| २.२ | कामगार नमुना निवड | ४३ |
| ४.१.१ | स्वामी समर्थ शेतकरी व सहकारी विणकर सूत गिरणी, वळसंग | ६७ |
| ४.१.२ | अधिकृत भागभांडवल रु. ७५०.०० लाख आहे. | ६८ |
| ४.१.३ | सूत उत्पादन (किलो) | ७२ |
| ४.१.४ | सूत विक्री | ७५ |
| ४.१.५ | श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी (सन २००१-२००२ ते सन २०१०-११) | ७९ |
| ४.१.६ | स्पिनिंग विभागातील कामगार संख्या | ८० |
| ४.१.७ | श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूतगिरणीला मिळालेले राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार | ८३ |
| ४.२.१ | सभासद संख्या (हजारात) | ८४ |
| ४.२.२ | भाग भांडवल (लाखात) | ८५ |
| ४.२.३ | सूत उत्पादन (किलो) | ८८ |
| ४.२.४ | स्थानिक बाजारात सूत विक्री तक्ता | ९२ |
| ४.२.५ | शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले निर्यात किंवा विदेशात केलेल्या सूत विक्री | ९५ |
| ४.२.६ | शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार (सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११) | ९८ |
| ४.२.७ | स्पिनिंग विभागातील कामगार संख्या | ९९ |
| ४.३.१ | सभासद संख्या (हजारात) | १०५ |
| ४.३.२ | भाग भांडवल (लाखात) | १०६ |
| ४.३.३ | शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे सूत उत्पादन (किलो) | १०८ |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| ४.३.४ | शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचा स्थानिक बाजारात सूत विक्री तक्ता | १११ |
| ४.३.५ | शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार (सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११) | ११३ |
| ४.३.६ | स्पिनिंग विभागातील कामगार संख्या | ११४ |
| ४.४.१ | महात्मा फुले अनुसूचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील सूत उत्पादन (सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११) | १२० |
| ४.४.२ | महात्मा फुले सूत गिरणीने स्थानिक भारतीय बाजारपेठेत व विदेशात केलेली सूताची विक्री | १२४ |
| ४.४.३ | महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार (सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११) | १२८ |
| ४.४.४ | महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकारी सहकारी सूत गिरणीतील स्पिनिंग विभागातील कामगार संख्या | १२९ |
| ४.५.१ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सभासद संख्या सभासद संख्या (हजारात) | १३२ |
| ४.५.२ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले भागभांडवल (लाखात) | १३३ |
| ४.५.३ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत उत्पादन :- (किलो) | १३६ |
| ४.५.४ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले स्थानिक व विदेशी बाजारात सूत विक्री | १३९ |
| ४.५.५ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीतील रोजगार (सन २००५-२००६ ते सन २०१०-२०११) | १४३ |
| ४.५.६ | शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले स्पिनिंग विभागातील कामगार संख्या | १४४ |
| ५.१ | सोलपूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा ढोबळ नफा | १५४ |
| ५.२ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा निव्वळ नफा गुणोत्तर | १५७ |
| ५.३ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर | १५९ |
| ५.४ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर | १६२ |
| ५.५ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर | १६४ |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्यांचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| ५.६ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | १६७ |
| ५.७ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे स्थीर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | १७० |
| ५.८ | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | १७२ |
| ६.१ | निवड कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणावरून वर्गीकरण | १७८ |
| ६.२ | निवड कामगारांची वयानुसार गटवारी | १७९ |
| ६.३ | शिक्षण व प्रशिक्षणानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण | १८० |
| ६.४ | निवड कामगारांचे कौटुंबिक आकारमान | १८१ |
| ६.५ | निवड कामगारांच्या विवाहीत/ अविवाहित दर्जानुसार वर्गीकरण | १८२ |
| ६.६ | रोजगारीचे स्वरूप | १८३ |
| ६.७ | भाषावार निवड कामगारांचे वर्गीकरण | १८५ |
| ६.८ | धर्मानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण | १८५ |
| ६.९ | जातीनुसार निवड कामगारांचे वर्गीकरण | १८६ |
| ६.१० | निवड कामगारांच्या भरतीचे मार्ग | १८७ |
| ६.११ | निवड कामगारांचे समस्यानुसार वर्गीकरण | १८८ |
| ६.१२ | निवड कामगारांच्या बढतीच्या बाबी | १८९ |
| ६.१३ | दरमहा वेतनाचा तपशील | १९१ |
| ६.१४ | बोनस रूपात कामगारांना वाटलेली रक्कम (सन २००१ ते २०१०-११ अखेर) | १९३ |
| ६.१५ | निवड कामगारांचे कर्ज घेण्याचे मार्ग | १९४ |
| ७.१ | सहकारी क्षेत्राचा विकास | २१२ |
| ७.२ | दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी क्षेत्राने केलेली प्रगती | २१४ |
| ७.३ | चौथ्या योजना काळातील प्रगती | २१७ |
| ७.४ | पाचव्या योजनेतील सहकारी क्षेत्राची उद्दीष्ट्ये व साध्य | २१८ |
| ७.५ | सहाव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे व साध्य | २१९ |
| ७.६ | सातव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे व साध्य | २२१ |
| ७.७ | आठव्या पंचवार्षिक योजनेतील सहकार पतपुरवठा क्षेत्राची उद्दिष्टे | २२२ |
| ७.८ | महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग व्याज सवलत धोरण सन २०११—२०१७ | २२८ |

# आलेख सूची



| आलेख क्र. | आलेखाचे शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | सूत उत्पादन किलो मध्ये ( श्री. स्वामी समर्थ) | ७२ |
| २. | स्थानिक बाजारात सूताची विक्री (लाखात) ——''—— | ७६ |
| ३. | विदेशात सूत विक्री किलो (लाख) ——''—— | ७६ |
| ४. | सूत उत्पादन (किलो) (शेतकरी सहकारी सू.गि.) | ८८ |
| ५. | स्थानिक बाजारात सूत विक्री ——''—— | ९२ |
| ६. | निर्यात किंवा विदेशात केलेल्या सूत विक्री ——''—— | ९५ |
| ७. | सूत उत्पादन (किलो) ( शरद शेतकरी सू.गि.) | १०९ |
| ८. | सूत उत्पादन प्रति चाती (ग्रॅम) महात्मा फुले सू.गि. | १२१ |
| ९. | स्थानिक बाजारात सूताची विक्री (रू. लाखात) —''— | १२५ |
| १०. | विदेशात सूताची निर्यात (रू. लाखात) —''— | १२५ |
| ११. | सूत उत्पादन :- (किलो) (शेतकरी महिला सहकारी सू.गि.) | १३६ |
| १२. | स्थानिक बाजारात सूत विक्री रू. —''— | १३९ |
| १३. | विदेशी बाजारात सूत विक्री रू. —''— | १४० |
| १४. | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा ढोबळ नफा गुणोत्तर | १५४ |
| १५. | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा निव्वळ नफा गुणोत्तर | १५७ |
| १६. | तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर | १५९ |
| १७. | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर | १६२ |
| १८. | कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर | १६५ |
| १९. | एकूण मालमत्ता व उलाढाल गुणोत्तर | १६७ |
| २०. | स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | १७० |
| २१. | सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | १७३ |

**प्रकरण पहिले**

**सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल भारत आणि महाराष्ट्र**

१.१ प्रस्तावना

१.२ सहकाराची व्याख्या

१.३ सहकाराची तत्वे

१.४ भारतातील सहकारी चळवळ : प्रारंभ व विकास

१.५ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकार चळवळ

१.६ महाराष्ट्रातील सहकार चळवळ

१.७ सहकारी चळवळीचा भविष्यकाळ आणि आवश्यकता

१.८ सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल

१.९ भारतातील सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल

१.१० महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांचा विकास

१.११ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा विकास

१.१२ सोलापूर जिल्ह्याचा नकाशा

# प्रकरण पहिले

# सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल : भारत आणि महाराष्ट्र

## १.१ प्रस्तावना :-

सहकार म्हणजे मानवाच्या अधिकतम कल्याणाच्या दृष्टीने स्वावलंबन व पारस्पारिक मदतीच्या तत्वावर आधारलेली अशी स्थिती की, जेथे सभासद स्वेच्छेने आपल्या सर्वसामान्य उद्देशांच्या पुर्तीसाठी समतेच्या भावनेने एकत्र येतात. अशा सव्वाशे वर्षाहुन अधिक काळ अस्तित्वात असलेल्या सहकारी चळवळीने सर्व विश्व आता व्यापलेले आहे.

सहकाराचा उगम इंगलंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या उत्तरार्धात झाला असे मानले जात असले तरी मानवी सहकारी प्रवृत्तीप्राचीन व मुलभूत आहे असे म्हणता येईल. सहकाराची वृत्ती ही अन्य मानवी वृतीप्रमाणेच उपजत आहे.

'मिल' या विख्यात अर्थशास्त्रज्ञाने आपल्या प्रिन्सिपल्स ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी या ग्रंथात म्हटले आहे.

"सहकार हे एक उत्तम उदिष्ट आहे. परस्परविरोधी हितासाठी झगडणाऱ्या वर्गातील संघर्ष दूर करुन सर्वांच्या फायद्यासाठी स्नेहपूर्ण स्पर्धेची कास धरुन मानवी जीवनाला योग्य आकार देण्याचा सहकार प्रयत्न करतो. भारतातील कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सहकाराचे वर्णन करणारे अनेक विचार मांडलेले आहेत. थोडक्यात प्राचीन तत्वज्ञ ते आधुनिक अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यांच्या ग्रंथातून सहकारविषयीचे विधायक विचार दर्शन होते"[१].

वन्यावस्थेत राहणाऱ्या मानवापासून ते आजच्या आधुनिक समाजात राहणाऱ्या मानवापर्यंत दैनंदिन जीवनात पदोपदी संघर्षासमान किंबहुना अधिकच सहकाराचा परिस्थितीजन्य गरजेपोटी तीव्रतेने प्रत्यय येतो.

१८४४ मध्ये इंग्लंडमध्ये रॉश्डेल येथे सर्वसामान्य कष्टकरी विणकरांनी जीवनावश्यक वस्तू रास्त दरात मिळाव्यात म्हणून ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली व अत्यंत अल्प नफा ठेवून विविध गरजेच्या वस्तु विकण्यास सुरुवात केली. सहकारी संस्थाच्या इतिहासातील ही आद्यसंस्था म्हणता येईल सहकाराची नवी दृष्टी प्राप्त झालेल्या सर्वसामान्य व्यक्तींनी आपली प्रत्येक अडचण सोडविण्यासाठी व गरज भागविण्यासाठी विविध स्वरुपांच्या सहकारी संस्था स्थापन केल्या. त्यातूनच सहकारी संस्थांचे व सहकारी क्षेत्राचे साम्राज्य उभे राहिले. औद्योगिक क्रांतीचे जे कांही फायदे समाजाला झाले त्यापैकी सहकारी चळवळीचा उगम हे औद्योगिक क्रांतीमुळे मिळालेले वरदानच आहे. विना सहकार नाही उध्दार व एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ ही वाक्ये आपल्याला परिचित आहेत. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीसही

सामन्य जीवन जगता यावे, ही सहकाराची प्रमुख भूमीका आहे. एक काठी चटकन तुटते, पण अनेक काठया एकत्र केल्या तर प्रत्येक काठीचीच ताकद वाढते, या न्यायाने एक व्यक्ती वैयक्तीकरित्या दुर्बल असेल, त्या व्यक्तीमध्ये अनेक त्रुटी किंवा कमरता असतील, भांडवल नसेल, कांही कौशल्य अथवा गुण नसतील, म्हणून ती व्यक्ती समाजातला दुर्बल घटक असेल, पण जेव्हा समान उद्दीष्टाने प्रेरित होऊन अशा अनेक दुर्बल व्यक्त्ी संघटीत होतात व एखादे कार्य करण्यास प्रेरीत होतात तेंव्हा त्यांचे सामर्थ्य अपराजित असते. एकमेकांच्या सहकार्याने काम पूर्ण होते. समान उद्दीष्टाने संघटित झालेल्या या व्यक्तींमध्ये उच्च-नीच, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेदभाव नसतो. प्रत्येक व्यक्तीला सन्माननीय वागणूक दिली जाते. सहकारी संस्थेत कोणीही मालक नसतो व कोणीही नोकर नसतो. सर्वजण संस्थेचे सभासद असतात. लोकशाही मार्गाने सर्व निर्णय घेतले जातात व निर्णयाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व सभासद एकमेकांना जबाबदार असतात. सामूहिक जबाबदारीची जाणीव जोपासली जाते. सहकारी संस्था आपल्या कामकाजावर मर्यादित नफा मिळवतात. कारण नफ्यापेक्षा सेवा व सभासदांच्या गरजांची पुर्तता करण्यास प्राधान्य दिले जाते या भूमिकेमुळेच सर्वसामान्य व्यक्तींनाही सहकारी संस्थाचा आधार विश्वासनीय ठरतो.

## १.२ सहकाराची व्याख्या :

अनेक विचारवंतानी, सहकारी कार्यकर्त्यांनी व राजकीय नेत्यांनी सहकार हा शब्द विविध संदर्भात वापरलेला आहे. संस्थेच्या स्वरुपाप्रमाणे, कार्याप्रमाणे विविध देशात सहकार चळवळीची वाढ व विकास ज्या स्वरुपात झाला, त्याचाही प्रभाव सहकार या शब्दाची व्याख्या करताना विविध विचारवंतावर पडलेला आहे. अर्थातच सहकाराच्या सर्वच व्याख्यांचा विचार करता येणार नाही. परंतू सहकार या शब्दाची यथार्थतेने माहिती होण्यासाठी आवश्यक अशा निवडक व्याख्यांचा विचार केलेला आहे.

Co-operation या शब्दाची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील Co-operare या शब्दामध्ये सापडते. Co-operare या लॅटिन शब्दाचा अर्थ एकत्र काम करणे असा आहे. सहकार या शब्दाची फोड केली असता सह म्हणजे सर्वांनी एकत्र मिळून केलेले, असा अर्थ होतो व कार म्हणजे कार्य अथवा काम तेंव्हा सहकार म्हणजे अनेक व्यक्त्ींनी एकत्र येऊन केलेले काम असे म्हणता येईल. कांही विचारवंतानी केलेल्या सहकाराच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

### १) होरेस प्लँकेट

"सहकार म्हणजे संघटनेच्या माध्यमातून केलेले प्रभावी स्वावलंबन व स्वयंसेवा होय"[२].

### २) सी.आर.पे.

"सहकारी संस्था म्हणजे दुर्बलांनी नि.:सवार्थी भूमिकेतून संयुक्तरित्या व्यापार करण्यासाठी स्थापन केलेली संघटना होय. या संस्थेच्या कामकाजाबाबत व संस्था चालविण्याच्या जबाबदारीच्या प्रमाणात सभासदांना लाभांश मिळेल असे गृहीत धरलेले असते"[३].

**३) कॅलव्हर्ट**

"जेंव्हा माणूस म्हणून अनेक व्यक्तीं समानतेच्या तत्वावर एकत्र येऊन स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संघटना स्थापन करतात तेंव्हा त्या संघटनेस सहकारी संघटना असे म्हणतात"[४].

**४) हेरिक**

"सहकार म्हणजे ऐच्छिकरीत्या गरीब व्यक्तींनी एकत्र येऊन एकमेकांने भांडवल व साधनसामग्री फायदेशीररित्या परस्पर साजंजस्याने वापरण्याची कृती होय"[५].

**५) प्रो.लॅम्बर्ट**

"स्वतःची उद्दीष्टे सफल करण्यासाठी व्यक्तींच्या समूहाने स्थापन केलेली व निर्यंत्रित केलेली, लोकशाही पध्दतीने चालविलेली, सभासदांच्या व समाजाच्या हिताची जपणूक करणारी संस्था म्हणजे सहकार होय"[६].

**६) डब्ल्यु डी.वटकीन**

"सहकार म्हणजे एकात्मता, लोकशाही, समता व स्वातंत्र्य या तत्वांवर आधारलेली सामाजिक संघटना होय"[७].

**७) श्री. वैकुंठलाल मेहता**

"समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी ऐच्छिकरित्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय"[८].

**८) पी.ई.वीरामन**

सहकार संस्था ही व्यक्तींची अशी संघटना आहे की या संघटनेत सभासद आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी परस्पर सहाय्य व नफ्याची वाटणी या तत्वावर आधारलेला उद्योग व्यवसाय स्थापन करतात व त्याचबरोबर समाजाच्या आर्थिक गरजाही भागवतात"[९].

वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास करताना सहकाराची कांही वैशिष्टये प्रकर्षाने जाणवतात. ती पुढीलप्रमाणे.-

१) सहकार म्हणजे अनेक व्यक्तींनी ऐच्छिकरित्या एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना आहे.

२) ही संघटना त्या व्यक्तींच्या दुर्बलतेवर मात करुन त्यांना सबल, सक्षम व सामर्थ्यवान बनविते.

३)	नि:स्वार्थी हेतू, सामूहिक जबाबदारी, समानता, समता हा सहकाराचा गाभा आहे.

४)	सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाला त्याने संस्थेसाठी केलेल्या व्यवहाराच्या अथवा योगदानांच्या (Contribution) प्रमाणात लाभांश दिला जाते.

५)	सहकारी संस्थेचे सदस्य सामूहिक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी एकत्र येतात.

६)	सहकार म्हणजे लोकशाही भावनेने कार्य करणारी विचारप्रणाली आहे.

७)	सहकार म्हणजे सेवाभाव वाढवणारी संघटना आहे.

८)	नैतिक विकास व सामाजिक उन्नती ही सहकाराची महत्वाची उद्दीष्टे आहेत.

भारताच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र अशा दोन क्षेत्रांमध्ये विभागणी करता येते. परंतू या दोन क्षेत्राबरोबरच सहकार क्षेत्रही भारतात मोठया प्रमाणावर विकसीत झाले. म्हणून सहकारी कार्यप्रणालीची माहिती करुन घेणे आवश्यक ठरते.

सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला, दुर्बल व्यक्तींना, आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या व्यक्तींना सक्षम, सबल व समर्थ बनविणे हे सहकाराचे प्रमुख उद्दीष्ट आहे. सहकारी संस्थाच्या सभासदांमध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही. सर्वांना समान दर्जा व समान वागणूक दिली जाते.

विविध विचारवंतांनी सहकाराच्या वेगवेगळया दृष्टीकोनातून व्याख्या केलेल्या आहेत पण सहकारी तत्वप्रणालीची माहिती होण्यासाठी सहकार म्हणजे स्वावलंबन व परस्पर साहाय्य यांच्या मदतीचे समतेच्या व समानतेच्या तत्वांवर, अल्प प्रमाणात नफा मिळवणारी, सेवाभावाने प्रेरित झालेली सभासदांची ऐच्छिक व आर्थिक संघटना होय, अशी व्याख्या करता येईल.

## १.३ सहकार तत्वे

"सहकार तत्वांमध्ये सर्वांचे हित साधण्याकरीता व्यक्तीसमुह आवश्यक मानला गेला आहे. प्रत्येक सभासद हा इतर सर्व सभासदांचा प्रतिनिधी आहे आणि इतर सर्व सभासद प्रत्येक सभासदाच्या कार्यास जबाबदार आहेत. या कल्पनेवर आधारीत सहकार तत्व आहे. सहकारी तत्वाज्ञानाला मानवी संस्कृतीइतकाच पूर्व इतिहास आहे. सहकाराची विशेष लक्षणे पुढील वैशिष्टयांनी अलंकृत आहेत"[१०].

(०१)	ऐच्छिक संघटन

(०२)	व्यक्तींचे संघटन

(०३)	लोकशाही तत्वांचा अंगीकार

(०४)	खुले सभासदत्व

(०५)	आर्थिक व्यवहार

(०६) मर्यादित जबाबदारी

(०७) वाजवी लाभांश/समान वाटप

(०८) सेवाभावावर भिस्त

(०९) एक सभासद एक मत

(१०) शिक्षणाची अभिवृध्दी

(११) एकाधिकाराला विरोध

सहकार तत्वांचा व्यावहारिक तत्वांशी संबंध आहे. सहकारी संस्थाचे संघटन आणि संचालन वैशिष्टयपूर्ण पध्दतीने ज्या तत्वानुसार होते ती सहकाराची तत्वे होत. सहकाराची तत्वे म्हणजे सहकाराची कार्यपध्दती घालून देणारी व सहकाराचा अतिम उद्देश, ध्येय साध्य करण्यास सहाय्य करणारी म्हणून अनिवार्य असणारी तत्वे आहेत. जॉर्ज जेबिडोविक या कॅनेडियन सहकार तज्ञांच्या मते सहकारी संघटनेचे जीवन आणि कार्यवाही यांचे नियमन आणि पोषण करणारी ही तत्वे आहेत.

सहकारी संघटना व सहकार चळवळ या दृष्टीने एक सांघिक शक्ती आपणास आढळते. या शिवाय सहकारी संघटनेच्या यशासाठी आवश्यक असलेले अनेक नियम आणि बंधने विचारात घेतली पाहिजेत. याच उद्देशाने चळवळीच्या प्रणेत्यांनी या संघटनांच्या व्यवहारासाठी अनेक नियम ठरवून दिले आहेत. हेच नियम आणि निर्बंध पुढे सहकारी तत्वे म्हणून ओळखली जाऊ लागली. बदलत्या पध्दतीनुसार या तत्वांत कांही बदल अपेक्षित असले तरी मूलभूत तत्वांपासून ते फारसे दूर जाऊ शकत नाहीत. सहकारी चळवळीच्या योग्य वाढीच्या दृष्टीने आणि कार्यक्षम कारभाराच्या उद्दीष्टांच्या पुर्तीसाठी या सहकारी तत्वांना अनुसरुन सहकारी संघटनाचा कारभार होणे आवश्यक आहे.

### १.४ भारतातील सहकार चळवळ : प्रारंभ व विकास

१८९५ साली सर फ्रेडरिक निकोलसने सहकारी पतपेढयांचा भारतात प्रथम पुरस्कार केला आणि त्यानंतर सहकारी चळवळीचा विकास हे सहकारी धोरण म्हणून अलग झाले.

"जगातील अन्य देशांतील सहकारी चळवळींप्रमाणेच भारतीय सहकारी चळवळीचा जन्मही दुर्बलांच्या एकजुटीतून, अडचणींचा परिहार करण्याच्या प्रयत्नातून झाला. सहकाराला आपत्तींची आपत्ये असे संबोधले जाते. निरनिराळया देशात निर्माण झालेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आपत्ती व संकटातून सहकाराचा जन्म झाला. आपल्या भारतात सहकाराचा उगम शेतकऱ्याच्या दारिद्रयातून, दुष्काळग्रस्त व रोगग्रस्त परिस्थितीतूनच झालेला आहे. सदैव निकृष्ट राहिलेली शेती व क्षीण होत चाललेले कुटीरोद्योग यामुळे ग्रामीण जनता कर्जाच्या खाईत बुडून गेली होती. शेतीप्रधान भारत हा महाजनांच्या विळख्यात सापडला होता. कर्जात जन्म, कर्जात जीवन आणि कर्जात मृत्यू असे भारतीय शेतकऱ्याचे

वर्णन यथार्थपणे केले जात होते. ब्रिटीश राजवटीत ही प्रक्रिया अधिकच वेगाने चालू होती. या वास्तविकतेचा परिणाम दक्षिण भारतातील असंतुष्ट कर्जबाजारी शेतकऱ्यांवर झाला व परिणामतः रोखे फोडीची मोहिम सरकारला १८७९ मध्ये मंजूर करावी लागली. १८८३ चा जमीन सुधारणा कायदा (लॅण्ड इम्प्रूव्हमेंट ॲक्ट) व १८८४ चा शेतकी कर्ज कायदा (ॲग्रिकल्चरल लोन्स ॲक्ट) सरकारने अमलात आणला. त्याआधी १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट शेतकऱ्यांना सुट देण्यासाठी मंजूर करण्यात आला होता"[११].

सर निकोलस यांच्या भगीरथ प्रयत्नामुळेच १९०२ साली सहकारास कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले. इंग्लंडमधील फ्रेंडली सोसायटीज ॲक्टच्या धर्तीवरच हा कायदा करण्यात आला तो मार्च १९०४ रोजी संपूर्ण हिंदूस्थानात अंमलात आला. या कायद्यातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे होत्या-

(१) एकाच गावात राहणारे, एकाच वर्गाचे कोणतेही दहा लोक काटकसर आणि स्वावलंबनाच्या हेतूने सहकारी संस्था स्थापन करु शकतील.

(२) ठेवी जमा करणे व कर्ज वाटप करणे हे त्यांचे मुख्य कार्य राहिल.

(३) या ग्रामीण संस्थांची जबाबदारी अमर्यादित राहिल व त्यांच्या सभासदांपैकी ४/५ सभासद शेतकरी असले पाहिजेत.

(४) होणाऱ्या फायद्यातून लाभांश न वाटता तो गंगाजळीत जमा करावयाचा व अशी पुरेशी रक्कम जमल्यावर त्याचे बोनस शेअरमध्ये रुपांतर करावयाचे.

या कायद्यात इतरही अनेक तरतूदी होत्या. पण त्या काळातील विचारप्रवाहाची दिशा कळण्याच्या दृष्टीने वरील माहिती पुरेशी आहे.

### १.५ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकार चळवळ

१९०४ ते १९१२ ही भारतीय सहकारी चळवळीची प्रायोगिक अवस्था मानली जाते. या काळातील सहकारी संस्थांची संख्यात्मक प्रगती पुढे दिली आहे.

**तक्ता क्र. १.१**

| वर्ष | पतपेढयांची संख्या | सभासद (हजारात) | भांडवल (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| १९०६-०७ | ८४३ | ९०.८४ | २३.७२ |
| १९१०-११ | ५३२१ | ३०५.०६ | २३०.०५ |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, पतपेढयाची प्रगती वेगाने झाली आहे.

त्यापुढेच १९१२ मध्ये नवीन अधिक व्यापक व सुधारीत कायदा करण्याची गरज भासली. पतपेढयांशिवाय अन्य प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्याची परवानगी १९१२ च्या कायद्यान्वये

देण्यात आली. हे सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने पुढचे पाऊल होते यात शंका नाही. त्यामुळे खरेदी विक्री सहकारी संस्था, ग्राहक भांडारे स्थापन होण्यास चालना मिळाली. १९११-१२ ते १९१७-१८ या कालावधीत सहकारी क्षेत्राची संख्यात्मक प्रगती पुढील तक्यावरुन लक्षात येते.

**तक्ता क्र.१.२**

| वर्ष | पतसंस्थांची संख्या | सभासद (लाखात) | खेळते भांडवल (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| १९११-१२ | ८१७७ | ४.०० | ३३५.०७ |
| १९१७-१८ | २५१९२ | १०.०९ | ७६०.०९ |

"१९०८ मध्ये रॉयल कमिशन ऑफ ॲग्रिकल्चर नेमण्यात आले. ही भारतीय शेती विकासाच्या दृष्टीने महत्वाची घटना होती. सन १९११ मध्ये कै.सामळदास यांच्या प्रयत्नाने मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली. तसेच सहकार हा विषय केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे देण्यात आला. १९१८-१९ ते १९२८-२९ या दहा वर्षात सहकारी चळवळीची वाढ वेगाने झाली आहे"[१२].

## १.६ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशात अग्रेसर आहे विविध आर्थिक क्षेत्रांमध्ये सहकारी चळवळीने यशस्वीपणे पदार्पण केले आहे. महाराष्ट्रातील काही सहकारी संस्थानी केलेली प्रगती अत्यंत स्पृहणीय व नेत्रदीपक असून या चळवळीचे कार्य इतर राज्यांतील सहकारी संस्थांना अनुकरणीय आहे. सहकारी संस्था या व्यावसायिक संघटना असल्या तरी सामाजिक बांधिलकी व समाज परिवर्तनाचे उदिष्ट त्याच्यासमोर असते. व्यवसाय तत्वे व सहकारी संस्था यशस्वी करण्याचे कार्य अत्यंत कठीण आहे. सहकारी चळवळीला अनेक अडचणींतुन मार्ग काढून आपले कार्य करावयाचे आहे. हितसंबंधी लोकांपासून तिचे संरक्षण करुन समाजातील दुर्बल घटाकांच्या व मागासलेल्या घटकांच्या कल्याणसाठी सहकारी चळवळ समर्थ बनविणे आवश्यक आहे व या दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील चळवळीचे कार्य अभिमानास्पद आहे.

"महाराष्ट्र सन २०११ अखेर एकूण १,४६,६४१ सहकारी संस्था असून त्यांची सभासद संख्या ३.८६ कोटी आहे. या संस्थांचे भरणा केलेले भाग भांडवल ४,२२४७, कोटींचे असून महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांचे स्वनिधी रुपये ७,०००/- कोटींच्यावर आहेत. विविध प्रकारच्या संस्थाकडे ३३.१५४ कोटींच्यावर ठेवी होत्या. या संस्थाचे खेळते भांडवल रुपये ६४,१३६ कोटी रुपयांचे असून त्या संस्थांकडून रुपये १८,९३४ कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. यावरुन महाराष्ट्रातील सहकारी संस्थांनी लोकांचा मोठया प्रमाणावर विश्वास संपादन केला आहे हेच स्पष्ट आहे. शेती विकासामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने केलेले कार्य नेत्रदीपक आहे. शेतीसाठी आवश्यक असणारा सर्व प्रकारचा भांडवल पुरवठा

मोठया प्रमाणावर सहकारी संस्थांनी उपलब्ध करुन दिलेला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी सोडविलेल्या आहेत. शेती कर्जपुरवठा क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अग्रणी आहे"[१३].

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने राज्याच्या विशेषतः ग्रामीण भगाच्या समाजिक व आर्थिक विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे सुरुवातीला ही चळवळ प्रामुख्याने कृषी पतपुरवठयाच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. त्यानंतर ही चळवळ शेतमाल प्रक्रिया, शेतमाल पणन, ग्रामीण भागातील उद्योग, ग्राहक भांडारे सामाजिक सेवा, आदीसाखरख्या क्षेत्रात वेगाने पसरली.

## १.७ सहकारी चळवळीचा भविष्यकाळ आणि आवश्यकता

सहकारी चळवळीने सभासदांचा कर्जबाजारीपणा कमी करुन त्यांच्या गरीबीचे निरसन करण्यास जशी मदत केली आहे, तसेच व्याजाचे दर खाली आणणे, जमिनीचे एकत्रीकरण, बचत आणि उत्पादकता वाढविणे, स्वस्त किंमतीस जीवनावश्यक वस्तुंची मदत केली आहे. सहकारी चळवळीमुळे अनावश्यक सामाजिक उधळपट्टीला पायंबद घालणे, समाजातील व्यक्तीचे जीवमान उंचावणे तसेच गरीब दुर्बलांना आशावादी बनविणे, इत्यादीबाबत सहकारी चळवळीचा प्रभाव पडलेला आहे.

१९४५ च्या गाडगीळ समितीने म्हटल्याप्रमाणे सहकारी चळवळीच्या विस्ताराकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. कारण एकंदर ग्रामीण अर्थरचनेच्या आणि त्यातही विशेषतः शेतपुरवठयाच्या प्रश्नांना चळवळीतून उत्तम उपाय सापडू शकेल त्यानंतर जवळजवळ दहा वर्षानंतर ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने भारतातील ग्रामीण पतपुरवठा यावर सविस्तर अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की, सहकार अपयशी झाला आहे. पण तो यशस्वी केलाच पाहिजे. अर्थात भविष्यकाळातील धोरणांचा उद्देश सहकारी चळवळीला यशस्वीपणे कार्य करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे हा असला पाहिजे.

समाजात आजची तातडीची गरज शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वाजवी दराने पुरेसा पतपुरवठा करणे त्याबरोबरच त्यांच्या छोटया जमिनीच्या तुकडयाचे एकत्रीकरण करुन पाणीपुरवठा, पुरक, व्यवसाय, उत्पादन, विक्री, प्रक्रिया यांसाठी सहकारी संस्थांनी कर्जपुरवठा केला पाहिजे ग्रामीण जीवनाशी निगडित असलेल्या अनेक सुधारणा घडवून आणण्याचे कार्यही सहकारी संस्थांना करावे लागेल. त्यासाठी आवश्यक असलेले समाजशिक्षण आणि मतपरिवर्तन घडवून आणण्यात या संस्थांनी पुढकार घेतला पाहिजे. त्यामुळे समाजामध्ये आर्थिक आणि साजाजिक जीवनही सुखद बनेल एकूण समाजामध्ये भरभराटीचे वातावरण तयार होईल.

जर चळवळीला भारतात अपेक्षित प्रमाणात यश मिळालेले दिसत नसेल तर त्याचा अर्थ सहकाराची तत्वे कमकुवत आहेत असे नव्हे तर त्या तत्वांची श्रद्धापूर्वक अंमलबजावणी या देशात झाली नाही. सहकारी चळवळीला आपल्या देशात प्रगती करण्यास भरपूर वाव आहे. "डॉ.ग्यानचंद यांनी

म्हटल्याप्रमाणे सहकार केवळ शाब्दिक नव्हे तर निष्ठापूर्वक रोजच्या व्यवहारात केला तर अतिशय लाभदायी ठरेल. सहकारी क्षेत्रात ज्या विरोधी शक्ती आडव्या येत असतील त्या दूर करणे, सहकारी चळवळीवरील विश्वास प्रकट करणे, सहकारी चळवळीमध्ये काही अपूर्णता आहे ती पूर्ण करणे, शक्य ती मदत करणे, सहकाराला दुसरा योग्य पर्याय नाही. ग्रामीण पुनर्रचनेसाठी वास्तव आणि कायम स्वरुपाचा परिणाम दिसून यावयाचा असेल तर तो सहकारी ध्येयवाद आणि संघटना यांच्या मदतीने साधता येईल"[१४].

सहकारी चळवळीला योग्य मार्गदर्शन व सहानुभूती लाभली तर ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न आणि अडचणी सहज सोडविता येतील.

देशातील बहुसंख्य शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. त्यांच्याकडे पाच एकराहूनही कमी शेती आहे. बाजारात जाऊन शेतमाल विकण्याएवढे अधिक उत्पादन (Marketable Surplus) ते करुच शकत नाहीत. जे काही थोडे उत्पादन विकता येण्यासारखे असते ते चांगल्या बाजार भावासाठी मोठया बाजारात न्यावे लागते. पण वाहतुक सुविधा स्वस्त नसल्याने त्यांना ते परवडत नाही. परिणामतः स्थनिक बाजारपेठेतच या शेतमालाची अतिशय कमी किंमतीस शेतकऱ्यांना विक्री करावी लागते. त्यांच्या शोषणाचे हे चक्र आजही चालू आहे. ग्रामीण कारागीर, हस्तकौशल्य असलेले हस्तकारागीर, वीणकर, इत्यादींचा मोठा वर्ग ग्रामीण व निमशहरी भागात आहे. या लोकांना कर्ज, भांडवल कच्चा माल सहजासहजी उपलब्ध होत नाही.

**महाराष्ट्र सहकार चळवळ**

स्वतंत्र महाराष्ट्राची गेली पन्नास वर्षे विचारात घेता महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्राची घोडदौट स्पष्टपणे नजरेत भरते. १९६० च्या सुमारास महाराष्ट्रात अंदाजे ३०,००० सहकारी संस्था होत्या त्यामध्ये वेगाने वाढ होऊन आज त्यांची संख्या दुप्पटीपेक्षाही जास्त म्हणजे अंदाजे २ कोटी ४० लाखंपर्यंत पोहोचली आहे. १९६० मध्ये राज्यतील सहकारी संस्था देशातील एकूण संस्थांच्या एकदशांश भाग होत्या. परंतु देशाच्या तुलनेने महाराष्ट्रातील सहकारी संस्थंच्या संख्येत अधिक वेगाने वाढ होऊन आज राज्यात देशातील एकूण सहकारी संस्थापैकी सुमारे ३८% संस्था सामावल्या आहेत असे दिसते. सुरुवातीला सहकारी संस्थाचे मिळून सुमारे १ कोटी सभासद होते. आज त्यांची संख्या अंदाजे १० कोटी पर्यंत पोहोचली आहे. १९६० च्या सुमारास या संस्थाजवळ असणारे ३३० कोटी रुपयाचे खेळते भांडवल आज ८०,००० कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे.

देशातील सहकारी क्षेत्राची वाटचाल ही आधुनिक भारतातील नेत्रदीपक घटना आहे. सावकारांकडून कर्जदार शेतकऱ्यांची होणारी पिळवणुक थांबावी म्हणून सुमारे शंभर वर्षापूर्वी ब्रिटिश सरकारने कायदा संमत केला होता. ती भारतातील सहाकाराची सुरुवात होती असे म्हणता येईल. सहकारी

संस्थांचा पहिला कायदा भारतात १९०४ साली संमत झाला, १९१२, १९१९, १९२५ या वर्षामध्ये त्यात सुधारण झाल्या गेल्या सुमारे ६०-७० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रात नामदार गोखले, तात्यासाहेब केळकर, वैकुंठभाई मेहता, दे.गो.कर्वे, विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, मा.ना. शरदचंद्रजी पवार, मा.आ. गणपतराव देशमुख, मा.मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, मा. आ. विजयसिंह मोहिते पाटील, मा.मंत्री अजितदादा पवार, विनय कोरे, अमरीशभाई पटेल, कल्लप्पा आवाडे अशासारख्या व्यक्तींचे समर्थ नेतृत्व सहकारी चळवळीस लाभले. प्रवरानगर-लोणी येथे सहकारी क्षेत्रातील देशातील पहिला सारखा कारखाना १९४८ साली काढण्याचे श्रेयही राज्यास मिळाले. विकासात सर्वांना समान हक्क देणारी, लोकशाही तत्वांचे पालन करणारी, दुर्बल घटकांना वरदान असणारी सहकारी चळवळ ही भारतातील गौरवपूर्ण घटना आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी बँका, नागरी सहकारी बँका यांच्या रुपाने राज्यातील ही सहकारी चळवळ भारतात आघाडीवर आहे. गेल्या ५० वर्षात सहकाराचा आकृतिबंध विस्तृत पायावर विस्तारीत झालेला आढळून येतो. १९६० मध्ये एकूण सहकारी संस्थापैकी सुमारे ६०% वाटा शेतकरी सहकारी पतसंस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचा होता. सहकारी चळवळ म्हणजे शेतकऱ्यांना कर्ज देणारी संस्था एवढेच त्याचे स्वरुप होते. परंतु पुढे हे चित्र बदलले बॅकींगबरोबर उत्पादन सेवा अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकाराने शिरकाव केला व आपला ठसा उमटविला. खेड्यातील प्राथमिक सहकारी संस्थांच्या बरोबरीने आज नागरी बँका, पतसंस्था, पणन, साखर उत्पादन, सूत गिरणी, विणकाम, घरबांधणी, डेअरी, औद्योगिक सहकारी बँक, उपसा सिंचन, मच्छिमार, मजुरसेवा, मुद्रण अशा कितीतरी क्षेत्रांमध्ये काम करीत आहेत. शेतकी सहकारी पतसंस्थेचे एकूणातील प्रमाण आज कमी होऊन ते २८% वर आले आहे. राज्यातील सहकारी चळवळीचे विविधीकरण झाले आहे व ती आता अधिक स्थिर पायावर उभी आहे असे यावरुन म्हणता येईल राज्यातील प्रत्येकाचा या-ना-त्या रुपाने सहकारी संस्थेशी संबंध येतो व संस्थेच्या कामकाजात स्वतः भाग घेण्याची प्रत्येकास संधी मिळते. मग ती पतसंस्था किंवा नागरी सहकारी किंवा घरबांधणी संस्था किंवा इतर कोणीतीही संस्था असो. १९७० नंतर व्यापारी बँकांनीही सहकारी बँकाच्या विकासास हातभार लावला आहे. सहकारी क्षेत्रास भांडवल पुरवून कर व नोंदणी शुल्कात सवलती देऊन शासनानेही या क्षेत्राच्या विकासास आग्रक्रम दिला आहे. सरकारचे अनुकूल धोरण, सबसीडी, तारणाऐवजी व्यक्तीच्या उपक्रमशीलतेवर भर, कर्ज उत्पादन विक्री, यांची घातलेली सांगड अशा कारणामुळेच सहकारी क्षेत्राने आज एवढी मजल मारली आहे. अशिक्षित निराधार व्यक्ती समाजातील दुर्बल घटकांना सहकारी क्षेत्र हे वरदान ठरले आहे.

## १.८ सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल

आधुनिक काळात देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे व झालेला विकास टिकवून ठेवणे याला फार महत्व प्राप्त झाले आहे. काही देश विकसित आहेत. उदा. अमेरिका, इंग्लंड, जपान, जर्मनी, इस्त्राईल इ. तर काही देश विकसनशील म्हणजे विकासाच्या मार्गावर आहेत. उदा. भारत, पाकिस्थान, चीन इ. अविकसित देशांचा आर्थिक विकास साध्य करताना औद्योगिकीकरणाला जास्त महत्व द्यावे लागते. भारताचा विचार केला तर स्वातंत्र्यपूर्व काळात औद्योगिकरणाच्या वाढीचा वेग कमी होता परंतू स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र औद्योगिकीकरणावर भर देण्यात आला. औद्योगिकीकरणाबरोबर सहकार या क्षेत्राला देखील महत्व देण्यात आले.

आज जगात देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी बहुतेक देशात सहकार चळवळ रूजलेली आढळते. उदा. इंग्लंड, जर्मनी, डेन्मार्क, रशिया, चीन, जपान, इस्त्राईल, भारत, इ. सहकारी चळवळीने देशाचा आर्थिक विकास होण्यास मोठया प्रमाणात मदत होत आहे. सहकारामुळे मोठे उद्योग, लघु उद्योग, प्रक्रिया उद्योग, सहकारी शेती, विपणन, मच्छेमारी, इ. प्रकारच्या उद्योगात आधुनिकीकरण करता आले. तसेच सहकारी तत्वावर बँका, शिक्षण संस्था, विमा, साखर उद्योग, वस्त्रोद्योग, सूत गिरण्या यांनी भारतात मोठया प्रमाणात प्रगती केल्याने देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या पातळीला पोहचली आहे.

सहकार व औद्योगिकरणापासून देशाला विविध फायदे मिळत असतात. विशेषतः आयात - निर्यातीत वाढ, दरडोई उत्पन्नात वाढ, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, रोजगार निर्मिती, गुंतवणूकीत वाढ, बँकांची प्रगती, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, विदेशी चलनात वाढ, असे अनेक फायदे देशाला होत असतात. थोडक्यात अलिकडे सहकाराशिवाय आर्थिक विकास अशक्य झाला आहे. भारतात विशेषतः सूती कापड उद्योग एक संघटीत व मोठा उद्योग म्हणून ओळखला जातो.

## १.९ भारतातील सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल :-

औद्योगिकरणामध्ये विशाल उद्योगधंदे महत्वपूर्ण समजले जातात. सहकारी क्षेत्रात लघु व विशाल उद्योगधंदे महत्वाचे समजले जातात. सन १८४४ मध्ये रॉश्लेड येथील गरीब विणकऱ्यांनी सहकारी तत्वावर ग्राहक सहकारी संस्था सुरू केली. रॉश्लेड मधील विणकऱ्यांच्या संस्थेचा आदर्श घेऊन १८६२ नंतर अमेरिकेत ग्राहकवादाच्या चळवळीने जोर धरला. नंतर मात्र उभोक्त्यांना संरक्षण देणारे कायदे निरनिराळया देशात मंजूर होऊ लागले. अशाप्रकारे सहकारी चळवळीला सर्व देशांच्या अर्थव्यवस्थेत महत्व प्राप्त झाले.

भारतात स्वातंत्र्यापूर्वीच सहकाराला सुरूवात झालेली होती. १८९१ मध्ये पंजाब मध्ये सहकाराला प्रारंभ झाला. परंतू १९०४ च्या सहकारी कायद्यान्वये कायदेशिरपणे सहकारी संस्थांचा कारभार सुरू झाला.

सन १९०४ पूर्वी भारतात काही थोडया सहकारी संस्था होत्या. परंतू त्यांना मूर्त स्वरूप सन १९०४ व सन १९१९ च्या कायद्यानेच प्राप्त झाले.

वस्त्र उद्योग हा देशातील मोठा उद्योग आहे. या उद्योगाची सुरूवात १८१८ मध्ये झाली. कलकत्त्याजवळील फोर्ट ग्लास्टर येथे पहिली सूत गिरणी सुरू झाली. १८५४ मध्ये मुंबई येथे पहिली कापड गिरणी सुरू झाली आणि त्यानंतर या उद्योगाच्या विकासाला प्रारंभ झाला. मुंबईच्या पाठोपाठ अहमदाबाद, नागपूर, सोलापूर येथे कापड गिरण्या सुरू झाल्या आणि त्यानंतर अनेक ठिकाणी सूती कापडगिरण्या सुरू होऊन या संघटीत उद्योगाचा विकास झाला.

भारतातील सूतीवस्त्र उद्योग खाजगी क्षेत्रात व सहकारी क्षेत्रात कार्यरत आहेत. प्रत्येक राज्यात कापड गिरण्या असल्या तरी महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या चार राज्यात देशातील सूती कापड गिरण्यापैकी शेकडा ७० टक्के गिरण्या आहेत. त्यातही महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये सूतीवस्त्र उद्योगाचे केंद्रीकरण झालेले असून देशातील एकूण मागाच्या शेकडा ७० माग या राज्यात आहेत. या उद्योगात सध्या एक हजार कोटी रूपयांचे भांडवल गुंतलेले असून सुमारे पस्तीस लाख लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. शिवाय या उद्योगावर देशातील तीन कोटीपेक्षा अधिक विणकर आपल्या चारीतार्थासाठी अवलंबून आहेत. कापड उत्पादनाच्या बाबतीत भारताचा जगात तिसरा क्रमांक असून कापड निर्यातीत दुसरा क्रमांक लागतो. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत या उद्योगाला महत्वाचे स्थान आहे.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून जरी ब्रिटीशांनी हा उद्योग उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला असला तरी देखील स्वातंत्र्योत्तर काळात भारताने या उद्योगाच्या प्रगतीकडे विशेष लक्ष पुरविले आहे. उत्पादनाच्या स्थूल मूल्यांच्या दृष्टीकोनातून जरी विचार केला तरी हा उद्योग महत्वाचा समजला जातो. या उद्योगाच्या प्रगतीकडे दृष्टीक्षेप टाकल्यास असे दिसून येते की, १८५४ मध्ये एक कापड गिरणी तर सन २०११ पर्यंत १८२२ कापड गिरण्या स्थापन करण्यात आल्या होत्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या उद्योगाची प्रगती तक्ता क्रमांक १.३ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १.३**

**भारतातील सूती कापड गिरण्यांची प्रगती**

**(खाजगी व सहकारी)**

| वर्ष | सूती कापड गिरण्यांची संख्या (खाजगी व सहकारी) | सूती धागा को. कि.ग्रा. | गिरणी क्षेत्र | सूती वस्त्र विकेंद्रीत क्षेत्र | को. मी. एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९४७ | ३८९ | ५९.७ | --- | --- | ३५०.० |
| १९५०-५१ | ३७८ | ५३.४ | ३४०.१ | ८१.४ | ४२१.५ |
| १९६०-६१ | ४७९ | ८०.१ | ४६३.९ | २०८.९ | ६३७.८ |
| १९७०-७१ | ६२५ | १०१.६ | ४१६.२ | ३६१.० | ७७७.२ |
| १९८०-८१ | ७१० | १२९.८ | ४१६.४ | ५४७.४ | ९६३.८ |
| १९८५-८६ | ९५५ | १४७.३ | ३३७.७ | ९१२.२ | १२४९.९ |
| १९९०-९१ | ९५५ | १५०.० | ३०२.७ | ९९७.० | १२९९.७ |
| २०००-०१ | १०५० | १७५.० | ३५०.८ | ११०६.० | १४०४.० |
| २००७-०८ | ११९० | २४०.०० | ४२०.२ | १४२२.० | १६६३.० |
| २०१०-११ | १८२२ | ५३०.०० | ६००.०१ | १४२१.० | २०२१.० |


**आधार :-** डॉ. दि. के. देशपांडे, औद्योगिक अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

वरील तक्ता क्रमांक १.३ वरून स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः १९५१ नंतर सूती कापड गिरण्यांची संख्या वाढत असल्याचे दिसते. १९५०-५१ ते १९६०-६१ या काळात सूती कापड गिरण्या कापूस टंचाईमुळे बंद पडल्यामुळे सूती कापड गिरण्यांची संख्या कमी झाली. तसेच सूती धागा व कापडाचे उत्पादनही कमी झाले, परंतु त्यानंतर मात्र सूती कापड गिरण्यांच्या संख्येत, उत्पादनात सातत्याने वाढ होत गेल्याचे आढळून येते. तसेच या उद्योगातील गिरणी क्षेत्र आणि विकेंद्रीत क्षेत्र यांच्या प्रगतीची कल्पना वरील तक्त्यावरून येते. तुलनात्मक दृष्ट्या गिरणी क्षेत्रापेक्षा विकेंद्रीत क्षेत्राची प्रगती अधिक झालेली दिसते. गिरणी क्षेत्रातील उत्पादन सन १९६०-६१ पासून कमी होत असल्याचे आढळते. तर विकेंद्रीत क्षेत्रातील उत्पादन सुरूवातीपासूनच वाढत असल्याचे दिसते. सन १९५०-५१ ते सन २०१०-११ च्या साठ वर्षाच्या कालावधीत गिरणी क्षेत्रात चढ-उतार झाल्याचे दिसते तर विकेंद्रीत क्षेत्रात झालेली वाढ जवळ जवळ सतरा पट आहे. यावरून भारताच्या कापड उद्योगात विकेंद्रीत क्षेत्राने महत्वाचे स्थान पटकावले आहे हे स्पष्ट होते.

"भारतातील सूती कापड उद्योग एक अतिमहत्वाचा उद्योग असल्यामुळे या उद्योगाच्या विकासाला महत्व आहे. मनुष्याच्या तीन मुलभूत गरजांपैकी वस्त्र ही एक गरज असल्यामुळे देशातील सर्व लोकांना

पूरेसे वस्त्र उपलब्ध होणे अत्यावश्यक असते. त्याकरीता भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सहकारी क्षेत्राच्या विकासास मोठया प्रमाणात सुरूवात झाली. भारताच्या लोकशाही नियोजनात सहकारी चळवळीला महत्व प्राप्त झालेले होते. अर्थव्यवस्थेत प्रत्येक महत्वाच्या क्षेत्रात सहकारी तत्वाला प्राधान्य दिलेले आहे. तसेच सहकारी क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबविण्यात आले. तिसऱ्या योजनेपासून नियोजित विकासाला सुरूवात झाली. औद्योगिक विकासाला सुरूवात झाल्याने तसेच देशातील लोकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी उद्योगधंदे स्थापन करणे आवश्यक होते. त्यावेळेस वस्त्रोद्योगाला महत्वाचे स्थान होते. या उद्योगातून मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला होता. तसेच विदेशी चलन देखील मोठया प्रमाणात मिळत होते. वस्त्रोद्योगांची प्रगती करणे गरजेचे होते परंतू वस्त्रोद्योगाला लागणारा कच्चा माल म्हणजे कापूस व सूत मोठया प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक होते. परंतू फाळणीमुळे कापूस पिकविणारा सिंधचा प्रांत पाकिस्तानच्या वाट्याला गेला त्यामुळे भारतात कापूस टंचाई भासू लागली. तसेच काही दलाल व व्यापाऱ्यांनी साठेबाजी करायला सुरूवात केल्याने वस्त्रोद्योगासमोर अडचणी येऊ लागल्याने याला पर्याय म्हणून सहकारी तत्वावर सहकारी सूत गिरण्या स्थापन करणे आवश्यक झालेले होते"[१५]. भारतातील वस्त्रोद्योगाची रचना खालील प्रमाणे आहे.

**भारतातील वस्त्रोद्योगाची रचना**




स्वातंत्र्यानंतर सरकारच्या प्रतिकूल धोरणामुळे कापड उद्योगाची पिछेहाट झाली होती. संघटीत क्षेत्रातील कापड उत्पादन सन १९५०-५१ मध्ये ७९ टक्के होते मात्र १९९०-९१ मध्ये कापड उत्पादनात १३ टक्के इतकी प्रचंड प्रमाणात घट झाली. ही घट होण्यामागे देशातील अनेक कारणे आहेत. कापड उत्पादन करणाऱ्या गिरण्यामधील कामगारांचे संप, अकार्यक्षम व्यवस्थापन, भ्रष्टाचार या कारणाने अनेक कापड

गिरण्या या कालावधीत बंद पडल्या तर काही गिरण्या आजारी म्हणून घोषीत केल्या. त्यामुळे मोठया प्रमाणात कापड उत्पादनात घट झाली.

मात्र असंघटीत क्षेत्रात कापड उत्पादन सन १९५०-५१ मध्ये २१ टक्के इतके होते तर सन १९९०-९१ मध्ये ते ८७ टक्के पर्यंत प्रचंड प्रमाणात वाढले. ही वाढ असंघटीत क्षेत्राला सरकारचे अनुकूल धोरण, कर, सवलती, कार्यक्षम व्यवस्थापन, निर्यातीस प्रोत्साहन, वित्त सहाय्य अशा अनेक कारणांनी असंघटीत क्षेत्रातील उत्पादनात वाढ होत गेली.

सध्या संघटीत क्षेत्रातील सूत गिरण्याकडे असंघटीत क्षेत्रातील हातमाग, यंत्रमाग, या उद्योगातून मोठया प्रमाणात सूताची मागणी वाढत आहे. त्यामुळे सहकारी सूत गिरण्यांच्या संख्येत वाढ होत आहे. ती खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. १.४**

**भारतातील सहकारी सूत गिरण्यांची वाढ**

| अ.क्र. | वर्ष | सहकारी सूत गिरण्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | १९५४ | ९ |
| २. | १९६२ | ३३ |
| ३. | १९७२ | ५३ |
| ४. | १९८२ | ६३ |
| ५. | १९९२ | ११३ |
| ६. | २००७ | २२२ |
| ७. | २०११ | २८० |

**आधार :-** श्री नरसिंह गोपाळ देवधर - सूती वस्त्रोद्योगछ पृष्ठ क्रमांक ७०, महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, सचिवालय, मुंबई.

वरील तक्ता क्रमांक १.४ असे दिसून येते की, स्वातंत्र्यानंतर सहकारी सूत गिरण्याची संख्या १९५४ मध्ये फक्त ९ इतकी होती. मात्र १९६० नंतर सहकारी सूत गिरण्यांच्या संख्येत सतत वाढ होत आहे. ही वाढ सन २०११ अखेर सहकारी सूत गिरण्याची संख्या २८० वर गेली. ही वाढ होण्यास औद्योगिक धोरणांमध्ये मोठया उद्योग क्षेत्रात सहकारी क्षेत्राला प्राधान्य दिले गेले. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची स्थापना (N.C.D.C.) केलेली आहे. ही संस्था सहकारी सूत गिरण्यांना व्यवस्थापन विषयक मार्गदर्शन व वित्तविषयक गरजांची पूर्ती करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तसेच महत्त्वाचे कारण १९६४ मध्ये स्थापन झालेल्या ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह स्पिनिंग मिल्स लिमिटेड या संस्थेची

स्थापना करण्यात आली. तेव्हापासून ही संस्था फेडरेशन मार्फत भारतातील सहकारी सूत गिरण्यांना तांत्रिक तसेच व्यवस्थापनविषयक मार्गदर्शन देण्याबरोबर त्यांच्या निकोप विकासाबाबतीतील समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे सहकारी सूत गिरण्यात वाढ होत आहे. सहकारी सूत गिरण्यातून आज मोठया प्रमाणात सूताची निर्यात होत आहे. तसेच या गिरण्या ग्रामीण भागात स्थापन झाल्याने ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झालेली आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी सूत गिरण्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

## १.१० महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांचा विकास :-

देशाच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या अर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान मोठे आहे. १९०४ च्या सहकारी संस्थाविषयक कायद्याने भारतात व महाराष्ट्रात सहकारी चळवळीची सुरूवात झाली मात्र अखिल भारतीय ग्रामीण पत पुरवठा पाहणी समितीच्या १९५४ च्या शिफारशी अमलात आणल्यानंतरच सहकार चळवळीला गती प्राप्त झाली.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. पहिले मुख्यामंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली नव महाराष्ट्र संघटीत होऊ लागला. त्याच बरोबर सहकाराची क्षितिजे रुंदाऊ लागली. ६० वर्षात सर्वच क्षेत्रात सहकाराची तत्वे आज वापरली जातात. सहकारामुळे राज्यात सहकारी तत्त्वावर साखर कारखाने, सूत गिरण्या, भात गिरण्या, प्रक्रिया उद्योग, शिक्षण संस्था, बँका इत्यादी सर्वच क्षेत्रात सहकाराचा अवलंब केलेला आहे. ग्रामिण विकास होण्यास सहकारी क्षेत्र महत्वाचे ठरलेले आहे.

महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ९.६९ कोटी होती. १ मार्च २०११ रोजी महाराष्ट्राची प्रक्षेपित लोकसंख्या सुमारे १०.८० कोटी होती. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३.०८ लाख चौ. कि. मिटर आहे तर भारताचे भौगोलिक क्षेत्रफव ३२.८ लाख चौ.कि.मिटर आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या आणि क्षेत्रफळ देशाच्या (भारताच्या) तुलनेत सुमारे १० टक्के आहे. सहकारी क्षेत्र विस्तारात महाराष्ट्राचा भारतात पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्र राज्यात सन २०१०-११ मध्ये पाऊस सरासरीपेक्षा ९ टक्के जास्त पडल्याने कृषी उत्पादनात वाढ झालेली आहे. तसेच सन २०१०-११ मध्ये देखील राज्यात पाऊस अधिक झाल्याने कृषी उत्पादन वाढलेले आहे. सन २०१०-११ मध्ये कृषी उत्पादन १५२.८५ लाख मे. टन झालेले आहे. हे उत्पादन सन २००६-०७ च्या तुलनेत २० टक्क्यांनी जास्त आहे. तसेच कापसाचे उत्पादन सन २०१०-११ मध्ये ५८.१५ लाख गासाडया झाले असून ते आधीच्या वर्षाच्या तुलनेत २६ टक्क्यांनी अधिक आहे.

महाराष्ट्रात आकोला, कोल्हापूर, सांगली, नागपूर, वर्धा, अमरावती, लातूर, सोलापूर, विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असल्याने या जिल्ह्यात सहकारी

सूत गिरण्या व वस्त्रोद्योग स्थापन झालेले आहेत. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६१ व्या फेरीनुसार सन २००४-०५ मध्ये संकलीत केलेल्या आकडेवारीनुसार विविध क्षेत्रातील रोजगार ४३२ लाख होता. कृषी व संलग्न क्षेत्रात सर्वात जास्त २४२ लाख (५६ टक्के) रोजगार होता. त्यामुळे कृषी व सहकारी क्षेत्रामुळे अधिक रोजगार उपलब्ध झालेला आहे.

राज्यात सहकारी चळवळीचा उदय प्रामुख्याने शेतकऱ्यांची सावकारी शोषणातून सुटका करण्यासाठी झाला. शेतीला कर्ज पुरवठा करणे हेच आरंभी सहकारी संस्थांचे मुख्य कार्य होते. परंतू नंतर शेतमाल साठवण, खरेदी-विक्री, प्रक्रिया उद्योग, नागरी पतपुरवठा, ग्राहक भांडार इत्यादी सारख्या अनेक व्यावसायामध्ये सहकार चळवळ यशस्वी झाली. साखर कारखाने आणि सूत गिरण्या, दूध उत्पादक संस्था सारखे मध्यम आकाराचे उद्योग ग्रामीण भागात सहकारी तत्त्वानुसार सुरू झाल्यामुळे महाराष्ट्राचे चित्र बदलले आहे.

महाराष्ट्राच्या औद्योगिक रचनेत कापड उद्योग हा महत्त्वाचा उद्योग समजला जातो. या उद्योगाला लागणारा कच्चा माल हा कापूस (सूत) आहे. त्यामुळे सूताचा पुरवठा चांगल्या प्रकारे होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी कापड गिरण्या आहेत. राज्यात वस्त्रोद्योग मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. या उद्योगात रू. १३०५५ कोटी भांडवल गुंतलेले आहे. तसेच या वस्त्रोद्योगात ९,८,९६५० कोटी रोजगार उपलब्ध झालेला आहे. भारतातील ५० टक्के हॅन्डलूम व पावर लूम (हातमाग व यंत्रमाग) महाराष्ट्र राज्यात आहेत. यांना लागणारा कच्चा माल म्हणून सूताची आवश्यकता आहे. तसेच राज्यात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. कापसापासून सूत तयार करावे लागते. या सर्व प्रक्रिया खाजगी क्षेत्रात असल्यास शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्यांची अडवणूक व फसवणूक होते. तेंव्हा यातून मार्ग काढण्यासाठी सहकारी तत्त्वावर कापूस प्रक्रिया संस्था स्थापन करण्याची आवश्यकता असल्याने यातूनच सहकारी सूत गिरण्या स्थापन झालेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यात १६७ सहकारी सूत गिरण्या कार्यरत आहेत. या सर्व सूत गिरण्यातून १ कोटी रोजगार उपलब्ध झालेला आहे. राज्यात पहिली सहकारी सूत गिरणी सन १९६० मध्ये इचलकरंजी येथे सुरू झालेली आहे. महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणात हातमाग (हॅन्डलूम) व यंत्रमाग (पावरलूम) आहेत. इचलकरंजी, मुंबई, भिवंडी, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या शहरातील व जिल्ह्यातील हवामानामुळे मोठया प्रमाणात हातमाग व यंत्रमाग चालू आहेत. सन १९५५ मध्ये सरकारने यंत्रमागावर अबकारी कर बसविल्याने या उद्योगात अनेक नविन प्रश्न निर्माण झाले. अबकारी कराचे प्रमाण दरवर्षी वाढू लागले. मध्यंतरीच्या काळात कंपोझीट गिरण्यावर लादलेली ४० टक्के कपात रद्द केली. त्यामुळे या गिरण्याकडून हातमाग व यंत्रमागांना होणारा सूताचा पुरवठा अनियमित व अपूरा तर होऊ लागलाच पण जादा पैसे

देऊनही चांगले सूत मिळेना. इचलकरंजीला सूताचा पूरवठा सर्वस्वी मुंबई, अहमदाबाद, कोईमतूर येथून होत राहिला. सूताचे एजंटस्, दलाल व पेढया या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन छोटया यंत्रमागधारकांची पिळवणूक करीत. सूत पुरवठयावर त्यांची मक्तेदारी निर्माण झालेली होती. यावर उपाय म्हणून इचलकरंजीमध्ये सहकारी तत्वावर एक सूत गिरणी चालविण्याचा नवा विचार पुढे आला.

महाराष्ट्र राज्य सरकारने नेमलेल्या पावरलूम इन्क्वायरी कमिटीने (यंत्रमाग चौकशी समिती) पावरलूम (यंत्रमाग) हा टेक्स्टाईल (वस्त्रोद्योग) धंदयातील एक स्वतंत्र घटक असून महाराष्ट्रातील ग्रामीण रोजंदारीचा प्रमुख आधारस्तंभ असल्याचे आपल्या अहवालात नमूद करून राज्य सरकारने हातमाग व यंत्रमाग असलेल्या ठिकाणी सहकारी पद्धतीची प्रोसेस हाऊस (प्रक्रिया प्रकल्प/ गृह) व सूत गिरण्या स्थापन करण्याची शिफारस केली.

समितीच्या शिफारशीचा फायदा घेऊन डिसेंबर १९६० मध्ये डेक्कन को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल लिमिटेड, इचलकरंजी या संस्थेची स्थापना झाली. पुढे १९६२ मध्ये त्यावेळचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते डेक्कन सूत गिरणी कार्यान्वित झाली. महाराष्ट्र राज्यात पहिली सहकारी सूत गिरणी डेक्कनच्या स्वरूपात सुरू झाली. तसेच राज्यात सहकारी सूत गिरणीचा पाया डेक्कननेच रोवला आहे. या सूत गिरणीचा आदर्श समोर ठेवून पुढे १९६१-६२ नंतर सहकारी तत्वावरील अनेक सूत गिरण्या चालू झालेल्या आहेत. पुढे मग नागपूर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातूर अशा अनेक जिल्ह्यात सहकारी सूत गिरण्या स्थापन झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात मार्च २०११ अखेर १६७ सहकारी सूत गिरण्या आहेत. त्यांचा सविस्तर तपशील तक्ता क्रमांक १.५ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक १.५**

**महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांचा तपशील**

| **अ. क्र.** | **तपशील** | **सन २०११ ची परिस्थिती** |
|---|---|---|
| **१.** | गिरण्यांची संख्या | १६७ |
| **२.** | त्यापैकी उत्पादन चालू असलेल्या | ५९ |
| **३.** | सभासद | ५.२३ |
| **४.** | भाग भांडवल | १११४ |
| **५.** | त्यापैकी राज्य शासनाचे | ७१६ |
| **६.** | चात्यांची संख्या (लाखात) | १३.७४ |
| **७.** | उत्पादीत सूताचे मूल्य (कोटी) | १०१६ |

**आधार :-** महाराष्ट्र आर्थिक पाहणी सन २०१०-११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन (तक्ता क्र. ८.२२) पान न. १२२

वरील तक्ता क्र. १.५ वरून दिसून येते की, सूत गिरण्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. सन २०११ मध्ये १६७ सहकारी सूत गिरण्यांपैकी ५९ गिरण्यात उत्पादन चालू आहे. सभासद संख्या ५.२३ लाख आहे. सर्व सूत गिरण्यांचे भाग भांडवल १११४ कोटी आहे. त्यापैकी ६० टक्के (७१६ कोटी) भाग भांडवल महाराष्ट्र शासनाचे आहे. तसेच १३.७४ लाख चात्यावर उत्पादन सुरू आहे. तर उत्पादीत सूताचे मूल्य १०१६ कोटी रूपये आहे. तपशीला वरून असे दिसून येते की, सूत गिरणीच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. महाराष्ट्रात प्रारंभापासून यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, प्रा. धनंजयराव गाडगीळ, कल्लप्पा आवाडे, पद्मश्री विखे पाटील, तात्यासाहेब कोरे यासारख्या महर्षिंनी सहकारी चळवळीला धडाडीचे नेतृत्व पूरविले. तसेच देशापुढे एक यशस्वी सहकारी चळवळीचा आदर्श घालून दिलेला आहे. सहकारी सूत गिरण्यामुळेच सहकार महर्षी कल्लप्पा आवाडे यांना सहकार महर्षी ही पदवी मिळालेली आहे. त्याच मार्गाने आज देखील देशातील सहकारात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे.

आज सहकारात कृषीमंत्री शरद पवार, जयंत पाटील, विलासराव देशमुख, प्रकाश आवाडे, आण्णा डांगे, विनय कोरे, गणपतराव देशमुख, प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, विजयसिंह मोहिते-पाटील, अमरीशभाई पटेल ही मंडळी देखील सहकारी तत्वावरील सहकारी सूत गिरण्या व्यवस्थित चालवित आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सूत गिरण्या स्थापन झाल्याने ग्रामीण भागातील लोकांना रोजगार व इतर सुविधा उपलब्ध होत आहेत. सहकारी सूत गिरण्यांनी एक प्रकारे आपापल्या परिसराचा एकात्मिक ग्रामीण विकासच घडवून आणलेला आहे. त्याचे वर्णन समग्र सामाजिक क्रांती या शब्दातच करावे लागेल.

## १.११ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा विकास :-

सोलापूर जिल्ह्यात वस्त्रोद्योग मोठया प्रमाणात स्थिरावलेला आहे. तसेच सोलापूर शहरातील वातावरणामुळे येथे हातमाग व यंत्रमाग मोठया प्रमाणात कार्यरत आहेत. सोलापूर शहराला गिरणगाव म्हणून ओळखले जायचे, कारण सोलापूर शहरात चार मोठ्या कापड गिरण्या होत्या. त्यामध्ये लक्ष्मी विष्णू मिल, नरसिंग गिरजी मिल, जूनी मिल आणि जामश्री मिल यांचा समावेश होता. या कापड गिरण्यामध्ये अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झालेला होता. परंतू यातील तीन गिरण्या आज बंद पडलेल्या आहेत. फक्त जामश्री ही कापड गिरणी सद्या कार्यरत आहे. बंद पडलेल्या गिरण्यातील बेकार कामगार हातमाग व यंत्रमागावर काम करतात. आज शहरात व जिल्ह्यात हातमाग व यंत्रमागावर मोठ्या प्रमाणत चादर व टॉवेलचे उत्पादन केले जाते. सोलापूरातील चादरीने सोलापूरचे नाव देशभरातच नव्हे तर जगभरात प्रसिद्ध झालेले आहे. वस्त्रोद्योगात चादरीच्या उत्पादनाबरोबरच टर्किश टेरिटॉवेल्सच्या उत्पादनास सुरूवात झालेली आहे. आज चादरीचे व टॉवेल्सची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. मोठ्या कापड गिरण्या बंद पडल्यानंतर राज्यामध्ये कापडाचे बहुतांशी उत्पादन हे यंत्रमागावर घेतले जाते. देशातील एकूण यंत्रमागापैकी ७० टक्के यंत्रमाग म्हणजे ९,२५,००० हे महाराष्ट्रात आहेत. भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी व सोलापूर ही यंत्रमागाची केंद्रे आहेत. राज्यात यंत्रमाग कामगारांची संख्या ७ लाख आहे. सोलापूर शहरात ७५ हजार व ग्रामीण भागात २० हजार अशी ९५ हजार यंत्रमाग कामगार आहेत. यंत्रमाग व हातमाग उद्योगांना कच्चा माल म्हणून सूत आवश्यक होते. ते चांगल्या प्रकारे उपलब्ध होण्यासाठी सहकारी तत्वावर सूत गिरणी स्थापन होणे आवश्यक होते. तसेच जिल्ह्यात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने सूत गिरण्या स्थापन झालेल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील वस्त्रोद्योगाला आवश्यक असणारा कच्चा माल (सूत) सहकारी सूत गिरण्यातून उपलब्ध होत आहे. जिल्ह्यात सहकारी क्षेत्र मोठया प्रमाणात प्रगती करीत आहे. सोलापूर जिल्ह्यात इचलकरंजीच्या डेक्कन सूत गिरणीचा आदर्श डोळयासमोर ठेवून सन १९६४ मध्ये पहिली सोलापूर सहकारी सूत गिरणी सुरू झाली. सन १९६७ मध्ये यशवंत सहकारी सूत गिरणी ही सहकारी तत्वावरील दुसरी सूत गिरणी शहरात स्थापन झाली. या दोन्ही सूत गिरण्या सन २००० मध्ये बंद पडलेल्या आहेत. ग्रामीण भागात सहकारी तत्वावरील अनेक सूत गिरण्या स्थापन झाल्या सद्यःस्थितीत सोलापूर जिल्ह्यात १४ सूत गिरण्या नोंदणीकृत आहेत. त्यापैकी सहकारी तत्वावरील ०६ सूत गिरण्या कार्यरत आहेत. या ०६ सूत गिरण्यामध्ये ५५०७ कामगार काम करतात. म्हणजेच ५० टक्के कामगार सहकारी तत्वावरील सहकारी सूत गिरण्यात काम करतात. जिल्ह्यात सांगोला वाघोली, वळसंग, अकलूज या ठिकाणच्या सहकारी सूत गिरण्या उत्तम व्यवस्थापनेमुळे कार्यरत आहेत. सहकारी सूत गिरण्यातील सूताची

निर्यात मलेशिया, सिंगापूर, पाकिस्तान, उत्तर कोरीया, दक्षिण कोरीया, चीन, बांग्लादेश इत्यादी देशात जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील सूताची मोठया प्रमाणात निर्यात केली जाते. जिल्ह्यात सहकारी सूत गिरण्यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाला चांगली किंमत मिळत आहे. तसेच या सहकारी सूत गिरण्याच्या स्थापनेमुळे ग्रामिण भागाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे. शिवाय स्थानिक भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील चालू असलेल्या ६ सहकारी सूत गिरण्यांपैकी ५ सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या हेतूने संशोधन हाती घेतलेले आहे. हे प्रमाण एकूण सहकारी सूत गिरण्यांपैकी ८६% आहे. संशोधनासाठी घेतलेलया त्या ५ सहकारी सूत गिरण्या पुढील प्रमाणे आहेत.

१) "श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी नियमित वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर या ठिकाणी माजी आमदार वि. गु. शिवदारे आण्णा यांनी या सूत गिरणीची दि. १४/११/१९७९ रोजी नोंदणी क्र. एस.यु.आर./पी.आर.जी./(ए)५/दिनांक १४/११/१९७९ अन्वये नोंदणी केलेली आहे. या सूत गिरणीत चांगल्या प्रकारचे उत्पादन होत आहे. या सूत गिरणीची सभासद संख्या सन २०११ अखेर ५०४८ आहे व भाग भांडवल ४८२.०० लाख रूपये आहे. या सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रू. ७५०.०० लाखाचे आहे. या सूत गिरणीतील कामगारांची संख्या १००० आहे"[१६].

२) "शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर ही मा. आमदार गणपतरावजी देशमुख यांनी दि. २४/११/१९७९ रोजी स्थापन केलेली आहे. या सूत गिरणीचे नोंदणी क्र. एस.यु.आर./पी.आर.जी./(ए) ७/दिनांक २८/१/१९८० असा आहे. या सूत गिरणीचे सभासद संख्या १०,००० आहे. याचे सभासद भाग भांडवल रू. १५३६.६८ लाख आहे. या सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रू. ३०.०० कोटी आहे. या सूत गिरणीतील कामगारांची संख्या २००० आहे. या सूत गिरणीत ५०,००० चात्यांवर सूत उत्पादन केले जाते. ही सूत गिरणी तीच्या स्थापने पासून नफ्यामध्ये आहे"[१७].

३) "शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी नियमित नान्नज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर या सूत गिरणीची स्थापना कै. बाबूराव आण्णा चाकोते यांनी नोंदणी क्र. एस.यु.आर./पी.आर.जी./(ए) डी.एच. ११ दिनांक १/११/१९९० रोजी केलेली आहे. या सूत गिरणीतील सभासदांची संख्या ३१६२ इतकी आहे. व सभासद भाग भांडवल रू. ७५५.७९ लाख इतके आहे. तर अधिकृत भाग भांडवल रू. १०.०० कोटी इतके आहे"[१८].

४) "महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नियमित शारदा नगर, वाघोली, ता. मोहोळ या सूत गिरणीची स्थापना प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी मोहोळ तालुक्यतील मौजे वाघोली येथे अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांना एकत्रित करून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी व कार्यक्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने सहकारी तत्वावर दि. २४ डिसेंबर १९९३ रोजी नोंदणी क्र. एस.यु.आर/पी.आर.जी./(ए) डी/ सोलापूर २३ दि. २४/१२/१९९३ अन्वये या नावाने सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. सन १९९३ मध्ये नोंदणी झालेल्या या सूत गिरणीचे उत्पादन पहिल्या टप्प्यात ८००० (आठ हजार) चात्यावर दि. १२/१२/२००० पासून चाचणी उत्पादन व दि. १/३/०१ पासून व्यापारी उत्पादन सुरू झाले. आज २०११ अखेर २०१६० चात्यावर सूताचे उत्पादन घेतले जात आहे. सूत गिरणीचा प्रकल्प एकूण २५२०० चात्यांचा आहे. सभासद भाग भांडवल रू. २५८.३० लाख इतके आहे. अधिकृत भाग भांडवल रू. ३०.०० कोटी इतके आहे"[१९].

५) "शेतकरी महिला सहकारी वस्त्र निर्माण सूत गिरणी मर्यादित, सांगोले, ता. सांगोला, जि. सोलापूर या सूत गिरणीची स्थापना मा. ना. गणपतरावजी देशमुख यांनी नोंदणी क्र. एस.यु.आर./ पी.आर.जी./(ए) डी.एच. २७ दि. १४/८/१९९५ अन्वये केलेली आहे. ही सूत गिरणी जिल्ह्यातील एकमेव महिला सूत गिरणी आहे. या सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रू. ३०.०० कोटी इतके आहे. सभासद भाग भांडवल रू. २८३.२५ लाख इतके आहे. यातील पहिल्या टप्प्यातील चात्यांची संख्या ६३३६ इतकी आहे. एकूण चात्यांची संख्या २५२०० इतकी आहे. या सूत गिरणीतील महिला सभासद संख्या २६३०४ इतकी आहे"[२०].

## १.१२ सोलापूर जिल्हा

**सहकारी सूत गिरण्या**

१) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग

२) शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले

३) शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी, नान्नज

४) महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली

५) शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले



**संदर्भ :**


१. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २१)

२. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

३. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

४. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

५. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

६. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

७. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

८. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

९. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २२)

१०. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २३)

११. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २४)

१२. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र २९)

१३. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. (पृष्ठ क्र ४५)

१४. कुलकर्णी पी. आर., सहकार तत्व व्यवहार,

१५. प्रा. ए. आर. रायखेलकर, डॉ. अशोक डांगे, (२००२) सहकार तत्वे आणि व्यवहार, मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.

१६. डॉ. दी. के. देशपांडे, (१९९०)औद्योगिक अर्थ शास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.

१७. प्रा. डी. एस. कदम
प्रा. आर. के. दातीर
प्रा. आर. एम. चिंतामणी
प्रा. जि. जे. लोमटे (२००३)
भारतीय अर्थ व्यवस्था, निराली प्रकाशन, जोगेश्वरी मंदिर मार्ग, पुणे

१८. प्रा. सुधाकर देशपांडे
डॉ. गजेंद्र फुके
प्रा. विनोद तक (२०००)
भारताचा आर्थिक विकास व नियोजन, संगम प्रकाशन, नागपूर.

१९. भोसले / काटे (२००४) भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२०. के. एच. ठक्कर(२००४) भारतीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२१. डॉ. विजय कविमंडल (१९९६) कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२२. नरसिंह गोपाळ देवधर (१९९७) सूती वस्त्रोद्योग, प्रकाशक :- महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, सचिवाल, मुंबई पृष्ठ. क्र. ७०

२३. महाराष्ट्रातील सहकार चळवळ एका दृष्टीक्षेपात,(१९९४), प्रकाशक :- सहकार आयुक्त व निबंधक संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२४. प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२५. प्रा. डॉ. पी.बी. कुलकर्णी, प्रा. डॉ. डी.जी. चौगुले, डॉ. टी.एम. भोसले (२००५) सहकाराचा विकास, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

२६. डॉ. सी.जे. जोशी, (२००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२७. प्रा. अशोक डांगे, डॉ. विजय ककडे (१९९९), जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२८. प्रा. अजहरखान आणि प्रा. श्रीकांत जोशी (२००४), वित्तीय संस्था-१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

२९. प्रा. भोसले के.एम., प्रा. काटे के.बी. (१९९७), सहकार-फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३०. कामत गो.सो. (१९७९), सहकार; तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन विद्या प्रकाशन पुणे, (महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळसाठी)

३१. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात (२००२ आणि २००३).

३२. सराफ मोहन, (१९८५) सहकार, नवविद्या प्रकाशन, पुणे.

३३. विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३४.कुलकर्णी पी. आर., सहकार तत्व व्यवहार,

३५. Kamat G. S., New Dynamic of Co-operative System.

३६. Mehta S. D., The Indian Cotton Textile Industry and Economic Annalysis.

३७. Mehta M. M., Structure of Cotton Mill Industries of India Central-Allahabad १९४९.

३८. Kamat G. S., New Dynamic of Co-operative System.

३९. Mehta S. D., The Indian Cotton Textile Industry and Economic Annalysis.

४०. Mehta M. M., Structure of Cotton Mill Industries of India Central-Allahabad १९४९.

## प्रकरण दूसरे

## संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा

२.१ संशोधन साहित्याचे पुनरावलोकन

२.२ संशोधन आराखडा

## प्रकरण दुसरे

## संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा

**प्रस्तावना :-**

संशोधन साहित्याचे पुनरावलोकन मध्ये संशोधन विषयाला अनुसरून पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा शोध घेण्याकरीता दीर्घ प्रयत्न करावे लागत असले तरी त्यामुळे संशोधनाचे कार्य पद्धतशीर व सफल होण्यास मदत होते. म्हणूनच संशोधनाच्या संबंधित घटकांचा अभ्यास बारकाईने करणे आवश्यक आहे. सूत गिरण्यांच्या विषयावर झालेल्या संशोधनाचा विविध लेखांचा आणि पी.एच.डी., एम.फिल. प्रबंधांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधन आराखडा यामध्ये प्रस्तूत संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधनाची पद्धत, प्रकरण योजना, संशोधनाच्या मर्यादा इत्यादीचा समावेश केला आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेत सूती उद्योगाचे स्थान, सहकारी सूत गिरण्यासंबंधीचे विचार, सहकारी सूत गिरण्यांची प्रगती, सहकारी सूत गिरण्यातील कामगार, त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती राहणीमान, त्यांचे इतर प्रश्न, सूत गिरणीशी संबंधीत इतर घटक यांचा विविध दृष्टीकोनातून लेखक, साहित्यीक, विचारवंत, स्वयंसेवी संस्था, शासन, विविध समित्या, संशोधक व अभ्यासक यांनी अभ्यास केला आहे. संशोधन विषयाला अनुसरून संशोधन साहित्याचा आधार संशोधकाला घ्यावा लागतो. त्यादृष्टीने प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन साहित्याच्या पुनरावलोकनाचा आढावा घेतला आहे.

### २.१ संशोधन साहित्याचे पुनरावलोकन :-

पी.एच.डी. - संशोधन प्रबंध विषयाशी संबंधीत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पी.एच.डी. साठी सादर झालेल्या पुढील प्रबंधाचा वाङ्‌मय साहित्य म्हणून अभ्यास केला आहे. तसेच विविध दैनिके, मासिके, साप्ताहिके यामधून आलेल्या लेखांचा अभ्यास केलेला आहे.

**१) मा. प्रकाश आवाडे माजी वस्त्रोद्योग मंत्री :- (लोकसत्ता २९ ऑगस्ट २००८)**

**सहकारी सूतगिरण्यांची वाटचाल आता कंपोझिट मिलच्या दिशेने.**

इचलकरंजी २९ ऑगस्ट २००८ लोकसत्ता- वस्त्रनगरीतील सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल कंपोझिट मिलच्या दिशेने सुरू झाली आहे. कापसापासून सूत निर्मितीपर्यंत पहिला आणि एकमेव टप्पा पूर्ण करण्याचे काम सूत गिरण्यांमध्ये गेली अनेक वर्षे होत आहे. आता मात्र वस्त्रोद्योगातील मूल्यवर्धीतेचा लाभ घेण्यास कापूस, सूत, विणकाम, तयार कपडे (गारमेंट) अशी संपूर्ण साखळीच एकवटण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामुळे कोटयावधी रूपयांची गुंतवणूक होण्याबरोबरच मोठया प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

इचलकरंजी ही सहकारी सूत गिरण्यांची पंढरी म्हणून ओळखली जाते. इचलकरंजी परिसरात डझनभर सहकारी सूत गिरण्या स्थापन झाल्या त्यातून सूत उत्पादनास सुरूवात झाल्यावर सहकारातील आदर्श म्हणून इचलकरंजीची ओळख राज्यभर तयार झाली.

एकेकाळी सोन्याचा धूर हा शब्दप्रयोग सार्थ ठरावा असे ऐश्वर्य सहकारी सूत गिरण्यांमध्ये होते. सूत गिरण्यांचा लाभांश ऐकण्यासाठी वार्षिक सभेवेळी सभासद अक्षरशः तुटून पडत. डेक्कन सहकारी सूत गिरणीने तर सभासदांना मोटार भेट देण्याची तयारी दर्शवली होती. डेक्कनचा शेअर्स असणे हे खास प्रतिष्ठेचे चिन्ह होते. इचलकरंजी सहकारी सूतगिरणीनेही सभासदांना मोठा लाभांश आजवर दिला आहे. सहकारातील या यशामुळेच कल्लप्पाण्णा आवाडे यांच्या नावापुढे सहकार महर्षी ही उपाधी लागली.

गेल्या दोन दशकात मात्र सहकारी सूत गिरण्यांची अवस्था अत्यंत केवीलवाणी झाली आहे आणि केवळ सूत निर्मिती करणे परवडणारे नाही. कंपोझिट मिल प्रमाणे कापूस ते तयार कापड असा सारा प्रवास एका छताखाली करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन सूत गिरण्यांचे मार्गदर्शक माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांनी वार्षिक सभेत केली. तसेच इचलकरंजीत, नवमहाराष्ट्र, इंदिरा गांधी महिला आदी गिरण्यांमध्ये ५०० शटललेस लूमद्वारा कापड निर्मिती, गारमेंट द्वारा तयार कपडे बनविण्याची योजना त्यांनी आखली आहे.[१]

**२) Chitte G. V. :- A Socio Economic Study of the Textile Workers in Dcentralised Sector in Solapur District.**

**सोलापूर जिल्ह्यातील असंघटीत क्षेत्रातील कापड कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास.(१९८९)**

संशोधकाने संशोधनाअंती असे निष्कर्ष काढले की, कामगारांना या क्षेत्रात अल्प वेतन दिले जाते. त्यांना निवासाची सोय चांगली नाही. यंत्रमाग कामगारांना कायम काम मिळत नाही. तसेच या असंघटीत क्षेत्रात १८ वर्षाखालील मुले-मुली काम करताना आढळतात. तसेच व्यसनाधिनता, गैरहजेरी मोठया प्रमाणात आढळते.

**शिफारशी :-**

कामगारांना योग्य वेतन देण्यात यावे, निवासस्थानासाठी गृहनिर्माण संस्था स्थापन करावेत. प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध कराव्यात, बालकामगारांना कामावर ठेवू नये. ग्राहक भांडार सुरू करावेत अशा शिफारशी संशोधकाने केलेल्या आहेत.[२]

**३) डॉ. मंगनाळे व्ही. एस.**

**सोलापूर मधील कापड उद्योगातील कामगार गैरहजरीच्या कारणांचा अभ्यास**

**निष्कर्ष :-**

कापड उद्योगातील कामगार सतत गैरहजर राहतात. त्यांची कारणे - आजारपण, व्यसनाधिनता, रात्रपाळी, कर्जबाजारीपणा, प्रवासी वृत्ती इत्यादी कामगारांचे उत्पन्न कमी असल्याने जीवनमान ही निम्न दर्जाचे असते. जिवनमान निम्न दर्जाचे असल्यामुळे अनेक (कित्येक) कामगार आजारी पडतात. साहजिकच गैरहजर राहतात.

**रात्रपाळी :-**

बहुतेक कामगार खेडयातून आलेले असल्याने गिरणीतील कामाचे स्वरूप, कष्टाचे, गुंतागुंतीचे निरस अत्यंत जिकीरीचे असते. रात्रपाळीतील काम हे तर अधिकच त्रासदायक असते या कारणामुळेच दिवसपाळीमधील कामगारापेक्षा रात्रपाळीतील कामगार लवकर कंटाळतात आणि जास्त प्रमाणावर गैरहजर राहतात.

**शिफारशी :-**

वेतनवाढ करावी. आरोग्यविषयक सुविधा कामगारांना द्याव्यात, व्यसनाधिनतेवर उपाय योजावेत, निरिक्षक व कामगार संबंध सुधारावेत, ग्राहक भांडारातून कामगारांना जीवनावश्यक वस्तू पूरवाव्यात.

**एम. फिल. - संशोधन लघु प्रबंध :-**

एम.फिल. पदव्युत्तर पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सादर झालेल्या एम.फिल. संशोधन लघु प्रबंधापैकी सहकारी सूत गिरणी प्रबंधाच्या विषयासंबंधी असलेल्या पुढील काही लघु प्रबंधाचा संशोधकाने अभ्यास केला आहे.[३]

**४) प्रा. शिंदे के. बी. :-**

**सूत गिरणीचे आर्थिक विश्लेषण शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादीत सांगोला चा अभ्यास.**

संशोधनावरून संशोधकाला सर्वसाधारणपणे असे निष्कर्ष प्राप्त झाले की, शासनाच्या आर्थिक साहाय्याच्या जोरावर सहाकार क्षेत्रामध्ये अनेक सहकारी सूत गिरण्या स्थापन झाल्या आहेत. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील काही सूत गिरण्यांनी समाधानकारक प्रगती केली आहे. त्याचे श्रेय त्या त्या भागातील सहकाराचे नेतृत्व, सभासद आणि कामगारांना जाते. संशोधकाला असे जाणवले की, सांगोला सूत गिरणीच्या एकूण भागभांडवलामध्ये शासनाचा आणि इतर वित्तीय संस्थांचा वाटा ९५ टक्के आहे. संशोधनाच्या कालावधीत गिरणीच्या उत्पादनात अनेक चढ-उतार झाले आहेत. हे चढ उतार अनेक अंतर्गत

आणि बाह्य समस्यामुळे निर्माण झाले आहेत. परंतू असे असले तरी सूत गिरणी उत्पादनाच्या बाबतीत आणि दर्जा सुधारण्याच्या बाबतीत यशस्वी झाली आहे. तसेच या सूत गिरणीने शासनाकडून घेतलेले आर्थिक सहाय्य मोठया प्रमाणात परत फेड करण्यात ही सूत गिरणी सहकारी क्षेत्रातील सूत गिरण्यामध्ये महाराष्ट्रात आघाडीवर आहे.[४]

**५) प्रा. पाटील ए. व्ही. :-**

**शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोला मधील कामगार कल्याण कार्यक्रमाचा अभ्यास.**

**संशोधकाचे निष्कर्ष :-**

सूत गिरणीमधील कामगारांना योग्य वेतन दिले जाते. तसेच पेन्शन योजना, अपघात विमा, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विषयक सुविधा, बोनस (लाभांश) दिला जातो, पाळणागृह आहे, सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले जाते, आदर्श कामगार पुरस्कार दिला जातो, पंरतू कामगारांच्या निवासाची सोय साईटवर नाही. त्याकरीता कामगारासाठी गृहनिर्माण संस्था स्थापन करून सूत गिरणीच्या साईटवर निवासस्थाने बांधावित तसेच कामगारांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू करावित.[५]

**६) डॉ. बारबोले टी. एल. :- (१९८८)**

**श्री शाहू मिल्स कोल्हापूर मधील कापड कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास.**

**निष्कर्ष :-**

कापड मिल मधील काही कामगार अकुशल व निरक्षर आहेत. तसेच कामगारांना दुरवरून यावे लागत असल्याने ते कंटाळून जातात. त्यामुळे काम करताना कामगार उत्साही नसल्याने त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. त्यासाठी कामगारांच्या निवासाची सोय गिरणीच्या परीसरात करणे आवश्यक आहे. काही कामगार कर्जबाजारी, व्यसनांच्या आहारी गेलेले आहेत.

**शिफारशी :-**

जे कामगार दुरून येतात त्यांना सायकलीचा पुरवठा करावा, तसेच अकुशल कामगारांना प्रशिक्षण द्यावे, अर्थ सहाय्यासाठी सहकारी पतसंस्था स्थापन करावी, ग्राहक भांडार सुरू करावे, आदर्श कामगार पुरस्कार द्यावा, कामगारांना आरोग्यविषयक सुविधा पुरवाव्यात, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे कामगारांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू करावीत अशा शिफारशी संशोधकाने केलेल्या आहेत.[६]

**७) प्रा. दिक्षित एन. बी. :-**

**बार्शी कापड गिरणी मर्यादित बार्शीच्या कापड गिरणीच्या संदर्भातून आजारी उद्योग संस्थांच्या समस्या आणि दृष्टीपथ.**

**निष्कर्ष :-**

कापड मिल आजारी होण्याची कारणे म्हणजे - अकार्यक्षम व्यवस्थापन, कामगारांचा कामचुकारपणा, गैरहजेरीचे प्रमाण जास्त त्यामुळे कमी उत्पादन, वित्त पुरवठयाची समस्या, चांगल्या सूताची व कापसाची कमतरता, भ्रष्टाचार अशा अनेक कारणांनी बार्शी येथील व अन्य कापड गिरण्या आजारी म्हणून जाहिर झाल्या.

**शिफारशी :-**

वित्त पुरवठा सरकारने करावा तसेच सरकारचे नियंत्रण असावे, कार्यक्षम व्यवस्थापन करावे, कामगारांना इतर सोयी सुविधा द्याव्यात जेणे करून कामगार कार्यक्षमपणे काम करतील भ्रष्टाचाराला आळा घालावा, कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्यात इत्यादी शिफारशी संशोधकाने केलेल्या आहेत.[७]

**८) प्रा. माशाळवाले एन. एस. :-**

**सोलापूर शहरातील यंत्रमाग उद्योगाच्या संदर्भातील कामगारांच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा अभ्यास.**

**निष्कर्ष :-**

शहरात १६ हजार यंत्रमाग आहेत. यात ५० हजार कामगार आहेत. यांच्या मार्फत चादर, टॉवेल्स व टेरी टॉवेल्सचे उत्पादन मोठया प्रमाणात केले जाते. पण कामगारांना अल्प मजूरी दिली जाते, अनेक कामगार कर्जबाजारी आहेत. तसेच हे कामगार झोपडपट्टी भागात राहत असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी आहे. प्रशिक्षणाचा अभाव आहे. तसेच असंघटीत कामगार आहेत.

**शिफारशी :-**

कामगारांना योग्य मजूरी देण्यात यावी, तसेच गृहनिर्माण संस्था काढून चांगल्या निवासांची सोय करावी, सहकारी पतसंस्था काढून वित्त पुरवठा करावा, ग्राहक भांडार सुरू करावे, कामगारांच्या मुलांसाठी शाळा, महाविद्यालये सुरू करावेत. तसेच आरोग्य विषयक सुविधा, सांस्कृतिक प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन यंत्रमाग धारकांनी करावे. अशा शिफारशी संशोधकाने केलेल्या आहेत.[८]

**९)   प्रा. माने व्ही. आर. :- (१९८१)**

**इचलकरंजी मधील सहकारी सूत गिरण्या आणि प्रदेशांचा विकास**

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रातील पहिली सहकारी सूत गिरणी इचलकरंजीत डेक्कनच्या स्वरूपात सुरू झाली. त्यानंतर इचलकरंजीच्या भागात अनेक सूत गिरण्या सुरू झाल्याने तेथे मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच या सूत गिरण्यामुळे या भागाचा सर्वांगीण विकास झालेला आहे. तसेच सहकारी सूत गिरण्यामुळे इचलकरंजीच्या प्रदेशाची मोठया प्रमाणात प्रगती झाली. तसेच काही कापड गिरण्यादेखील सुरू झाल्या. सूत गिरण्यामुळे त्या भागात शाळा, महाविद्यालये, दवाखाने, प्रशासकीय कार्यालये मोठया प्रमाणात सुरू झाल्याने त्या प्रदेशाचा सर्वांगीण विकास झालेला आहे. असे संशोधकाला संशोधनाने काही निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.[९]

**१०)   महाजन एस. एस. :-**

**सहकारी सूत गिरणीचे व्यवस्थापन कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित येड्राव इचलकरंजीचा अभ्यास.**

**निष्कर्ष :-**

व्यवस्थापन अयोग्य कारण अशिक्षित कर्मचारी वर्ग शिक्षित कर्मचारी मोजकेच, प्रत्येक विभाग स्वतंत्र नव्हता.

**शिफारशी :-**

शिक्षित तज्ज्ञ कर्मचारी वर्ग नेमावा टेक्सटाईल मधील पदवीधर कर्मचारी, सहकाराची पदवी प्राप्त अधिकारी, M.B.A. चे व्यवस्थापक M.S.W. झालेंले लेबर ऑफिसर नेमल्यास व्यवस्थापन कार्यक्षम होण्यास मदत होते.[१०]

**११)   प्रा. कदम प्रभा :- (१९९४)**

**माधवनगर कॉटन मिल्स लि. माधव नगर मील मधील कामगारांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण.**

**संशोधनाचे निष्कर्ष :-**

संशोधकांनी संशोधनाअंती असे निष्कर्ष काढले की, शक्यतो कामगार उत्पादक वयोगटातील असावेत. कामगार शिक्षित व प्रशिक्षण घेतलेले असतील तर उत्पादनात वाढ होते. कामगार विवाहीत असावेत त्यांचे कुटुंब मर्यादित असल्यास राहणीमानाचा दर्जा कायम राखण्यासाठी जबाबदारीने काम करतात. कामगारांना प्रत्यक्ष कामावर असताना काही सुरक्षा साधनांचा पुरवठा करणे

गरजेचे असते. त्याच प्रमाणे त्यांना राहण्यासाठी घर व कारखान्यामध्ये कामगारांना विश्रांती घेण्यासाठी विश्रांतीगृहाची सोय करणे गरजेचे आहे. कामगारांना कमी किमतीत गृहोपयोगी वस्तू उपलब्ध करून देण्यासाठी ग्राहक भांडार, तसेच अडी अडचणीच्या वेळी कर्ज देण्यासाठी पत संस्थांची स्थापना करणे महत्वाचे आहे. कामगार व्यसनापासून दूर राहावा यासाठी त्यांच्यामध्ये जाणीव, जागृती निर्माण करावी. तसेच कामगारांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे. महत्वाचे म्हणजे स्त्री कामगार आणि बदली कामगार यांच्या समस्या तीव्र आहेत. त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासारखे काही महत्वाचे निष्कर्ष व शिफारशी संशोधकाने केलेल्या आहेत.[११]

**१२. प्रा. चव्हाण अभिषेक देवराव, योजना, मे २०११, पृष्ठ क्र.४३ :-**

प्रा. चव्हाण यांनी भारतीय हातमाग व हस्तकला संधीच्या उंबरठ्यावर या लेखात भारताने कापड उद्योगातील स्पिनींग, व्हीवींग, साईटींग, प्रोसेसींग व गारमेंट अशा सर्व प्रक्रियांचे आधुनिकीकरण केले पाहिजे. संशोधन विकास अध्ययन परिक्षण व मार्गदर्शन यातून उत्पादनात विविधता आणली पाहिजे. आणि बदलत्या मागणीनूसार आपल्या उत्पादनात बदल करण्याचे क्षमता विकसीत केली पाहिजे. असे विचार मांडलेले आहेत.[१२]

**१३. प्रा. एस.टी. भोसले, योजना, मे २०११, पृष्ठ क्र. २३ :-**

प्रा. एस.टी. भोसले यांनी यंत्रमाग स्थिती समस्या व उपाय या त्यांच्या लेखामध्ये काही शिफारशी केलेल्या आहेत. कामगारांना निश्चित वेतनांची हमी द्यावी, सुरक्षीत कामासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती करावी. कामगारांना वस्त्रोद्योगाचे ज्ञान देण्यासाठी विद्यालयाची स्थापना करावी. कामगारांना कपडा तयार करण्यासाठी स्वस्थ धागा उपलब्ध करुन द्यावे. दलालामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ज्या ठिकाणी कापूस पिकवला जातो त्याच ठिकाणी यंत्रमागांची उभारणी करावी अशा शिफारशी केलेल्या आहेत. [१३]

**१४. प्रा. डॉ. जे.एफ. पाटील, अर्थकारणातील सहकार, लोकराज्य सप्टेंबर २०१२ :**

लोकराज्य या मासिकात अर्थकारणातील सहकार या लेखात स्पर्धात्मक बाजारपेठेत, संकरित उद्योग व व्यापारी व्यवस्थेशी स्पर्धा करुन, यशस्वी उद्योगसंस्था म्हणून उभे रहावयाचे झाल्यास सीमान्त / लहान शेतकऱ्यांनी सहकारी शेती तयार करणे, अल्पबचत करणाऱ्या अनेक लहान कुटुंबानी सहकारी पतसंस्था स्थापन करुन त्यांच्या एकत्रीकरणातून जिल्हा बँक किंवा राज्य बँक स्थापन करने, गवळयांच्या ऐवजी सहकारी दुध संस्था व महासंघ तयार करणे, हातमाग किंवा

विद्युत कुटुंब पातळीऐवजी सहकारी सूत गिरणी / कापड गिरणी स्वरुपात राबविणे सर्वांच्याच हिताचे आहे असे मत प्रा. डॉ.जे.एफ. पाटील यांनी मांडलेले आहे. [१४]

**१५. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, मानसिक बदलाची आवश्यकता, लोकराज्य सप्टेंबर २०१२ :**

लोकराज्य या लेखात डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी सर्व कापसाच्या उपयोगानूसार सहकारी तत्तवावर शेतकऱ्यांच्या कापूस प्रक्रिया उद्योगांसाठी कापूस संकुले, कॉटन कँडचे क्लासेस सुरु करणे आवश्यक आहे. अशीच संकुले मराठवाडा व खानदेशासाठी उपयोगी पडली तर त्यातुन शेतकऱ्यांकडे कारखान्याच्या मालकीतून वाढणारे उत्पन्न शेतकऱ्यांच्या मुलामुलींना प्राधान्याने तांत्रिक रोजगार आणि २-३ जिल्ह्यांसाठी एक संकुल असे केल्यास मुंबई-पुण्यासारख्या केंद्रित विकास टाळुन विकेंद्रीत विकास इत्यादी महत्वाची उद्दिष्टे गाठता येतील. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशेची भावना निर्माण झाली आहे असे विचार डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी मांडलेले आहे.[१५]

**१६. किरण तारळेकर (अध्यक्ष, विटा यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था) :-**

किरण तारळेकर यांनी त्यांच्या लेखात वस्त्रोद्योग धोरणातील प्रादेशीक भेदभाव चुकीचा आहे असे म्हटले आहे. राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहिर झालेले आहे. या क्षेत्रान नव्याने येणाऱ्या उद्योगासाठी कर्जावरील व्याज, अनुदान, स्वरूपात देण्याचे अतिशय चांगली तरतुद केलेली आहे. मात्र त्याच वेळी सवलतीसाठी प्रादेशिक भेदभाव केला आहे. तो मात्र चुकीचा आणि अन्यायकारक आहे असे लिहीले आहे. विदर्भाला वस्त्रोद्योग धोरणामध्ये अनेक सोई सवलती जाहिर केल्यामुळे प्रादेशीक भेदभाव दिसून येतो.[१६]

**१७. संजयकुमार अनुसे, व्यवस्थापकीय संचालक, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोला लोकमत १४ जुन २०११ :**

कापूस निर्यात धोरणात सातत्य नसल्याचा परिणाम : राज्यातील सूत गिरण्या अडचणीत. केद्रांच्या निर्यात धोरणात सातत्य नसल्यामुळे कापसाच्या दरात तेजी-मंदी येत आहे. केंद्राने १ जानेवारी २०११ रोजी सूताची निर्यात बंद केल्यामुळे सूत गिरण्यांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रदेशातील सूत गिरण्यांचे जे ग्राहक होते त्यांना सूत गिरण्याबद्दलची विश्वसनीयता वाटत होती ती कमी झाली. सहाजीकच परदेशी ग्राहक तुटले गेले याचा फटका सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना १ एप्रिल पासून सूताची निर्यात बंदी उठवल्यानंतर बसू लागलेला आहे. परदेशी ग्राहक सूताच्या गाठी घ्यायला तयार नाही. शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला दर मिळण्यासाठी आणि सूत गिरण्या तगविण्यासाठी केंद्र सरकारने निर्यातीला प्रोत्साहन दिले पाहिजे.

निर्यातीसाठीच्या कर्जावरील ८ टक्के रिबेट देण्याचे धोरण पुन्हा अवलंबिले पाहिजे असे विचार संजयकुमार अनुसे यांनी मांडलेले आहेत.[१७]

**१८. प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, पालक मंत्री, सोलापूर जिल्हा, लोकमत २० ऑगस्ट २०११ :**

कापसाचे दर वाढल्याने सूत गिरण्या अडचणीत : कापसाचे वाढलेले दर आणि त्या तूलनेत सूताला अपेक्षित दर न मिळणे यामुळे राज्यातील सूत गिरण्या अडचणीत आल्या आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी सूत गिरण्यांना विज बिलात सवलत व इतर प्रकारची मदत वस्त्रोद्योग विभागाने सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना करावी असे विचार पालकमंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी मांडलेले आहेत.[१८]

**१९. आमदार गणपतराव देशमुख सांगोला, राज्यातील सूत गिरण्या संकटात, पुढारी १५ऑक्टोंबर २०११ :**

राज्यातील ५८ सहकारी सूत गिरण्या वस्त्रोद्योग व्यवसायात असलेल्या जागतिक व देशांतर्गत आर्थिक मंदीमुळे संकटात सापडल्या आहेत. या सूत गिरण्यांना आर्थिक सहाय्य देण्याची मागणी पश्चिम महाराष्ट्रातील २१ सूत गिरण्यांनी केलेली आहे. महाराष्ट्रातील या सूत गिरण्यांना शासनाने वेळीच मदतीचा हात दिला नाही तर महाराष्ट्रातील सर्व सूत गिरण्या कायमच्या बंद होऊन दोन ते अडीच लाख कामगार बेकार होण्याची भिती निर्माण झाली आहे. आमदार गणपतराव देशमुख यांनी राज्य व केंद्र शासनाला निवेदन पाठवून १२५०० चात्याच्या गिरणीला ५ कोटी, २५ हजार चात्याच्या गिरणीला १० कोटी व त्यापेक्षा जास्त चात्याच्या गिरणीला त्या प्रमाणात बिन व्याजी कर्ज ५ वर्षानंतर परत फेडीच्या अटीवर द्यावी तसेच व्हॅट ला स्थगिती देऊन ती रक्कम त्या पुढील ५ वर्षात समान हफ्त्याने वसुल करावी. इतर राज्याप्रमाणे वीज दरात सवलत द्यावी व गरीब कापुस उत्पादकांचा हा ग्रामीण सहकारी उद्योग जिवंत रहावा म्हणून शासनाने मदत करावी अशी मागणी केलेली आहे. या मागण्यांवर शासनाने लवकरात लवकर निर्णय घेतला नाही तर या ५८ सूत गिरण्या कोणत्याही क्षणी कायमच्या बंद पडुन लाखो कामगार बेकार होण्याची भिती आहे असे विचार आमदार गणपतराव देशमुख यांनी मांडलेले आहेत.[१९]

**२०. राजशेखर शिवदारे, चेअरमन श्री. स्वामी समर्थ सहकारी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, सहकारी सूत गिरण्या दशा आणि दिशा, लोकमत, २३ एप्रिल २०१२ :**

मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम गेल्या १० वर्षाच्या कालखंडात वस्त्रोद्योगात जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यस्थेमुळे निर्माण झालेली जागतिक स्पर्धा आणि मंदी यामुळे अडचणीत आला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक सहकारी सूत गिरण्या यातून सावरु शकल्या नाहीत. ज्या काही

गिरण्यांनी नियोजनबध्द कारभार केला त्या सहकारी सूत गिरण्या टिकुन राहिल्या आहेत. अशा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच सहकारी सूत गिरण्या राज्यात नफ्यात आहेत. महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यावर लादण्यात आलेले लडी सूत / हँक यार्न स्वरुपात उत्पादनाचे लादलेले बंधने अन्यायकारक आहे तर ते त्वरीत बंद करावेत असे विचार राजशेखर शिवदारे यांनी मांडले आहेत. [२०]

**२१. प्रा. डॉ. शितोळे बी.बी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या शेती विकासातील सहकार चळवळीचे योगदान, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :**

पश्चिम महाराष्ट्र ज्याप्रमाणे उसाचा पट्टा म्हणून ओळखला जातो तसा संदर्भ हा महाराष्ट्रातील पांढरे सोने (कापूस) उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर असणारा भाग परिणामी त्यावर प्रक्रिया करण्याऱ्या उद्योगाची उभारणी करण्यामध्येही सहकार क्षेत्राची महत्वपुर्ण भुमिकस असुन सरकी काढणे, कापसाच्या गाठी करणे, सूत तयार करणे इ. क्षेत्रातही सहकार क्षेत्राद्वारे अनेक प्रक्रिया उद्योग उभे आहेत. इ.स. २००९ पर्यंत सहाकरी सूत गिरण्यांची संख्या १२२ इतकी होती. आज सहकारी तत्त्वावरील सूत गिरणी व्यवसाय विविध समस्यांना तोंड देत असला तरी काही सूत गिरण्या कार्यक्षमतेच्या जोरावर चांगल्या प्रकारचा नफा मिळवून शेतकरी सभासदांना आर्थिक स्थैर्य देण्यात महत्वाची भूमिका करत आहेत असे विचार मांडलेले आहे.[२१]

**२२. डॉ. पुजारी वाय.डी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे सिंहावलोकन, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :**

मुक्त अर्थव्यवस्थेत येऊ घातलेल्या सर्व बदलांना सामोरे जाण्याची क्षमता सहकारी क्षेत्राने मिळविली पाहिजे. व्यवस्थापन व सेवकांना पुरेसे प्रशिक्षण देऊन त्यांचे व्यवसायिक कौशल्य स्पर्धात्मक पातळीवर राखले पाहिजे व राष्ट्रीय स्तरावर स्विकारलेल्या धोरणाचे समाज विकासावर अनिष्ट परिणाम होऊ नयेत यासाठी सहकारी चळवळ दक्ष राहिली पाहिजे. याऊलट जागतिक स्तरावर आर्थिक सुधारणातून होणाऱ्या बदलांचा पुरेसा लाभ समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सहकारी संस्थानी माध्यम म्हणून काम करण्याची तयार करावी. सहकारी संस्था या कार्यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडु शकतात. ह्य क्षेत्र समुह शक्तीच्या बळावर अवलंबून आहे. समाज समक्ष असेल तर सहकार क्षेत्र अधिक बळकट व व्यापक होईल हे आव्हान स्विकारून आम्ही आमची कार्यपध्दती व कार्यक्षमता स्पर्धात्मक ठेवली पाहिजे. सहकारी क्षेत्र ही जबाबदारी समर्थपणे पेलू शकेल यात शंकाच नाही असे मत मांडलेले आहे.[२२]

**२३. प्रा. सौ. पारेकर एस.एम., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :**

नव्या पार्श्वभूमीवर सहकारी चळवळीची आव्हाने वाढत आहेत. बाजारव्यवस्थेशी मिळते जुळते घेणे आवश्यक ठरेल. सहकारी संस्थाची फेररचना, फेरमांडणी करावी लागेल. उत्पादन, एकत्रीकरण, प्रतवारी, मुल्यनिर्धारण, संग्रहण वाहतूक विज्ञापन, संशोधन इ. संस्थांच्या एकत्रीकरणाची गरज वाटते. जगातील नव्या प्रवाहांचा फटका सहकारी संस्थांना बसल्याने दिसत आहे. राजकारणी खोलवर अभ्यास व उपाय न करता ऐकमेकांवर कुरघोडी करीत आहेत. संघटित गट स्वहिताकडे पाहुन गलेलठ्ठ पगार घेवून चंगळवादी जीवन जगत आहे. कनिष्ठ व मध्यम वर्गावर टांगती तलवार आहे. कामगार वर्ग वाढत्या किंमतीमुळे हताश व विस्कळित आहे. अनेक परिणामांना विरोध करण्याचे सामर्थ्य राहिलेले नाही. सरकारच्या अपराधाशिवाय सहकारी चळवळ प्रगत होईल अशी आशा आज तरी करता येणार नाही असे विचार मांडलेले आहेत.[२३]

**२४. प्रा. व्हनबिंदगे वि. पी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे सिंहावलोकन, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीबाबत अनेक दोष असले तरी सहकाराच्या माध्यमातून राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाची समिकरणे मांडला येऊ शकतात. सहकारी चळवळीतील असणारे दोष दुर करण्यासाठी काही प्रभावी उपाययोजना करता येऊ शकतात. सहकारी चळवळीच्या यशासाठी प्रामाणिकपणे आणि निस्वार्थीपणे काम करणारे कार्यकर्ते पाहिजे. सहकारी चळवळीस सुजाण व व्यापक भुमिका असणारे नेतृत्व लाभले पाहिजे. सहकारी चळवळ ही केवळ कृषि क्षेत्रापुरतीच मर्यादित नाही तर सहकारी चळवळ ही समाज, शिक्षण व संस्कृतिक परिवर्तनासाठी दुसरा पर्याय नाही. शेतमालास वाजवी किंमत मिळवून देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा फुलोरा फुलविण्यासाठी सहकार हा उत्तम मार्ग आहे. ग्राहकांना वाजवी दरात चांगल्या दर्जाच्या वस्तु सहकाराच्या माध्यमातून मिळु शकतात. समाजातील अनेक घटकांचे शोषण थांबविण्यासाठी सहकारी चळवळीचा विकास होण्यासाठी आवश्यकता आहे. सहकाराची पताका खाद्यांवर घेऊन वाटचाल करणारे तळमळीचे वारकरी सहकारी चळवळीस मिळाले पाहिजेत असे मत मांडले आहेत.[२४]

२५. **श्री. पेंटप्पा गड्डम, अध्यक्ष सोलापूर यंत्रमाग धारक संघ, लोकमत १५ जुन २०११, टॉवेल चादरींची निर्यात १२५ कोटींनी घटली :**

सूताच्या दरामध्ये होत असलेल्या तेजी-मंदीमूळे अर्थात साठेबाजी मुळे सोलापूरचा यंत्रमाग उद्योग संकटात सापडला असून, संपूर्ण भारतात आणि देश-विदेशात प्रसिध्द असलेल्या सोलापूरी टॉवेल, नॅपकिन आणि चादरीची दरवर्षी होणारी ५०० कोटी रुपयांची निर्यात दर महा घटत चाचली आहे. गेल्या ६ महिन्यात झालेली घट १२५ कोटी रूपयांची आहे. याबाबत सूताची साठेबाजी रोखण्यासाठी सूताचा जीवनावश्यक वस्तुंच्या यादीत समावेश करावा. केंद्र सरकारने थेट कापूस निर्यात करण्यापेक्षा सूत आणि कापडाची निर्यात करावी असे विचार पेंटप्पा गड्डम यांनी माडलेले आहे.[२५]

## २.२ संशोधन आराखडा

**"सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास"**

या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

### १. संशोधनाची समस्या :-

"सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास" जागतिकीकरणाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झालेला आहे. म्हणून जागतीकीकरणानंतर या सहकारी सूत गिरण्यांची प्रगती, सूताची निर्यात, सूत उत्पादन, कामगारांची स्थिती याबाबींवर संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय निवडलेला आहे.

या संशोधन प्रकल्पामुळे सहकारी सूत गिरणींच्या भावी विकासास मदत होईल. तसेच सूत गिरणींचे कामगार यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास होईल व त्यावर उपाययोजना सुचविता येतील. सूत गिरण्यांच्या प्रगती करीता हे संशोधन होणे गरजेचे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती व आर्थिक मूल्यमापन तसेच कामगार यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. जागतिकी करणानंतर सूत गिरणीच्या सद्यस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

### २. उद्दिष्टे :-

१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे उत्पन्न व खर्चाचे मूल्यमापन करणे.

३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमुळे निर्माण झालेल्या रोजगारीचा अभ्यास करणे.

४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरणीतील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे.

६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे ग्रामीण विकासातील योगदान अभ्यासणे.

७. सरकारी धोरण व जागतिकीकरणाचा सहकारी सूत गिरण्यावरील परिणाम अभ्यासणे.

## ३. संशोधनाची गृहीतके :-

१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती होत आहे.

२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमुळे रोजगार निर्मिती होत आहे.

३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांतील कामगारांच्याआर्थिक व सामाजिक समस्याआहेत.

४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमुळे आसपासच्या ग्रामीण भागाचा विकास झालेला आहे.

५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यां कामगारांसाठी विविध कल्याणकारी सेवा सुविधा पुरवितात.

६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यासामोर जागतिकीकरणाची आव्हाने निर्माण झाली आहेत.

## ४. संशोधन विषयाचे महत्त्व :-

सोलापूर जिल्ह्यात ६ सहकारी सूत गिरण्या चालू आहेत. या सूत गिरण्यांच्या स्थापनेमुळे जिल्ह्यातील कापूस उत्पादनाला प्रेरणा मिळालेली आहे. तसेच सहकारी सूत गिरण्यांमुळे रोजगार निर्मिती झालेली आहे. या सूत गिरण्यांच्या प्रगतीचा व सूत गिरण्यातील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याच्या हेतूने हे संशोधन हाती घेतलेले आहे. तसेच या सूत गिरण्यांची ग्रामीण विकासातील भूमिका अभ्यासणे महत्वाचे आहे.

जागतिकी करणाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झालेला आहे. म्हणून जागतीकीकरणानंतर या सहकारी सूत गिरण्यांची प्रगती, सूताची निर्यात, सूत उत्पादन, कामगारांची स्थिती याबाबींवर संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय निवडलेला आहे.

या संशोधन प्रबंधामुळे सहकारी सूत गिरण्यांच्या भावी विकासास मदत होईल. तसेच सूत गिरणीतील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास होईल व त्यावर उपाययोजना सुचविता येतील. सूत गिरण्यांच्या प्रगती करीता हे संशोधन होणे गरजेचे आहे.

## ५. संशोधनाची मर्यादा :-

अभ्यास क्षेत्र :- प्रस्तुत संशोधन हे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांपूरते मर्यादित आहे. या जिल्ह्यात ११ तालुके आहेत. या जिल्ह्यात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते. म्हणून जिल्ह्यात ६ सहकारी सूत गिरण्या कार्यरत आहेत. या सूत गिरण्या वळसंग, सांगोला, नान्नज, वाघोली व अकलूज या ठिकाणी चालू आहेत. हे संशोधन जिल्ह्यातील चालू असलेल्या ५ सहकारी सूत गिरण्यांपूरतेच मर्यादित आहे.

## ६. संशोधनाचा कालावधी :-

प्रस्तूत संशोधनासाठी सन २००१-०२ ते २०१०-११ हा दहा वर्षांचा कालावधी निवडला आहे. जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती, सभासद संख्या, भागभांडवल, सूत उत्पादन, सूत विक्री, रोजगार, कामगार यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या अभ्यासण्यासाठी दहा वर्षे घेतली आहेत. तसेच आर्थिक मुल्यमापन करण्याकरीता २००६-०७ ते २०१०-११ ही ५ वर्षे घेतलेली आहेत.

## ७. संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन, वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती वापरून केलेले आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि द्वितीय अशा दोन्ही स्त्रोतांचा वापर केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील चालू असलेल्या ५ सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. हे संशोधन सोलापूर जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे.

## ८. तथ्य संकलन व विश्लेषण :-

### ८.१ तालुका / गावांची निवड :-

या संशोधनाकरीता सोलापूर जिल्ह्यातील खालील ५ सहकारी सूत गिरण्यांची निवड करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. २.१**

**सहकारी सूत गिरण्यांची निवड**

| अ. क्र. | तालुका | गांव | सूत गिरणीचे नांव |
|---|---|---|---|
| १. | दक्षिण सोलापूर | वळसंग | श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी नि. |
| २. | सांगोला | सांगोला | शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित. |
| ३. | उत्तर सोलापूर | नान्नज | शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी नि. |
| ४. | मोहोळ | वाघोली | महात्मा फुले अनु. जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नि. |
| ५. | सांगोला | सांगोला | शेतकरी महिला सहकारी वस्त्र निर्माण सूत गिरणी मर्यादित. |

## ८.२ तथ्य संकलनाचे मार्ग :-

प्रस्तूत संशोधनात प्राथमिक आणि द्वितीय अशा दोन्ही स्त्रोतांचा वापर केला आहे.

## ८.३ प्राथमिक तथ्य संकलन :-

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक तथ्य संकलनामध्ये प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत, नमुना निवड, निरीक्षण, या तंत्रांचा अवलंब करून तसेच सहकार कार्यालय व इतर कार्यालय इ. कडून विषयाला अनुरूप तथ्य संकलन करण्यात आले आहे. कामगारांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने १०% प्रमाणे केली आहे.

**अ) कामगार नमुना निवड :-**

कामगारांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने १०% प्रमाणे केलेली आहे.

**तक्ता क्र. २.२**

**कामगार नमुना निवड**

| अ.क्र | सूतगिरणीचे नांव | एकूण कामगार संख्या | नमुना निवड कामगार संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | स्वामी समर्थ सूत गिरणी, वळसंग | ८५० | ८५ | १०% |
| २. | शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोला | १४२७ | १४२ | १०% |
| ३. | शरद शेतकरी सूत गिरणी, नान्नज | ४०० | ४० | १०% |
| ४. | महात्मा फुले सूत गिरणी, वाघोली | ५०० | ५० | १०% |
| ५. | शेतकरी महिला सूत गिरणी, सांगोला | ३७० | ३८ | १०% |
| | एकूण :- | ३५४७ | ३५४ | १०% |

## ८.४ द्वितीय तथ्य संकलन :-

द्वितीय तथ्य संकलनासाठी सूत गिरण्यांचे वार्षिक आर्थिक अहवाल, शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडून प्रसिद्ध होणारे अहवाल, शासकीय गॅझेट, शासकीय रेकॉर्ड, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, संशोधन प्रबंध, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, वस्त्रोद्योग महामंडळाचे पुस्तके इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

## ८.५ विश्लेषणाची साधने व तंत्रे / तथ्य संकलन व विश्लेषण :-

माहितीचे विश्लेषण करताना सारणीकरण, निरीक्षण, पृथ्थकरण, तक्त्यामध्ये मांडणी करून, सरासरी, शेकडेवारी, टक्केवारी, निर्देशांक इ. सर्वसाधारण गणिती तंत्रांचा वापर केला आहे. योग्या त्या ठिकाणी स्तंभालेख दर्शविले आहेत. त्यानुसार निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**९. <u>प्रकरण नियोजन :-</u>**

**प्रकरण १ ले :- सहकारी सूत गिरण्यांची वाटचाल :- भारत आणि महाराष्ट्र**

**प्रकरण २ रे :- संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन आराखडा.**

**प्रकरण ३ रे :- सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.**

**प्रकरण ४ थे :- सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती.**

**प्रकरण ५वे :- सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक मूल्यमापन.**

**प्रकरण ६वे:- सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांतील कामगारांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण.**

**प्रकरण ७ वे :- पंचवार्षिक योजना आणि जागतिकीकरणाची आव्हाने**

**प्रकरण ८ वे :- निष्कर्ष व शिफारशी.**

**संदर्भ :-**


१) दैनिक लोकसत्ता २९ ऑगस्ट २००८.

२) शिवाजी विद्यापीठातील पि.एच्.डी. चे प्रबंध १९८९.

३) शिवाजी विद्यापीठातील पि.एच्.डी. चे प्रबंध.

४) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध १९८०.

५) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध.

६) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध १९८०.

७) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध.

८) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध.

९) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध १९८१.

१०) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध.

११) शिवाजी विद्यापीठातील एम. फिल चे प्रबंध १९९४.

१२) प्रा. चव्हाण अभिषेक देवराव, योजना, मे २०११, पृष्ठ क्र.४३ :

१३) प्रा. एस.टी. भोसले, योजना, मे २०११, पृष्ठ क्र. २३ :-

१४) प्रा. डॉ. जे.एफ. पाटील, अर्थकारणातील सहकार, लोकराज्य सप्टेंबर २०१२ :

१५) डॉ. श्रीनिवास खांदेवाले, मानसिक बदलाची आवश्यकता, लोकराज्य सप्टेंबर २०१२ :

१६) किरण तारळेकर (अध्यक्ष, विटा यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था) :

१७) संजयकुमार अनुसे, व्यवस्थापकीय संचालक, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोला लोकमत १४ जुन २०११ :

१८) प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, पालक मंत्री, सोलापूर जिल्हा, लोकमत २० ऑगस्ट २०११ :

१९) आमदार गणपतराव देशमुख सांगोला, राज्यातील सूत गिरण्या संकटात, पुढारी १५ऑक्टोंबर २०११ :

२०) राजशेखर शिवदारे, चेअरमन श्री. स्वामी समर्थ सहकारी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, सहकारी सूत गिरण्या दशा आणि दिशा, लोकमत, २३ एप्रिल २०१२ :

२१) प्रा. डॉ. शितोळे बी.बी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या शेती विकासातील सहकार चळवळीचे योगदान, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :

२२) डॉ. पुजारी वाय.डी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे सिंहावलोकन, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :

२३) प्रा. सौ. पारेकर एस.एम., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :

२४) प्रा. व्हनबिंदगे वि. पी., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे सिंहावलोकन, सहकार मंथन, २०१०-११ (राष्ट्रीय मराठी अर्थशास्त्र परिषद) :

२५) श्री. पेंटप्पा गड्डम, अध्यक्ष सोलापूर यंत्रमाग धारक संघ, लोकमत १५ जुन २०११, टॉवेल चादरींची निर्यात १२५ कोटींनी घटली :

२६) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

**प्रकरण तिसरे**

**सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**

३.१ सोलापूर जिल्ह्याची सर्वसामान्य माहिती

३.२ संशोधनासाठी निवड केलेल्या सहकारी सूत गिरण्यांच्या तालुक्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन

३.२.१ दक्षिण सोलापूर

३.२.२ सांगोला

३.२.३ उत्तर सोलापूर

३.२.४ मोहोळ

**सोलापूर जिल्हातील अभ्यासासाठी निवडलेल्या सूत गिरणीनिहाय तालुका व जिल्ह्यांचा नकाशा**



# प्रकरण तिसरे

# सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

## ३.१ सोलापूर जिल्ह्याची सर्व सामान्य माहिती :-

सिद्धरामेश्वरांच्या काळात या सोलापूर शहराला सोन्नलगी या नावाने ओळखले जायचे. त्यानंतर ब्रिटीशांच्या काळात या शहरात सोळा पेठ असल्याने त्याला सोळापूर /शोलापूर या नावाने ओळखले जायचे. त्याचाच अपभ्रंश होऊन पुढे सोलापूर हे नाव रूढ झाले आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांना जोडणारा दुवा आहे. प्राचीन काळापासून पश्चिम किनाऱ्याकडील चौल कडे जाणारा व्यापारी मार्ग सोलापूर जिल्ह्यातून जात होता. ब्रिटीश काळात मुंबईशी व्यापारी मार्गांनी जोडलेला होता. सध्याचा सोलापूर जिल्हा हा पूर्वी सोळा कसबे, सोन्नलगी, शोलापूर, सोलापूर या नावाने ओळखला जात असे. तो अहमदनगर, पुणे व सातारा या जिल्ह्याचा भाग होता. सन १८३८ मध्ये सोलापूर हा अहमदनगर जिल्ह्याचा उप जिल्हा बनला. त्यात सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, इंडी, हिप्परगी आणि मुद्देबिहाळ हे आठ उपविभाग होते. १८६४ मध्ये हा जिल्हा बरखास्त करण्यात आला. १८६९ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा व सातारा जिल्ह्यातील पंढरपूर व सांगोला हे उपविभाग जोडून सोलापूर जिल्हा तयार झाला. पुढे १८७५ मध्ये माळशिरस ही त्यात जोडण्यात आला. सन १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर सोलापूर जिल्हा मुंबई प्रांतात समाविष्ट करण्यात आला व १९६० पासून महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा बनला आहे.

### १. भौगोलिक स्थान :-

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला वसलेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७.१० अंश ते १८.३२ अंश उत्तर अंशास व ७४.४२ अंश ते ७६.१५ अंश पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस अहमदनगर व पूर्वेस उस्मानाबाद हा जिल्हा आहे. दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे हे जिल्हे आहेत.

### २. क्षेत्रफळ आणि प्रशासकीय विभाग :-

जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४८९५ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८४ टक्के आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १.१५ टक्के (१७०.७९ चौ.कि.मी.) क्षेत्र नागरी व ९८.८५ टक्के (१४७२४.२१ चौ.कि.मी.) क्षेत्र ग्रामीण आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने माळशिरस तहसील सर्वात मोठा (१६०४.८० चौ.कि.मी.) असून उत्तर तहसिल सर्वात लहान आहे. जिल्ह्यात एकूण ११ तहसिल आहेत. त्यांच्या ११ पंचायत समित्या आहेत. अकरा तहसिल मध्ये करमाळा, माढा, बार्शी, उत्तर

सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट इत्यादी तालुक्यांचा समावेश होतो.

जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय सोलापूर येथे असून सोलापूर जिल्ह्यात, सोलापूर, माढा (कुर्डूवाडी) , माळशिरस व पंढरपूर असे चार महसूल विभाग आहेत. जिल्ह्यात ९ नगरपरिषदा व १ महानगर पालिका आहे.

**३. भौगोलिक वैशिष्टे :-**

जिल्ह्याचे मुख्यालय सोलापूर हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ५५० मि. उंचीवर आहे. जिल्ह्यामध्ये महत्वाचे पर्वत नाहीत. परंतू बालाघाट पर्वत श्रेणीचे कित्येक फाटे बार्शी तहसिलच्या उत्तरेस काही मैल पसरलेले आहेत. त्याचप्रमाणे करमाळा, माढा व माळशिरस तहसिलमध्ये विखुरलेले डोंगर आहेत. करमाळा तहसिल (तालुक्यामध्ये) मध्ये वाघोबा व बोडकी या डोंगराची उंची अनुक्रमे २१० व १९० फूट आहे. माढा तहसिलच्या उत्तरेस असलेल्या चिंचगाव डोंगराची उंची ३०० फूट असून तो ६ कि.मी. पसरलेला आहे.

**४. हवामान आणि पर्जन्मान :-**

सन २०११ या वर्षात सोलापूरचे कमाल तापमान ४३.१ अंश सेल्सिअस व किमान तापमान १५.९ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे. हवामानाच्या दृष्टीने संपूर्ण जिल्हा पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडतो. मान्सूनचा कालावधी जूनच्या पंधरवडयापासून सप्टेंबर अखेर असतो. जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ८०७.२१ मि.मि. आहे. जिल्ह्याचे हवामान उष्ण व दमट स्वरूपाचे आहे.

**५. अवर्षण व प्रवण जिल्हा :-**

पारदासानी समितीने १९५७ पर्यंतच्या ३० वर्षाच्या कालावधीतील पर्जन्यमान जाहिर झालेली दुष्काळ/ टंचाई स्थिती याचा अभ्यास करून बार्शी व पाटबंधारे लाभक्षेत्रातील माळशिरस तालुक्याचा भाग वगळता इतर सर्व तालुके अवर्षण प्रवण असल्याचे जाहिर केले होते. त्यानंतर १९७३ मध्ये सुकथनकर समितीने जिल्ह्यातील लहरी व तुटपुंज्या पर्जन्यमानाचा सखोल अभ्यास करून माळशिरस व पंढरपूरचा कालवा भाग वगळता संपूर्ण जिल्हा अवर्षण प्रवणक्षेत्र म्हणून जाहीर केलेला आहे. केंद्र शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील जिल्ह्यातील सर्व ११ तालुके अवर्षण प्रवण असल्याचे मान्य केलेले आहे.

## ६. जमीन :-

सन २०००-२००१ च्या सुधारीत आकडेवारीनुसार १४.८८ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी १३.३५ लक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य होते. ०.७९ लक्ष हेक्टर जमीन शेती योग्य नव्हती. ११.२६ लक्ष हेक्टर क्षेत्र निव्वळ कसलेले होते.

सन २०१०-११ मध्ये निव्वळ ओलिताखालील क्षेत्र २.५८ लक्ष हेक्टर व ओलिता खालील एकूण क्षेत्र २.९६ लक्ष हेक्टर होते.

## ७. नद्या :-

जिल्ह्यामध्ये भीमा ही प्रमुख नदी असून, तिच्या जवळ निरा, मान, सिना व भोगावती या उपनद्या आहेत. भीमा नदीची जिल्ह्यातील एकूण लांबी २८९ कि.मी. आहे.

## ८. सोलापूर जिल्ह्याच्या लोकसंख्येची वैशिष्टे :-

जनगणना सन २०११ प्रमाणे सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४३,१५,७२७ लाख होती. यापैकी २६.२४ लाख ग्रामीण लोकसंख्या असून नागरी लोकसंख्या १२.२५ लाख इतकी आहे. तर लोकसंख्या वाढीचा दर वार्षिक ०.१९१ असा असून लोकसंख्येची घनता २९० द. चौ.कि.मी. आहे. जिल्ह्यातील दर हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३२ एवढे आहे.

सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ५.७८ लाख व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०.६९ लाख इतकी होती.

### १) साक्षरता :-

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील ६ वर्षावरील वय असलेल्या लोकसंख्येमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७७.७२ टक्के इतके आहे. राज्यात तेच प्रमाण ७७.३ टक्के होते. जिल्ह्यातील ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण ६८.३ टक्के व नागरी भागात ७७.५ टक्के होते. पुरुष संख्या ८६.३३ टक्के तर स्त्रींया ६८.५५ टक्के असे प्रमाण आहे.

## ९. उद्योगधंदे :-

सन २०११ अखेर जिल्ह्यात एकूण ५६५९ नोंदणीकृत कारखाने होते. त्यापैकी चालू असलेल्या २४७० कारखान्यामध्ये ४१६५५ कामगार काम करीत आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात ६०००० यंत्रमाग कामगार आहेत. तसेच ६०००० महिला विडी उद्योगात काम करतात.

सन २०१०-११ मध्ये जिल्ह्यात २० सहकारी साखर कारखाने व ५ खाजगी साखर कारखाने कार्यरत होते. तसेच १३ सहकारी सूत गिरण्या नोंदणीकृत आहेत. पण प्रत्यक्षात ६ सहकारी सूत गिरण्या चालू आहेत. या सर्व सूत गिरण्यात ५ हजार कामगार काम करतात. सन २०११ मध्ये जिल्ह्यात ३६१० दुग्ध

व्यवसाय सहकारी संस्था होत्या. सन २०१०-११ या वर्षात एकूण १०४३४ सहकारी संस्था होत्या, ११९२ कृषी सहकारी पतसंस्था पैकी ११८९ प्राथमिक कृषी सहकारी संस्था होत्या. जिल्हा औद्योगिक बँक, प्राथमिक सहकारी बँका व इतर बिगर शेती पतसंस्थाची संख्या १५७५ होती. सन २०११ च्या अखेरीस जिल्ह्यातील एकूण ४७३ गावात वर्गीकृत व सहकारी बँकांच्या ५६२ शाखा होत्या त्यापैकी सुमारे ३८.२६ टक्के शाखा वर्गीकृत होत्या.

**१०. वाहतूक व दळणवळण :-**

संदर्भ वर्ष २०११ नुसार रस्त्यांची एकूण लांबी १४२०१ कि.मी. होती. रेल्वेमार्ग जिल्ह्यात आहे. रेल्वे मार्गाची लांबी ३७५.४ कि.मी. आहे. जिल्ह्यात एकूण मालवाहतूक वाहने २७०६६ इतकी आहेत. तसेच प्रवासी वाहने २८७९६३ आहेत. जिल्ह्यातील डाक कार्यालयाची संख्या ५२८ इतकी आहे. जिल्ह्यातील चादर देशात प्रसिद्ध आहे. तसेच चादर व्यापार व साखर, अन्नधान्यांचा व्यापार जिल्ह्यात मोठया प्रमाणावर चालतो.

**११. शिक्षण विषयक माहिती :-**

सोलापूर जिल्ह्यात एका जिल्ह्यासाठी स्वतंत्र असे सोलापूर विद्यापीठ आहे. या विद्यापीठाशी संलग्नित १२२ महाविद्यालये सुरू आहेत. या सर्व महाविद्यालयातून ५५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

तसेच शिक्षण विभागाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सन २०११ अखेर जिल्ह्यात ४०८१ प्राथमिक शाळा, ६०४ माध्यमिक शाळा, १०९ उच्च माध्यमिक शाळा व १९ सामान्य शिक्षणाची विद्यालये आहेत. या व्यतिरिक्त २० शिक्षण विषयक पदवी महाविद्यालये, ४ विधी महाविद्यालये आणि प्रत्येकी एक या प्रमाणे वैद्यकीय व आयुर्वेदिक महाविद्यालय, १० अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. ५ तंत्रनिकेतन १२ आय.टी.आय. व २५ डी.एड. या प्रमाणे अन्य संस्था कार्यरत आहेत.

वरील संदर्भिय वर्षात एकूण ८.९७ लक्ष विद्यार्थ्यांपैकी ५६.८६ टक्के विद्यार्थी प्राथमिक शाळेत, २६.९ टक्के विद्यार्थी माध्यमिक शाळेत, १४.६० टक्के विद्यार्थी उच्च माध्यमिक शाळेत आणि राहिलेले २.३४ टक्के विद्यार्थी महाविद्यालयामध्ये शिकत होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५४.१८ टक्के मुले व ४५.८२ टक्के मुली होत्या. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सुमारे १६.२८ टक्के व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सुमारे २.५६ टक्के होते. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात संपूर्ण साक्षरता अभियान अंतर्गत साक्षरोत्तर १०५५ केंद्रे कार्यरत होती. त्यामध्ये २३९०७८ प्रौढ लाभार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते.

**१२. सार्वजनिक आरोग्य विषयक सोयी व सेवा :-**

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी संस्था यांचे मार्फत जनतेस वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यापैकी शासकीय, जिल्हा परिषद व महानगर पालिका, नगरपरिषदा

यांचे तर्फे उपलब्ध असलेल्या सोयींचा विचार केला असता असे दिसून येते की, सन २०१०-११ मध्ये जिल्ह्यात १७ रूग्णालये, २१ दवाखाने, १० प्रसूतीगृहे व ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे होती. त्यामध्ये ३९९ डॉक्टर व वैद्य, ८३७ परिचारीका होत्या. खाटांची संख्या १७५५ होती.

**१३. धार्मिक व पर्यटन स्थळे :-**

जिल्ह्यात वारकरी सांप्रदायाचे प्रमुख पंढरपूर तिर्थक्षेत्र आहे. आषाढी कार्तिकी आदी वाऱ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून व अन्य राज्यातून लाखो वारकरी श्री विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी पंढरपूर क्षेत्रास भेट देतात. बार्शी येथील श्री भगवंताचे मंदीर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांची समाधी, वडवळ (तालुका मोहोळ) येथील नागनाथ मंदीर, दामाजी पंथ, चोखोबा व कान्होपात्रा या संतांच्या वास्तव्याने पुनित झालेले मंगळवेढे, माचणूर (ता.मंगळवेढा) येथील श्री सिद्धेश्वराचे मंदीर, करमाळा व माढा येथील माढेश्वरी देवीची मंदीरे, सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर मंदीर, वेळापूर येथील प्राचीन अवशेष अर्धनारी नटेश्वराचे मंदीर व अन्य हेमांड पंथी मंदीरे ही या जिल्ह्यातील उल्लेखनीय धार्मिक व पर्यटन स्थळे आहेत. सोलापूर शहरापासून जवळच नान्नज (ता. उ. सोलापूर) येथे माळढोक या दुर्मिळ पक्षाचे व हरणांचे अभयारण्य असून ते एक पर्यटन स्थळ झालेले आहे.

अशा प्रकारे सोलापूर जिल्ह्यातील सर्वसामान्य माहितीचा आढावा घेतलेला आहे.

## ३.२ संशोधनासाठी निवड केलेल्या सहकारी सूत गिरण्यांच्या तालुक्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन :

३.२.१) दक्षिण सोलापूर

३.२.२) सांगोला

३.२.३) उत्तर सोलापूर

३.२.४) मोहोळ

### ३.२.१) दक्षिण सोलापूर :

**१) भौगोलिक स्थान :-**

दक्षिण सोलापूर तालुका सोलापूर जिल्ह्यात वसलेला आहे.

**२) सिमा :-**

दक्षिण सोलापूर तालुक्याच्या पूर्वेस अक्कलकोट, पश्चिमेस मंगळवेढा, दक्षिणेस कर्नाटकाचा भाग तर उत्तरेस उत्तर सोलापूर व मोहोळ या तालुक्याच्या सिमा आहेत.

**३) क्षेत्रफळ :-**

दक्षिण सोलापूर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ११९४६३ चौ.कि.मी. आहे. हे सर्व क्षेत्र ग्रामीण स्वरूपाचे आहे. तसेच तालुक्यात एकूण ९१ गावे आहेत. जिल्हा प्रदेश घटक ७ आहेत. ग्रामपंचायती ७६ आहे. बारामाही रस्ते ९८ आहेत.

**४) जमिन क्षेत्र :-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात पर्जन्य सरासरी १२२.४७ टक्के आहे. या तालुक्यात ओलिताखालील निव्वळ क्षेत्र १९३०६ इतके आहे. त्यामध्ये पृष्ठभागीय क्षेत्र ६२६१ हेक्टर व विहीरीवरील क्षेत्र १२४०१ हेक्टर ओलिताखाली आहे. तसेच ओलिताखालील स्थूल क्षेत्र ९५५२४ हेक्टर आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र १०४५६९ हेक्टर आहे. ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी असणारी टक्केवारी २०.२१ टक्के इतकी आहे. ओलिताखालील क्षेत्र हे तालुक्यातील काही भागात उजनीचे कालवे व पाझर तलावे होत असल्याने हे ओलिताखालील क्षेत्र वाढत आहे.

**५) पिक रचना :-**

प्रामुख्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकरी ज्वारी, गहू, कापूस, सूर्यफूल, ऊस, बाजरी, मका, हरभरा या अन्नधान्यांचे उत्पादन घेतात. तसेच भाजीपाला व फळ पिके आवळा, चिंच, आंबा, पपई, द्राक्षे इ. फळाचे उत्पादन होते. तसेच तालुक्यात कोरडवहू ३८ हेक्टर, ओलीताखाली ९३ हेक्टर क्षेत्रात कापसाची लागवड केलेली आहे.

**६) उद्योगधंदे :-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात हैद्राबाद-सोलापूर रोडवर औद्योगिक वसाहत प्रस्तावित आहे. तेथे अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. बिर्ला सिमेंट होटगी स्टेशन, औष्णीक विद्युत प्रकल्प (एन.टी.पी.सी.) आहेत. तसेच लोकमंगल साखर कारखाना, भंडारकवठे (खाजगी) आणि प्रस्तावित ३ सहकारी साखर कारखान्यांचे कामकाज सुरु आहे. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यात वळसंग येथे श्री स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी आहे. या उद्योगामुळे तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

**७) व्यापार :-**

दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर ह्या दोन तालुक्याची मिळून एक कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर शहरात आहे. या समितीतर्फे शेतकऱ्याच्या मालाची अन्नधान्याची खरेदी विक्री होते. तसेच या तालुक्याचा व्यापार सोलापूर शहर, मोहोळ, अक्कलकोट, विजापूर, इंडी, चडचण,

जत, या शहराशी मोठया प्रमाणावर चालतो. तसेच तालुक्यातील फळे, साखर व सूत हे विदेशात निर्यात केले जातात.

**८) वाहतूक व दळणवळण :-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातून एक राष्ट्रीय मार्ग ४३ हैद्राबाद-सोलापूर, विजापूर-सोलापूर, सोलापूर-पुणे व राज्यमार्ग ३७ जातो. प्रमुख जिल्हा मार्ग २९६ आहेत. इतर जिल्हा १३९ कि.मी. आहे. ग्राम मार्ग ४९६ कि.मी. आहे. एकूण लांबी रस्त्यांची १०११ कि.मी. आहे. तसेच तालुक्यातील सर्व गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. होटगी जंक्शन हे रेल्वे स्टेशन आहे. येथून लोहमार्ग आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, हैद्राबाद, बेंगलोर, चेन्नई, दिल्ली या शहराकडे जाण्याकरिता, अन्नधान्या पाठविणे व व्यापाराकरीता देखील रेल्वेची सोय आहे.

**९) लोकसंख्या :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार दक्षिण सोलापूरची लोकसंख्या २२५४८९ इतकी होती. त्यामध्ये पुरुष संख्या १०९०२५ व स्त्रियांची संख्या १०१७४९ इतकी होती. तसेच तालुक्यात ग्रामीण कुटुंबाची एकूण संख्या ३९१८६ इतकी होती. दक्षिण सोलापूर तालुक्यातील लोकसंख्येची घनता १७६ चौ.कि.मी. इतकी आहे. तालुक्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९३३ आहे. तालुक्यात एकूण ९१ गावे आहेत ती ग्रामीण आहेत.

**१०)शैक्षणिक सोयी :-**

शैक्षणिक सोयीमध्ये तालुक्यात सर्व गावामध्ये २७३ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळा, १० खाजगी प्राथमिक शाळा आहेत. तसेच तालुक्यात ४० हायस्कूल आहेत. तसेच २१ कनिष्ठ महाविद्यालये, १ वरिष्ठ महाविद्यालय, ३ अध्यापक महाविद्यालय आहेत. १ आय.टी.आय. आहे. या सर्व शैक्षणिक क्षेत्रातील हायस्कूल व महाविद्यालयातून ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ५६.८९ टक्के इतके आहे.

**११) आरोग्यविषयक सुविधा :-**

तालुक्यात सार्वजनिक व शासन सहाय्यीत असे एक रूग्णालय आहे. ६ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर त्यांचे ३३ उपकेंद्रे आहेत. तसेच प्रत्येक गावात खाजगी दवाखाने देखील आहेत. त्यामुळे तालुक्यातील लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

**१२)बँका :-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात ०५ वर्गिकृत बँका आहेत. तसेच राष्ट्रीयकृत पाच बँका तालुक्यात असून त्यांची २९ गावात शाखा कार्यालये आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था देखील स्थापन झालेल्या आहेत. ८२ प्राथमिक कृषी सहकारी संस्था आहेत.

**१३) धार्मिक व पर्यटन स्थळ :-**

दक्षिण सोलापूर हत्तरसंग कुडल येथे हेमाडपंथी मंदिर आहे. तसेच हत्तुर, मंद्रुप येथे धार्मिक स्थळे आहे. होटगी येथे तलावाजवळ साईबाबा मंदिर हे पर्यटन स्थळ आहे.

**३.२.२) सांगोला तालुका :-**

**१) भौगोलिक स्थान :-**

सांगोला तालुका सोलापूर जिल्ह्यात वसलेला आहे.

**२) सिमा :-**

सांगोला तालुक्याच्या पूर्वेस मंगळवेढा, पश्चिमेस आटपाडी, दक्षिणेस जत तर उत्तरेस पंढरपूर व माळशिरस या तालुक्याच्या सिमा आहेत.

**क्षेत्रफळ :-**

सांगोला तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४८१.९ चौ.कि.मी. आहे. हे सर्व क्षेत्र ग्रामीण स्वरूपाचे आहे. तसेच तालुक्यात एकूण १०२ गावे आहेत. सांगोल्यात एक नगरपरिषद आहे. जिल्हा परिषद गट ०७ आहेत. स्वतंत्र ग्रामपंचायती १०२ आहे. बारामाही रस्ते ५५ आहेत.

**३) जमिन क्षेत्र :-**

सांगोला तालुक्यात पर्जन्य सरासरी १३५.०८ टक्के आहे. या तालुक्यात ओलिताखालील निव्वळ क्षेत्र २८६५७ इतके आहे. त्यामध्ये पृष्ठभागीय क्षेत्र २८६५७ हेक्टर व विहीरीवरील क्षेत्र ० हेक्टर ओलिताखाली आहे. तसेच ओलिताखालील स्थूल क्षेत्र २८६५७ हेक्टर आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ६७३५९ हेक्टर आहे. ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी असणारी टक्केवारी ४२.१० टक्के इतकी आहे. ओलिताखालील क्षेत्र हे तालुक्यातील काही भागात उजनीचे कालवे व पाझर तलावे होत असल्याने हे ओलिताखालील क्षेत्र वाढत आहे.

**४) पिक रचना :-**

प्रामुख्याने सांगोला तालुक्यातील शेतकरी ज्वारी, गहू, कापूस, सूर्यफूल, ऊस, बाजरी, मका, हरभरा या अन्नधान्यांचे उत्पादन घेतात. तसेच भाजीपाला व फळ पिके डाळिंब, बोर, पपई,

आवळा, इ. फळांचे उत्पादन होते. तसेच तालुक्यात कोरडवाहू १३१५ हेक्टर, ओलीताखाली ४७७ हेक्टर क्षेत्रात कापसाची लागवड केलेली आहे. सांगोल्यातील डाळिंब पिकाला जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात डाळिंब, बोर ह्या फळांची विदेशात निर्यात केली जाते.

**५) उद्योगधंदे :-**

सांगोला तालुक्यात सांगोला-कोल्हापूर रोडवर औद्योगिक वसाहत आहे. तेथे अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. ह्याचा मार्गावर दोन सहकारी सूत गिरण्या आहेत. तसेच १ साखर कारखान चालू आहे. एक वस्त्र निर्माण (गारमेंट) आहे. या उद्योगामुळे तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

**६) व्यापार :-**

सांगोला तालुक्यात एक कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. या समितीतर्फे शेतकऱ्याच्या मालाची अन्नधान्याची खरेदी विक्री होते. तसेच या तालुक्याचा व्यापार सोलापूर शहर, मोहोळ, आटपाडी, जत, सांगली, कोल्हापूर, सातारा, मुंबई, पुणे या शहराशी मोठया प्रमाणावर चालतो. तसेच तालुक्यातील फळे, साखर व सूत हे अमेरिका, न्यूयॉर्क, युरोप ह्या देशात निर्यात केले जातात. तसेच सांगोल्यातील सहकारी सूत गिरण्यातील सूत अमेरिका, चिन, जपान, मलेशिया, सिंगापूर इत्यादी देशात निर्यात केले जाते.

**७) वाहतूक व दळणवळण :-**

सांगोला तालुक्यातून एक राष्ट्रीय मार्ग ० कि.मी.  व राज्यमार्ग १५३ कि.मी. जातो. प्रमुख जिल्हा मार्ग २८५कि.मी आहे. इतर जिल्हा २६५.४७ कि.मी. आहे. ग्राम मार्ग ८१९ कि.मी. आहे. एकूण लांबी रस्त्यांची १५२२.२४७ कि.मी. आहे. तसेच तालुक्यातील सर्व गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. सांगोला येथे रेल्वे स्टेशन सुद्धा आहे. येथून लोहमार्ग आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, हैद्राबाद, बेंगलोर, चेन्नई, दिल्ली या शहराकडे जाण्याकरिता, अन्नधान्य, बोर, डाळींब, पपई, द्राक्षे, सूत पाठविणे व व्यापाराकरीता देखील रेल्वेची सोय आहे.

**८) लोकसंख्या :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार सांगोला तालुक्याची लोकसंख्या २६०९९२ इतकी होती. त्यामध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार पुरुष संख्या १२५९७८ व स्त्रियांची संख्या ११७९९३ इतकी होती. तसेच तालुक्यात ग्रामीण कुटुंबाची एकूण संख्या ४५५०१ इतकी होती. सांगोला

तालुक्यातील लोकसंख्येची घनता १६५ चौ. कि.मी. इतकी आहे. तालुक्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९३७ आहे. तालुक्यात एकूण १०२ गावे आहेत ती ग्रामीण आहेत.

**९) शैक्षणिक सोयी :-**

शैक्षणिक सोयीमध्ये तालुक्यात सर्व गावामध्ये ४८५ प्राथमिक शाळा आहेत. एकूण ४४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच तालुक्यात ५१ हायस्कूल आहेत. तसेच २३ कनिष्ठ महाविद्यालये, २ वरिष्ठ महाविद्यालये, ३ अध्यापक महाविद्यालय आहेत. ३ शिक्षणशास्त्र महाविद्यालय आहेत. १ आय.टी.आय. आहेत. २ इंजिनिअरिंग कॉलेज आहेत. १ एम.बी.ए. कॉलेज आहेत. तसेच तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ५६.०७ टक्के इतके आहे.

**१०) आरोग्यविषयक सुविधा :-**

सन २०१०-११ नुसार तालुक्यात सार्वजनिक व शासन सहाय्यीत असे एक रूग्णालय आहे. ६ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर त्यांचे ३९ उपकेंद्रे आहेत. तसेच सांगोल्यात ५ खाजगी रुग्णालय आहेत. सांगोल्यात ८४ दवाखाने आहेत. त्यामुळे तालुक्यातील लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

**११) बँका :-**

सांगोला तालुक्यात ०८ वर्गिकृत बँका आहेत. तसेच राष्ट्रीयकृत ०८ बँका तालुक्यात असून त्यांची ४४ गावात शाखा कार्यालये आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था देखील स्थापन झालेल्या आहेत. ८१ प्राथमिक कृषी सहकारी संस्था आहेत.

**१२) धार्मिक व पर्यटन स्थळ :-**

सांगोला तालुक्यात आलेगाव येथे सिध्दनाथ मंदिर आहे. सांगोला तालुका अवर्षण प्रवण असल्यामुळे पर्यटन स्थळ विकसित झालेले नाही.

**३.२.३) उत्तर सोलापूर :**

**१) भौगोलिक स्थान :-**

उत्तर सोलापूर तालुका सोलापूर शहराजवळ वसलेला आहे.

**२) सिमा :-**

उत्तर सोलापूर तालुक्याच्या पूर्वेस तुळजापूर, पश्चिमेस मोहोळ, दक्षिणेस दक्षिण सोलापूर तर उत्तरेस बार्शी या तालुक्याच्या सिमा आहेत.

**३) क्षेत्रफळ :-**

उत्तर सोलापूर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ६८३०७ चौ.कि.मी. आहे. हे सर्व क्षेत्र ग्रामीण स्वरूपाचे आहे. तसेच तालुक्यात एकूण ४० गावे आहेत. जिल्हा परिषद गट २ आहेत. ग्रामपंचायती ७६ आहे. बारामाही रस्ते ९८ आहेत.

**४) जमिन क्षेत्र :-**

उत्तर सोलापूर तालुक्यात पर्जन्य सरासरी १२२.५२ टक्के आहे. या तालुक्यात ओलिताखालील निव्वळ क्षेत्र १२२२७ इतके आहे. त्यामध्ये पृष्ठभागीय क्षेत्र १२२२७ हेक्टर व विहीरीवरील क्षेत्र १२४०१ हेक्टर ओलिताखाली आहे. तसेच ओलिताखालील स्थूल क्षेत्र १२२२७ हेक्टर आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ५६२१८ हेक्टर आहे. ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी असणारी टक्केवारी २१.७५ टक्के इतकी आहे. ओलिताखालील क्षेत्र हे तालुक्यातील काही भागात उजनीचे कालवे व पाझर तलावे होत असल्याने हे ओलिताखालील क्षेत्र वाढत आहे.

**५) पिक रचना :-**

प्रामुख्याने उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकरी ज्वारी, गहू, कापूस, सूर्यफूल, ऊस, बाजरी, मका, हरभरा या अन्नधान्यांचे उत्पादन घेतात. तसेच भाजीपाला व फळ पिके चिंच, आंबा, पपई, द्राक्षे इ. फळाचे उत्पादन होते. तसेच तालुक्यात कोरडवहू ३८ हेक्टर, ओलीताखाली ४६ हेक्टर क्षेत्रात कापसाची लागवड केलेली आहे.

**६) उद्योगधंदे :-**

उत्तर सोलापूर तालुक्यात सोलापूर शहरालगत आहेत. त्यामध्ये सहकारी साखर कारखाना, २ खाजगी साखर कारखाने आहेत. कोंडी येथे औद्योगिक वसाहत आहे. तेथे अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. प्लास्टीक उद्योग, पाईप उद्योग, रेल्वेचे सिमेंट स्लीपर निर्मिती उद्योग असे लघु व मध्यम मोठे उद्योग धंदे आहेत. एक शरद शेतकरी सूत गिरणी आहे. या उद्योगामुळे तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

**७) व्यापार :-**

उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर असे दोन तालुक्यांचे एक कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर शहरात आहे. या समितीतर्फे शेतकऱ्याच्या मालाची अन्नधान्याची खरेदी विक्री होते. तसेच या तालुक्याचा व्यापार सोलापूर शहर, मोहोळ, बार्शी, वैराग, उस्मानाबाद, मुंबई, पुणे,

कोल्हापूर या शहराशी मोठया प्रमाणावर चालतो. तसेच तालुक्यातील फळे, साखर व सूत हे विदेशात निर्यात केले जातात.

**८) वाहतूक व दळणवळण :-**

उत्तर सोलापूर तालुक्यातून २ राष्ट्रीय मार्ग पुणे-सोलापूर, हैद्राबाद-सोलापूर व राज्यमार्ग ७८ जातो. प्रमुख जिल्हा मार्ग १३८ आहे. इतर जिल्हा १४७४ कि.मी. आहे. ग्राम मार्ग १९८ कि.मी. आहे. एकूण लांबी रस्त्यांची १९३८ कि.मी. आहे. तसेच तालुक्यातील सर्व गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. पाकणी येथे रेल्वे स्टेशन सुद्धा आहे. येथून लोहमार्ग आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, हैद्राबाद, बेंगलोर, चेन्नई, दिल्ली या शहराकडे जाण्याकरिता, अन्नधान्य पाठविणे व व्यापाराकरीता देखील रेल्वेची सोय आहे.

**९) लोकसंख्या :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार उत्तर सोलापूर तालुक्याची लोकसंख्या ९४४९१ इतकी होती. त्यामध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार पुरुष संख्या ४५८८६ व स्त्रियांची संख्या ४२४३९ इतकी होती. तसेच तालुक्यात ग्रामीण कुटुंबाची एकूण संख्या १७०९६ इतकी होती. उत्तर सोलापूर तालुक्यातील लोकसंख्येची घनता १२४ चौ. कि.मी. इतकी आहे. तालुक्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२५ आहे. तालुक्यात एकूण ४० गावे आहेत ती ग्रामीण आहेत.

**१०)शैक्षणिक सोयी :-**

शैक्षणिक सोयीमध्ये तालुक्यात सर्व गावामध्ये ५६८ प्राथमिक शाळा, ३४५ खाजगी प्राथमिक शाळा आहेत. तसेच तालुक्यात २० हायस्कूल आहेत. तसेच १० कनिष्ठ महाविद्यालये, १ वरिष्ठ महाविद्यालये, १ अध्यापक महाविद्यालय आहेत. १ शिक्षणशास्त्र महाविद्यालय आहेत. २ कृषी विज्ञान केंद्र आहेत. १ कृषी महाविद्यालय आहेत. १इंजिनिअरींग कॉलेज आहेत. तसेच तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ६५.५९ टक्के इतके आहे.

**११) आरोग्यविषयक सुविधा :-**

तालुक्यात सार्वजनिक व शासन सहाय्यीत असे २ रूग्णालय आहे. ४ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर त्यांचे २२ उपकेंद्रे आहेत. तसेच प्रत्येक गावात खाजगी दवाखाने देखील आहेत. त्यामुळे तालुक्यातील लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

**१२)बँका :-**

उत्तर सोलापूर तालुक्यात ३० वर्गिकृत बँका आहेत. तसेच राष्ट्रीयकृत ३० बँका तालुक्यात असून त्यांची ६० गावात शाखा कार्यालये आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था देखील स्थापन झालेल्या आहेत. ५० प्राथमिक कृषी सहकारी संस्था आहेत.

**१३) धार्मिक व पर्यटन स्थळ :-**

उत्तर सोलापूर तालुक्यात मार्डी येथे यमाई देवीचा मंदिर आहे. तसेच नान्नज येथे राष्ट्रीय मोळढोक अभयारण्य आहे हे पर्यटनस्थळ म्हणून विकसित होत आहे.

**३.३.४) मोहोळ तालुक्याची सर्वसामान्य माहिती :-**

इंग्रज व मराठे यांच्यातील खऱ्या अर्थाने शेवटची लढाई १८१८ मध्ये मोहोळ तालुक्यातील आष्टी येथे घडून आली. या युद्धात दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले हे मारले गेले. ही लढाई इतिहासात आष्टीची लढाई म्हणूनच ओळखली जाते.

**मोहोळ तालुका :-**

**१) भौगोलिक स्थान :-**

मोहोळ तालुका सोलापूर जिल्ह्यात वसलेला आहे.

**२) सिमा :-**

मोहोळ तालुक्याच्या पूर्वेस उत्तर सोलापूर, पश्चिमेस पंढरपूर, दक्षिणेस दक्षिण सोलापूर व मंगळवेढा तर उत्तरेस बार्शी व माढा या तालुक्याच्या सिमा आहेत.

**३) क्षेत्रफळ :-**

मोहोळ तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४०८.४० चौ.कि.मी. आहे. हे सर्व क्षेत्र ग्रामीण स्वरूपाचे आहे. तसेच तालुक्यात एकूण १०१ गावे आहेत.

**४) जमिन क्षेत्र :-**

मोहोळ तालुक्यात पर्जन्य सरासरी १६३.९८ टक्के आहे. या तालुक्यात ओलिताखालील निव्वळ क्षेत्र १४३१६ इतके आहे. त्यामध्ये पृष्ठभागीय क्षेत्र १४३१६ हेक्टर व विहीरीवरील क्षेत्र ० हेक्टर ओलिताखाली आहे. तसेच ओलिताखालील स्थूल क्षेत्र २१८०७ हेक्टर आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ९४३६८ हेक्टर आहे. ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडी खालील स्थूल क्षेत्राशी असणारी टक्केवारी १५.१७ टक्के इतकी आहे. ओलिताखालील क्षेत्र हे तालुक्यातील काही भागात उजनीचे कालवे व पाझर तलावे होत असल्याने हे ओलिताखालील क्षेत्र वाढत आहे.

**५) पिकरचना :-**

प्रामुख्याने मोहोळ तालुक्यातील शेतकरी गहू, ज्वारी, ऊस, मका, बाजरी, तांदूळ, सुर्यफूल, तर हरभरा, मटकी, कापूस या अन्नधान्यांचे उत्पादन घेतात. तसेच भाजीपाला फळे, बोर, डाळींब, आवळा, चिंच, आंबा, पपई, द्राक्षे इ. फळाचे उत्पादन होते. तसेच तालुक्यात १७४० हेक्टर क्षेत्रात कापसाची लागवड केलेली आहे.

**६) उद्योगधंदे :-**

मोहोळ तालुक्यात पुणे-सोलापूर रोडवर चंद्रमोळी औद्योगिक वसाहत आहे. तेथे अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. प्लास्टीक उद्योग, पाईप उद्योग, रेल्वेचे सिमेंट स्लीपर निर्मिती उद्योग असे लघु व मध्यम मोठे उद्योग धंदे आहेत. तसेच सहकारी तत्वावरील दोन साखर कारखाने आहेत. सहकारी तत्वावरील एक सूत गिरणी तालुक्यात आहे. या उद्योगामुळे तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

**७) व्यापार :-**

तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. या समितीतर्फे शेतकऱ्याच्या मालाची अन्नधान्याची खरेदी विक्री होते. तसेच या तालुक्याचा व्यापार सोलापूर बार्शी, वैराग, पंढरपूर, माढा, पुणे, मुंबई या शहराशी मोठया प्रमाणावर चालतो. तसेच तालुक्यातील फळे, साखर व सूत हे विदेशात निर्यात केले जातात.

**८) वाहतूक व दळणवळण :-**

मोहोळ तालुक्यातून एक राष्ट्रीय मार्ग पुणे सोलापूर व एक प्रस्तावित राज्यमार्ग रत्नागिरी-नागपूर जातो. राज्य महामार्ग ९४ कि.मी.आहे. प्रमुख जिल्हा मार्ग १६२ कि.मी. आहेत. इतर जिल्हा मार्ग २३० कि.मी. आहेत. ग्राम मार्ग ४७७ कि.मी.आहे. एकूण रस्त्यांची लांबी १००८ कि.मी. आहेत. तसेच तालुक्यातील सर्व गावे पक्क्या रस्त्यांनी जोडलेले आहेत. मोहोळ येथे रेल्वे स्टेशन सुद्धा आहे. येथून लोहमार्ग आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, हैद्राबाद, बेंगलोर, चेन्नई, दिल्ली या शहराकडे जाण्याकरिता, अन्नधान्या पाठविणे व व्यापाराकरीता देखील रेल्वेची सोय आहे.

**९) लोकसंख्या :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार मोहोळ तालुक्याची लोकसंख्या २७०१५५ इतकी होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार त्यामध्ये पुरुष संख्या १३१४९३ व स्त्रियांची संख्या १२१०३३ इतकी होती. तसेच तालुक्यात ग्रामीण कुटुंबाची एकूण संख्या ५२०२१ इतकी होती. मोहोळ तालुक्यातील

लोकसंख्येची घनता १७९ चौ.कि.मी. इतकी आहे. तालुक्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२० आहे. तालुक्यात एकूण १०१ गावे आहेत ती ग्रामीण आहेत.

**१०)शैक्षणिक सोयी :-**

शैक्षणिक सोयीमध्ये तालुक्यात सर्व गावामध्ये प्राथमिक शाळा आहेत. तसेच तालुक्यात ६० हायस्कूल आहेत. तसेच ६ कनिष्ठ महाविद्यालये, २ वरिष्ठ महाविद्यालये, एक शारिरीकशिक्षण महाविद्यालय, दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालय आहेत. या सर्व शैक्षणिक क्षेत्रातील हायस्कूल व महाविद्यालयातून ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ६९.५४ टक्के इतके आहे.

**११) आरोग्यविषयक सुविधा :-**

तालुक्यात सार्वजनिक व शासन सहाय्यीत असे एक रूग्णालय आहे. ७ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर त्यांचे ३५ उपकेंद्रे आहेत. तसेच प्रत्येक गावात खाजगी दवाखाने देखील आहेत. त्यामुळे तालुक्यातील लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

**१२)बँका :-**

मोहोळ तालुक्यात ०७ वर्गिकृत बँका आहेत. तसेच राष्ट्रीयकृत ०७ बँका तालुक्यात असून त्यांची ३६ गावात शाखा कार्यालये आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात १२० सहकारी पतसंस्था देखील स्थापन झालेल्या आहेत.

**१३) धार्मिक व पर्यटन स्थळ :-**

तालुक्यात वडवळ येथे हेमाडपंथी विशाल नागनाथांचे मंदिर आहे. तसेच पिपरी येथे परमेश्वराचे मंदिर आहे. तसेच या तालुक्यात हरण या प्राण्यांचे वास्तव्य मोठया प्रमाणात आहे.

संशोधनासाठी निवडलेली महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी ही मोहोळ तालुक्यात असल्याने तालुक्याची सर्वसामान्य माहिती विचारात घेतलेली आहे.

**संदर्भ :-**

१) महाराष्ट्र आर्थिक पाहणी सन २०१०-११ अर्थ व साख्यिंकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, सांख्यिकी विभाग, सोलापूर २०१०-११.

## प्रकरण चौथे

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती

### ४.१ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी नियमित, वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

४.१.१ स्थापना

४.१.२ सभासद संख्या व भाग भांडवल

४.१.३ सूत उत्पादन

४.१.४ सूत विक्री

४.१.५ रोजगार

४.१.६ कामाचे स्वरूप

४.२.७ वेतन पध्दती

४.१.८ कल्याणकारी योजना

४.१.९ औद्योगिक सुरक्षितता

४.१.१० पूरस्कार

### ४.२. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, ता. सांगोले, जि. सोलापूर.

४.२.१ प्रस्तावना - स्थापना

४.२.२ सभासद संख्या व भाग भांडवल

४.२.३ सूत उत्पादन

४.२.४ सूत विक्री (स्थानिक बाजारात)

४.२.५ सूत विक्री (विदेशात) / निर्यात

४.२.६ रोजगार

४.२.७ कामाचे स्वरूप

४.२.८ वेतन पध्दती

४.२.९ कल्याणकारी योजना

४.२.१० पूरस्कार

## ४.३ शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

४.३.१ प्रस्तावना - स्थापना

४.३.२ सभासद संख्या व भाग भांडवल

४.३.३ सूत उत्पादन

४.३.४ सूत विक्री

४.३.५ रोजगार

४.३.६ कामाचे स्वरुप

४.३.७ वेतन पध्दती

४.३.८ कल्याणकारी योजना

## ४.४ महात्मा फुले अनूसुचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नि., शारदानगर, वाघोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर

४.४.१ प्रस्तावना - इतिहास

४.४.२ स्थापना

४.४.३ सभासद संख्या व भाग भांडवल

४.४.४ सूत उत्पादन

४.४.५ सूत विक्री

४.४.६ रोजगार

४.४.७ कामाचे स्वरुप

४.४.८ वेतन पध्दती

४.४.९ कल्याणकारी योजना

## ४.५ शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी सांगोले, ता. सांगोला, जि. सोलापूर.

४.५.१ प्रस्तावना - स्थापना

४.५.२ सभासद संख्या व भाग भांडवल

४.५.३ सूत उत्पादन

४.५.४ सूत विक्री

४.५.५ रोजगार

४.५.६ कामाचे स्वरुप


४.५.७ वेतन पध्दती

४.५.८ कल्याणकारी योजना

४.५.९ पूरस्कार

४.६ सैध्दांतिक पार्श्वभूमी

४.७ गृहितकांची तपासणी



# प्रकरण चौथे

# सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची प्रगती

**प्रस्तावना :**

सोलापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग स्थापन करण्यात आले आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू बनविणारे उद्योग उदा. हातमाग, कातडी, कागद, स्टील व पितळी भांडी, रंग, खिळे, औषध इ. बनविणारे उद्योग तर कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग उदा. जिनिंग व प्रेसिंग, साखर कारखाने, सूत गिरण्या, तेल गिरण्या डाळीच्या गिरण्या इ. चा समावेशहोतो. या उद्योगामध्ये कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची भूमिका महत्वाची आहे. कारण सोलापूर जिल्ह्यातील कृषी क्षेत्रामध्ये ज्वारी, गहु, ऊस, भूईमुग, तूर, कापूस, करडई सोयाबीन इ. पिके घेतली जातात. या पिकांच्या उत्पादनात वाढ होत गेली. त्यामुळे कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची संख्या वाढत गेली. या उद्योगांनी जिल्ह्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली आहे.

जिल्ह्यामध्ये कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारे जे उद्योग आहेत त्यापैकी सहकारी सूत गिरण्या हा उद्योग महत्वाचा आहे. कारण या उद्योगाने ग्रामीण भागाचे चित्र बदलून सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आशेचा किरण निर्माण केला आहे. सहकारी सूत गिरण्यामुळे या भागातील जनतेच्या जीवनामध्ये परिवर्तन घडून आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा विचार केला तर सन १९६४ पर्यंत जिल्ह्यात एकही सूत गिरणी नव्हती. त्यानंतरच्या काळामध्ये मात्र हळूहळू सूत गिरण्यांची संख्या वाढत गेली. जिल्ह्यातील कापसाखाली असलेल्या क्षेत्रामध्ये व उत्पादनामध्ये जसजशी वाढ होत गेली तसतसे गरजेनूसार सहकारी सूत गिरण्यांची उभारणी करण्यात आली. त्यामुळे सूत गिरण्यांची संख्या वाढत गेली. सोलापूर जिल्ह्यामध्ये सन १९६७ मध्ये ०२ सूत गिरण्या होत्या. त्यात वाढ होऊन आज ही संख्या ०६ इतकी झाली. या सूत गिरण्यांची उभारणी खाजगी व सहकारी या तत्त्वावर झालेली आहे. या एकूण सूत गिरण्यांपैकी २ खाजगी तत्त्वावर व ०६ सहकारी क्षेत्रात कार्यरत आहेत. या सूत गिरण्याची उभारणी कधी झ ाली, तसेच गिरण्यातील विविध घटकासंबंधिचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

## ४.१ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकर सहकारी सूत गिरणी नियमित वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

### ४.१.१ स्थापना :-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकरी व विणकरी लोकांना एकत्रित करुन माझी आमदार व्ही. गु. शिवदारे यांनी या सूत गिरणीची दि. १४/११/१९७९ रोजी नोंदणी क्र. एस.यु.आर./पी.आर.जी./(ए) ५ अन्वये नोंदणी केलेली आहे. या सूत गिरणीची सुरुवातीची

सभासद संख्या ५०४८ होती. ही सूतगिरणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग या गावी आहे. सोलापूर-अक्कलकोट रोडवर सोलापूर पासून २५ किलोमीटर व अक्कलकोट पासून ७ किलोमीटरवर आहे. ही सूत गिरणी ६४ एकर जमिनीमध्ये वसलेली आहे. सूत गिरणीच्या परिसरात आवळा, बोर, चिंच व कर्मचारीवसाहत, सूत गिरणीच्या परिसरात आहे. ही सूत गिरणी स्थापन झाल्यापासून नफ्यात आहे. या सूत गिरणीच्या स्थापनेमुळे त्या परिसरातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष २००० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. सूत गिरणीमुळे त्या परिसराचा आर्थिक, सामाजिक, भौगोलिक विकास होण्यास मदत होत आहे.

सन २०१०-११ या वर्षाअखेर ४७९१ इतकी सभासद संख्या आहे.

## स्वामी समर्थ शेतकरी व सहकारी विणकर सूत गिरणी, वळसंग

### ४.२ सभासद संख्या :-

**सभासद संख्या (हजारात)**

**तक्ता क्र. ४.१.१**

| अ.क्र. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक सभासद | ३६०९ | ३६१३ | ३६२२ | ३६२९ | ३६५५ | ३६७८ | ३६८७ | ४७२७ | ४७६६ | ४७९१ |
| २. | व्यक्तिगत विणकर सभासद | १३८ | १३८ | १३८ | १४० | १४० | १४० | १६६ | १९१ | १९४ | १९४ |
| ३. | हातमाग विणकर सोसा. | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ४. | इतर सह सोसायटी | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ | ११९ |
| ५. | महाराष्ट्र राज्य शासन मुंबई. | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | **एकूण** | **३८७७** | **३८८१** | **३८९०** | **३८९९** | **३९२५** | **३९४८** | **३९८३** | **५०४८** | **५०९०** | **५११५** |

**आधार :- श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी च्या सन २००१ ते २०११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून.**

**अधिकृत भागभांडवल रु. ७५०.०० लाख आहे.**

**विगतवारी खालीलप्रमाणे**

**तक्ता ४.१.२**

| अ. क्र. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक सभासद | ३३.९७ | ३३.९८ | ३४.०४ | ३४.४७ | ३५.४९ | ३६.६३ | ३७.४३ | ४३.७८ | ४४.५७ | ४७.३६ |
| २. | व्यकिगत विणकर सभसद | १.३१ | १.३१ | १.३१ | १.४१ | १.४१ | १.४१ | २०.०६ | २.१८ | २.१९ | २.१९ |
| ३. | हातमाग विणकर सोसा. | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ | २.५९ |
| ४. | इतर सह सोसायटी | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ | १२.४५ |
| ५. | महाराष्ट्र राज्य शासन मुंबई | ५०९.०० | ५६३.०० | ६०१.०० | ५६५.०० | ५२९.०० | ४९३.०० | ४५७.०० | ४२१.०० | ४१५.०० | ३४९.०० |
| | **एकूण** | **५६९.३०** | **६१३.३३** | **६५१.३९** | **६१५.९२** | **५८०.९४** | **५४६.०८** | **५११.५३** | **४८२.००** | **४७६.८०** | **४१३.५९** |

**आधार :- श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१ ते २०११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून.**

### ४.१.२ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग चे सभासद संख्या व भाग भांडवल :

वरील आकडो ारीवरुन असे दिसून येते की, सभासद संख्येत वाढ नाही. परंतु उत्पादक सभासदाच्या भागभांडवलात रु. २०००/- वाढ झाली आहे. तसेच गिरणीच्या प्रथम प्रकल्प ऊभारणीसाठी शासनाकडून मिळालेल्या रु. ३५९.०० लाखाचे दि. ३१ मार्च २००२ पासून परतफेडीस सुरुवात झालेली आहे. २००१-०२ या सालात १० लाख शासकीय भागभांगवल परत केलेले आहे.

१) सन २००३-०४ या वर्षी सभासद संख्येत वाढ झालेली आहे. परंतु अहवाल वर्षात भाग भांडवलात रु. ६००० ने वाढ झाली आहे. गिरणीच्या प्रथम प्रकल्प उभारणीसाठी शासनाकडून मिळालेल्या रु. ३५९.०० लाखाचे ३१ मार्च २००२ पासून परतफेडीस सुरुवात झाल्याने यावर्षाअखेर ५०.०० लाख शासकीय भाग भांडवल परतफेड केले आहे.

२) सन २००४-०५ या अहवाल वर्षात सभासद संख्येत वाढ आहे. परंतु उत्पादक व विणकर सभासदांच्या भाग भांडवलात रु. ५३,००० ने वाढ झाली आहे. अहवाल वर्षात रु. ३६.०० लाख शासकीय भाग भांडवल परतफेड केले आहे. आतापर्यंत गिरणीने रु. ८६.०० लाख शासकीय भागभांडवल परतफेड केले आहे.

३) सन  २००५-०६ या अहवाल वर्षातील आकडेवारीवरुन आपणास असे दिसून येईल की, सभासद संख्येत वाढ  झालेली आहे.  परंतु (तसेच) उत्पादक व विणकर सभासदांच्या भाग भांडवलात रु. १,०२,५०० ने वाढ झाली आहे. आतापर्यंत गिरणीने रु. १२२.०० लाख शासकीय भाग भांडवल परतफेड केले आहे.

४) सन २००६-०७ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रु. ७५० लाखाचे असून ३१-०३-२००७ अखेर सभासद व शासनाचे रु. ५४६.०८ लाख भाग भांडवल प्राप्त झालेले आहे.

वरील आकडेवारीवरुन आपणास असे दिसून येते की, सभासद संख्येत वाढ झालेली आहे. सभासदाच्या भाग भांडवलात रु. १.१४ लाखाने वाढ झाली आहे. तसेच गिरणीने शासनाचे रु. १५८.०० लाख शासकीय भाग भांडवलाची परतफेड केलेली आहे.

५) सन २००७-०८ या अहवाल वर्षात अधिकृत भाग भांडवल रु. ७५०.०० लाखाचे असून त्यापैकी सभासद व शासनाचे २००८ अखेर रु. ५११.५३लाख प्राप्त झाले.

वरील आकडेवारीवरुन आपणास असे दिसून येईल की, सभासद संख्येत वाढ होत आहे. तसेच उत्पादक व विणकर सभासदांच्या भाग भांडवलात रु. १.४५ लाखाने वाढ झाली आहे. आतापर्यंत गिरणीने १९४.०० लाख शासकीय भाग भांडवलाची परतफेड केलेली आहे.

६) सन २००८-०९ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रु. ७५०.०० लाखाचे असून त्यापैकी सभासद व शासनाचे ३१-०३-२००९ अखेर रु. ४८२.०० लाख प्राप्त झालेले आहे.

या अहवाल वर्षात आपणास असे दिसून येईल की, उत्पादक व विणकर सभासदांच्या भाग भांडवलात रु. ६.४७ लाखाने वाढ झाली आहे. हे प्रमाण फारच कमी आहे.

७) सन २००९-१० या अहवाल वर्षात सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल ७५०.०० लाखाचे असून त्यापैकी सभासद व शासनाचे दिनांक ३१/०३/२०१० अखेर रु. ४७६.८० लाख धारण केलेले आहे.

या अहवाल वर्षात आपणास असे दिसून येईल की, उत्पादक व विणकर सभासदाच्या भाग भांडवलात रु. ०.८० लाखाने वाढ झालेली आहे.

८) सन २०१०-११ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल रु. ७५०.०० लाखाचे असून त्यापैकी सभासद व शासनाने दिनांक ३१/०३/२०११ अखेर रु. ४१३.५९ लाख धारण केलेले आढळते.

## सारांश

वरील आकडेवारीवरुन आपणास असे दिसून येईल की, उत्पादक सभासदाच्या भाग भांडवलात रु. २.७९लाखाने वाढ झाली आहे. गतवर्षी जास्तीत जास्त भाग खरेदी करण्याचे अवाहन केल्याने भाग भांडवलातवाढ झाल्याचे आढळते. अवाहनास उत्पादक सभासदाने प्रतिसाद दिल्याने वाढ झालेली आहे. अहवाल वर्षात सूत गिरणीच्या सभासद संख्येत वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरणीच्या भाग भांडवलात देखील वाढ झालेली आहे. तसेच शासनाकडून घेतलेले कर्ज देखील सूत गिरणीने १०८१.७८लाख परतफेड करणे आवश्यक आहे. शासनाच्या प्राप्त भाग भांडवलापैकी रु. ३०२.००लाख भाग भांडवलाची परतफेड केलेली आहे. अद्याप रु. ५७.०० लाख शासकीय भागभांडवल परतफेड करावयाचे आहे.

### ४.१.३ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग चे सूत उत्पादन :-

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रामुख्याने चार उत्पादन घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन यांचा समावेश होतो. विशेषतः ज्या नैसर्गिक मानवी साधनांचे उत्पादन प्रक्रियेला सहाय्य होते. त्या साधनांना उत्पादनाचे घटक असे म्हणतात. वास्तविक पाहता उत्पादनाच्या क्रियेला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. जमीन, इमारत, कच्चामाल, इंधन, श्रम, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन इत्यादी अनेक वेळा उत्पादन क्रियेसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या खूपच मोठी असते. या सर्वांना आदान (Input) असे म्हणतात. परंतू अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या सोईसाठी सर्व आदानांचे चार गट पाडले आहेत. भूमी, श्रम, भांडवल, संयोजन यालाच चतुर्विध वर्गिकरण असे म्हणतात. आज कोणतेही उत्पादन करायचे झाल्यास या चार घटकांची आवश्यकता आहे. पूर्वी उत्पादनाचे दोनच घटक मानले जात होते. परंतू भांडवलाचे महत्व वाढत गेल्याने उत्पादनाचा तो एक स्वतंत्र घटक बनला. तसेच श्रम करणारे मजूर व उत्पादनाची जोखीम स्विकारणारा संयोजक यातही फरक केला गेला. उत्पादनाचे हे चार घटक एकत्र येऊन निर्माण होणारे फलित म्हणजे उत्पादन होय. सर्व अर्थिक घडामोडींचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे उपभोग होय. मात्र त्यासाठी उत्पादन व विनिमय या प्रक्रिया फार महत्वाच्या असतात. त्यामुळे उत्पादन हे अरंभस्थानी असणारा बिंदू धरला तर अंतिम बिंदू उपभोग होय. श्री स्वामी समर्थ सूत गिरणीच्या भांडवलाचा आढावा घेतल्यानंतर उत्पादन या महत्वाच्या घटकाकडे आपोआप लक्ष वेधले जाते. कारण कोट्यावधी रूपयांची उलाढाल केल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होणार ही मानवाची सहज प्रवृत्ती असते. तर निष्पन्न झालेले उत्पादन फायदेशिर की, तोट्याचे होते ते पाहणे देखिल संयोजकाचे (व्यवस्थापनेचे) कर्तव्यच असते. निर्मित उत्पादन कोणत्या किमतीला मिळते ते पाहणे हे ग्राहकांचे देखील कर्तव्यच असते.

श्री. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणीमध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने माहे मार्च २००१ पासून व्यापारी सूत उत्पादनास सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, ३०, ३४,३८,३९, ४०, ६४ सिंगल कोंम्बड- कार्डेड आणि होजिअरी विव्हिंग सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीची प्रगती पाहत असताना सूत उत्पादनातील चढ ऊतार पाहणे अधिक योग्य व महत्वाचे ठरते. श्री. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी मध्ये सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११ या काळात किती सूताचे उत्पादन केले आहे. त्याचा तपशील तक्ता. क्र. ४.१.३ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्र. ४.१.३

## सूत उत्पादन (किलो)


| अ.क्र. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्थापित चात्या (हजारात) | ३७४८८ | ३८३०४ | ३८३०४ | ३८३०४ | ३७४८८ | ३८३०४ | ३७४८८ | ३८३०४ | ३८३०४ | ३८३०४ |
| २. | चात्या वापर टक्केवारी | ८७.६६ | ८५.७८ | ८६.७९ | ८९.३५ | ८६.११ | ८७.३० | ९१.३८ | ९३.६८ | ९०.२७ | ९०.९६ |
| ३. | सूत उतारा टक्केवारी | ८४.२३ | ८३.४५ | ८०.७३ | ७९.९२ | ७३.३८ | ७६.२८ | ७४.८३ | ७५.५३ | ७४.४२ | ७६.२३ |
| ४. | सरासरी काऊंट टक्केवारी | ३७.४३ | ४०.१४ | ४०.२६ | ४२.५७ | ४६.८१ | ४३.०४ | ४८.५१ | ४६.११ | ४७.६९ | ४९.३४ |
| ५. | उत्पादन (किलो लाखात) | ३७.८६ | ३१.७५ | ३२.३२ | ३३.४६ | २८.३३ | ३१.९८ | २४.३९ | ३३.२७ | ३१.२७ | २९.२१ |

आधार :- श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी च्या सन २००१ ते २०११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून.

वरील तक्त्यावरुन अहवाल वर्षात प्रति चात्यांच्या वापरामध्ये वाढ झालेली आढळते. २००१-०२ मध्ये चात्यावापर ८७.६६% होते तर २०१०-११ ते ९०.९६% चात्या वापर आहे, सूत उतारामध्ये देखील सातत्य आहे. सन २००१-०२ ते २००५-०६ या काळात सूत उतारा ८४% ते ७३% आहे. तर २००६-०७ ते २०१०-११ या अहवाल वर्षात ७६% सातत्य राहिलेले आहे. सूताच्या सरासरी काऊंटमध्ये देखील सातत्याने वाढ झालेली आहे. २००१-०२ मध्ये सूताचा सरासरी काऊंट ३७.४३ होते. तर २०१०-११ मध्ये ४९.३४ आहे. म्हणजेच सूताचे सरासरी काऊंट वाढलेले आहे.

### आलेख क्र. १

### सूत उत्पादन किलो मध्ये




**आधार :— तक्ता क्र. ४.१.३**

१) सन २००१-०२ अहवाल वर्षात २६ ते ४४ पर्यंतचे कार्डेड व कोम्बर्ड प्रकारात सूताचे उत्पादन केले असून ओपन एण्ड स्पिनिंग मशीनवर १६ ते २० सिंगल सूताचे ही उत्पादन केले आहे. वरील आकडेवारी पाहिली असता एकंदरीत गत वर्षापेक्षा अहवाल वर्षात सूत उत्पादनात ५.७४ लाख किलोने वाढ झालेली आहे.

२) सन २००३-०४ या अहवाल सालात सूत गिरणीने स्थानिक व विदेशी बाजारासाठी ३२ ते ६२ कार्डेड व कोम्बड प्रकारात सूताचे उत्पादन केले आहे. गेल्या दोन वर्षापूर्वी ओपन एण्ड स्पिनिंग मशिनवर १६ ते २० कार्डेड सूताचेही उत्पादन केले आहे. ओपन एण्ड स्पिनिंग मशिन विक्री केल्यामुळे आता उत्पादन नाही अहवाल सालात २००३-०४ या वर्षात गतवर्षापेक्षा ०.५७ किलो उत्पादन जादा झालेले आहे.

३) सन २००४-०५ या अहवालवर्षी ३२ ते ६० पर्यंतचे कार्डेड व कोम्बर्ड प्रकारात सूताचे उत्पादन केले आहे. वरील आकडेवारी पाहिली असता गतवर्षापेक्षा अहवाल सालात १.१४ लाख किलो उत्पादन जादा झालेले आहे.

४) सन २००५-०६ वरील आकडेवारी पाहिली असता गतवर्षापेक्षा अहवाल सालात ५.१३ लाख किलो उत्पादन कमी झालेले आहे. कारण अहवाला सालात २ जुने १३८ मॉडेलचे ॲटोकोनर मशिन काढून त्याठिकाणी २ नवीन स्लॅफोर्स्ट कंपनीचे ३३२ मॉडेलचे ॲटोकोन बसविण्याकरीता थोडा कालावधी लागल्याने रिंगफ्रेम बंद ठेवावे लागले त्यामुळे चात्या वापर कमी होऊन सूत उत्पादन कमी झालेले आहे.

५) सन २००६-०७ यावर्षीदेखील सूत गिरणीचे स्थानिक व विदेशी बाजारासाठी ३४ ते ६४ काऊंट पर्यतचे कार्डेड व कोम्बर्ड प्रकारात सूताचे उत्पादन केलेले आहे. वरील आकडेवारी पाहिली असता गतवर्षापेक्षा अहवाल सालात ३.६५ लाख किलो उत्पादन जास्त झाले आहे.

६) सन २००७-०८ या अहवाल वर्षात संस्थेने स्थानिक व विदेशी बाजारासाठी अहवाल वर्षी ३२ ते ६४ काऊंट पर्यंतचे कार्डेड व कोम्बर्ड प्रकारच्या सूताचे उत्पादन केलेले आहे. वरील आकडेवारी पाहिली असता, गतवर्षापेक्षा अहवाल सालात ७.५९ लाख किलो उत्पादन कमी झालेले आहे. कारण गिरणीचे आधुनिकीकरण कामामुळे ३८ रिंगफ्रेम मशिनरी बंद होत्या.

७) सन २००८-०९ या अहवाल वर्षात सूत गिरणीने स्थानिक व विदेशी बाजारासाठी अहवाल वर्षी ३२ ते ६४ काऊंट पर्यंतचे कार्डेड व कोम्बंड प्रकारात सूताचे उत्पादन केलेआहे.

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते कि, गतवर्षापेक्षा अहवाल सालात ८.८८ लाख किलो सूताचे उत्पादन जास्त झालेले आहे.

८) सन २००९-१० या अहवाल वर्षात सूत गिरणीने अहवाल वर्षात स्थानिक व विदेशी बाजारासाठी ३९ ते ६४ काऊंट पर्यंतचे कार्डेड व कोम्बड प्रकारात सूताचे उत्पादन केलेले आहे.

वरील आकडेवारी पाहिले असता, गतवर्षापेक्षा अहवाल सालात २.०० लाख किलो सूताचे उत्पादन कमी झालेले आहे.

९) २०१०-११ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे स्थानिक व विदेशी बाजारासाठी अहवालवर्षी ३९ ते ६४ काऊंट पर्यंतचे कार्डेड व कोम्बर्ड प्रकारात सूताचे उत्पादन केले आहे.

वरील आकडेवारी पाहिले असता, गतवर्षापेक्षा अहवाल सालात२.०६ लाख किलो उत्पादन कमी झालेले आहे. कारण जागतिकीकरण, मंदी, शासनाचे बदलते धोरण.

**सारांश :-**

अहवाल वर्षात सूत उत्पादनात वाढ झालेली परंतु काही वर्षात २००५-०६, २००७-०८, २००९-१० आणि २०१०-११ या वर्षात सूत उत्पादन कमी झालेले आहे. कारण २००५-०६ नवीन मशिनरी (आधुनिकीकरण) केल्याने या कालावधीत चात्या बंद ठेवल्याने उत्पादन कमी झालेले आहे. तर २००९-१० या कालावधीत सूताची मागणी कमी असल्याने उत्पादन कमी झालेले आहे. तसेच जागतिक मंदीमुळे सूत उत्पादनात घट झालेली आढळते.

**४.१.४ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ची सूत विक्री :-**

श्री. स्वामी समर्थ सूतगिरणी मध्ये मुख्यत: सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने व्यापारी उत्पादनास माहे मार्च १९८४ पासून सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, २४, २६, ३०, ३२, ३४, ३८, ४० सिंगल कोम्बड, कार्डेड होजिअरी व विव्हिंग सूताचे उत्पादन होते. अशा वरील विविध सूत काऊंटरचे उत्पादन केले जाते. परंतू या तयार झालेल्या सूताला योग्य बाजारपेठ प्राप्त करणे स्पर्धेमुळे कठीण होऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सूताची विक्री वाढवायची असेल तर त्यासाठी उत्पादन खर्च कमी करून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. तसेच सूताचा दर्जा व गुणवत्ता चांगली असली पाहिजे तरच सूताला वाढती मागणी येऊ शकेल. अन्यथा सूत गिरणी सतत आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सूत गिरणीने अत्याधूनिक प्रयोगशाळा उपकरणे बसवून विविध सूत काऊंटरचे उत्पादनास सुरूवात केलेली आहे. सूतगिरणीमध्ये कच्च्या कापसापासून सूत निर्मिती करण्यात येते. निर्यातक्षम व उच्च गुणवत्ता असलेले सूत तयार करण्यासाठी कच्च्या कापसापासून सूत निर्मिती पर्यंत वेगवेगळ्या घटकांची तपासणी करण्यासाठी परदेशी बनावटीची अद्यावत उपकरणे व सूत गिरणीने सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा उभी केली आहे. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे आणि निर्यातक्षम सूताचे

उत्पादन सुरू झालेले आहे. यामुळेच सूतगिरणीने आवघ्या ४ ते ५ वर्षात स्थानिक बाजारपेठेत म्हणजेच भारतीय बाजारपेठेत आणि विदेशात बांगला देश, चीन, पाकिस्थान, दक्षिण कोरीया, उत्तर कोरीया, मलेशिया आदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

सूत गिरणीतील सूताच्या विक्रीसाठी निरनिराळया ठिकाणचे व्यापारी, एजंन्ट, दलाल, कारखानदार स्वतः सूत गिरणीत येतात. सूताच्या दर्जाविषयी किंमती विषयी, चर्चा व्यापारी व्यवस्थापनाशी करून किंमत निश्चिती करतात. शिवाय काही व्यापारी व कारखानदार त्यांना ज्या दर्जाचे काऊंटचे सूत हवे आहे त्याचे नमुने आणतात. त्याप्रमाणे सूताची मागणी करतात तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन व्यवस्थापन व संचालक मंडळ सूत उत्पादन मागणी व जास्त किंमत मिळवून देणाऱ्या सूताचे उत्पादन करण्यास व्यवस्थापक मंडळास सांगतात. थोडक्यात सूत विक्रीचे सर्व निर्णय व्यवस्थापक व संचालक मंडळ घेते. स्थानिक बाजारपेठेत प्रत्यक्षरित्या सूताची विक्री विक्रीदात्याकडून केली जाते. तसेच सूत गिरणीतर्फे एजन्ट विविध राज्यात नियुक्त केलेले आहेत. तसेच विदेशात देखील मोठया प्रमाणात सूताची निर्यात केली जाते.

**तक्ता क्र. ४.१.४**


**सूत विक्री**

| अ. क्र. | वर्ष | सूत किलो (लाख) | स्थानिक बाजारात सूताची विक्री (लाखात) | विदेशात सूत विक्री किलो (लाख) | सूताची निर्यात (लाख) रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००१-०२ | ३६.३४ | ३३२५.३४ | ० | ० |
| २ | २००२-०३ | ३१.८४ | २९६०.८९ | ० | ० |
| ३ | २००३-०४ | ३२.८७ | ३८२५.०६ | ० | ६३७.११ |
| ४ | २००४-०५ | ३४.५४ | ४०३०.९३ | ४.४३ | ६६०.७१ |
| ५ | २००५-०६ | २८.१७ | ३५६६.५४ | ३.४३ | ५४४.३० |
| ६ | २००६-०७ | ३१.१० | ३७६२.३७ | ७.१२ | ९८१.७४ |
| ७ | २००७-०८ | २४.९१ | ३०३२.८७ | २.०२ | २७१.७० |
| ८ | २००८-०९ | ३३.३७ | ४३९०.७८ | ८.४६ | ० |
| ९ | २००९-१० | ३१.६६ | ४७८०.३० | ४.७८ | ७३३.५५ |
| १० | २०१०-११ | २७.५३ | ५६९५.८२ | ०.३७ | ६८.७१ |
| | **एकूण** | **३१२.३३** | **२९२५९.६१** | **३०.६१** | **३८९७.८२** |

**आधार :- श्री. स्वामी समर्थ सहकरी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून.**

आलेख क्र. २


**स्थानिक बाजारात सूताची विक्री (लाखात)**




आधार :— **तक्ता क्र. ४.१.४**

आलेख क्र. ३

**विदेशात सूत विक्री किलो (लाख)**




आधार :— **तक्ता क्र. ४.१.४**

१) सन २००१-०२ वरील आकडेवारी पाहिली असता २००१-०२ सालात ३३२५.३४ लाख सूत विक्री झालेली आहे. तसेच मागील वर्षापेक्षा ३.२१ लाख किलोने व विक्री रु. ८५.४४ लाखानी जास्त झाली आहे.

२) सन २००२-०३ या अहवाल वर्षात सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठेत ३१.८४ किलो सूताची विक्री केलेली आहे. या विक्रीतून सूत गिरणीला रु. २९६०.८९ लाख रुपये प्राप्त झाले.

३) सन २००३-०४ वरील आकडेवारीनुसार २००३-०४ या वर्षात आधुनिकीकरणामुळे अहवाल सालात मागील वर्षापेक्षा १.०३ लाख किलोने उत्पादन व विक्री रु. ८६४.१७ लाखानी जास्त झाली आहे. कारण सदर आधुनिकीकरण प्रकल्प अतिशय नियोजन पध्दतीने हाताळल्यामुळे आर्थिक बाजू चांगली राहिली (स्थानिक ३२.८७ किलो रु. ३८.२५ लाख) मार्च २००३ पासून सूत गिरणी सूताची निर्यात करीत आहे. अहवाल वर्षात पूर्व युरोप खंडातील स्लोव्होनिया, दुबई, तुर्की, झेक रिपब्लिक व ईईसी या देशांना प्रथम सूत निर्यात केले आहे. त्याची किंमत रु. ६३७.११ लाख आहे.

४) सन २००४-०५ वरील आकडेवारी पाहिली असता सूत गिरणीने स्थानिकबाजारपेठेत ३४.५४ लाख किलो सूत विक्री केलेली आहे. त्यापासून रु. ४०३०.९३ लाख रुपये सूत गिाणीला मिळालेले आहेत. तसेच ४.४३ लाख किलो सूताची निर्यात केली आहे. त्याची किंमत रु. ६६०.७१ लाख असून सूत गिरणीला तेवढे परकीय चलन मिळाले. एकूण उत्पादनाशी सूताची निर्यात १३.२४% इतकी झालेली आहे.

५) सन २००५-०६ या वर्षात सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठेत रु. ३५६६.५४ लाखाची सूत विक्री केली आहे. तसेच रु. ५४४.३० लाखाची विदेशात सूताची निर्यात केली आहे. एकूण सूताची विक्री रु. ४११०.८४ लाख करण्यात आली आहे.

६) सन २००६-०७ मध्ये सूत गिरणीने ३१.१० लाख किलो सूताची विक्री स्थानिक बाजारात केली त्याची किंमतरु. ३७६२.३७ लाख रुपये झाली तसेच ७.१२ लाख किलो सूत निर्यात केले आहे. त्याची किंमत रु. ९८१.७४ लाख असून देशाला तेवढे परकीय चलन मिळाले. एकूण उत्पादनातील सूत निर्यात २२.२६% इतके झालेले आहे.

७) सन २००७-०८ मध्ये सूत गिरणीने रु. ३०३२.८७ लाखाचे २४.९१ किलो सूत स्थानिक बाजारपेठेत तर रु. २७१.७० लाख रुपयाचे २.०२ लाख किलो सूत विदेशात निर्यात केलेले आढळते.

८) सन २००८-०९ मध्ये सूत गिरणीने ३३.३७ लाख किलो सूताची विक्री स्थानिक बाजारपेठेत केलेली आहे. त्याची किंमत  रुपये ४३९०.७८ लाख रुपये आहे. जागतिक मंदीमुळे सूताला मागणी नसल्याने या वर्षात सूत गिरणीने निर्यात केली नाही.

९) सन २००९-१० या अहवाल सालात सूत गिरणीने ४७८०.३० लाख रुपयांची सूत विक्री स्थानिक बाजारपेठेत व रुपये ७ कोटी ३३ लाख ५५ हजार इतके रुपयांची सूत विक्री विदेशात केलेली आहे.

१०) सन २०१०-११ या अहवाल सालात सूत गिरणीने रुपये ५६९५.८५ लाख सूताची विक्री स्थानिक बाजारात आणि रुपये ६८.७१ लाख इतके परकिय चलन मिळाले आहे.

## सारांश

अहवाल वर्षात या सूत गिरणीने स्थानिक बाजारात एकूण ३१२.३३ किलो सूताची विक्री व विदेशात ३.६१ किलो सूताची निर्यात केलेली आहे. स्थानिक व विदेशात एकूण ३४२.९४ किलो सूताची विक्री केलेली आहे. त्यापासून सूत गिरणीला स्थानिक बाजारातून २९२५९.६१ रुपये व निर्यातीतून ३८९७.८२ परकीय चलन मिळालेलेआहे.

सूत गिरणीने अहवाल वर्षात सातत्य राखून सूत निर्यात केलेले आहे. परंतु २००८-०९ यावर्षी जागतिक मंदीमुळे सूताला मागणी नसल्याने सूताची निर्यात केलेली नाही. अहवाल वर्षात स्थानिक व विदेशात एकूण ४३२६८.७२ रुपये सूताची विक्री झालेली आहे.

### ४.१.५ श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार :-

भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शिवाय वाढती लोकसंख्या असल्यामुळे त्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असते. प्रचलीत वेतनदरावर ज्याची काम करण्याची इच्छा आहे अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्यच समजले जाते. रोजगार निर्मितीत सहकारी सूत गिरण्यांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली आहे. या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे. महाराष्ट्र राज्यात सहकारी सूत गिरण्यांमुळे १० लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे.

श्री. स्वामी समर्थ सूत गिरणी स्थापन करीत असताना माजी आमदार वि.गु. शिवदारे यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा हे उद्दिष्ट ठेवलेले होते. त्यानुसार ग्रामीण भागात सूत गिरणी सुरू केलेली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत रोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून सूत गिरणीने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व समाजातील दुर्बल घटकांना, बेरोजगारांना सतत रोजगार मिळत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, श्री स्वामी समर्थ सूत गिरणीच्या स्थापनेने उत्पादन वाढ व ग्रामीण विकास या उद्देशावरून वळसंगच्या आसपासच्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त करून देणे व त्या भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश यशस्वी होत आहे.

सन १९७९ मध्ये श्री. स्वामी समर्थ सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. प्रत्यक्ष सूत गिरणी १९८४ पासून सुरू झाली. मार्च २००१ पासून ३४४८८ चात्यावर सूत गिरणीत सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. सन २००१-२००२ मध्ये एकूण दैनंदिन काम करणाऱ्या कामगारांची संख्या १३०० होती. आज संख्या ७७३ वर गेल्याचे आढळते. सन २००१-२००२ पासून सन २०१०-२०११ पर्यंत कामगारांच्या संख्या कमी होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक ४.१.५ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमाक ४.१.५**

**श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी**

**(सन २००१-२००२ ते सन २०१०-११)**

| वर्ष | कामगारांची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | १३०० |
| २००२-२००३ | १२०० |
| २००३-२००४ | ११०० |
| २००४-२००५ | १००० |
| २००५-२००६ | ९०० |
| २००६-२००७ | ८०० |
| २००७-२००८ | ८५० |
| २००८-२००९ | ८५० |
| २००९-२०१० | ८५० |
| २०१०-२०११ | ७७३ |

**आधार :-** सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील आकडेवारी वरून असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये कामगारांची संख्या १३०० होती. त्यानंतर सन २०१०-२०११ मध्ये कामगारांची संख्या ७७३ इतकी झाली. याचाच अर्थ असा होतो की, या दहा वर्षात कामगार संख्या कमी झालेली आढळते. तसेच सूत गिरणीतील प्रत्यक्ष कामगार संख्या कमी झालेली आहे. आधुनिक यंत्रे, मशीनरी मुळे कामगार संख्या कमी झालेली आढळते. तसेच सूत गिरणी मुळे परिसरातील १५०० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले.

स्पिनिंग विभागात काही उपविभाग आहेत. त्यातील कामगारांची संख्या ही मार्च २०११ ची आहे.

### तक्ता क्रमांक ४.१.६

### स्पिनिंग विभागातील कामगार संख्या

| अ. क्र. | विभाग | कायमची कामगार संख्या | बदली कामगार संख्या |
|---|---|---|---|
| १. | गोडावून (कॉटन, वेस्ट) | ०८ | |
| २. | मिक्सींग | ०५ | |
| ३. | ब्लोरुम | ०७ | |
| ४. | कार्डींग | १४ | |
| ५. | स्पीड फ्रेम | ५९ | |
| ६. | रिंग फ्रेम | १९६ | ३०० |
| ७. | वायडिंग | १०७ | |
| ८. | पॅकींग | २० | |
| ९. | इंजिनिअर वर्क्स शॉप | २६ | |
| १०. | जनरल | ३५ | |
| ११. | स्टाफ | ६१ | |
| | **एकूण** | **५३८** | **३००** |

**आधार :-** टाईम विभागाच्या रेकॉर्ड वरून.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कायम कामगार ५३२ आहेत व बदली कामगार ३०० आहेत. म्हणजेच एकूण ८३८ कामगार सूत गिरणीत काम करतात.

**४.१.६ श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमधील स्पिनिंग विभागातील कामाचे स्वरुप :-**

सूत गिरणीमध्ये कामाच्या तीन पाळ्या चालतात. यामध्ये त्यांच्या वेळा खालील प्रमाणे सांगता येतात.

१) पहिली पाळी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत.

२) दुसरी पाळी दुपारी ४.०० ते सायंकाळी १२.०० पर्यंत.

३) तिसरी पाळी रात्री १२.०० ते सकाळी ८.०० पर्यंत.

वरील प्रमाणे कामगार तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

कापसापासून सूत तयार करण्यासाठी निरनिराळ्या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानुसार सूत गिरणीतील स्पिनिंग विभाग हा महत्वाचा आहे. त्याची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रथमतः गोडाऊन मधून कापूस मिक्सिंग विभागात येतो तेथून मिक्सिंग केल्यानंतर ब्लोरूम विभागात पिंजणी करण्याचे कार्य केले जाते. पुढे कारडिंग विभागात आल्यानंतर तेथे नको असलेला कचरा काढून स्वच्छ केले जाते. नंतर पुढे स्पीडप्रेम मध्ये वात तयार होते. पुढे गेल्यावर

त्या वातीचे बारीक दोरा सूत तयार होते. तसेच पुढे जाऊन वायडींग विभागामध्ये चांगले सूत तयार होते. नंतर हे चांगले तयार झालेले सूत पॅकिंग विभागात पाठविले जाते. तेथे पॅकिंग झाल्यानंतर सूताची विक्री करण्यासाठी ते सूत बाजारपेठेत पाठविले जाते. अशाप्रकारे कापसापासून सूत तयार होईपर्यंतची प्रक्रिया सूत गिरणीमध्ये केली जाते. तसेच स्पिनिंग विभागातील जी यंत्र सामुग्री वापरली जाते त्यांची दुरूस्ती व त्यांची व्यवस्था पाहण्याचे कार्य मेन्टेनन्स विभागाकडून केले जाते. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामाचे स्वरूप आहे. या ठिकाणी सूत तयार होण्याच्या व कामाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४.१.७ श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमधील वेतन पध्दती :-**

कामगारांच्या प्राप्तीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वेतनाचा किंवा मजूरीचा उल्लेख केला जातो. कामगाराला किंवा श्रमिकाला उत्पादन कार्यात त्याच्या श्रमशक्तीचा वापर केल्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला वेतन असे म्हणतात. यामध्ये शारिरीकव बौद्धीक, कुशल व अकुशल अशा सर्व श्रमांचा समावेश होतो. वेतन तासाच्या दरात, दिवसाप्रमाणे, महिन्याप्रमाणे व वस्तूच्या किंवा दोन्ही मिळून दिले जाते.

कित्येकदा वेतन काम केलेल्या कालाप्रमाणे दिले जाते. यास कालानुसार वेतन म्हणतात. तर कित्येकदा वेतन कामगारांने केलेल्या कामाप्रमाणे म्हणजे उत्पादनाप्रमाणे दिले जाते. तर कधी कधी वेतन अमुक काम झाल्यावर दिले जाते त्यास ठेक्याप्रमाणे वेतन म्हणता येईल.

वरील प्रकारापैकी श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कालाप्रमाणे वेतन दिले जाते. अर्थात यासाठी आठ तासांची पाळी नेमून दिलेली आहे. त्याप्रमाणे हुद्दयानुसार कामगारांना वेतन दिले जाते. वेतन निश्चिती मुंबई वेतन मंडळ करते. त्याची अंमलबजावणी सूत गिरणी आपल्या कामगारांच्या बाबतीत करते. सूत गिरणीतील कामगारांना वेतन महिन्याला दिले जाते. प्रत्येक महिन्यातील १० तारखेस कामगारांना वेतन दिले जाते. हे अनुसूचितील प्रश्नाच्या उत्तरावरून आढळून आले.

**४.१.८ श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमधील कामगार कल्याण व सांस्कृतिक कार्य :-**

उत्पादनात कामगार वर्गाचा सहभाग फार महत्त्वाचा असतो. किंबहुना कामगारांच्या सहकार्याने कोणत्याही योजनेची अमंलबजावणी यशस्वीपणे केली जाते. त्यामुळे औद्योगिक विकासामध्ये कामगारांचे योगदान मोलाचे असते. संस्थेच्या व्यवस्थापनास कामगारांबद्दलचा दृष्टीकोन प्रथमपासून उदारमतवादी असून कामगार बंधुसाठी जास्तीत जास्त सुखसुविधा

देण्याकडे मिलचा कटाक्ष आहे. त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी आर्थिक व इतर उपयुक्त सुविधा सूतगिरणीमार्फत उपलब्ध करुन दिल्या जातात. उदा. १) सहकारी पतपेढी व ग्राहक भांडार, २) दवाखाना, ३) विश्रांती भवन, ४) धुलाई भत्ता, ५) घरभाडे भत्ता, ६) क्रिडा साहित्य, ७) थंड पाण्याचे वॉटर कुलर शुध्द पाणी मिळण्यासाठी छोटा जलशुध्दीकरण प्लॉन्ट, ८) मेडीकल भत्ता अशा अनेक सुविधा सूत गिरणीने दिल्या आहेत.

गैरहजेरीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी जास्तीत जास्त हजर राहणाऱ्या प्रामाणिक व विशेष काम करुन दाखविणाऱ्या कामगारांना १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिनी योग्य ते रोख बक्षिस देऊन त्यांचा सत्कार केला जातो.

**४.१.९ श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमधील कामगार संघटना :-**

गिरणीमध्ये राष्ट्रीय कमगार युनियन (इंटक) ही मान्यताप्राप्त संघटना असून गिरणीचे व कामगारांचे संबंध सलोख्याचे आहेत. युनियनचे अध्यक्ष, सरचिटणीस व त्यांचे सदस्यांचे नेहमीच व्यवस्थापन मंडळास सहकार्य मिळत आहे.

गिरणीमध्ये सहकार तत्त्वावर कर्मचाऱ्यांची एक पतसंस्था व ग्राहक भांडार असून सदर संस्थेमार्फत कामगार व कर्मचाऱ्यांना रास्त व्याज दराने, कर्ज रुपाने अर्थसहाय्य, घरगुती वस्तु, ग्राहक भांडारा मार्फत रास्त भावात स्वच्छ व घरगुती माल देण्याचे कार्य करीत आहेत.

गिरणीमध्ये गेल्या ६-७ वर्षापासून मा. सहकारमहर्षि वि.गु. शिवदारे कामगार कर्मचारी कल्याण मंडळ कार्यरत असून यासंस्थेमार्फत गिरणीतील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आपत्कालीन काळात आर्थिक मदत करीत आहे. सदर संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व त्यांचे सदस्यांचे नेहमी सहकार्य मिळत आहे.

**उद्यान व वनीकरण :-**

गिरणीच्या सभोवतालचे वातावरण स्वच्छ व प्रसन्न असावे आणि प्रदुषणाचा गिरणीच्या कर्मचाऱ्यांच्या जीवनावर अनिष्ठ परिणाम होऊ नये अशा हेतूने सूत गिरणीने सन १९८४ पासून सुंदर बगीचा निर्माण करुन गिरणीचा परिसर सुशोभित केला आहे.

यात विशेषतः आंबा, सागवान, अशोक, नारळ, आवळा, चिंच व अनेक निरनिराळ्या प्रकारची फुलझाडे इत्यादींचा समावेश असून उन्हाळ्यात पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने ठिंबक सिंचन, टॅंकर व स्प्रिंकलरची योजना अमंलात आणली आहे. याशिवाय गिरणीमधील सांडपाण्यावर शास्त्रीय प्रक्रिया करुन ते पाणी वनीकरणासाठी पुन्हा वापरले जाते. या वनीकरण उपक्रमामुळे गिरणीच्या परिसरातील वातावरण स्वच्छ व आल्हाददायक बनले आहे. गिरणीच्या याअभिनव

वनीकरणात अनेक शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील संस्था सहलीच्या रुपाने भेट देऊन वनीकरण पाहून समाधान व्यक्त करीत असतात.

सूत गिरणीच्या परिसरात आलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या आंबा, आवळा व फुलांची विक्री करुन गिरणीस उत्पन्नही मिळत आहे.

### ४.१.१० श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीमधील औद्योगिक सुरक्षितता :-

४ मार्च ते ११ मार्च हा कालावधी सुरक्षा सप्ताह म्हणून शासनाने जाहीर केला असून याची अंमलबजावणी संस्था प्रतिवर्षी करीत असते. अपघातांचे प्रमाण कमी व्हावे व पर्यायाने कामगारांचे जीवन सुरक्षित व्हावे यासाठी प्रबोधनात्मक ज्ञान कामगारांना देण्याचा या सुरक्षा सप्ताहाचा उद्देश असतो. केवळ समारंभ म्हणून या कार्यक्रमाकडे न पाहता काही विधायक कार्यक्रम हाती घेऊन सूत गिरणी हा सप्ताह साजरा करते. भित्तीपत्रके,घोषवाक्ये, निबंध या विविध विषयावर वैयक्तिक व खातेनिहाय स्पर्धा घेण्यात येऊन यशस्वी कामगारांना पारितोषिक देण्यात येतात. वर्षभर विना अपघात व काळजीपूर्वक काम करणाऱ्या खात्यांना बक्षिसे देऊन त्यांना प्रोत्साहन दिले जाते. आगीपासून होणारे अपघात हे अत्यंत घातक असल्यामुळे आग विझवण्याचे प्रशिक्षण आणि आग विझविण्याच्या साधनांची चाचणी या दुहेरी हेतूने मासिक चाचण्याही घेण्यात येतात. नवनवीन आग प्रतिबंधक साधने मागवून सुरक्षिततेची खबरदारी घेण्यात आली आहे.

### ४.१.११ श्री स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूतगिरणीला मिळालेले राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार :-

**तक्ता क्र. ४.१.७**

| अ.क्र. | पुरस्कार | ॲवार्डचे तपशील | ॲावार्ड क्र. |
|---|---|---|---|
| १. | सन १९८७-८८ | बेस्ट वर्कींग परफॉरमन्स | तिसरा |
| २. | १९८८-८९ | बेस्ट वर्कींग परफॉरमन्स | दूसरा |
| ३. | १९९८-९९ | आर्थिक व तांत्रीक व्यवस्थापनाचा सर्वोत्कृष्ट पूरस्कार | तिसरा |
| ४. | १९९९-२००० | उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन पूरस्कार | तिसरा |
| ५. | २०००-२००१ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | तिसरा |
| ६. | २००१-२००२ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | चौथा |
| ७. | २००२-२००३ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | दूसरा |
| ८. | २००३-२००४ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | तिसरा |
| ९. | २००४-२००५ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | दूसरा |
| १०. | २००५-२००६ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | गोल्ड मेडल |
| ११. | २००६-२००७ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | गोल्ड मेडल |
| १२. | २००७-२००८ | उत्कृष्ट आर्थिक व तांत्रीक पूरस्कार | दूसरा |
| १३. | २००९-२०१० | विशेष लक्षणिय कामगिरी (संचित निव्वळ नफा) | सुवर्ण पदक |
| १४. | २०१०-२०११ | विशेष लक्षणिय कामगिरी (संचित निव्वळ नफा) | सुवर्ण पदक |

## ४.२) शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, ता. सांगोला , जि. सोलापूर :-

### ४.२.१ प्रस्तावना :-

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्रित करुन मा. आमदार गणपतराव देशमुख यांनी या सूत गिरणीची स्थापना दि. २४/११/१९७९ रोजी रजि. नं. एस.यु.आर./पी.आर.जे.(ए)/७ दि.२८/१/१९८० अन्वये नोंदणी केलेली आहे. सूत गिरणीची सुरुवातीची सभासद संख्या ९३७६ इतकी होती. हि सूत गिरणी सांगोला येथे असून ती सांगोला येथून ४ कि.मी. अंतरावर आहे. कोल्हापूर सोलापूर या मार्गावर ही सूत गिरणी आहे. या सूत गिरणीमुळे सांगोला परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ५००० लोकांना रोजगार मिळालेला आहे. ही सूत गिरणी १२२ हेक्टर जमिनीवर वसलेली आहे. तसेच या परिसरात सूत गिरणीने बोर, डाळींबे, आवळा, चिंच अशा अनेक प्रकारच्या वृक्षांची लागवड केलेली आहे. या सूत गिरणीमुळे त्या परिसराचा आर्थिक, सामाजिक व भौगोलिक विकास होण्यास मदत होत आहे. सन २०१०-११ या वर्षाअखेर ११६०७ इतकी सभासद संख्या आहे. ही सूत गिरणी स्थापनेपासून नफ्यात आहे. या सूत गिरणीला महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मुंबई आणि अखिल भारतीय सहकारी सूत गिरणी महासंघ यांच्याकडून निव्वळ नफा, रोकड नफा, उत्कृष्ठ आर्थिक व तांत्रीक व्यवस्थापन याबाबतीत अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. सूत गिरणी मोठ्या प्रमाणात विदेशात सूताची निर्यात करीत आहे.

## शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले

### ४.२ सभासद संख्या :-

**तक्ता क्र. ४.२.१**

**सभासद संख्या (हजारात)**

| अ.क्र. | तपशील | २००१ २००२ | २००२ २००३ | २००३ २००४ | २००४ २००५ | २००५ २००६ | २००६-२००७ | २००७ २००८ | २००८ २००९ | २००९ २०१० | २०१० २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक | ९२९४ | ९२९४ | ९२९४ | ९२९४ | ९२९४ | ११३७५ | ११५०२ | ११५२६ | ११५२५ | ११५२५ |
| २. | सहकारी संस्था | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ | ८१ |
| ३. | महाराष्ट्र शासन | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | **एकूण** | **९३७६** | **९३७६** | **९३७६** | **९३७६** | **९३७६** | **११४५७** | **११५८४** | **११६०८** | **११६०७** | **११६०७** |

**आधार : शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

**शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले**

## ४.३ भाग भांडवलः-

**तक्ता क्र. ४.२.२**

**भाग भांडवल (लाखात)**

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक | १०७.३५ | १०७.५१ | १०७.७४ | १४१.७५ | १४१.८९ | १६३.७२ | १६५.०७ | २०४.७१ | २०४.६९ | २०५.४५ |
| २. | सहकारी संस्था | ०.५९ | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० | ०.६० |
| ३. | महाराष्ट्र शासन | १३८८.६५ | १५२८.१९ | १५००.१९ | १४५४.१९ | १३९४.१९ | १३४६.१९ | १३१०.०० | १२७४.०० | १२३७.०० | १२२५.०० |
| | **एकूण** | **१४९६.५९** | **१६३६.३०** | **१६०८.५३** | **१५९६.५४** | **१५३६.६८** | **१५१०.५१** | **१४७५.६७** | **१४७९.३१** | **१४४२.२९** | **१४३१.०५** |

**आधार : शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

### ४.२.२ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले सभासद संख्या व भाग भांडवल

१) सन २००१-०२ मध्ये कापूस सभासद संख्या ९२९४ आहे. तर सहकारी संस्था ८१ सभासद आहेत. तसेच महाराष्ट्र शासन अशी सभासद संख्या आढळते. अशी एकूण या वर्षी ९३७६ ही सभासद संख्या आहे. या वर्षात कापूस उत्पादक सभासदांचे भाग भांडवल १०७.३५ लाख रुपये सहकारी संस्था ७.५९ लाख व शासनाकडून प्राप्त झालेले १३८८.६५ लाख रुपये असे एकूण १४९६.५९ लाख रुपये भागभांडवल प्राप्त झालेले आहे.

२) सन २००२-२००३ या वर्षात सभासद संख्या स्थिर आहे. तसेच सहकारी संस्थाची संख्यादेखील स्थिर आहे. या वर्षी कापूस उत्पादक सभासदाचे भागभांडवल १०७.५१ लाख इतके तर सहकारी संस्थाचे भाग भांडवल रु. ०.६० लाख तर शासनाकडून १५२८.१९ लाख भागभांडवल प्राप्त झ ालेले आहे.

३) सन २००३-०४ या वर्षात देखील सूत गिरणीची सभासद संख्या स्थिर राहिलेली आहे. या वर्षी कापूस उत्पादक सभासदांचे भाग भांडवल रु. १०७.७४ लाख तर सहकारी संस्थाचे भागभांडवल रु. ०.६० लाख तर महाराष्ट्र शासनाकडून १५००.१९ लाख प्राप्त झालेले आहे. असे एकूण या वर्षात रु. १६०८.५३ लाख रुपये भागभांडवल सूत गिरणीचे होते.

४) सन २००४-०५ या वर्षात देखील सूत गिरणीची सभासद संख्या स्थिर आहे. भाग भांडवलात मात्र वाढ झालेली आहे. कापूस उत्पादक सभासदाचे भाग भांडवल रु. १४१.७५ लाख तर सहकारी संस्थाचे ०.६० लाख असे एकूण रु. १५९६.५४ लाख इतके भाग भांडवल आहे.

५) सन २००५-०६ या वर्षात देखील सभासद संख्या कायम आहे. या वर्षात उत्पादक सभासदांचे भागभांडवल १४१.८९ लाख तर सहकारी संस्थाचे भागभांडवल रु. ०.६० लाख हे स्थिर आहे. महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेले रु. १३९४.१९ लाख इतके आहे. एकूण भागभांडवल रु. १५३६.६८ इतके आहे.

६) २००८-०९ मध्ये सूत गिरणीची सभासद संख्या ११५२ तर सहकारी संस्था ८१ व शासन ०१ अशी एकूण सभासद संख्या ११६०८ इतकी आहे. या वर्षात उत्पादक सभासदांचे भागभांडवल रु. २०४.७१ लाख तर सहकारी संस्थाचे रु. ०.६० लाख महाराष्ट्र शासनाचे रु. १२७४.०० लाख असे एकूण रु. १४८९.३१ लाख रुपये आहे.

७) सन २००९-१० या वर्षी उत्पादक सभासद संख्या ११५२५ सहकारी संस्था सभासद संख्या ८१ ही स्थिर आहे. महाराष्ट्र शासन ०१ अशी एकूण सभासद संख्या ११६०७ इतकी आहे. तर भागभांडवल उत्पादक सभासदांचे भागभांडवल रु. २०४.६९ लाख सहकारी संस्थाचे ०.६० हे स्थिर आहे. तर महाराष्ट्र शासनाचे रु. १२३७.०० असे आहे. या सर्व सभासदाचे एकूण भागभांडवल रु. १४४२.२९ लाख इतके आहे.

८) सन २००१-२०११ या वर्षात कापूस उत्पादक सभासद संख्या ११५२५ सहकारी संस्था ८१ व महाराष्ट्र शासन ०१ अशी एकूण सभासद संख्या ११६०७ इतकी आहे. या वर्षात उत्पादक सभासदाचे भागभांगवल रु.२०५.४५ लाख तर सहकारी संस्थाचे भागभांडवल रु. ०.६० लाख महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेले भागभांगवल रु. १२२५.०० लाख असे सर्व मिळून रु. १४३१.०५ लाख इतके भाग भांडवल आहे.

## सारांश

सन २००१-०२ ते २०१०-११ या अहवाल वर्षात सभासद संख्येत वाढ झालेली आहे. सन २००१-२००२ मध्ये कापूस उत्पादक सभासद संख्या ९२९४ होती. तर २०१०-२०११ मध्ये ती वाढून ११५२५ इतकी आहे. तसेच सहकारी संस्थांची सभासद संख्या ८१ ही दहा वर्षात स्थिर राहिलेली आहे. महाराष्ट्र शासन ०१ ही देखील स्थिर आहे. अशी एकूण सभासद संख्या ११६०७ इतकी आहे.

अहवाल वर्ष २००१-२००२ ते २०१०-२०११ या दहा वर्षाच्या कालावधी मध्ये सूत गिरणीच्या भागभांडवलामध्ये वाढ झालेली आढळते. सन २००१-२००२ मध्ये कापूस उत्पादक सभासदाचे भाग भांडवल रु. १७७.३५ लाख होते. सहकारी संस्थाचे भागभांडवल रु. ०.५९ लाख होते. तर महाराष्ट्र शासनाचे भागभांडवल रु. १३८८.६५ लाख होते. ते वाढून २०१०-२०११ मध्ये ते कापूस उत्पादक

सभासदांचे भागभांडवल रु. २०५.४५ लाख सहकारी संस्थाचे, भागभांडवल रु. ०.६० लाख तर महाराष्ट्र शासनाचे भागभांडवल रु. १२२५.०० लाख आहे. एकूण भागभांडवल रु. १४३१.०५ लाख इतके आहे.

### ४.२.३ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले चे सूत उत्पादन :-

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रामुख्याने चार उत्पादन घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन यांचा समावेश होतो. विशेषतः ज्या नैसर्गिक मानवी साधनांचे उत्पादन प्रक्रियेला सहाय्य होते. त्या साधनांना उत्पादनाचे घटक असे म्हणतात. वास्तविक पाहता उत्पादनाच्या क्रियेला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. जमीन, इमारत, कच्चामाल, इंधन, श्रम, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन इत्यादी अनेक वेळा उत्पादन क्रियेसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या खूपच मोठी असते. या सर्वांना आदान (Input) असे म्हणतात. परंतू अर्थ शास्त्रज्ञांनी आपल्या सोईसाठी सर्व आदानांचे चार गट पाडले आहेत. भूमी, श्रम, भांडवल, संयोजन यालाच चतुर्विध वर्गिकरण असे म्हणतात. आज कोणतेही उत्पादन करायचे झाल्यास या चार घटकांची आवश्यकता आहे. पूर्वी उत्पादनाचे दोनच घटक मानले जात होते. परंतू भांडवलाचे महत्व वाढत गेल्याने उत्पादनाचा तो एक स्वतंत्र घटक बनला. तसेच श्रम करणारे मजूर व उत्पादनाची जोखीम स्विकारणारा संयोजक यातही फरक केला गेला. उत्पादनाचे हे चार घटक एकत्र येऊन निर्माण होणारे फलित म्हणजे उत्पादन होय. सर्व अर्थिक घडामोडींचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे उपभोग होय. मात्र त्यासाठी उत्पादन व विनिमय या प्रक्रिया फार महत्वाच्या असतात. त्यामुळे उत्पादन हे अरंभस्थानी असणारा बिंदू धरला तर अंतिम बिंदू उपभोग होय. शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या भांडवलाचा आढावा घेतल्यानंतर उत्पादन या महत्वाच्या घटकाकडे आपोआप लक्ष वेधले जाते. कारण कोटयावधी रूपयांची उलाढाल केल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होणार ही मानवाची सहज प्रवृत्ती असते. तर निष्पन्न झालेले उत्पादन फायदेशिर की, तोटयाचे होते ते पाहणे देखिल संयोजकाचे (व्यवस्थापनेचे) कर्तव्यच असते. निर्मित उत्पादन कोणत्या किमतीला मिळते ते पाहणे हे ग्राहकांचे देखील कर्तव्यच असते.

शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने माहे मार्च १९८५ पासून व्यापारी सूत उत्पादनास सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, ३०, ३४,३८,४० सिंगल कोंम्बड- कार्डेड आणि होजिअरी विव्हिंग सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीची प्रगती पाहत असताना सूत उत्पादनातील चढउतार पाहणे अधिक योग्य व महत्वाचे ठरते. शेतकरी सहकारी सूत गिरणी मध्ये सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११ या काळात किती सूताचे उत्पादन केले आहे. त्याचा तपशील तक्ता. क्र. ४.२.३ मध्ये दर्शविला आहे.

# शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले

## तक्ता क्र. ४.२.३


## सूत उत्पादन (किलो)

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित चात्या (ह) | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ | ४१६१६ |
| २. | उपलब्ध चात्या (ह) | ४५५६९५२० | ४५५६९५२० | ४५६९४३६८ | ४५५६९५२० | ४५५६९५२० | ४५५६९५२० | ४५६९४३६८ | ४६००१२३५ | ४७६७१९२० | ४७३१६८१६ |
| ३. | चाललेल्या चात्या (ह) | ३८६९२७५१ | ३९२८०१३९ | ४११९०३१० | ४२१४४१६३ | ४२७१२०८२ | ४३१८८०७२ | ४२९१०३०४ | ४१८८६७९४ | ३९०९३७६१ | ३७०५६३३२ |
| ४. | चाललेल्या चात्याची टक्केवारी | ८४.२५ | ८६.२० | ९०.१४ | ९२.४८ | ९३.७३ | ९४.७७ | ९३.९१ | ९१.०६ | ८२.०१ | ७८.३२ |
| ५. | उत्पादन सरासरी काऊंट | २३.८४ | २५.६३ | २५.८२ | २५.४० | २५.१२ | २५.३६ | २३.९२ | २४.६७ | २१.९१ | २३.१५ |
| ६. | सूत उत्तारा % | | | | | | | | | | |
| ७. | प्रति चाती उत्पादन ग्रॅम्स | १४७.०५ | १६२.३३ | १६७.७१ | १७९.३८ | १८७.३४ | १८४.७४ | २६०.५७ | १९७.७९ | २१४.९२ | १९६.३१ |
| ८. | निव्वळ सूत उत्पादन किलो | ५६४५५९३ | ६३७६५०२ | ६९०७८९३ | ७५५९९५३ | ८००१७३८ | ८१९४६९५ | ८९०६७३७ | ८२८४७२९ | ८४०२३१७ | ७२७४३७७ |
| ९. | सूत गिरणी चाललेली दिवस | ३५६ | ३५८ | ३५९ | ३५९ | ३५७ | ३५८ | ३५९ | ३५८ | ३५७ | ३५८ |

**आधार :- शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

आलेख क्र. ४

**सूत उत्पादन (किलो)**




आधार :— तक्ता क्र. ४.२.३

१) अहवाल वर्ष सन २००१-२००२ मध्ये प्रस्थापित चात्या ४१६१६ आहेत. उपलब्ध चात्या ४५५६५२० तर चालेल्या चात्याची संख्या ३८३९२७५१ इतकी या वर्षी सूत उत्पादन ५६४५५९३ किलो इतके झालेले आहे. तर चाललेल्या चात्याची टक्केवारी ८४.२५ आहे. उत्पादीत सूताचा सरासरी काऊंट २३.८४ आहे. तर प्रति चाती सूत उत्पादित ग्रॅम्स १४७.०५ इतके आहे. तसेच या वर्षात सूत गिरणी ३५६ दिवस चालू राहिलेली आहे.

२) सन २००२-२००३ मध्ये निव्वळ सूत उत्पादन ६३७६५०२ किलो झालेले आहे. उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २५.६३ आहे. तर प्रति चाती सूत उत्पादन १६२.३३ ग्रॅम्स आहे आणि सूत गिरणी ३५८ दिवस चाललेली आहे.

३) सन २००३-२००४ मध्ये निव्वळ सूत उत्पादन ६९०७८९३ किलो झालेले आहे. प्रस्थापित चात्या ४१६१६ तर उपलब्ध चात्या ४५६९४३६८ तसेच चाललेल्या चात्यांची संख्या ४११९०३१० आहे. चाललेल्या चात्यांची टक्केवारी ९०.१४ आहे. उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २५.८२ तर प्रति चाती सूत उत्पादन १६७.७१ ग्रॅम्स राहिलेले आहे. या वर्षात सूत गिरणी ३५९ दिवस चालू राहिलेली आहे.

४) सन २००४-२००५ मध्ये प्रस्थापित चात्या ४१६१६ या स्थिर आहेत. उपलब्ध चात्या ४५५६९५२० चाललेल्या चात्या ४२१४४१६३ चाललेल्या चात्याची टक्केवारी ९२.४८ तर उत्पादीत सूताचा सरासरी काऊंट २५.४० आहे. एकूण निव्वळ सूत उत्पादन ७५५९९५३ किलो इतके झालेले आहे. प्रति चाती सूत उत्पादन १७९.३८ ग्रॅम्स इतके झालेले आहे. सूत गिरणी ३५९ दिवस चालू होती.

५) सन २००५-२००६ मध्ये देखील प्रस्थापित चत्या ४१६१६ इतक्याच आहेत. उपलब्ध चात्या ४५५६९५२० तर चाललेल्या चात्याची संख्या ४२७१२०८२ इतकी आहे. या वर्षात सूत उत्पादन ८००१७३७ किलो इतके सूत उत्पादन झालेले आहे. या काळात चाललेल्या चात्यांची टक्केवारी ९३.७३ तर उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २५.१२ इतका आहे. या वर्षी प्रति चाती सूत उत्पादन १८७.३४ ग्रॅम्स इतके झालेले ाहे.

६) सन २००७-२००८ या वर्षात एकूण निव्वळ सूत उत्पादन ८९०६७३७ किलो झालेले आहे. या वर्षात सूताचा सरासरी काऊंट २३.९२ तर प्रति चाती सूत उत्पादन २६०.५७ ग्रॅम्पस प्राप्त झालेले आहे.

७) सन २००८-२००९ या वर्षात प्रस्थापित चात्या वाढून ४२०१० तर उपलब्ध चात्या ४६००१२३५ तर चाललेल्या चात्यांची संख्या ४१८८६७९४ इतकी आहे. या वर्षी निव्वळ सूत उत्पादन

८२८४७२९ किलो इतके झाले आहे. प्रति चाती सूत उत्पादन १९७.७९ ग्रॅम्स इतके राहिलेले आहे.

८) सन २००८-२००९ या वर्षात निव्वळ सूत उत्पादन ८४०२३१७ किलो इतके झालेले आहे. या वर्षात प्रस्थापित चात्या ४३५३६ तर उपलब्ध चात्या ४७६७१९२० आणि चाललेल्या चात्याची संख्या ३९०९३७६१ इतकी आहे. चाललेल्या चात्याची टक्केवारी ८२.०१ आणि उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २१.९१ इतका आहे. तसेच प्रति चाती सूत उत्पादन २१४.९२ ग्रॅम्स मिळालेले आहे. सूत गिरणी पूर्णपणे ३५७ दिवस चालू होती.

९) सन २०१०-२०११ या वर्षात प्रस्थापित चात्या ४३२१२ उपलब्ध चात्या ४७३१६८१६ आणि चाललेल्या चात्या ३७०५६३३२ इतक्या आहेत. यापासून निव्वळ सूत उत्पादन ७२७४३७७ किलो इतके मिळाले. या वर्षी चाललेल्या चात्याची टक्केवारी ७८.३२ तर उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २३.१५ इतका आहे. तसेच प्रति चाती सूत उत्पादन १९३.३१ ग्रॅम्स इतके आहे. यावर्षी सूत गिरणी पूर्ण कार्यक्षमतेने ३५८ दिवस चालू होती.

**सारांश**

अभ्यासासाठी निवडलेल्या दहा वर्षात सूत गिरणीचे निव्वळ सूत उत्पादन ७५५५५४५३४ किलोचे झालेले आहे. तर प्रस्थापित चात्याची संख्या ४१६१६ वरून ४३२१३ इतकी तर चाललेल्या चात्याची टक्केवारी जवळपास ८४ ते ९३टक्केपर्यंत आहे. तर उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २३ ते २५ तसेच प्रति चाती सूत उत्पादन १४७ ते २६० ग्रॅम्स पर्यंत मिळालेले आहे.

### ४.२.४ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोलेची सूत विक्री :-

शेतकरी सहकारी सूतगिरणी मध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने व्यापारी उत्पादनास माहे १९८५ पासून सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, २४, २६, ३०, ३२, ३४, ३८, ४० सिंगल कोम्बड, कार्डेड होजिअरी व विव्हिंग सूताचे उत्पादन होते. अशा वरील विविध काऊंटचे सूत उत्पादन केले जाते. परंतू या तयार झालेल्या सूताला योग्य बाजारपेठ प्राप्त करणे स्पर्धेमुळे कठीण होऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सूताची विक्री वाढवायची असेल तर त्यासाठी उत्पादन खर्च कमी करून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. तसेच सूताचा दर्जा व गुणवत्ता चांगली असली पाहिजे तरच सूताला वाढती मागणी येऊ शकेल. अन्यथा सूत गिरणी सतत आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सूत गिरणीने अत्याधूनिक प्रयोगशाळा उपकरणे बसवून विविध सूत काऊंटचे उत्पादनास सुरूवात केलेली आहे. सूतगिरणीमध्ये कच्च्या कापसापासून सूत निर्मिती करण्यात येते. निर्यातक्षम व उच्च गुणवत्ता असलेले सूत तयार करण्यासाठी कच्च्या कापसापासून सूत निर्मिती पर्यंत

वेगवेगळ्या घटकांची तपासणी करण्यासाठी परदेशी बनावटीची अद्यावत उपकरणे आणि सूत गिरणीत सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा उभी केली आहे. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे आणि निर्यातक्षम सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. यामुळेच सूतगिरणीने आवघ्या ४ ते ५ वर्षात स्थानिक बाजारपेठेत म्हणजेच भारतीय बाजारपेठेत आणि विदेशात जपान, इस्त्राईल, रशिया, इटली, ब्राझील, पेरु, दक्षिण आफ्रिका, ईराण, पोर्तूगाल, फिलीपाईन्स, कोलंबिया, बांगलादेशआदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

सूत गिरणीतील सूताच्या विक्रीसाठी निरनिराळया ठिकाणचे व्यापारी, एजंन्ट, दलाल, कारखानदार स्वतः सूत गिरणीत येतात. सूताच्या दर्जाविषयी किंमती विषयी चर्चा, व्यापारी व्यवस्थापनाशी करून किंमत निश्चिती करतात. शिवाय काही व्यापारी व कारखानदार त्यांना ज्या दर्जाचे काऊंटचे सूत हवे आहे त्याचे नमुने आणतात. त्याप्रमाणे सूताची मागणी करतात तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन व्यवस्थापन व संचालक मंडळ सूत उत्पादन मागणी व जास्त किंमत मिळवून देणाऱ्या सूताचे उत्पादन करण्यास व्यवस्थापक मंडळास सांगतात. थोडक्यात सूत विक्रीचे सर्व निर्णय व्यवस्थापक व संचालक मंडळ घेते. स्थानिक बाजारपेठेत प्रत्यक्षरीत्या सूताची विक्री विक्रीदात्याकडून केली जाते. तसेच सूत गिरणीतर्फे एजन्ट विविध राज्यात नियुक्त केलेले आहेत. तसेच विदेशात देखील मोठया प्रमाणात सूताची निर्यात केली जाते. सूत गिरणीतर्फे स्थनिक बाजारात विकलेले सूत तक्ता क्र. ४.२.४ मध्ये दाखविले आहे.

## तक्ता क्र. ४.२.४


## स्थानिक बाजारात सूत विक्री तक्ता

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण सूत उत्पादन | ५६४५५९३ | ६३७६५०२ | ६९०७८९३ | ७५५९९५३ | ८००१७३७ | ८१९४६९५ | ८९०६७३७ | ८२८४७२९ | ८४०२३१७ | ७२७४३३७ |
| २. | स्थानिक बाजारात सूत विक्री किलो | ५५८५५४६ | ६५३९९२२ | ६९५०३५६ | ७५८८९३६ | ७९४६३३५ | ८२०९४४८ | ८८९९८९६ | ८१६६०४९ | ८५४८९३३ | ६७७७५०६ |
| ३. | स्थानिक बाजारात सूत विक्री किंमत (रु. लाखात) | ४७१३.०० | ५२०९.५२ | ६८१०.१३ | ७१८२.७८ | ६८८७.९४ | ७७९१.४२ | ८२५०.२९ | ८४४३.६० | ९४३३.५८ | १००८१.६७ |
| ४. | सरासरी विक्री दर प्रति किलो रुपये | ८४.३८ | ७९.६५ | ९७.९२ | ९४.६५ | ८६.६८ | ९४.९१ | ९२.७० | १०३.४० | ११०.३५ | १४८.७५ |

आधार : शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून

### आलेख क्र. ५

### स्थानिक बाजारात सूत विक्री




**आधार :— तक्ता क्र. ४.२.४**

१) वरील तक्त्यावरून अहवाल वर्ष सन २००१-२००२ या वर्षी एकूण सूत उत्पादन ५६४५५९३ किलो पैकी ५५८५५४६ किलो सूताची विक्री सूत गिरणीने आपल्याच देशातील बाजार पेठेत केलेली आहे. सूत विक्रीची किंमत रू.४७१३.०० लाख इतकी मिळाली तर प्रति किलो सूताला ८४.३८ पैसे हा दर मिळाला आहे.

२) सन २००२-२००३ या वर्षात सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठेत ६५३९९२२ किलो सूताची विक्री केलेली आहे. त्याची किंमत रूपये ५२०९.५२ लाख इतकी आहे. यावर्षी प्रति किलो सूताला रूपये ७९.६५ पैसे हा दर मिळालेला आहे.

३) सन २००३-२००४ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ६९०७८९३ किलो त्यापैकी ६९५०३५६ किलो स्थानिक बाजारपेठेमध्ये रूपये ६८१०.१३ लाख रूपये सूताची विक्री केलेली आहे. या वर्षी सूताला प्रति किलो रूपये ९७.९८ पैसे हा दर मिळालेला आहे.

४) सन २००४-२००५ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ७५५९९५३ किलो आहे. त्यापैकी ७५८८९३६ किलो सूताची विक्री स्थानिक बाजारपेठेमध्ये केलेली आहे. या विक्रीतून सूत गिरणीला रूपये ७१८२.७८ लाख रूपये मिळाले. या वर्षी सूताला सरासरी प्रति किलो रूपये ९४.६५ पैसे हा दर मिळाला आहे.

५) सन २००५-२००६ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ८००१७३७ किलो आहे. त्यापैकी ७९४६३३५ किलो सूताची विक्री आपल्या देशातील बाजारपेठेमध्ये केलेली आहे. त्याची किंमत रूपये ६८८७.९४ लाख इतकी प्राप्त झालेली आहे. तर सरासरी प्रति किलो सूताला ८६.६८ पैसे हा दर मिळालेला आहे.

६) सन २००६-२००७ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ८१९४६९५ किलो आहे. त्यापैकी ८२०९४४८ किलो सूताची विक्री आपल्याच देशातील बाजारपेठामध्ये केलेली आहे. त्याची किंमत रूपये ७७९१.४२ इतकी सूत गिरणीला प्राप्त झालेली आहे. तर सरासरी प्रति किलो सूताला ९४.९१ हा दर मिळालेला आहे.

७) सन २००७-२००८ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ८९०६७३७ किलो आहे. त्यापैकी सूत गिरणीने ८८९९८९६ किलो सूताची विक्री आपल्याच देशातील बाजारपेठामध्ये केलेली आहे. त्याची किंमत रू.८२५०.२९ लाख इतकी आहे. तर सरासरी प्रति किलो सूत रू.९२.७० या दराने विकलेला आहे.

८) सन २००८-२००९ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ८२८४७२९ किलो आहे. त्यापैकी सूत गिरणीने ८१६६०४९ किलो सूताची विक्री आपल्याच देशातील बाजारपेठात केलेली आहे. विक्री केलेल्या सूताची किंमत रू.८४४३.६० लाख इतकी आहे. यावर्षी सूताला सरासरी प्रति किलो सूत रुपये १०३.४० पैसे हा दर मिळालेला आहे.

९) सन २००९-२०१० या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ८४०२३१७ किलो आहे. त्यापैकी सूत गिरणीने ८५४८९३३ किलो सूताची विक्री आपल्याच देशातील बाजारपेठामध्ये केलेली आहे. विक्री केलेल्या सूताची किंमत रू.९४३३.५८ लाख इतकी आहे. या वर्षी सूताला सरासरी प्रति किलो सूत रुपये ११०.३५ पैसे हा दर मिळालेला आहे.

१०) सन २०१०-२०११ या वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ७२७४३३७ किलो आहे. त्यापैकी सूत गिरणीने ६७७७५०६ किलो सूताची विक्री आपल्याच देशातील बाजारपेठामध्ये केलेली आहे. विक्री केलेल्या सूताची किंमत रूपये १००८१.६७ लाख इतकी आहे. तर या वर्षात सूताला सरासरी प्रति किलो सूत रुपये १४८.७५ पैसे दर मिळालेला आहे.

## सारांश

अहवाल वर्षात सूतगिरणीचे स्थनिक बाजारपेठेत ७५२१२९२७, किलो सूताची विक्री केलेली आहे. त्यापासून सूतगिरणीला ७४८०३९३ रुपये मिळालेले आहेत. पहिल्या ३-४ वर्षात सूताला प्रति किलो दर ९४ रुपये ते ९७ रुपये दरम्यान राहिलेला आहे. तर २००९ ते २०११ या वर्षात प्रति किलो दर १०३ ते १४८ रु एवढा दर प्राप्त झालेला आहे.

### ४.२.५ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले चे विदेशात सूत निर्यात :-

गिरणीच्या आधूनिकीकरन प्रकल्पाअंतर्गत ई.पी.सी.जी. या केंद्रशासनाच्या कस्टम ड्युटी सवलत योजनेखाली गिरणीने अत्याधूनिक मॉडेलची यंत्रसामूग्री खरेदी केली असून नियमानूसार त्यावरील सूताची निर्यात करण्याचे बंधन असल्याने तसेच अंतरराष्ट्रीय बाजारात सूताला चांगला दर मिळत असल्याने सूताची निर्यात जपान, इस्त्राईल, रशिया, इटली, ब्राझील, पेरु, दक्षिण अफ्रिका, ईराण, पोर्तूगाल, फिलीपाईन्स, कोलंबिया, बांगलादेशात इत्यादी देशात सूताची निर्यात केलेली आहे. सूत गिरणीने निर्यात केलेल्या सूताचा तक्ता क्र.४.२.५ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्र. ४.२.५

## शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले निर्यात किंवा विदेशात केलेल्या सूत विक्री तक्ता


| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६- २००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण सूत उत्पादन | ५६४५५९३ | ६३७६५०२ | ६९०७८९३ | ७५५९९५३ | ८००१७३७ | ८१९४६९५ | ८९०६७३७ | ८२८४७२९ | ८४०२३१७ | ७२७४३३७ |
| २. | विदेशात सूत किलो | २४७०३० | १७९४८०२ | १७५६०१८ | १११५६७५ | ११८००२५ | १२५५८८२ | २९५७२०७ | २८३७४३९ | ३८७१३३८ | ४७५४३०३ |
| ३. | विदेशात सूत विक्री किंमत (रु. लाखात) | २०८.०९ | १६४५.६९ | १८१९.८४ | ११६८.८६ | ११२०.२५ | १२६२.६५ | २७७७.२३ | २९२२.६७ | ४३८५.८४ | ६८३२.४१ |
| ४. | एकूण विक्रीपैकी निर्यात टक्केवारी | ४.४२ | ३१.५९ | २६.७२ | १६.२७ | १६.२६ | १६.२१ | ३३.६६ | ३४.६१ | ४६.४९ | ६७.७७ |
| ५. | निर्यात प्रति किलो विक्री दर रु.पै. | ८४.२४ | ९१.६९ | १०३.६३ | १०४.७७ | ९४.९३ | १००.५४ | ९३.९१ | १०३.०० | ११३.२९ | १४३.७१ |

**आधार :- शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवालावरून**

सूत गिरणीतर्फे जपान, इस्त्राईल, रशिया, इटली, ब्राझील, पेरु, दक्षिण आफ्रिका, ईराण, पोर्तूगाल, फिलीपाईन्स, कोलंबिया, बांगलादेशआदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

### आलेख क्र. ६

### निर्यात किंवा विदेशात केलेली सूत विक्री




आधार :- तक्ता क्र. ४.२.५

१)	सन २००१-२००२ या अहवाल सालात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ५६४५५९३ किलो आहे. त्यापैकी सूत गिरणीने २४७०३० किलो सूताची निर्यात विदेशात केलेली आहे. एकूण सूत विक्रीच्या ४.४२ टक्के इतक्या सूताची निर्यात केली असून त्यापोटी रूपये २.०८ कोटी इतके परकीय चलन आपल्या देशास मिळवून दिले आहे.

२)	सन २००२-२००३ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ६३७६५०२ किलो आहे. त्यापैकी १७९४८०२ किलो सूताची निर्यात विदेशात केलेली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातून सूताची मागणी चांगली असल्याने एकूण सूत विक्री किंमतीच्या ३१.५९ टक्के सूत निर्यात केली असून त्यापोटी रूपये १६.४६ कोटी परकीय चलन आपल्या देशास मिळाले आहे.

३)	सन २००३-२००४ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ६९०७८९३ किलो इतके आहे. त्यापैकी १७५६०१८ किलो सूताची निर्यात विदेशात केलेली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सूताला मागणी वाढल्यने आणि सूत गिरणीने अत्याधुनिक यंत्रे बसविल्याने या वर्षात, एकूण सूत विक्री किंमतीच्या २६.७२ टक्के इतकी निर्यात केलेली आहे. त्यापोटी रूपये १८१९.८४ लाख परकीय चलन देशास मिळालेले आहे. निर्यात सूताला प्रति किलो रूपये १०३.६२ पैसे हा दर मिळालेला आहे.

४)	सन २००४-२००५ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ७५५९९५३ किलो इतके आहे. त्यापैकी १११५६७५ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात सूत विक्री किंमतीच्या १६.२७ टक्के इतकी सूत निर्यात झाली असून त्याची किंमत रूपये ११६८.८६ लाख इतकी आहे. निर्यात प्रति किलो विक्री दर रूपये १०४.७७ पैसे हा मिळालेला आहे.

५)	सन २००५-२००६ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ८००१७३७ किलो इतके आहे. त्यापैकी ११८००२५ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात एकूण विक्री किंमतीच्या १६.२६ टक्के इतकी सूत निर्यात केलेली असून त्याची किंमत रूपये ११२०.२५ लाख आहे. निर्यात सूताला प्रति किलो विक्री दर रूपये ९४.९३ पैसे हा दर मिळालेला आहे.

६)	सन २००६-२००७ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ८१९४६९५ किलो इतके आहे. त्यापैकी १२५५८८२ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात एकूण विक्री किंमतीच्या १६.२१ टक्के इतकी सूत निर्यात झाली असून त्याची किंमत रूपये १२६२.६५ लाख इतकी आहे. निर्यात सूताला प्रति किलो विक्रीदर रूपये १००.५४ पैसे हा दर मिळालेला आहे.

७)	सन २००७-२००८ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ८९०६७३७ किलो इतके आहे. त्यापैकी २९५७२०७ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात एकूण विक्री किंमतीच्या

३३.६६ टक्के इतकी सूत निर्यात झाली असून त्याची किंमत रूपये २७७७.२३ लाख इतकी आहे. निर्यात सूताला प्रति किलो विक्रीदर रूपये ९३.९१ पैसे हा दर मिळालेला आहे.

८) सन २००८-२००९ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ८२८४७२९ किलो इतके आहे. त्यापैकी २८३७४३९ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात एकूण विक्री किंमतीच्या ३४.६१ टक्के इतकी सूत निर्यात झाली असून त्याची किंमत रूपये २९२२.६७ लाख इतकी आहे. निर्यात सूताला प्रति किलो विक्रीदर रूपये १०३.०० पैसे हा दर मिळालेला आहे.

९) सन २००९-२०१० या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ८४०२३१७ किलो इतके आहे. त्यापैकी सूत गिरणीने ३८७१३३८ किलो सूताची विदेशात निर्यात केलेली आहे. या वर्षात निर्यात बाजारात सूताचे दर किफायतशीर असल्याने निर्यातीत वाढ झालेली आहे. या वर्षात सूत निर्यातीपासून रूपये ४३८५.४४ लाख इतके परकीय चलन मिळालेले आहे. तसेच या वर्षात एकूण सूत विक्री किंमतीच्या ४६.४९ टक्के सूताची निर्यात झाली आहे. या वर्षी निर्यात सूताला प्रति किलो विक्रीदर रूपये ११३.२३ पैसे हा दर मिळालेला आहे

१०) सन २०१०-२०११ या वर्षात सूत गिरणीचे सूत उत्पादन ७२७४३३७ किलो इतके आहे. त्यापैकी ४७५४३०३ किलो सूताची निर्यात केलेली आहे. या वर्षात एकूण उत्पादनाच्या ६७.७७ टक्के सूताची निर्यात केली आहे. त्याची किंमत रूपये ६८३२.४१ लाख इतकी आहे. तसेच या वर्षात निर्यात सूताला प्रति किलो विक्रीदर रूपये १४३.७१ पैसे हा दर मिळालेला आहे.

## सांराश

अभ्यासासाठी निवडलेल्या आर्थिक वर्षात सूत गिरणीने २१७६९७१९ किलो सूताची निर्यात विदेशात केलेली आहे. त्यापासून आपल्या देशाला २४१४३.५३ लाख इतके परकीय चलन प्राप्त झालेले आहे. सूताला प्रतिकिलो २०१०-११ या वर्षी १४३.७१ रु हा दर मिळालेला आहे.

### ४.२.६ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीतील रोजगार :-

भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शिवाय वाढती लोकसंख्या असल्यामुळे त्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असते. प्रचलीत वेतनदरावर ज्याची काम करण्याची इच्छा आहे अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्यच समजले जाते. रोजगार निर्मितीत सहकारी सूत गिरण्यांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली आहे. या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे. महाराष्ट्र राज्यात सहकारी सूत गिरण्यांमुळे १० लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे.

शेतकरी  सहकारी सूत गिरणी स्थापना करीत असताना आमदार गणतराव देशमुख यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा हे उद्दिष्ट ठेवलेले होते. त्यानुसार ग्रामीण भागात सूत गिरणी सुरू केलेली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत रोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून सूत गिरणीने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व समाजातील दुर्बल घटकांना, बेरोजगारांना सतत रोजगार मिळत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या स्थापनेत उत्पादन वाढ व ग्रामीण विकास या उद्देशावरून सांगोले आसपासच्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त करून देणे व त्या भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश यशस्वी होत आहे.

सन १९७९ मध्ये शेतकरी सहकारी सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. प्रत्यक्ष सूत गिरणी डिसेंबर १९८५ पासून सुरू झाली. मार्च २००१ पासून ४१६१२ चात्यावर सूत गिरणीत सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. सन २००१-२००२ मध्ये एकूण दैनंदिन काम करणाऱ्या कामगारांची संख्या ३०० होती. आज संख्या १४७१ वर गेल्याचे आढळते. सन २००१-२००२ पासून सन २०१०-२०११ पर्यंत कामगारांच्या संख्येत वाढ होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक ४.२.६ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमाक ४.२.६**

**शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार**

**(सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११)**

| वर्ष | कामगारांची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | ३०० |
| २००२-२००३ | ३५० |
| २००३-२००४ | ४०० |
| २००४-२००५ | ४२५ |
| २००५-२००६ | ५१० |
| २००६-२००७ | ५९० |
| २०१०-२०११ | १४७१ |

**आधार :-** सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील आकडेवारी वरून असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये कामगारांची संख्या ३०० होती. त्यानंतर सन २०१०-२०११ मध्ये कामगारांची संख्या १४७१ इतकी झाली. याचाच अर्थ असा होतो की, या दहा वर्षात कामगार संख्येत वाढ झालेली आढळते. तसेच सूत गिरणीतील प्रत्यक्ष कामगार संख्येत

वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरणी मुळे परिसरातील ५००० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले.

स्पिनिंग विभागात काही उपविभाग आहेत. त्यातील कामगारांची संख्या ही डिसेंबर २०११ ची आहे.

**तक्ता क्रमांक ४.२.७**
**स्पिनिंग विभागातील कामगार संख्या**

| अ. क्र. | विभाग | कायमची कामगार संख्या | बदली कामगार संख्या |
|---|---|---|---|
| **१.** | स्पीड फ्रेम (कारडींग, ब्लोरूम) | ३०० | ६० |
| **२.** | रिंग फ्रेम | ४०० | १८० |
| **३.** | वायडींग (एस.क्यू.सी., पॅकींग) | २०० | १२० |
| **४.** | मेन्टनन्स (जनरल आणि वाचमन) | १०० | ६१ |
| **५.** | कार्यालय | ५० | |
| | **एकूण** | **१०५०** | **४२१** |

**आधार :-** टाईम विभागाच्या रेकॉर्ड वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, स्पिनिंग विभागात चार उपविभाग आहेत. वरील विभागापैकी रिंग विभागात कायम व बदली कामगार या दोहोंची संख्या १४७१ इतकी आहे. तसेच स्पीड व मेन्टनन्स या विभागात कामगारांची संख्या ४०० आहे. एकूण कामगारांची संख्या पाहिली तर कायम कामगारांची संख्या अधिक असल्याचे दिसते. तसेच वरील तक्त्यात कार्यालयातील ५० कर्मचाऱ्यांच्या संख्येचा देखील उल्लेख आहे. यावरून सूत गिरणी मधील कायम कामगारांची संख्या १०५० तर बदली कामगारांची संख्या ४२१ आहे. स्पिनिंग विभागात एकूण कामगारांची संख्या १००० इतकी आहे. सूत गिरणीतील उत्पादन सध्या ४१६१६ चात्यावर सुरू आहे. आणखी ९००० चाते बसवून ज्या वेळेस सूत गिरणी ५०००० चात्यावर उत्पादन पूर्ण कार्यक्षमतेने सुरू होईल त्यावेळेस आणखी काही लांकांना रोजगार उपलब्ध होऊन कामगार संख्येत वाढ होईल. असे तथ्य संकलनावरून आढळते.

### ४.२.७ शेतकरी सहकारी सूत गिरणी मधील स्पिनिंग विभागातील कामाचे स्वरूप :-

सूत गिरणीमध्ये कामाच्या तीन पाळ्या चालतात. यामध्ये त्यांच्या वेळा खालील प्रमाणे सांगता येतात.

१) पहिली पाळी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत.

२) दुसरी पाळी दुपारी ४.०० ते सायंकाळी १२.०० पर्यंत.

३) तिसरी पाळी रात्री १२.०० ते सकाळी ८.०० पर्यंत.

वरील प्रमाणे कामगार तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

कापसापासून सूत तयार करण्यासाठी निरनिराळ्या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानुसार सूत गिरणीतील स्पिनिंग विभाग हा महत्वाचा आहे. त्याची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रथमतः

गोडाऊन मधून कापूस मिक्सिंग विभागात येतो तेथून मिक्सिंग केल्यानंतर ब्लोरूम विभागात पिंजणी करण्याचे कार्य केले जाते. पुढे कारडिंग विभागात आल्यानंतर तेथे नको असलेला कचरा काढून स्वच्छ केले जाते. नंतर पुढे स्पीडप्रेम मध्ये वात तयार होते. पुढे गेल्यावर त्या वातीचे बारीक दोरा सूत तयार होते. तसेच पुढे जाऊन वायडींग विभागामध्ये चांगले सूत तयार होते. नंतर हे चांगले तयार झालेले सूत पॅकिंग विभागात पाठविले जाते. तेथे पॅकिंग झाल्यानंतर सूताची विक्री करण्यासाठी ते सूत बाजारपेठेत पाठविले जाते. अशाप्रकारे कापसापासून सूत तयार होईपर्यंतची प्रक्रिया सूत गिरणीमध्ये केली जाते. तसेच स्पिनिंग विभागातील जी यंत्र सामुग्री वापरली जाते त्यांची दुरूस्ती व त्यांची व्यवस्था पाहण्याचे कार्य मेन्टेनन्स विभागाकडून केले जाते. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामाचे स्वरूप आहे. या ठिकाणी सूत तयार होण्याच्या व कामाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ४.२.८ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले वेतन पद्धती :-

कामगारांच्या प्राप्तीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वेतनाचा किंवा मजुरीचा उल्लेख केला जातो. कामगाराला किंवा श्रमिकाला उत्पादन कार्यात त्याच्या श्रमशक्तीचा वापर केल्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला वेतन असे म्हणतात. यामध्ये शारिरीक व बौद्धीक, कुशल व अकुशल अशा सर्व श्रमांचा समावेश होतो. वेतन तासाच्या दरात, दिवसाप्रमाणे, महिन्याप्रमाणे व वस्तूच्या किंवा दोन्ही मिळून दिले जाते.

कित्येकदा वेतन काम केलेल्या कालाप्रमाणे दिले जाते. यास कालानुसार वेतन म्हणतात. तर कित्येकदा वेतन कामगारांने केलेल्या कामाप्रमाणे म्हणजे उत्पादनाप्रमाणे दिले जाते. तर कधी कधी वेतन अमुक काम झाल्यावर दिले जाते त्यास ठेक्याप्रमाणे वेतन म्हणता येईल.

वरील प्रकारापैकी शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कालाप्रमाणे वेतन दिले जाते. अर्थात यासाठी आठ तासांची पाळी नेमून दिलेली आहे. त्याप्रमाणे कामगारांना हुद्यानुसार वेतन दिले जाते. वेतन निश्चिती मुंबई वेतन मंडळ करते. त्याची अंमलबजावणी सूत गिरणी आपल्या कामगारांच्या बाबतीत करते. सूत गिरणीतील कामगारांना वेतन महिन्याला दिले जाते. प्रत्येक महिन्यातील १० तारखेस कामगारांना वेतन दिले जाते. हे अनुसूचितील प्रश्नाच्या उत्तरावरून आढळून आले.

### ४.२.९ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले तर्फे राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना :-

गिरणीच्या कार्यस्थळावर तसेच गिरणीच्या सहकार्याने विविध सामाजिक आर्थिक /औद्योगिक / कृषी सलग्न पथदर्शक योजना चालू आहेत.

**१) कापूस विकास योजना :-**

गिरणीच्या कार्यक्षेत्रात कापूस लागवड क्षेत्र वाढविणेच्या दृष्टीने गिरणी सतत प्रयत्नशील आहे. गिरणीतर्फे सभासदांना कापसाच्या योग्य जातीचे बियाणे रास्त भावात पुरविणे, कापसाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी, आवश्यक माहिती देणे, निरनिराळ्या किडीसंबंधी व त्यावर करावयाचे उपाय, कापसाची वेचणी वगैरेसंबंधी शास्त्रीय माहिती दिले जाते. गिरणीच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रामुख्याने, उन्हाळी हंगामामध्ये कापासाची लागवड केली जाते. तथापी मागील काही वर्षामध्ये पडलेल्या अपुऱ्या पावसामुळे कापसाची लागवड कमी होत आहे. तरी पाण्याच्या उपलब्धतेचा विचार करुन, सभासद शेतकऱ्यांनी कापूस क्षेत्र वाढविणेसाठी प्रयत्न करावेत. सूत गिरणीतर्फे शेतकऱ्यांना कापसाचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**२) अंधत्व निवारण अभियान :-**

अंधत्व निवारण अभियानांतर्गत गिरणीच्या साईटवर दर रविवारी नेत्र शिबीराचे आयोजन केले जाते. अहवाल साल अखेर एकूण ४०० शिबीरे आयोजित केली असून यामध्ये १९९४१ इतक्या रुग्णांची तपासणी करुन ५०८६ इतक्या रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या आहेत.

**३) सामुदाईक विवाह :-**

या योजनेअंतर्गत सन १९८९ पासून अहवाल साल २०११ अखेर ७७२ जोडप्याचे विवाह झाले आहेत. चालू अहवाल सालात ४४ जोडप्यांचे विवाह झाले. महाराष्ट्र शासनाच्या महिला व बचत विकास विभागाकडून राबवल्या जाणाऱ्या शुभ मंगल सामुहिक विवाह योजनेचा लाभ शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील जोडप्यांना प्राप्त करुन दिला जात आहे. या योजनेअंतर्गत रक्कम रुपये १०,०००/- दिली जाते.

**४) गुणवंत विद्यार्थी / आदर्श शिक्षक पारितोषिक योजना :-**

सांगोले तालुक्यातील शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या तसेच इ. १० वी, इ. १२ वी व पदवी परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांना घडविणाऱ्या आदर्श शिक्षकांचा रोख रक्कम /भेट वस्तू देऊन दरवर्षी गिरणीतर्फे सत्कार करण्यात येतो.

**५) फलोद्यान, सामाजिक वनीकरण, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम :-**

सूत गिरणीच्या कार्यक्षेत्रावर आवळा, जांभूळ इत्यादी फळझाडांची व औषधी वनस्पतीचीही लागवड केली आहे. गिरणीच्या माध्यमातून शासनाच्या सामाजिक वनीकरण, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम या योजना राबविणे चालू आहे.

**६) औद्योगिक सहकारी वसाहत :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या माध्यमातून सांगोले तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रात वाढ व्हावी, बेरोजगार तरुणांनानी स्वयंरोजगार निर्माण कराव. रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सांगोले

औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, सांगोले या औद्योगिक वसाहतीला तिच्या स्थापनेपासून सूत गिरणीने संपूर्ण सहकार्य केले आहे. आज या वसाहतीत ३३ लघु उत्पादन उत्पादनाखाली आले असून सुमारे ३२५ ते ३५० बेरोजगार युवकांना स्थिर रोजगार प्राप्त झाला आहे.

**७) महिला सूत गिरणी :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या प्रोत्साहनाने शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणीची स्थापना दि.१३ ऑक्टोबर १९९४ रोजी झाली. या सूत गिरणीचा २५,२०० चात्याचा प्रकल्प दोन टप्प्यामध्ये कार्यान्वित करण्याचे ठरले असून पहिल्या टप्प्यातील १३८२७ चात्यावर माहे फेब्रुवारी २००८ पासून उत्पादनास सुरुवात झाली आहे. १२,५०० चात्याच्या दुसऱ्या टप्प्यातील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून यंत्रसामुग्रीचे इरेक्शन झाले आहे. जुलै २०१२ पर्यंत हा टप्पाही उत्पादनाखाली आला आहे. या गिरणीमुळे सुमारे ३०० महिला व २५० पुरुष यांना स्थिर रोजगार प्राप्त झाला आहे.

**कामगार कल्याण योजना :-**

गिरणीमध्ये अहवाल साल २०११ अखेर एकूण कामगार १०७८ व कार्यालयीन कर्मचारी ७१ कार्यरत आहेत. या कामगार वर्गाच्या कल्याणासाठी गिरणी खालीलप्रमाणे निरनिराळ्या योजना राबवित आहे.

**१) सकस आहार योजना :-**

कामगारांचे आरोग्य सुदृढ राहण्याच्या दृष्टीने या योजनेअंतर्गत कामगारांना आठवड्यातून ४ दिवस बिस्कीटचे पुडे दिले जातात व उर्वरीत दिवशी १७० ग्रॅम शेंगादाणे माफक दरात दिले जातात.

**२) शेकोस्पिन ग्राहक भांडार :-**

गिरणीतील कामगार, कर्मचारी, सभासद तसेच अन्य नागरिकांना जीवनाश्यक वस्तू निर्भेळ व योग्य किंमतीस एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कामगार कर्मचाऱ्यांनी सहकारी तत्त्वावर ग्राहक भांडाराची स्थापना दि. ०९/१०/१९८९ रोजी केलेली आहे. सध्या या ग्राहक भांडाराची वार्षिक उलाढाल १४१.०० लाख इतकी आहे.

**३) शेकोस्पीन पतसंस्था :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीतील सर्व कामगार, कर्मचारी यांचे नांवे जनता अपघात विमा पॉलिसी घेतली असून या योजनेमुळे कामगार / कर्मचारी यांचे कोठेही व केव्हाही अपघाती निधन झाल्यास त्यांच्या वारसाला रुपये १.०० लाख इतकी रक्कम विमा कंपनी कडून मिळते.

**४) जनता अपघात विमा पॉलिसी :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीतील सर्व कामगार, कर्मचारी यांचे नांवे जनता अपघात विमा पॉलीसी घेतली असून या योजनेमुळे कामगार / कर्मचारी यांचे कोठेही व केव्हाही अपघाती निधन झाल्यास त्यांचे वारसाला रुपये १.०० लाख इतकी रक्कम विमा कंपनी कडून मिळते.

**५) समुह विमा योजना (ई.डी.एल.आय.) :-**

भारतीय जीवन विमा निगम, पुणे यांचेकडे गिरणीतील सर्व कामगार कर्मचाऱ्यांचा समुह विमा (ई.डी.एल.आय.) उतरविला असून कामगार / कर्मचाऱ्यांचे कोणत्याही निमित्ताने सेवेच्या काळात निधन झाल्यास त्यांचे वारसास रुपये १, ३२, ०००/- इतकी रक्कम मिळते.

**६) ग्रुप ग्रॅच्युटी योजना :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीतील कामगार /कर्मचारी यांना सेवानिवृत्ती नंतर ग्रॅच्युईटीची रक्कम त्वरीत व सुलभपणे उपलब्ध व्हावी यासाठी सूत गिरणीने भारतीय जीवन बीमा निगम यांच्याकडील ग्रुप ग्रॅच्युईटी योजनेत भाग घेतला आहे. दरवर्षी गिरणी या पोटी विमा हप्ता भरते. एखादा कामगार / कर्मचारी यांचे निधन निवृत्तीपूर्वी झाल्यास त्यांच्या वारसास निवृत्ती काळानंतर मिळणाऱ्या ग्रॅच्युईटी इतकी रक्कम या योजनेअंतर्गत मिळते.

**७) कामगार व व्यवस्थापन :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीत कामगार, कर्मचारी व व्यवस्थापन यांच्यात योग्यरीतीने समन्वय तसेच सुसंवाद आहे. कामगारांच्या कामकाजातील अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने वारंवार बैठका घेतल्या जातात. तसेच कामगारासंबंधी तक्रार निवारण समिती, सुरक्षा कमिटी, कॅंटीन कमिटी यांच्या माध्यमातून कर्मचारी व अधिकारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

**८) गुणवंत कामगार योजना :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये दर वर्षी कायम व बदली कामगारांची हजेरी, वर्तणूक, कामाची पध्दत वगैरे निकषांवर कामगारांना गुण देऊन जास्तीत जास्त गुण मिळणाऱ्या कामगारांचा प्रशस्तीपत्र व भेट वस्तू देऊन सन्मान केला जातो.

**९) उपस्थिती प्रोत्साहन योजना :-**

अ. कामगाराने जास्तीत जास्त दिवस कामावर हजर रहावे, या उद्देशाने महिन्यात २५ दिवस हजर राहणाऱ्या कामगारांना एक दिवसाचा प्रोत्साहनपर जादा पगार दिला जातो.

ब. बदली कामगारांना काम न मिळाल्याने परत जाणे भाग पडल्यास त्यांना प्रवास खर्चासाठी म्हणून त्या दिवशी रुपये २५/- देण्यात येतात.

**१०)कामगार कल्याण ट्रस्ट :-**

शेतकरी सहकारी सूत गिरणीत कामगार व कर्मचारी यांनी कल्याणकारी ट्रस्टची स्थापना केली असून या ट्रस्ट मार्फत दरवर्षी कामगारांच्या आरोग्याची तपासणी केली जाते. तसेच कामगार / कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास ६ वह्या मोफत वाटल्या जातात तसेच अपघातग्रस्त व आजारी कामगारांना तातडीने आर्थिक मदत केली जाते.

## ४.२.११ शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोलेला मिळालेले राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार :-

१) सूत गिरणीस सन १९८५-८६ पासून सातत्याने राज्य पातळीवरील व देशापातळीवरील महासंघाकडून उत्कृष्ट कार्याबद्दल पूरस्कार मिळालेले आहेत.

त्याचप्रमाणे सन २००४-०५ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मुंबई यांचेकडून उत्कृष्ट आर्थिक व तांत्रिक व्यवस्थपनातील तृतिय पुरस्कार व उत्कृष्ट तांत्रिक व्यवस्थापनातील पाचवा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

२) सन २००२-०३ मध्ये रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीबद्दल पुणे विभागाचा उत्कृष्ट कार्य पुरस्कार.

३) सन २००६-०७ या अहवाल वर्षात

   १) संचित निव्वळ नफा सुवर्णपदक

   २) यंत्र उत्पादन, कार्यक्षमता व रोकड नफा, उत्कृष्ट आर्थिक व तांत्रिक व्यवस्थापनास रजत पदक गिरणीस मिळाले आहे. १००% अल्पबचत योजना कार्यान्वीत करण्यात आली.

४) महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित मुंबई, या सहकारी सूत गिरण्यांच्या शिखर संस्थेने सन २००७-०८ मध्ये सूत गिरणीने महाराष्ट्र राज्यात अव्वलस्थानी राहण्याची परंपरा कायम ठेवीत संचित निव्वळ नफा कमविण्यात विशेष लक्षणिय कामगिरी केल्याबद्दल सूवर्ण पदक मिळविलेले आहे. तसेच मशीन उत्पादकता, कामगार उत्पादकता यामधील मानांकनानूसार आर्थिक व तांत्रिक व्यवस्थापनाचे रजत पदक मिळविले आहे.

५) सन २००८-०९ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मुंबई या संस्थेने कार्यरत असणाऱ्या गिरण्यांच्या कामकाजाचे तसेच सांघिक कामगिरीचे शास्त्रोक्त पध्दतीने मुल्यांकन करुन विशेष कामगिरी बजाविल्याबद्दल सूत गिरणीला सन २००८-०९ या वर्षाकरीता मशिन उत्पादकता व ढोबळ नफा यामधील निकषानूसार उत्कृष्ट आर्थिक व तांत्रिक व्यवस्थापनाचा विशेष पुरस्कार मिळालेला आहे. प्रत्येक वर्षी पुरस्कार मिळविणारी महाराष्ट्रातील ही एकमेव सूत गिरणी आहे.

## ४.३) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर :-

### ३.३.१ प्रस्तावना :-

या सूत गिरणीची स्थापना माजी आमदार बाबुराव आण्णा चाकोते यांनी नोंदणी क्र.एस.यु.आर./पी.आर.जी.(ए)डी.एच.१३ अन्वये दि. १/११/१९८० रोजी केलेली आहे. या सूत गिरणीमुळे त्या परिसरातील बेरोजगार लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. तसेच या सूत गिरणीच्या अभ्यासासाठी निवडलेल्या सुरुवातीच्या वर्षाची सभासद संख्या ३१५९ इतकी होती. तर २०११ अखेर या सूत गिरणीची सभासद संख्या ३१७४ इतकी आहे. या सूत गिरणीमुळे आजूबाजूच्या परिसराचा विकास होण्यास मदत होत आहे. तसेच सूत गिरणी अहवाल वर्षात तोट्यात आहे. या सूत गिरणीचे अधिकृत भागभांडवल ३० कोटीचे आहे.

### ४.३.२ शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सभासद संख्या :-

**तक्ता क्र. ४.३.१**

**सभासद संख्या (हजारात)**

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी सभासद | २९५४ | ३१५४ | ३१५४ | ३१५४ | ३१५४ | ३१५४ | ३१६२ | ३१६६ | ३१६६ | ३१६६ |
| २. | सहकारी संस्था | ०७ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०७ | ०७ | ०७ | ०७ | ०७ |
| ३. | महाराष्ट्र शासन | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | **एकूण** | **२९६२** | **३१५९** | **३१५९** | **३१५९** | **३१५९** | **३१६२** | **३१७३** | **३१७४** | **३१७४** | **३१७४** |

**आधार :** शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून

## ४.३.३ शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज भाग भांडवल:-

**तक्ता क्र. ४.३.२**

**भाग भांडवल (लाखात)**

| अ.क्र | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी सभासद | ७४.८० | ७४.८० | ७४.८० | ७४.८० | ७४.८० | ७४.८० | ७५.६५ | २६५.४२ | २४३.६८ | २४३.६८ |
| २. | सहकारी संस्था | ०.७२ | ०.७२ | ०.७२ | ०.७२ | ०.७२ | ०.७५ | ०.७५ | १.१७ | १.१७ | १.१७ |
| ३. | महाराष्ट्र शासन | ५५४.५२ | ५५४.५२ | ५५४.५२ | ५५४.५२ | ५५४.५२ | ७५५.१९ | ७५६.६४ | ९९६.८४ | ११२९.९३ | १३२९.०९ |
| | **एकूण** | **६३०.०४** | **६३०.०४** | **६३०.०४** | **६३०.०४** | **६३०.०४** | **८३०.७४** | **८३३.०४** | **१२६३.४३** | **१३७४.७८** | **१५७३.९४** |

**आधार : शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

### सभासद संख्या व भागभांडवल

शदर शेतकरी सहकारी सूत गिरणीचे अधिकृत भाग भांडवल ३० कोटीचे आहे. महाराष्ट्र राज्य शासनाकडून रक्कम रुपये २३५६ लाख भाग भांडवल अनुज्ञेय आहे.

१) अहवाल वर्ष २००१-०२ या वर्षात सूत गिरणीची सभासद संख्या ३१५९ इतकी आहे व भागभांडवल ५५४.५२ लाख रु आहे.

२) अहवाल वर्ष २००६-०७ या वर्षात सभासद संख्या ३१६२ आहे. आणि या सर्वांचे मिळुन भागभांडवल ७५५.७९ लाख इतके आहे.

३) अहवाल वर्ष २००७-०८ या वर्षात सभासद संख्या ३१७० आहे. आणि या सर्वांचे मिळुन भागभांडवल ७५६.६४ लाख इतके आहे.

४) अहवाल वर्ष २००८-०९ या वर्षात सभासद संख्या ३१७४ आहे. आणि या सर्वांचे मिळुन भागभांडवल ९९६.८३ लाख इतके आहे.

५) अहवाल वर्ष २००९-१० या वर्षात सभासद संख्या ३१७४ आहे. आणि या सर्वांचे मिळुन भागभांडवल ११२९.०९ लाख इतके आहे.

६) अहवाल वर्ष २०१०-११ या वर्षात सभासद संख्या ३१७४ आहे. आणि या सर्वांचे मिळुन भागभांडवल १३२९.०९ लाख इतके आहे.

## सारांश

अभ्यासासाठी निवडलेल्या अहवाल वर्षात सभासद संख्या इतर सूत गिरण्यांच्या तूलनेत फार कमीने वाढलेली अ हे. तसेच भागभांडवल देखील वाढण्याचे प्रमाण कमी आहे.

### शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे सूत उत्पादन :-

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रामुख्याने चार उत्पादन घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन यांचा समावेश होतो. विशेषतः ज्या नैसर्गिक मानवी साधनांचे उत्पादन प्रक्रियेला सहाय्य होते. त्या साधनांना उत्पादनाचे घटक असे म्हणतात. वास्तविक पाहता उत्पादनाच्या क्रियेला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. जमीन, इमारत, कच्चामाल, इंधन, श्रम, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन इत्यादी अनेक वेळा उत्पादन क्रियेसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या खूपच मोठी असते. या सर्वांना आदान (Input) असे म्हणतात. परंतू अर्थ शास्त्रज्ञांनी आपल्या सोईसाठी सर्व आदानांचे चार गट पाडले आहेत. भूमी, श्रम, भांडवल, संयोजन यालाच चतुर्विध वर्गिकरण असे म्हणतात. आज कोणतेही उत्पादन करायचे झाल्यास या चार घटकांची आवश्यकता आहे. पूर्वी उत्पादनाचे दोनच घटक मानले जात होते. परंतू भांडवलाचे महत्व वाढत गेल्याने उत्पादनाचा तो एक स्वतंत्र घटक बनला. तसेच श्रम करणारे मजूर व उत्पादनाची जोखीम स्विकारणारा संयोजक यातही फरक केला गेला. उत्पादनाचे हे चार घटक एकत्र येऊन निर्माण होणारे फलित म्हणजे उत्पादन होय. सर्व अर्थिक घडामोडींचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे उपभोग होय. मात्र त्यासाठी उत्पादन व विनिमय या प्रक्रिया फार महत्वाच्या असतात. त्यामुळे उत्पादन हे अरंभस्थानी असणारा बिंदू धरला तर अंतिम बिंदू उपभोग होय. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या भांडवलाचा आढावा घेतल्यानंतर उत्पादन या महत्वाच्या घटकाकडे आपोआप लक्ष वेधले जाते. कारण कोटयावधी रूपयांची उलाढाल केल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होणार ही मानवाची सहज प्रवृत्ती असते. तर निष्पन्न झालेले उत्पादन फायदेशिर की, तोटयाचे होते ते पाहणे देखिल संयोजकाचे (व्यवस्थापनेचे) कर्तव्यच असते. निर्मित उत्पादन कोणत्या किमतीला मिळते ते पाहणे हे ग्राहकांचे देखील कर्तव्यच असते.

शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने माहे मार्च १९९० पासून व्यापारी सूत उत्पादनास सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, ३०, ३४,३८,४० सिंगल कोंम्बड- कार्डेड आणि होजिअरी विव्हिंग सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीची प्रगती पाहत असताना सूत उत्पादनातील चढउतार पाहणे अधिक योग्य व महत्वाचे ठरते. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी मध्ये सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११ या काळात किती सूताचे उत्पादन केले आहे. त्याचा तपशील तक्ता. क्र. ४.३.३ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्र. ४.३.३


## शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे सूत उत्पादन (किलो)

| अ. क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित चात्या | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ४०३२ | ६९१२ | ८३५२ |
| २. | उपलब्ध चात्या | ४४१५ | ४४१५ | ४४१५ | ४४१५ | ४४१५ | ४४१५ | ४४.२७ | ४४१५०.४० | ७५६८६४० | ८७५२३२० |
| ३. | चाललेल्या चात्या | २८.१७ | २८.१७ | २८.१७ | २८.१७ | २८.१७ | ३१.७५ | २४.८९ | २५.४० | २७.०५ | २५.४० |
| ४. | चाललेल्या चात्याची टक्केवारी | ६३.८१ | ६१.८२ | ६४.२७ | ६९.२० | ६५.४२ | ७४.९३ | ५६.२४ | ४२.०२ | ५७.८० | ६४.३७ |
| ५. | उत्पादन सरासरी काऊंट | १३.८० | २०.८४ | १९.६६ | १९.६५ | २०.०० | १९.१० | २०.०५ | १८.१३ | २१.१२ | २१.०५ |
| ६. | सूत उत्तारा % | ७८.५३ | ७७.५६ | ७५.७४ | ७४.३२ | ८३.१६ | ८२.४२ | ७८.५० | ७८.८१ | ९६.९३ | ९५.८६ |
| ७ | निव्वळ सूत उत्पादन किलो | ६००६५६ | ६६४१८२ | ६६५२७० | ६३२५७४ | ६६११७६८ | ५७६५९६ | ३५६६५५ | २१०१४२ | १३८५३१ | २११३२४१ |
| ८ | सूत गिरणी चाललेली दिवस | ३१० | ३११ | ३१३ | ३१२ | ३१० | ३१३ | ३११ | ३१३ | ३१२ | ३१२ |

**आधार :- शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

## आलेख क्र. ७

**सूत उत्पादन (किलो)**




आधार :— तक्ता क्र ४.३.३

### सूत उत्पादन

१) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचा अहवाल वर्ष २००२-०३ च्या वर्षात प्रस्थापित चात्या ४०३२ आणि उपलब्ध चात्या ४४.१५ होत्या. चाललेल्या चात्याची संख्या २८.१७ आहे तसेच चाललेल्या चात्यांची टक्केवारी ६३.८१% आहे. या वर्षात सूत उत्पादन ६६४१८२ किलो झालेले आहे. सूत उतारा ७७.५६% आहे. तर सूताचा सरासरी उत्पादन काऊंट २०.८४ आहे. व सूत गिरणी ३१३ दिवस चाललेली आहे.

२) सन २००६-०७ या वर्षात ५७६५९६ किलो सूत उत्पादन झालेले आहे. चात्या वापर ३१.७५% झालेला आहे. सूताचा उतारा ८२.४२% आहे. उत्पादीत सूताचा सरासरी काऊंट १९.१० आहे.

३) सन २००७-०८ या वर्षात ३५३६५५ किलो सूत उत्पादन झालेले आहे. चात्या वापर ५६.२४% झालेला आहे. सूताचा उतारा ७८.८०% आहे. उत्पादीत सूताचा सरासरी काऊंट २०.०५ इतके आहे.

४) सन २००८-०९ या वर्षात उपलब्ध चात्या ४४.२७ हजार आहेत. तर त्यापैकी १८५५१३३ इतक्या चात्या चाललेल्या आहेत. त्यापासून २१०१४२ किलो सूत उत्पादन झालेले आहे. चाललेल्या चात्याची टक्केवारी ४२.०२ इतकी आहे. सूताचा उतारा ७८.८१% आहे. तर सूताचा सरासरी काऊंट १८.१३ इतका आहे.

५) सन २००९-१० या वर्षात उपलब्ध चात्या ७५६८६४ त्यापैकी चाललेल्या ४३७४६०६ इतक्या चात्यावर १३८५३१ किलो सूताचे उत्पादन झालेले आहे. तसेच चाललेल्या चात्यांची टक्केवारी ५७.८० आहे. सूताचा उतारा ९६.९३६ इतका आहे. तर सूताचा सरासरी काऊंट २१.१२ इतके आहे.

६) सन २०१०-११ या वर्षात प्रस्थापित चात्या ८३५२ आहेत. तर उपलब्ध चात्या ८७५२३२० आहेत. या वर्षात चाललेल्या चात्या ५६३४४६१ इतकी आहे. या वर्षात सूताचे २११३२४१ किलो उत्पादन झालेले आहे. सूत उतारा ६५.८६% आहे. तर उत्पादीत सूत उतारा ९५.८६% आहे. तर उत्पादीत सूताचा सरासरी काऊंट २१.०५ आहे.

## शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीची सुत विक्री :-

शरद शेतकरी सहकारी सूतगिरणी मध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने व्यापारी उत्पादनास माहे १९९० पासून सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, २४, २६, ३०, ३२, ३४, ३८, ४० सिंगल कोम्बड, कार्डेड होजिअरी व विव्हिंग सूताचे उत्पादन होते. अशा वरील विविध काऊंटचे सूत उत्पादन केले जाते. परंतू या तयार झालेल्या सूताला योग्य बाजारपेठ प्राप्त करणे स्पर्धेमुळे कठीण होऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सूताची विक्री वाढवायची असेल तर त्यासाठी उत्पादन खर्च कमी करून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. तसेच सूताचा दर्जा व गुणवत्ता चांगली असली पाहिजे तरच सूताला वाढती मागणी येऊ शकेल. अन्यथा सूत गिरणी सतत आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सूत गिरणीने अत्याधूनिक प्रयोगशाळा उपकरणे बसवून विविध सूत काऊंटचे उत्पादनास सुरूवात केलेली आहे. सूतगिरणीमध्ये कच्च्या कापसापासून सूत निर्मिती करण्यात येते. निर्यातक्षम व उच्च गुणवत्ता असलेले सूत तयार करण्यासाठी कच्च्या कापसापासून सूत निर्मिती पर्यंत वेगवेगळ्या घटकांची तपासणी करण्यासाठी परदेशी बनावटीची अद्यावत उपकरणे आणि सूत गिरणीत सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा उभी केली आहे. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे आणि निर्यातक्षम सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. यामुळेच सूतगिरणीने आवघ्या ४ ते ५ वर्षात स्थानिक बाजारपेठेत म्हणजेच भारतीय बाजारपेठेत आणि विदेशात जपान, इस्त्राईल, रशिया, इटली, ब्राझील, पेरु, दक्षिण आफ्रिका, ईराण, पोर्तूगाल, फिलीपाईन्स, कोलंबिया, बांगलादेशआदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

सूत गिरणीतील सूताच्या विक्रीसाठी निरनिराळया ठिकाणचे व्यापारी, एजंन्ट, दलाल, कारखानदार स्वतः सूत गिरणीत येतात. सूताच्या दर्जाविषयी किंमती विषयी चर्चा, व्यापारी व्यवस्थापनाशी करून किंमत निश्चिती करतात. शिवाय काही व्यापारी व कारखानदार त्यांना ज्या दर्जाचे काऊंटचे सूत हवे आहे त्याचे नमुने आणतात. त्याप्रमाणे सूताची मागणी करतात तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन व्यवस्थापन व संचालक मंडळ सूत उत्पादन मागणी व जास्त किंमत मिळवून देणाऱ्या सूताचे उत्पादन करण्यास

व्यवस्थापक मंडळास सांगतात. थोडक्यात सूत विक्रीचे सर्व निर्णय व्यवस्थापक व संचालक मंडळ घेते. स्थानिक बाजारपेठेत प्रत्यक्षरीत्या सूताची विक्री विक्रीदात्याकडून केली जाते. तसेच सूत गिरणीतर्फे एजन्ट विविध राज्यात नियुक्त केलेले आहेत. तसेच विदेशात देखील मोठया प्रमाणात सूताची निर्यात केली जाते. सूत गिरणीतर्फे स्थनिक बाजारात विकलेले सूत तक्ता क्र. ४.३.४ मध्ये दाखविले आहे.

**तक्ता क्र. ४.३.४**

**शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचा स्थानिक बाजारात सूत विक्री तक्ता**

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण सूत उत्पादन | ५९४५६० | -- | -- | -- | -- | ५६३५५० | ३५९९६० | -- | -- | -- |
| २. | स्थानिक बाजारात सूत विक्री किलो | ५०७५६० | ७१७२८० | -- | -- | -- | ५८१९१० | ३५९७१० | -- | -- | -- |
| ३. | स्थानिक बाजारात सूत विक्री किंमत (रु. लाखात) | ३२७४१०९६ | ४३९६ | -- | -- | -- | ४४१७५६२५ | १९९७४४ | -- | -- | -- |
| ४. | सरासरी विक्री दर प्रति किलो रुपये | ६४.५१ | ६१.२९ | -- | -- | -- | ९०.१२ | ९१.२० | -- | -- | -- |

**आधार : शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

## सूत विक्री

१) सन २००१-०२ या अहवाल वर्षात सूत गिरणीचे एकूण सूत उत्पादन ५९४५६० किलो पैकी स्थानिक बाजारात ५०७५६० किलो पैकी स्थानिक बाजारात ५०७५६० किलो सूताची विक्री केलेली आहे. त्याची किंमत ३१७४१०९६ लाख इतकी आहे. तसेच या वर्षात सूताला विक्री दर प्रति किलो ६४.५१ रु दर मिळालेला आहे.

२) सन २००२-०३ या अहवाल वर्षात सूत गिरणीने एकूण सूत उत्पादनापैकी ७१७२८० किलो सूताची विक्री आपल्याच देशात केलेली आहे. त्याची किंमत रु ४३९ लाख इतकी आहे. तर या वर्षात सूताला प्रति किलो दर ६१.२९ रु इतका मिळालेला आहे.

३) सन २००३-०४ या वर्षात सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठांमध्ये २७७१ लाख रुपये इतक्या किंमतीचे सूत विकलेले आढळले.

४) सन २००६-०७ या अहवाल वर्षात सूत गिरणीने एकूण सूत उत्पादन ५६३५५० किलोचे केलेले आहे. त्यापैकी बाजारपेठेत ५११९७० किलोची सूत विक्री केलेली आहे. त्याची किंमत ४४.१७ लाख रुपये इतकी प्राप्त झालेली आहे.

५) सन २००७-०८ च्या अहवाल वर्षात सूत गिरणीने एकूण ३५९९६० किलोचे एकूण सूत उत्पादन घेतलेले आहे. तर त्यापैकी ३५९७१० किलो सूताची विक्री बाजारपेठेत केलेली आहे. विक्री केलेल्या सूतापासून सूत गिरणीला २९१९९४४ लाख रूपये मिळालेले आहेत.

## सारांश

शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीने फक्त ५ वर्षात सूताची विक्री केलेली आहे. तसेच ही सूत विक्री उपल्याच देशात केलेली आढळते. तसेच २००३-०४, २००४-०५, २००५-०६, २००६-०७-२००८-०९, २००९-१०, २०१०-११ या अहवाल वर्षात सूत गिरणीने सूताची विक्री केलेली नाही असे आढळते. या सूत गिरणीने सूतांची आजपर्यंत  निर्यात देखील केलेली नाही. सूत गिरणी तोट्यात असल्याने सध्या आजारी आवस्थेत आहे.

**४.२.६:- शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज :- रोजगार :-**

भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शिवाय वाढती लोकसंख्या असल्यामुळे त्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असते. प्रचलीत वेतनदरावर ज्याची काम करण्याची इच्छा आहे अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्यच समजले जाते. रोजगार निर्मितीत सहकारी सूत गिरण्यांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली आहे. या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे.  महाराष्ट्र राज्यात सहकारी सूत गिरण्यांमुळे १० लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे.

शरद शेतकरी  सहकारी सूत गिरणी स्थापना करीत असताना माजी आमदार बाबुरावअण्णा चाकोते यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा हे उद्दिष्ट ठेवलेले होते. त्यानुसार ग्रामीण भागात सूत गिरणी सुरू केलेली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत रोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून सूत गिरणीने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व समाजातील दुर्बल घटकांना, बेरोजगारांना सतत रोजगार मिळत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या स्थापनेत उत्पादन वाढ व ग्रामीण विकास या उद्देशावरून नान्नजच्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त करून देणे व त्या भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश यशस्वी होत आहे.

सन १९९० मध्ये शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. प्रत्यक्ष सूत गिरणी २००१ पासून सुरू झाली. मार्च २००१ पासून ४०३२ चात्यावर सूत गिरणीत सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. सन २००१-२००२ मध्ये एकूण दैनंदिन काम करणाऱ्या कामगारांची संख्या १०० होती. आज संख्या ४०० वर गेल्याचे आढळते. सन २००१-२००२ पासून सन २०१०-२०११ पर्यंत कामगारांच्या संख्येत वाढ होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक ४.३.४ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमाक ४.३.५**

**शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार**

**(सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११)**

| वर्ष | कामगारांची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | १०० |
| २००२-२००३ | १२० |
| २००३-२००४ | १६० |
| २००४-२००५ | २०० |
| २००५-२००६ | २६० |
| २००६-२००७ | ४०० |
| २०१०-२०११ | ४०० |

**आधार :-** शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील आकडेवारी वरून असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये कामगारांची संख्या १०० होती. त्यानंतर सन २०१०-२०११ मध्ये कामगारांची संख्या ४०० इतकी झाली. याचाच अर्थ असा होतो की, या सात वर्षात कामगार संख्येत वाढ झालेली आढळते. तसेच सूत गिरणीतील प्रत्यक्ष कामगार संख्येत वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरणी मुळे परिसरातील १००० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले.

स्पिनिंग विभागात काही उपविभाग आहेत. त्यातील कामगारांची संख्या ही डिसेंबर २०११ ची आहे.

**तक्ता क्रमांक ४.३.६**
**स्पिनिंग विभागातील कामगार संख्या**

| **अ. क्र.** | **विभाग** | **कायमची कामगार संख्या** | **बदली कामगार संख्या** |
|---|---|---|---|
| **६.** | स्पीड फ्रेम (कारडींग, ब्लोरूम) | ९० | १० |
| **७.** | रिंग फ्रेम | १२० | ८० |
| **८.** | वायडींग (एस.क्यू.सी., पॅकींग) | १३० | २० |
| **९.** | मेन्टनन्स (जनरल आणि वाचमन) | ४५ | ३० |
| **१०.** | कार्यालय | १५ | |
| | **एकूण** | **४००** | **१४०** |

**आधार :-** शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, स्पिनिंग विभागात चार उपविभाग आहेत. वरील विभागापैकी रिंग विभागात कायम व बदली कामगार या दोहोंची संख्या १०० इतकी आहे. तसेच स्पीड व मेन्टनन्स या विभागात कामगारांची संख्या १३५ आहे. एकुण कामगारांची संख्या पाहिली तर कायम कामगारांची संख्या अधिक असल्याचे दिसते. तसेच वरील तक्त्यात कार्यालयातील १५ कर्मचाऱ्यांचा संख्येचा देखील उल्लेख आहे. यावरून सूत गिरणी मधील कायम कामगारांची संख्या ४०० तर बदली कामगारांची संख्या १४० आहे. स्पिनिंग विभागात एकूण कामगारांची संख्या ५४० इतकी आहे. सूत गिरणीतील उत्पादन सध्या ८३.५२ चात्यावर सुरू आहे.

**४.३.७ शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी मधील स्पिनिंग विभागातील कामाचे स्वरूप :-**

सूत गिरणीमध्ये कामाच्या तीन पाळ्या चालतात. यामध्ये त्यांच्या वेळा खालील प्रमाणे सांगता येतात.

१) पहिली पाळी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत.
२) दुसरी पाळी दुपारी ४.०० ते सायंकाळी १२.०० पर्यंत.
३) तिसरी पाळी रात्री १२.०० ते सकाळी ८.०० पर्यंत.

वरील प्रमाणे कामगार तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

कापसापासून सूत तयार करण्यासाठी निरनिराळ्या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानुसार सूत गिरणीतील स्पिनिंग विभाग हा महत्वाचा आहे. त्याची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रथमत: गोडाऊन मधून कापूस मिक्सिंग विभागात येतो तेथून मिक्सिंग केल्यानंतर ब्लोरूम विभागात पिंजणी करण्याचे कार्य केले जाते. पुढे कारडिंग विभागात आल्यानंतर तेथे नको असलेला कचरा काढून स्वच्छ केले जाते. नंतर पुढे स्पीडप्रेम मध्ये वात तयार होते. पुढे गेल्यावर त्या वातीचे बारीक दोरा सूत तयार होते.

तसेच पुढे जाऊन वायडींग विभागामध्ये चांगले सूत तयार होते. नंतर हे चांगले तयार झालेले सूत पॅकिंग विभागात पाठविले जाते. तेथे पॅकिंग झाल्यानंतर सूताची विक्री करण्यासाठी ते सूत बाजारपेठेत पाठविले जाते. अशाप्रकारे कापसापासून सूत तयार होईपर्यंतची प्रक्रिया सूत गिरणीमध्ये केली जाते. तसेच स्पिनिंग विभागातील जी यंत्र सामुग्री वापरली जाते त्यांची दुरूस्ती व त्यांची व्यवस्था पाहण्याचे कार्य मेन्टेनन्स विभागाकडून केले जाते. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामाचे स्वरूप आहे. या ठिकाणी सूत तयार होण्याच्या व कामाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ४.३.८ शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीतील वेतन पद्धती :-

कामगारांच्या प्राप्तीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वेतनाचा किंवा मजूरीचा उल्लेख केला जातो. कामगाराला किंवा श्रमिकाला उत्पादन कार्यात त्याच्या श्रमशक्तीचा वापर केल्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला वेतन असे म्हणतात. यामध्ये शारिरीक व बौद्धीक, कुशल व अकुशल अशा सर्व श्रमांचा समावेश होतो. वेतन तासाच्या दरात, दिवसाप्रमाणे, महिन्याप्रमाणे व वस्तूच्या किंवा दोन्ही मिळून दिले जाते.

कित्येकदा वेतन काम केलेल्या कालाप्रमाणे दिले जाते. यास कालानुसार वेतन म्हणतात. तर कित्येकदा वेतन कामगारांने केलेल्या कामाप्रमाणे म्हणजे उत्पादनाप्रमाणे दिले जाते. तर कधी कधी वेतन अमुक काम झाल्यावर दिले जाते त्यास ठेक्याप्रमाणे वेतन म्हणता येईल.

वरील प्रकारापैकी शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कालाप्रमाणे वेतन दिले जाते. अर्थात यासाठी आठ तासांची पाळी नेमून दिलेली आहे. त्याप्रमाणे कामारांना हुद्यानुसार वेतन दिले जाते. वेतन निश्चिती मुंबई वेतन मंडळ करते. त्याची अंमलबजावणी सूत गिरणी आपल्या कामगारांच्या बाबतीत करते. सूत गिरणीतील कामगारांना वेतन महिन्याला दिले जाते. प्रत्येक महिन्यातील १० तारखेस कामगारांना वेतन दिले जाते. हे अनुसूचितील प्रश्नाच्या उत्तरावरून आढळून आले.

## सारांश

शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी अनेक कारणाने आजारी अवस्थेत आहे. अकार्यक्षम व्यवस्थापन, कुशल कामगारांचा अभाव, सक्षम नेवृत्वाचा अभाव इत्यादी अनेक कारणाने सूत गिरणी तोट्यात आलेली आहे.

## ४.४ महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीचा पूर्व

### ४.४.१ इतिहास :-

मोहोळ तालुक्यातील तरूणांना व समाजातील मागासवर्गीय दारिद्रयरेषेखालील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी दि. १८ मे १९८७ या दिवशी महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी स्टार्च उद्योग ही संस्था स्थापन केली. सदरील संस्थेत दररोज १००० टन मका प्रोसेसिंग करून स्टार्च पावडर व पशुखाद्य तयार करणे, त्याच बरोबर डेस्ट्रेन व ग्लुकोज पावडर निर्मिती करणे हे संस्थेचे उद्दिष्ट होते.

शेतीत ऊस हे पिक वर्षाला एकदाच येते. परंतू मक्याचे (पिके) उत्पादन ९० ते १२० दिवसात होते. म्हणजे वर्षातून ३ वेळा मक्याचे उत्पादन (पिक) घेणे शक्य आहे. मक्याचे उत्पादन ऊसामध्ये देखील मिश्र पिक म्हणून घेतले जाते. तसेच मोहोळ तालुक्यातून उजनीचा उजवा कालवा गेल्यामुळे सिंचनाचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मक्याचे उत्पादन घेणे शक्य होते. मक्याच्या पिकामुळे (उत्पादनामुळे) शेतकऱ्यांना उत्पन्न देखील मिळेल या हेतूने प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी या सहकारी संस्थेची स्थापना करून स्टार्च प्रकल्पाची उभारणी केली. परंतु सन १९९१ पासून जागतिकीकरणास सुरूवात झाली. वस्त्रोद्योग (कापड) उद्योगात जागतिक क्रांती झाली. रेऑन, पॉलिस्टर सारखे कापड मोठया प्रमाणात उत्पादन होऊन अल्पदरामध्ये ग्राहकांना उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे ग्राहक सूती कापड वापरापासून दूर गेला. तसेच सूती कापड रेऑन व पॉलिस्टर कापडापेक्षा महाग असल्याने सूती कापडाचा वापर कमी झाल्याने सूती कापडास आवश्यक असणारी स्टार्च पावडरची मागणी कमी झाली. स्टार्च पावडर बाजारपेठेतून हद्दपार झाली. त्यामुळे स्टार्च प्रकल्प उभारणी धोक्यात आली असल्याने शासनाने वरील स्थिती मुळे स्टार्च प्रकल्प उभारणीस आर्थिक साहाय्य देण्यास असमर्थता दर्शविली असल्याने ७४८३ इतके दारिद्र्यरेषे खालील अनुसूचित जातीच्या लाभार्थी सभासदाचे जीवनमान उंचावण्यासाठी उभारावयाचा प्रकल्प धोक्यात आला. म्हणून याच नावाने सूत गिरणीची स्थापना करण्यात आलेली आहे. स्टार्च कारखान्याचे भाग भांडवल देखील महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीत विलिन केलेले आहे.

### ४.४.२ स्थापना :-

सोलापूर जिल्ह्यात कापसाचे उत्पादन चांगले होत असल्याने सूत गिरणी स्थापन केल्याने रोजगार उपलब्ध होऊन त्या भागाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल हे उद्दिष्ट ठेऊन प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी मोहोळ तालुक्यतील मौजे वाघोली येथे अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांना एकत्रित करून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी व कार्यक्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने

सहकारी तत्वावर दि. २४ डिसेंबर १९९३ रोजी महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नियमित शारदा नगर, वाघोली, ता. मोहोळ या नावाने सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. अयशस्वी झालेल्या स्टार्च कारखान्याचे भाग भांडवल या सहकारी सूत गिरणीत विलीन केले. या सूत गिरणीची साईट सोलापूर मंगळवेढा रोडवर सोलापूर शहरापासून २६ कि.मी. व मंगवेढयापासून २५ कि.मी. अंतरावर आहे. मोहोळ पासून २७ कि.मी. अंतरावर आहे. सूत गिरणीची एकूण २११.५ एकर इतकी जमीन आहे. वाघोली येथील गट क्र. ७१(अ) २० हेक्टर ही शासकीय जमीन शासनाने सूत गिरणीला (कडे) वर्ग केलेली आहे. याच जमीनीवर गट क्र. ७१ (अ) मध्ये सूत गिरणीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे.

सन १९९३ मध्ये नोंदणी झालेल्या या सूत गिरणीचे उत्पादन पहिल्या टप्प्यात ८००० (आठ हजार) चात्यावर दि. १२/१२/२००० पासून चाचणी उत्पादन व दि. १/३/०१ पासून व्यापारी उत्पादन सुरू झाले. आज २०११ अखेर २२१७६ चात्यावर सूताचे उत्पादन घेतले जात आहे. सूत गिरणीचा प्रकल्प एकूण २५२०० चात्यांचा आहे.

### ४.४.३ महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीची सभासद संख्या व भाग भांडवल :-

महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीचा प्रकल्प एकूण २५२०० चात्यांचा आहे. त्याची प्रकल्प किंमत ५१ कोटी ६४ लाख रूपये इतकी आहे. सूत गिरणीच्या भाग भांडवला मध्ये सभासदाचे भागभांडवल, स्थिर भांडवल, खेळते भांडवल व शासकीय भांडवल या चारही भांडवलांचा समावेश करावा लागतो. तसेच कर्ज हा भांडवल उभारणीचा महत्वाचा मार्ग आहे. त्यामुळे कर्जाचा देखील समावेश भांडवला मध्ये केलेला आहे.

महात्मा फुले सूत गिरणी ही मागासवर्गीय सूत गिरणी आहे. या सूत गिरणीचे ९४ टक्के सभासद अनुसूचित जाती जमातीचे आहेत. मागासवर्गीय सभासदांच्या सूत गिरण्यांना कोणत्याही बँका अथवा अर्थिक वित्तीय संस्था दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यास तयार नसतात. यावर उपाय म्हणून अनुसूचित जाती जमातीच्या सूत गिरण्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण विभागाकडून अशा सूत गिरण्यांना विशेष घटक योजनेखाली दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्याची योजना आहे. या योजनेनुसार महात्मा फुले अनुसूचित जाती जमातीच्या सूत गिरणीला विशेष घटक योजनेखाली दीर्घ मुदतीचे कर्ज प्रत्येक वर्षी मंजूर झालेले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील शासकीय भांडवल दिलेले आहे. सूत गिरणीने सभासदांकडून देखील भागभांडवल उभारलेले आहे.

महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहाकरी सूत गिरणीने भांडवल उभारणी करीत असताना ५ टक्के सभासदांचा हिस्सा ४५ टक्के शासनाचा हिस्सा व ५० टक्के कर्ज समाज कल्याण विभागाच्या विशेष घटक योजनेतून उभारले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादीत मुंबई यांच्या सुधारीत प्रकल्प अहवाला प्रमाणे ५१ कोटी ६४ लाख रुपये भांडवल उभारणे आवश्यक आहे. हे भांडवल २५२०० चात्याकरीता आवश्यक आहे.

सूत गिरणीने ३१ मार्च २०११ अखेर महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योगाच्या नियमाप्रमाणे सभासदांच्या ५ टक्के भाग भांडवलाची उभारणी केलेली आहे.

प्रकल्प अहवालाप्रमाणे प्रकल्प खर्चाची उभारणी ही सभासद व शासकीय भागभांडवल यांचे १:९ या प्रमाणे भागभांडवलाची उभारणी केलेली आहे. तसेच भागभांडवल व कर्ज यांची उभारणी १:१ याप्रमाणे केलेली आहे. सदर प्रकल्प अहवाल खर्च रू. ५१ कोटी ६४ लाख याप्रमाणे सूत गिरणीने रू. २५८.०० लाख सभासद भागभांडवल जमा करणे आवश्यक होते. ३१ मार्च २०११ अखेर रू. २५८.२९ लाख सभासद भाग भांडवल जमा केलेले आहे. म्हणजे शासनाच्या नियमा प्रमाणे सभासद भागभांडवल पूर्ण जमा केलेले आहे.

सूत गिरणीला शासकीय भागभांडवल ४५ टक्के हिस्सा याप्रमाणे नोंदणी नंतर सन १९९४ मध्ये ८ कोटी १८ लाख रुपये मिळाले होते. पुढे प्रत्येक वर्षी शासकीय भांडवल मिळत आहे. सूत गिरणीला महाराष्ट्र शासनाने शासकीय भांडवल म्हणून आतापर्यंत म्हणजेच ३१ मार्च २०११ पर्यंत २३ कोटी २३ लाख ६२ हजार रूपये इतके शासकीय भांडवल दिलेले आहे.

तसेच विशेष घटक योजने अंतर्गत समाज कल्याण विभागाकडून दीर्घ मुदतीचे कर्ज म्हणून २५ कोटी ८२ लाख ६२ हजार रूपये मिळालेले आहेत. या माध्यमातून सूत गिरणीने भांडवलांची उभारणी करीत मार्च २००१ पासून ८०६४ चात्यावरून सूताचे उत्पादन कार्य चालू केले. मार्च २०११ अखेर २२१७६ चात्यावर सूताचे उत्पादन चालू आहे. सूत गिरणीला सद्या शासनाकडून आणखी ३ कोटी शासकीय भाग भांडवल व २ कोटी ८९ लाख रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्ज मिळणे बाकी आहे. हे कर्ज व भागभांडवल मिळताच सूत गिरणी २५२०० चाते बसवून पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालू होऊन उत्पादन कार्याचा वेग वाढणार आहे.

सूत गिरणीने सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल व दीर्घ मुदतीचे कर्ज यामधून जमीन खरेदी करून भव्य अशी इमारत उभी केली आहे. अद्यावत मशिनरी बसविली, चात्याकरीता आवश्यक असणारी बँक प्रोसेस मशिनरी पूर्णपणे स्थापित करून व अत्याधूनिक प्रयोगशाळेत उपकरणे बसवून

विविध सूत काऊंटचे उत्पादन सुरू केले आहे. सूत गिरणीच्या २११ एकरच्या मोकळया जमिनीवर चिंच, आवळा, नारळ, आंबा, चिकू, बोर, लिंबू अशा अनेक फळ झाडांची लागवड केलेली आहे. त्यामुळे नैसर्गिक समतोल राखला जात आहे. शिवाय सूत गिरणीच्या परिसराला फळ झाडामुळे चांगल्या प्रकारची शोभा आली आहे.

**४.४.४ महात्मा फुले अनुसूचीत जाती-जमाती शेतकरी सहकारी गिरणी :- सूत उत्पादन :-**

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रामुख्याने चार उत्पादन घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन यांचा समावेश होतो. विशेषतः ज्या नैसर्गिक मानवी साधनांचे उत्पादन प्रक्रियेला सहाय्य होते. त्या साधनांना उत्पादनाचे घटक असे म्हणतात. वास्तविक पाहता उत्पादनाच्या क्रियेला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. जमीन, इमारत, कच्चामाल, इंधन, श्रम, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन इत्यादी अनेक वेळा उत्पादन क्रियेसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या खूपच मोठी असते. या सर्वांना आदान (Input) असे म्हणतात. परंतू अर्थ शास्त्रज्ञांनी आपल्या सोईसाठी सर्व आदानांचे चार गट पाडले आहेत. भूमी, श्रम, भांडवल, संयोजन यालाच चतुर्विध वर्गिकरण असे म्हणतात. आज कोणतेही उत्पादन करायचे झाल्यास या चार घटकांची आवश्यकता आहे. पूर्वी उत्पादनाचे दोनच घटक मानले जात होते. परंतू भांडवलाचे महत्व वाढत गेल्याने उत्पादनाचा तो एक स्वतंत्र घटक बनला. तसेच श्रम करणारे मजूर व उत्पादनाची जोखीम स्विकारणारा संयोजक यातही फरक केला गेला. उत्पादनाचे हे चार घटक एकत्र येऊन निर्माण होणारे फलित म्हणजे उत्पादन होय. सर्व अर्थिक घडामोडींचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे उपभोग होय. मात्र त्यासाठी उत्पादन व विनिमय या प्रक्रिया फार महत्वाच्या असतात. त्यामुळे उत्पादन हे अरंभस्थानी असणारा बिंदू धरला तर अंतिम बिंदू उपभोग होय. महात्मा फुले सूत गिरणीच्या भांडवलाचा आढावा घेतल्यानंतर उत्पादन या महत्वाच्या घटकाकडे आपोआप लक्ष वेधले जाते. कारण कोटयावधी रूपयांची उलाढाल केल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होणार ही मानवाची सहज प्रवृत्ती असते. तर निष्पन्न झालेले उत्पादन फायदेशिर की, तोटयाचे होते ते पाहणे देखिल संयोजकाचे (व्यवस्थापनेचे) कर्तव्यच असते. निर्मित उत्पादन कोणत्या किमतीला मिळते ते पाहणे हे ग्राहकांचे देखील कर्तव्यच असते.

महात्मा फुले अनुसूचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने माहे मार्च २००१ पासून व्यापारी सूत उत्पादनास सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, ३०, ३४,३८,४० सिंगल कोंम्बड- कार्डेड आणि होजिअरी विव्हिंग सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीची प्रगती पाहत असताना सूत उत्पादनातील चढउतार पाहणे अधिक योग्य व महत्वाचे ठरते. महात्मा फुले अनुसूचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी मध्ये सन २००१-२००२ ते सन

२०१०-२०११ या काळात किती सूताचे उत्पादन केले आहे. त्याचा तपशील तक्ता. क्र. ४.४.१ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ४.४.१**

**महात्मा फुले अनुसूचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील सूत उत्पादन**


**(सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११)**

| **अ. क्र.** | **वर्ष** | **सूत उत्पादन प्रति चाती (ग्रॅम)** | **सूत उत्पादनाची किंमत (लाख रूपये)** | **सूताचा सरासरी उतारा टक्केवारी कार्डेड वार्प/ होजिअरी कोम्बड धरुन** |
|---|---|---|---|---|
| **१.** | २००१ ते २००२ | १८५ | १५७०.०१ | ७२ |
| **२.** | २००२ ते २००३ | १७९ | १७७३.०३ | ७५ |
| **३.** | २००३ ते २००४ | १६९ | २४४०.७२ | ७७ |
| **४.** | २००४ ते २००५ | १७० | १९३२.२९ | ७६.८६ |
| **५.** | २००५ ते २००६ | १३० | १८६३.४९ | ७२.२५ |
| **६.** | २००६ ते २००७ | १३१ | २०२५.४२ | ७४.९१ |
| **७.** | २००७ ते २००८ | १२४ | १३८३.१२ | ७५.२४ कार्डेड<br>८५.०१ कार्डेड<br>६९.५९ कोंम्बड |
| **८.** | २००८-०९ | ११९ | २०९८.०९ | ८५.६७ |
| **९.** | २००९-१० | १०० | २०८६.०५ | ८१.३९ |
| **१०.** | २०१०-११ | ९९ | २८४३.६२ | ७८.७१ |
| | **एकूण :-** | **१४०६** | **२००१५.८४** | **९२१.६३** |

**आधार :-** महात्मा फुले सूत गिरणीचा वार्षिक अहवालानूसार

आलेख क्र. ८

**सूत उत्पादन प्रति चाती (ग्रॅम)**




**आधार :— तक्ता क्रमांक ४.४.१**

वरील तक्ता क्रमांक ४.४.१ वरून असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये सूताचे प्रतिचाती उत्पादन १८५ ग्रॅम्स झालेले होते. नंतर मात्र प्रति चाती सूत उत्पादन घटत गेलेले आहे. सन २००१ ते २०११ या दहा वर्षात सूत उत्पादन प्रति चाती १७० ग्रॅम्स झालेले दिसून येते. परंतू सन २००५ ते २००८ या काळात प्रति चाती सूत उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे आढळून येते. पहिल्य तीन वर्षात मशिनरी नविन असल्याने सूत उत्पादन प्रति चाती वाढलेले आहे. एकंदरीत एकूण दहा वर्षाचा उत्पादनाच्या बाबतीत विचार केला असता त्यामध्ये चढ उतार अधिक जाणवतात कारण त्या त्या वर्षामध्ये कापसाचा पुरेसा पुरवठा होऊ न शकल्याने चढ उतार दिसून येतात. सन २००१ ते २००२या वर्षात प्रति चाती सूत उत्पादन १८५ ग्रॅम्स होत होते तर सन २००७-२००८ या वर्षी प्रति चाती सूत उत्पादनात मोठया प्रमाणात घट होऊन प्रति चाती सूत उत्पादन १९९ ग्रॅम्स झालेले दिसून येते ही घट होण्यास कापसाचा अपूरा पुरवठा खेळत्या भांडवलाचा अभाव नवीन यंत्रसामुग्री वेळेवर न येणे उत्पादन क्षमतेचा अपूरा वापर इत्यादी कारणे कारणीभूत ठरतात. विशेषतः सूत उत्पादन, किंमतीत देखील चढ-उतार झाल्याचे दिसते. सन २००२-२००३ मध्ये सूताची किंमत १७७३.०३ लाख रूपये होती. तिच्यात थोडाफार चढ उतार आहे. तर सन २००३-२००४ मध्ये या सूत उत्पादनाची २४४०.७२ लाख इतकी आहे. सन २००४-२००५ या वर्षात उत्पादन किंमत रू. १९३२.२९ लाख झालेली दिसून येते. सन २००५-२००६ या वर्षात सूत उत्पादन किंमत १८६३.४९ लाख व सन २००६-२००७ या वर्षात रू. २०२५.४२ लाखाचे सूत उत्पादन झालेले आहे. मात्र सन २००७-२००८ या वर्षी मात्र सूत उत्पादनाची किंमत घटून रू. १३८३.१२ लाख इतक्या किंमतीचे सूत

उत्पादन झालेले आढळते. सन २००९-१० मध्ये सूत उत्पादन प्रति चाती १०० ग्रॅम्स झालेले तसेच २०१०-११ मध्ये प्रती चाती सूत उत्पादन ९९ गॅम्स तर त्या सूत उत्पादनाची किंमत रु २८४३.६२ लाख इतके आहे. १० वर्षामध्ये एकूण सूत उत्पादनाची किंमत २००१५.८४ लाख रुपयाचे सूत उत्पादन आहे. उत्पादन घटण्यास सूताची बाजारातील मंदी, निर्यात धोरण, गुणवत्ता अशी अनेक कारणे कारणीभूत ठरतात.

वरील तक्त्यावरून सूताचा सरासरी उतारा टक्केवारीत असे दिसून येते की, सरासरी चाती सूत उत्पादन १ ते २ टक्क्यांच्या फरकाने स्थिर आहे असे दिसते. सरासरी सूताचा उतारा ७२ टक्के ते ७८ टक्के या दरम्यान आहे. सन २००१ ते २०११ या दहा वर्षाच्या अभ्यासात सरासरी सूताच्या उताऱ्यात मोठा चढ उतार दिसत नाही. सूत उत्पादनाचा सरासरी उतारा पाहत असताना यामध्ये कार्डेड वार्प/ कार्डेड होजिअरी /कोम्बड होजिअरी या सूताचे उत्पादन सूत गिरणीत होते. वरील तक्त्या वरून असे दिसून येते. सूताच्या सरासरी उतारा टक्केवारीत कार्डेड या सूताचा उतारा २०१०-२०११ या वर्षात ८५.०१ टक्के आहे. तर कोम्बड होजिअरी या सूताचा उतारा ६९.५९ आहे. म्हणजेच कार्डेड होजिअरी व कोम्बड सूताच्या उत्पादन टक्केवारीत वाढ झाल्याचे आढळून आले.

## सारांश

महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीत सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११ या काळात सूताचे प्रतिचाती प्रमाणे एकूण उत्पादन १४०६ ग्रॅम्स झाले असून त्याची याच काळातील एकूण किंमत २००१५.८४ लाख रूपये झाल्याचे दिसून येते तर सूताचा सरासरी उतारा ७८ टक्के असल्याचे आढळते.

### ४.४.५ महात्मा फूले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी :- सूत विक्री :-

महात्मा फुले सूतगिरणी मध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने व्यापारी उत्पादनास माहे मार्च २००१ पासून सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, २४, २६, ३०, ३२, ३४, ३८, ४० सिंगल कोम्बड, कार्डेड होजिअरी व विव्हिंग सूताचे उत्पादन होते. अशा वरील विविध सूत काऊंटचे उत्पादन केले जाते. परंतू या तयार झालेल्या सूताला योग्य बाजारपेठ प्राप्त करणे स्पर्धेमुळे कठीण होऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सूताची विक्री वाढवायची असेल तर त्यासाठी उत्पादन खर्च कमी करून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. तसेच सूताचा दर्जा व गुणवत्ता चांगली असली पाहिजे तरच सूताला वाढती मागणी येऊ शकेल. अन्यथा सूत गिरणी सतत आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सूत गिरणीने अत्याधूनिक प्रयोगशाळेत आधुनिक उपकरणे बसवून विविध काऊंटच्या सूत उत्पादनास सुरूवात केलेली आहे. सूतगिरणीमध्ये कच्च्या कापसापासून सूत निर्मिती करण्यात येते. निर्यातक्षम व उच्च गुणवत्ता असलेले सूत तयार करण्यासाठी कच्च्या कापसापासून

सूत निर्मिती पर्यंत वेगवेगळ्या घटकांची तपासणी करण्यासाठी परदेशी बनावटीची अद्यावत उपकरणे तसेच सूत गिरणीने सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा उभी केली आहे. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे आणि निर्यातक्षम सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. यामुळेच सूतगिरणीने आवघ्या ४ ते ५ वर्षात स्थानिक बाजारपेठेत म्हणजेच भारतीय बाजारपेठेत आणि विदेशात बांगला देश, चीन, पाकिस्थान, दक्षिण कोरीया, उत्तर कोरीया, मलेशिया आदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

सूत गिरणीतील सूताच्या विक्रीसाठी निरनिराळया ठिकाणचे व्यापारी, एजंन्ट, दलाल, कारखानदार स्वतः सूत गिरणीत येतात. सूताच्या दर्जाविषयी किंमती विषयी, चर्चा व्यापारी व्यवस्थापनाशी करून किंमत निश्चिती करतात. शिवाय काही व्यापारी व कारखानदार त्यांना ज्या दर्जाचे काऊंटचे सूत हवे आहे त्याचे नमुने आणतात. त्याप्रमाणे सूताची मागणी करतात तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन व्यवस्थापन व संचालक मंडळ सूत उत्पादन मागणी आणि जास्त किंमत मिळवून देणाऱ्या सूताचे उत्पादन करण्यास व्यवस्थापक मंडळास सांगतात. थोडक्यात सूत विक्रीचे सर्व निर्णय व्यवस्थापक व संचालक मंडळ घेते. स्थानिक बाजारपेठेत प्रत्यक्षरित्या सूताची विक्री विक्रीदात्याकडून केली जाते. तसेच सूत गिरणीतर्फे एजन्ट विविध राज्यात नियुक्त केलेले आहेत. तसेच विदेशात देखील मोठया प्रमाणात सूताची निर्यात केली जाते.

**महात्मा फुले सूत गिरणीने स्थानिक भारतीय बाजारपेठेत व विदेशात केलेली सूताची विक्री तक्ता क्रमांक ४.४.२ मध्ये दर्शविली आहे. (सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११)**

**तक्ता क्रमांक ४.४.२**


| **अ. क्र.** | **वर्ष** | **स्थानिक बाजारात सूताची विक्री (रू. लाखात)** | **विदेशात सूताची निर्यात (रू. लाखात)** | **एकूण सूताची विक्री (रू. लाखात)** |
|---|---|---|---|---|
| **१.** | २००१-०२ | ८५०.११ | ७८९.०५ | १५८२.२१ |
| **२.** | २००२ ते २००३ | ९१०.१३ | ८५४.०७ | १७६४.२० |
| **३.** | २००३ ते २००४ | ११९५.८९ | ११४३.८२ | २३३९.७१ |
| **४.** | २००४ ते २००५ | १०७६.५९ | ९६६.६२ | २०४३.२१ |
| **५.** | २००५ ते २००६ | १५५५.६१ | ३०९.६० | १८६५.२१ |
| **६.** | २००६ ते २००७ | १९४९.०० | ६३.४२ | २०१२.४२ |
| **७.** | २००७ ते २००८ | २०४६.४९ | ३३.९३ | २०८०.४२ |
| **८.** | २००८-०९ | २०४०.१२ | ३४.०० | २१५० |
| **९.** | २००९-१० | २११३.१० | ६३.२० | २२१५ |
| **१०.** | २०१०-११ | ३२१२.१४ | ७४.१८ | २४५१ |
| | **एकूण :-** | **१६०९९.०७** | **३५४२.८४** | **१८८२१.१७** |

**आधार :-** महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीचे सन २००१ ते २०११ चे वार्षिक अहवाल.

## आलेख क्र. ९

**स्थानिक बाजारात सूताची विक्री**

**(रू. लाखात)**





**आधार :— तक्ता क्रमांक ४.४.२**

## आलेख क्र. १०

**विदेशात सूताची निर्यात**

**(रू. लाखात)**




**आधार :— तक्ता क्रमांक ४.४.२**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सूत विक्रीत चढ उतार झालेले आढळतात. विशेषतः स्थानिक भारतीय बाजार पेठेत सूताच्या विक्रीत वाढ झालेली आहे. मात्र विदेशात सूताच्या होणाऱ्या निर्यातीत घट झालेली आहे.

१) सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठेत सन २००२-२००३ मध्ये ९१०.१३ लाखांची सूत विक्री केली आहे. तसेच ८५४.७ लाखाची विदेशात सूताची निर्यात केली आहे. एकूण सूताची विक्री १७६४.२० लाख करण्यात आली आहे.

२) सन २००३-२००४ मध्ये सूत गिरणीने ११९५.८९ लाखाची सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच ११४३.८२ लाख विदेशात सूताची निर्यात केलेली आहे. सदर वर्षात एकूण रू. २३३९.११ लाखाची सूत विक्री झाल्याचे आढळते.

३) सन २००४-२००५ मध्ये सूतगिरणीने रू. १०७६.५९ लाख सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच ९६६.६२ लाख रू. विदेशात सूताची निर्यात केलेली आहे. सदर वर्षात एकूण रू. २०४३.२१ लाखांची सूत विक्री केलेली आहे.

४) सन २००५-२००६ मध्ये सूत गिरणीने रू. १५५५.६१ लाखांची सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच रू. ३०९.६० लाखाची विदेशात सूताची निर्यात केलेली आढळते. सदर वर्षात एकूण रू. १८६५.२१ लाखाची सूत विक्री करण्यात आली.

५) सन २००६-२००७ मध्ये सूत गिरणीने रू. १९४९.०० लाखांची सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच रू. ६३.४२ लाखांची सूताची विदेशात निर्यात केल्याचे आढळते. सदर वर्षात एकूण रू. २०१३.०० लाखांची सूत विक्री केल्याचे आढळते.

६) सन २००७-२००८ मध्ये सूत गिरणीने रू. २०४६.४९ लाखांची सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच रू. ३३.९३ लाखांच्या सूताची विदेशात निर्यात केल्याचे आढळते. सदर वर्षात रू. २०८०.४२ लाख रूपयांची सूत विक्री झाल्याचे आढळते.

७) सन २०१०-२०११ मध्ये सूत गिरणीने रू. ३२१२.१४ लाखांची सूत विक्री स्थानिक बाजारात तसेच रू. ७४.१८ लाखांच्या सूताची विदेशात निर्यात केल्याचे आढळते. सदर वर्षात रू. २४५१ लाख रूपयांची सूत विक्री झाल्याचे आढळते.

वरील अभ्यासावरून असे दिसून येते की, सूत विक्रीत चढ उतार झालेली आहे. सूत गिरणीने स्थानिक बाजारपेठेत सूताची विक्री, महाराष्ट्रात, इचलकरंजी, नागपूर, सोलापूर, मुंबई, नाशिक येथे तसेच गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश या राज्यात केल्याचे आढळते. तसेच सूताची निर्यात विदेशामध्ये बांगलादेश,

चीन, पाकिस्थान, श्रीलंका, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, मलेशिया, आदी देशात रू. ३३ कोटी रूपयापेक्षा अधिक सूतांची निर्यात केलेली आढळते.

## सारांश

सूत गिरणीने सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११ या काळात एकूण स्थानिक बाजारपेठेत १६०९९.०७ लाख रूपयांची सूताची विक्री केली तर विदेशात सदर कालावधीत एकूण ३५४२.८४ लाख रूपयाची सूताची निर्यात केली आहे. स्थानिक बाजारात व विदेशात एकूण १९६४१.९१ लाख रूपयांची सूताची विक्री करण्यात आली.

### ४.४.६ महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी :- रोजगार :-

भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शिवाय वाढती लोकसंख्या असल्यामुळे त्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असते. प्रचलीत वेतनदरावर ज्याची काम करण्याची इच्छा आहे अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्यच समजले जाते. रोजगार निर्मितीत सहकारी सूत गिरण्यांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली आहे. या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे. महाराष्ट्र राज्यात सहकारी सूत गिरण्यांमुळे १० लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे.

महात्मा फुले सूत गिरणी स्थापन करीत असताना प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा हे उद्दिष्ट ठेवलेले होते. त्यानुसार ग्रामीण भागात सूत गिरणी सुरू केलेली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत रोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून सूत गिरणीने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व समाजातील दुर्बल घटकांना, बेरोजगारांना सतत रोजगार मिळत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, महात्मा फुले सूत गिरणीच्या स्थापनेत उत्पादन वाढ व ग्रामीण विकास या उद्देशावरून वाघोलीच्या आसपासच्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त करून देणे व त्या भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश यशस्वी होत आहे.

सन १९९३ मध्ये महात्मा फुले सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. प्रत्यक्ष सूत गिरणी डिसेंबर २००० पासून सुरू झाली. मार्च २००१ पासून ८०४६ चात्यावर सूत गिरणीत सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. सन २००१-२००२ मध्ये एकूण दैनंदिन काम करणाऱ्या कामगारांची संख्या २५० होती. आज संख्या ५४० वर गेल्याचे आढळते. सन २००१-२००२ पासून सन २०१०-२०११ पर्यंत कामगारांच्या संख्येत वाढ होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक ४.४.३ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमाक ४.४.३**

**महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील रोजगार**

**(सन २००१-२००२ ते सन २०१०-२०११)**

| **वर्ष** | **कामगारांची संख्या** |
|---|---|
| **२००१-२००२** | **२००** |
| **२००२-२००३** | **२५०** |
| **२००३-२००४** | **२७५** |
| **२००४-२००५** | **३००** |
| **२००५-२००६** | **४००** |
| **२००६-२००७** | **५००** |
| **२००७-२००८** | **५४०** |
| **२००८-०९** | **५६२** |
| **२००९-१०** | **५८५** |
| **२०१०-११** | **६१०** |

**आधार :-** महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील आकडेवारी वरून असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये कामगारांची संख्या २०० होती. त्यानंतर सन २०१०-२०११ मध्ये कामगारांची संख्या ६१० इतकी झाली. याचाच अर्थ असा होतो की, या दहा वर्षात कामगार संख्येत वाढ झालेली आढळते. तसेच सूत गिरणीतील प्रत्यक्ष कामगार संख्येत वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरणी मुळे परिसरातील ३००० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले.

स्पिनिंग विभागात काही उपविभाग आहेत. त्यातील कामगारांची संख्या ही डिसेंबर २०११ ची आहे.

**तक्ता क्रमांक ४.४.४**

**महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकारी सहकारी सूत गिरणीतील**

**स्पिनिंग विभागातील कामगार संख्या**

| **अ. क्र.** | **विभाग** | **कायमची कामगार संख्या** | **बदली कामगार संख्या** |
|---|---|---|---|
| **१** | स्पीड फ्रेम (कारडींग, ब्लोरूम) | ९० | १० |
| **२** | रिंग फ्रेम | १८० | १०० |
| **३** | वायडींग (एस.क्यू.सी., पॅकींग) | १३० | २० |
| **४** | मेन्टनन्स (जनरल आणि वाचमन) | ९० | ३० |
| **५** | कार्यालय | ५० | |
| | **एकूण** | **५४०** | **१६०** |

**आधार :-** महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकारी सहकारी सूत गिरणीच्या टाईम विभागाच्या रेकॉर्ड वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, स्पिनिंग विभागात चार उपविभाग आहेत. वरील विभागापैकी रिंग विभागात कायम व बदली कामगार या दोहोंची संख्या २८० इतकी आहे. तसेच स्पीड व मेन्टनन्स या विभागात कामगारांची संख्या २२० आहे. एकूण कामगारांची संख्या पाहिली तर कायम कामगारांची संख्या अधिक असल्याचे दिसते. तसेच वरील तक्त्यात कार्यालयातील ५० कर्मचाऱ्यांच्या संख्येचा देखील उल्लेख आहे. यावरून सूत गिरणी मधील कायम कामगारांची संख्या ५४० तर बदली कामगारांची संख्या १६० आहे. स्पिनिंग विभागात एकूण कामगारांची संख्या ७०० इतकी आहे. सूत गिरणीतील उत्पादन सध्या २२१७६ चात्यावर सुरू आहे. आणखी ५००० चाते बसवून ज्या वेळेस सूत गिरणी २५२०० चात्यावर उत्पादन पूर्ण कार्यक्षमतेने सुरू होईल त्यावेळेस आणखी काही लांकांना रोजगार उपलब्ध होऊन कामगार संख्येत वाढ होईल. असे तथ्य संकलनावरून आढळते.

### ४.४.७ महात्मा फुले सूत गिरणी मधील स्पिनिंग विभागातील कामाचे स्वरूप :-

सूत गिरणीमध्ये कामाच्या तीन पाळ्या चालतात. यामध्ये त्यांच्या वेळा खालील प्रमाणे सांगता येतात.

१) पहिली पाळी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत.

२) दुसरी पाळी दुपारी ४.०० ते सायंकाळी १२.०० पर्यंत.

३) तिसरी पाळी रात्री १२.०० ते सकाळी ८.०० पर्यंत.

वरील प्रमाणे कामगार तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

कापसापासून सूत तयार करण्यासाठी निरनिराळ्या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानुसार सूत गिरणीतील स्पिनिंग विभाग हा महत्वाचा आहे. त्याची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रथमतः गोडाऊन मधून कापूस मिक्सिंग विभागात येतो तेथून मिक्सिंग केल्यानंतर ब्लोरूम विभागात पिंजणी करण्याचे कार्य केले जाते. पुढे कारडिंग विभागात आल्यानंतर तेथे नको असलेला कचरा काढून स्वच्छ केले जाते. नंतर पुढे स्पीडप्रेम मध्ये वात तयार होते. पुढे गेल्यावर त्या वातीचे बारीक दोरा सूत तयार होते. तसेच पुढे जाऊन वायडींग विभागामध्ये चांगले सूत तयार होते. नंतर हे चांगले तयार झालेले सूत पॅकिंग विभागात पाठविले जाते. तेथे पॅकिंग झाल्यानंतर सूताची विक्री करण्यासाठी ते सूत बाजारपेठेत पाठविले जाते. अशाप्रकारे कापसापासून सूत तयार होईपर्यंतची प्रक्रिया सूत गिरणीमध्ये केली जाते. तसेच स्पिनिंग विभागातील जी यंत्र सामुग्री वापरली जाते त्यांची दुरूस्ती व त्यांची व्यवस्था पाहण्याचे कार्य मेन्टेनन्स विभागाकडून केले जाते. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामाचे स्वरूप आहे. या ठिकाणी सूत तयार होण्याच्या व कामाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी कामगार संघटना :-**

महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये कामगार - सेवक संघटना असून सूतगिरणी व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राखण्यामध्ये कामगार संघटना महत्वाची भूमिका बजावत असून कामगार-सेवक संघटना प्रतिनिधी अध्यक्ष श्री. आर.के. पाटील, उपाध्यक्ष श्री. सुनिल म्हमाणे, सचिव श्री. नामदेव जगताप व कामगार संघटनेचे इतर सदस्य यांनी नेहमीच सूत गिरणीच्या व्यवस्थापनाशी सहकार्याची भूमिका बजावितात.

**४.४.८ महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीतील वेतन पद्धती :-**

कामगारांच्या प्राप्तीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वेतनाचा किंवा मजूरीचा उल्लेख केला जातो. कामगाराला किंवा श्रमिकाला उत्पादन कार्यात त्याच्या श्रमशक्तीचा वापर केल्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला वेतन असे म्हणतात. यामध्ये शारिरीक व बौद्धीक, कुशल व अकुशल अशा सर्व श्रमांचा समावेश होतो. वेतन तासाच्या दरात, दिवसाप्रमाणे, महिन्याप्रमाणे व वस्तूच्या किंवा दोन्ही मिळून दिले जाते.

कित्येकदा वेतन काम केलेल्या कालाप्रमाणे दिले जाते. यास कालानुसार वेतन म्हणतात. तर कित्येकदा वेतन कामगारांने केलेल्या कामाप्रमाणे म्हणजे उत्पादनाप्रमाणे दिले जाते. तर कधी कधी वेतन अमुक काम झाल्यावर दिले जाते त्यास ठेक्याप्रमाणे वेतन म्हणता येईल.

वरील प्रकारापैकी महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कालाप्रमाणे वेतन दिले जाते. अर्थात यासाठी आठ तासांची पाळी नेमून दिलेली

आहे. त्याप्रमाणे कामगारांना हुद्यानुसार वेतन दिले जाते. वेतन निश्चिती मुंबई वेतन मंडळ करते. त्याची अंमलबजावणी सूत गिरणी आपल्या कामगारांच्या बाबतीत करते. सूत गिरणीतील कामगारांना वेतन महिन्याला दिले जाते. प्रत्येक महिन्यातील १० तारखेस कामगारांना वेतन दिले जाते. हे अनुसूचितील प्रश्नाच्या उत्तरावरून आढळून आले.

**४.४.९ महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या कल्याणकारी योजना :-**

सूत गिरणीच्या विकासामध्ये कामगारांचे योगदान व सहभाग मोलाचे असल्याने सूतगिरणीच्या व्यवस्थापनाने कामगारांना जास्तीत जास्त सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) कामगारांना ने-आण करण्याकरीता सूत गिरणीने मोफत बससेवा दिली आहे.

२) ज्या कामगारांना ये-जा करणे गैरसोयीचे आहे अशा कामगरांना सूत गिरणीच्या आवारात कामगार निवासी घरकुलामध्ये मोफत वीज पाणी व राहण्याकरीता निवासाची व्यवस्था केलेली हआहे.

३) कामगारांना अडी अडचणीच्या वेळी पैशाची निकड भागविण्याकरीता पतसंस्थेमार्फत व्यवस्था करण्यात आली आहे.

४) कामगारास कामावर असताना दुखापत, इजा झाल्यास त्यास मोफत वैद्यकिय औषधोपचार केला जातो.

५) कामगारांसाठी वर्कमेन्स कॉम्पेनसेशन ॲक्ट खाली पॉलिसी घेतली असून या योजनेतून कामगारांना अपघात झाल्यास नुकसान भरपाई दिली जाते.

६) कामगारांची मोफत सर्व रोग निदान आरोग्य तपासणी केली जाते.

७) सूत गिरणीतील कामगारांच्या मुलांना वह्या, पुस्तके व शालेय ड्रेस मोफत दिले जातात.

८) कामगारांना प्रॉव्हीडंट फंड, फॅमिली पेन्शन, लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन, पुणे मार्फत एम्प्लॉईज ग्रुप ग्रॅज्युएटी काम ॲशोरन्स योजना, सेवकांना पगार हक्क रजा, पगारी सुट्टी इ. सोयी सवलती दिल्या जातात.

## ४.५ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले, ता. सांगोला, जि. सोलापूर

**४.५.१ स्थापना :-**

शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी नियमित सांगोला , ता. सांगोला, जि. सोलापूर या सूत गिरणीची स्थापना मा.ना. गणपतरावजी देशखुख यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १४/०८/१९९५ रोजी नोंदणी क्र. एस.यु.आर./पी.जी.आर.जी./ (ए)/बी.एच.२७ अन्वये नोंदणी केलेली आहे. या

सूत गिरणीची सुरुवातीची सभासद संख्या २४७०० होती. ही सूतगिरणी सांगोला या गावी आहे. सोलापूर- कोल्हापूर रोडवर सांगोला पासून ४ किलोमीटर आहे. सूत गिरणीच्या परिसरात आवळा, बोर, चिंच, कर्मचारीवसाहत ही सूत गिरणीत आहे. ही सूत गिरणी स्थापन झाल्यापासून नफ्यात आहे. या सूत गिरणीच्या स्थापनेमुळे त्या परिसरातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष २००० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. सूत गिरणीमुळे त्या परिसराचा आर्थिक, सामाजिक, भौगोलिक विकास होण्यास मदत होत आहे. सन २०१०-११ या वर्षाअखेर २३३११ इतकी सभासद संख्या आहे.

सोलापूर जिल्ह्यातील महिलांनी स्थापन केलेली पहिली सूत गिरणी आहे. या सूत गिरणीत सूत उत्पादनाला सूरूवात झाल्यापासून अनेक महिलांना रोजगार प्राप्त झालेला आहे. तसेच ही सूत गिरणी सुरुवातीपासून नफ्यात आहे. या सूत गिरणीत तयार होणारे सूत विदेशात मलेशिया, जपान, इंडोनेशीया, सिंगापूर इत्यादी देशात मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. निर्यातीपासून आपल्या देशाला परकीय चलन प्राप्त झालेले आहे. ही सूत गिरणी महाराष्ट्रात एक आदर्श सूत गिरणी म्हणून गणली जाते. या सूत गिरणीला अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.

**तक्ता क्र. ४.५.१**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सभासद संख्या :-**

**सभासद संख्या (हजारात)**

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक महिला सभासद | २४६९३ | २६१८३ | २६२६२ | २६३०४ | २६३०४ | २६३०४ | २६३०४ | २६३०४ | २६३०४ | २६३०४ |
| २. | सहकारी संस्था | ०.६ | ०.६ | ०.६ | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.७ | ०.७ | ०.७ | ०.७ |
| ३. | महाराष्ट्र शासन | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | **एकूण** | **२४७००** | **२१९०** | **२६२६९** | **२६३११** | **२६३१२** | **२६३१२** | **२६३१२** | **२६३१२** | **२६३१२** | **२६३१२** |

**आधार :** शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून

**तक्ता क्र. ४.५.२**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले  भागभांडवल (लाखात)**

| अ.क्र. | तपशील | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कापूस उत्पादक | २६७.१६ | २८२.०६ | २८२.८३ | २८३.३१ | २८३.२५ | २८३.२५ | २८३.२५ | २८३.२५ | २८३.२५ | २८३.२५ |
| २. | सहकारी संस्था | ७.०६ | ०.०६ | ०.०६ | ०.०६ | ०.०७ | ०.०७ | ०.०७ | ०.०७ | ०.०७ | ०.०६ |
| ३. | महाराष्ट्र शासन | २९५.०० | २९५.०० | २९५.०० | २९५.०० | २९५.०० | १८२९.६० | १८२९.६० | १९०४.६० | १९२९.६० | २३८१.४० |
| | **एकूण** | | **५७७.१२** | **५७७.८९** | **५७८.३७** | **५७८.३२** | **३११२.९२** | **२१११.९२** | **२१८७.९२** | **२२१२.९२** | **२६६४.७२** |

**आधार :** शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले च्या सन २००१-०२ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

### ४.५.२ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सभासद संख्या व भाग भांडवल

१) वरील तक्त्यावरुन असे दिसते की सन २००१-२०२ मध्ये सून गिरणीची सभासद संख्या २४६९३ ही कापूस उत्पादक महिला सभासद संख्या आहे. ६ सहकारी संस्था सभासद आहेत. तसेच महाराष्ट्र शासन १ अशी आहे. तर यावर्षी सूत गिरणीचे सभासद भागभांडवल २६७.१६ लाख सहकारी संस्था, ०.०६ लाख तर महाराष्ट्र शासनाचे २९५.०० लाख आहे.

२) अहवाल वर्ष २००२-०३ मध्ये सभासद संख्या २६१८३ इतकी झालेली आहे. सहकारी संस्थेच्या सभासद संख्येत वाढ झालेली नाही. या वर्षी कापूस उत्पादक महिला सभासद यांच्याकडून २८२.०६ भाग भांडवल जमा झालेले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने २९५.०० भाग भांडवल दिलेले आहे. सहकारी संस्थेचे भाग भांडवल ०.०६ लाख इतकेच आहे असे या वर्षी एकूण ५५७.१२ लाख रूपये भागभांडवल सूत गिरणीकडे उपलब्ध झालेले आढळते.

३) सन २००३-०४ या वर्षात सभासद कापूस उत्पादक महिला सभासद संख्या २६२६२ आहे. त्यांचे भागभांडवल २८२.८३ लाखाचे असून सहकारी संस्थाचे ०.०६ लाख व शासनाचे २९५ लाख असे एकूण ५७७.८९ लाख रूपयाचे भागभांडवल प्राप्त झालेले आहे.

४) सन २००४-०५ या अहवाल वर्षात कापूस उत्पादक महिला सभासद संख्या २६३०४ आहे. त्यांचे भागभांडवल २८३.३१ लाख आहे. शासनाचे व सहकारी संस्थेचे भागभांडवल स्थिर आहे.

५) सन  २००५-०६ या अहवाल वर्षात सभासद संख्या २६३०४ आहे. त्याचे भाग भांडवल २८३.२५ आहे. सहकारी संस्थेचे सभासद संख्या एकने वाढलेली आहे. ती सात झालेले आहे. त्यामुळे त्याचे भागभांडवल ०.०७ इतके झालेले आहे. शासकीय भांडवल २९५.०० इतकेच आहे.

६) सन २००६-०७ या अहवाल वर्षात सभासद संख्या २६३०४ आहे. त्याचे भाग भांडवल २८३.२५ आहे. सहकारी संस्थेचे ०.०७ लाख तर शासनाचे भागभांडवल १८२९.६० लाख रूपये इतके प्राप्त झालेले आहे.एकूण भाग भांडवल २११२.९२ लाख रूपये इतके या वर्षात प्राप्त झालेले आहे.

७) सन २००७-०८ या अहवाल वर्षात सभासद संख्या स्थिर राहिलेली आहे.

८) सन २००८-०९ या अहवाल वर्षात सभासद संख्या २६३०४ अशी स्थिर असल्याने त्याचे भागभांडवल देखील स्थिर राहिलेले आहे. ते २८३.२५ लाख आहे. या वर्षात शासनाचे भागभांडवल १९०४.६० लाख इतके प्राप्त झालेले आहे.

९) सन २००९-१० या अहवाल वर्षात देखील सभासद संख्या व त्याचे भागभांडवल स्थिर आहे. या वर्षात शासनाचे भागभांडवल वाढलेले दिसते. १९२९.६० लाख रूपये इतके शासनाचे भांडवल प्राप्त  झालेले आहे.

१०) या सूत गिरणीचे अधिकृत भागभांडवल ३०  कोटी रुपये आहे. सन २०१०-२०११ या वर्षात कापसू उत्पादक महिला सभासद संख्या सहकारी संस्थाचे ७.०७ लाख शासनाचे भाग भांडवल २३८१.४० लाख रूपये प्राप्त झालेले आहे.

## सारांश

दहा वर्षात सूत गिरणीच्या कापूस उत्पादक महिला सभासदाच्या संख्येत वाढ झालेली दिसते. तसेच सूत गिरणीच्या सभासदाच्या भागभांडवलात देखील सातत्याने वाढ झालेली आहे. तसेच शासनाने देखील वेळोवेळी भाग भांडवल पूरविलेले आढळते.

### ४.५.३ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत उत्पादन :-

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी प्रामुख्याने चार उत्पादन घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये भूमि, श्रम, भांडवल आणि संयोजन यांचा समावेश होतो. विशेषतः ज्या नैसर्गिक मानवी साधनांचे उत्पादन प्रक्रियेला सहाय्य होते. त्या साधनांना उत्पादनाचे घटक असे म्हणतात. वास्तविक पाहता उत्पादनाच्या क्रियेला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. जमीन, इमारत, कच्चामाल, इंधन, श्रम, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन इत्यादी अनेक वेळा उत्पादन क्रियेसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या खूपच मोठी असते. या सर्वांना आदान (Input) असे म्हणतात. परंतू अर्थ शास्त्रज्ञांनी आपल्या सोईसाठी सर्व आदानांचे चार गट पाडले आहेत. भूमी,

श्रम, भांडवल, संयोजन यालाच चतुर्विध वर्गिकरण असे म्हणतात. आज कोणतेही उत्पादन करायचे झाल्यास या चार घटकांची आवश्यकता आहे. पूर्वी उत्पादनाचे दोनच घटक मानले जात होते. पंरतू भांडवलाचे महत्व वाढत गेल्याने उत्पादनाचा तो एक स्वतंत्र घटक बनला. तसेच श्रम करणारे मजूर व उत्पादनाची जोखीम स्विकारणारा संयोजक यातही फरक केला गेला. उत्पादनाचे हे चार घटक एकत्र येऊन निर्माण होणारे फलित म्हणजे उत्पादन होय. सर्व अर्थिक घडामोडींचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे उपभोग होय. मात्र त्यासाठी उत्पादन व विनिमय या प्रक्रिया फार महत्वाच्या असतात. त्यामुळे उत्पादन हे अरंभस्थानी असणारा बिंदू धरला तर अंतिम बिंदू उपभोग होय. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले गिरणीच्या भांडवलाचा आढावा घेतल्यानंतर उत्पादन या महत्वाच्या घटकाकडे आपोआप लक्ष वेधले जाते. कारण कोटयावधी रूपयांची उलाढाल केल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होणार ही मानवाची सहज प्रवृत्ती असते. तर निष्पन्न झालेले उत्पादन फायदेशिर की, तोट्याचे होते ते पाहणे देखिल संयोजकाचे (व्यवस्थापनेचे) कर्तव्यच असते. निर्मित उत्पादन कोणत्या किमतीला मिळते ते पाहणे हे ग्राहकांचे देखील कर्तव्यच असते.

शेतकरी महिला सहकारी सूत गिरणीमध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने माहे फेब्रु. २००६ पासून व्यापारी सूत उत्पादनास सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, ३०, ३२, ३४,३८,४० सिंगल कोंम्बड- कार्डेड आणि होजिअरी विव्हिंग सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीची प्रगती पाहत असताना सूत उत्पादनातील चढउतार पाहणे अधिक योग्य व महत्वाचे ठरते. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मध्ये सन २००५-२००६ ते सन २०१०-२०११ या काळात किती सूताचे उत्पादन केले आहे. त्याचा तपशील तक्ता. क्र. ४.५.३ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ४.५.३**


**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत उत्पादन :- (किलो)**

| अ.क्र. | तपशील | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित चात्या | ६३३६ | ६३३६ | १३७२८ | १३७२८ | १३७२८ | १४०३७ |
| २. | उपलब्ध चात्या | ११२१४७२ | ६९३७९२० | ९१७४५२८ | १५०३२१६० | १५०३२१६० | १५३७११३६ |
| ३. | चाललेल्या चात्या | ७६७४७२ | ६२४००६५ | ८६६०३७१ | १३६५३७२८ | १३५५८०११ | १३८३८५९७ |
| ४. | चात्या वापर | ८७.४७ | ८९.८४ | ९४.४० | ९०.८३ | ९०.१९ | ९०.०३ |
| ५. | सूत उत्तारा % | ८५.२१ | ८५.३२ | ८५.३७ | ८४.३३ | ८४.२० | ८२.७८ |
| ६. | सरासरी काऊंट | ३० | २७.९३ | २७.०३ | २८.८९ | २९.०८ | ३१.२१ |
| ७. | प्रति चाती उत्पादन ग्रॅम्स | १३६.४४ | १६६.०९ | १८९.६७ | १७२.९८ | १६५.४१ | १५१.८० |
| ८. | उत्पादन किलो (लाखात) | १०४७६१ | १०३६२२४ | १६४२६०५ | २३६०१३४.५६ | २२४२६१३.८४ | २१००७६४.२६ |

**आधार : शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सन २००१-०२ ते २०१०-११ वार्षिक अहवालावरून**

आलेख क्र. ११

**सूत उत्पादन :- (किलो)**




**आधार :— तक्ता क्रमांक ४.५.३**

पहिल्या टप्प्यातील १३७२८ चात्या उत्पादनाखाली व उर्वरित १३७२८ चात्यांची पूर्ण उभारणी झाली असून त्यातील ३१६८ चात्या उत्पादनाखाली आल्या आहेत.

१) प्रकल्पात आत्याधूनिक यंत्रसामुग्रीचा समावेश तसेच स्वित्झर्लंड देशातील उस्टर कंपनीची आत्याधूनिक प्रयोगशाळा उभारली आहे.

२)	शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले २५२०० चात्याचा प्रकल्प आहे. सूत गिरणीत प्रत्यक्ष सूत उत्पादनाला सुरुवात २००५-२००६ या अहवाल वर्षात सुरुवात झालेली आहे. अहवाल सालात माहे फेब्रुवारी २००६ व मार्च २००६ मध्ये ३० सिंगल कार्डेड वार्फ या काऊंटचे एकूण १०४,७६१ किलो सूताचे उत्पादन करण्यात आले. या काळात ६३३६ चात्यावर उत्पादन सुरु झाले. चात्या वापर ६८.४७% झालेले आहे. सूताचा उतारा ८५.२१% राहिलेलाआहे. सरासरी काऊंट ३० आहे. प्रति चाती १३६.४४ ग्रॅम्स सूत मिळालेले आहे.

३)	सन २००६-०७ यावर्षात १०३६२२४किलो सूत उत्पादन झालेले आहे. चात्या वापर ८९.९४ टक्के चात्या वापर आहे. उत्पादित सूताचा सरासरी काऊंट ३० तर प्रति चाती उत्पादन ग्रॅम्स १६६.०९ सूत उत्पादन झालेले आहे.

४)	सन २००७-२००८ या वर्षात उपलब्ध चात्या ९१७४५२८ त्यापैकी चाललेल्या चात्या ८६६०३७१ आहेत. या चात्यावर १६४२६०६ किलो सूताचे उत्पादन केलेले आहे. यावर्षी सूत उतारा ८५.३७% टक्के राहिलेला आहे. तर प्रति चाती १८९.६७ ग्रॅम्स सूत उत्पादन मिळालेले आहे. चाललेल्या चात्याची टक्केवारी ९४.४०% आहे.

५)	सन २००८-२००९ या वर्षी उपलब्ध चात्या १५०३२१६ आहेत तर चालेल्या चात्याची संख्या १३६५३७२८ इतकी आहे. या वर्षात २३६०१३४.५६ किलो सूताचे उत्पादन झालेले आहे. चाललेल्या चात्याची टक्केवारी ९०.८३ आहे तर उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २८.८९ आहे. सूत उतारा टक्केवारी ८४.३३ आहे तर प्रति चाती सूत उत्पादन ग्रॅम्स १७२.९८ आहे.

६)	सन २००९-२०१० या वर्षात उपलब्ध चात्या १५०३२१६० पैकी चाललेल्या चात्या १३५५८०११ आहेत. या वर्षात २२४२६१३.८४ किलो सूताचे उत्पादन झालेले आहे. चाललेल्या चात्यांची टक्केवारी ९०.१९ आहे. उत्पादित सूताचा सरासरी काऊंट २९.०८ आहे. सूत उतारा टक्केवारी ८४.२० आहे. प्रति चाती सूत उत्पादन १६५.४१ ग्रॅम्स आहे.

७)	सन २०१०-२०११ या वर्षात प्रस्थापित चात्या १४७३७ आहेत तर उपलब्ध चात्या १५३७११३६ आहेत. यावर्षात चाललेल्या चात्या १३८३८५९७ इतक्या आहेत. या वर्षी सूत उत्पादन २१००७६४.२६ झाले टक्केवारी ९०.०३ इतकी आहे.

उत्पादित सूताचा सरासरी काऊंट ३१.२१ आहे. सूत उतारा टक्केवारी ८२.७८ आहे. तसेच प्रति चाती सूत उत्पादन (१५१.८०) इतके आहे. तसेच वर्षात ३५८ दिवस गिरणी चाललेली आहे.

## सारांश

अहवाल वर्षात सूत गिरणीच्या उत्पादनात वाढ झालेली आढळते, तसेच चाललेल्या चात्याची सरासरी टक्केवारी ९०% आहे. तसेच प्रति ग्रॅम्स चाती सूत उत्पादनात देखील सातत्य राहिलेले आढळते. तसेच उत्पादित सूताचा सरासरी काऊंट ३१.२१ राहिलेला आहे. उत्तम रितीने व कार्यक्षमतेने सूत गिरणी चाललेली असल्याने सूत उत्पादन चांगले झालेले आहे. त्यामुळे सूत गिरणी नफ्यात आहे.

### ४.५.४ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत विक्री :-

शेतकरी महिला सूतगिरणी मध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. सूत गिरणीने व्यापारी उत्पादनास माहे मार्च २००६ पासून सुरूवात केली आहे. सूत गिरणीमध्ये २०, २४, २६, ३०, ३२, ३४, ३८, ४०, ६२, ६४ सिंगल कोम्बड, कार्डेड होजिअरी व विव्हिंग सूताचे उत्पादन होते. अशा वरील विविध सूत काऊंटचे उत्पादन केले जाते. परंतू या तयार झालेल्या सूताला योग्य बाजारपेठ प्राप्त करणे स्पर्धेमुळे कठीण होऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सूताची विक्री वाढवायची असेल तर त्यासाठी उत्पादन खर्च कमी करून त्याच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. तसेच सूताचा दर्जा व गुणवत्ता चांगली असली पाहिजे तरच सूताला वाढती मागणी येऊ शकेल. अन्यथा सूत गिरणी सतत आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सूत गिरणीने अत्याधूनिक प्रयोगशाळा उभारली आहे. त्यामध्ये आधूनिक उपकरणे बसवून विविध काऊंटच्या सूत उत्पादनास सुरूवात केलेली आहे. सूतगिरणीमध्ये कच्च्या कापसापासून सूत निर्मिती करण्यात येते. निर्यातक्षम व उच्च गुणवत्ता असलेले सूत तयार करण्यासाठी कच्च्या कापसापासून सूत निर्मिती पर्यंत वेगवेगळ्या घटकांची तपासणी करण्यासाठी परदेशी बनावटीची अद्यावत उपकरणे तसेच सूत गिरणीने सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा उभी केली आहे. त्यामुळे उच्च गुणवत्तेचे आणि निर्यातक्षम सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. यामुळेच सूतगिरणीने आवघ्या ४ ते ५ वर्षात स्थानिक बाजारपेठेत म्हणजेच भारतीय बाजारपेठेत आणि विदेशात अर्जेंटीना, चायना, जपान व इजिप्त आदी देशात सूताची निर्यात केलेली आहे.

सूत गिरणीतील सूताच्या विक्रीसाठी निरनिराळया ठिकाणचे व्यापारी, एजंन्ट, दलाल, कारखानदार स्वतः सूत गिरणीत येतात. सूताच्या दर्जाविषयी, किंमती विषयी चर्चा, व्यापारी व्यवस्थापनाशी करून किंमत निश्चिती करतात. शिवाय काही व्यापारी व कारखानदार त्यांना ज्या दर्जाचे काऊंटचे सूत हवे आहे त्याचे नमुने आणतात. त्याप्रमाणे सूताची मागणी करतात तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन व्यवस्थापन व संचालक मंडळ सूत उत्पादन मागणी आणि जास्त किंमत मिळवून देणाऱ्या सूताचे उत्पादन करण्यास व्यवस्थापक मंडळास सांगतात. थोडक्यात सूत विक्रीचे सर्व निर्णय व्यवस्थापक व संचालक मंडळ घेते. स्थानिक बाजारपेठेत प्रत्यक्षरित्या सूताची विक्री विक्रीदात्याकडून केली जाते. तसेच सूत गिरणीतर्फे एजन्ट

विविध राज्यात नियुक्त केलेले आहेत. तसेच विदेशात देखील मोठया प्रमाणात सूताची निर्यात केली जाते. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले या सूत गिरणीने स्थानिक व विदेशी बाजारात विक्री केलेल्या सूताचा सूत विक्री तक्ता क्र. ४.५४ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ४.५.४**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले**


**स्थानिक व विदेशी बाजारात सूत विक्री तक्ता**

| अ.क्र. | तपशील | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण सूत उत्पादन | १०४७६१ | १०३६२२४ | १६४२६०५ | २३६०१३४ | २२४४१८८ | २१०१७६७ |
| २. | स्थानिक बाजारात सूत विक्री किलो | ७६२०८ | १०३४४८६.६२ | ९३०१०७ | १८६५८१७ | १७८६३६७ | १५५९३५६ |
| ३. | स्थानिक बाजारात सूत विक्री किंमत (रु. लाखात) | १०३.५० | १००८.५६ | ८८३.५ | २०२०.२७ | २१२७.१३ | २६५२.०२ |
| ४. | सरासरी विक्री दर प्रति किलो रुपये | १००.२६ | ९७.४९ | ९३.०१ | १०६.४५ | ११५.६७ | १६६.९८ |
| ५. | विदेशी सूत विक्री किंमत (रु. लाखात) | --- | २१४.५४ | ६२१.५७ | ३८२.१२ | ५८४.०३ | ७७७.६९ |

**आधार :-** शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीच्या सन २००१-०२ ते २०१०-११ वार्षिक अहवालावरून

आलेख क्र. १२


**स्थानिक बाजारात सूत विक्री रू.**




**आधार :— तक्ता क्र. ४.५.४**

## आलेख क्र. १३

**विदेशी बाजारात सूत विक्री रू.**




**आधार :— तक्ता क्र. ४.५.४**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत विक्री**

१) अहवाल सालात माहे फेब्रुवारी २००६ व मार्च २००६ या दोन महिन्यात ३० सिंगल कार्डेउ वार्प या काऊंटचे सूत उत्पादन झाले. या वर्षापपासून सूत उत्पादनास सुरुवात झाली. या दोन महिन्यात १,०४,७६१ किलो सूताचे उत्पादन करण्यात आले. या वर्षात सूताला स्थानिक मागणी आल्याने ७६२०८ किलो सूताची विक्री स्थानिक बाजारात म्हणजेच तामिळनाडू राज्यात केलेली आहे. त्याची किंमत रुपये ७६.४१ लाख इतकी आहे. पहिल्या वर्षात सूताची निर्यात केलेली नाही.

२) सन २००६-०७ या अहवाल वर्षात ६३३६ चात्यांच्या प्रकल्पात सुरुवातीपासून तांत्रिक बाबतीत उत्तम कामगिरी बजावून सूताचा दर्जा अतिउत्तम ठेवला आहे. याचाच परिणाम अहवाल वर्षात २४ कार्डेड होजिअरी, ३० कार्डेड होजिअरी व ३० कार्डेड व्हीविंग या काऊंटचे १२ कंटेनर म्हणजेच रु. २१४.५४ लाखाचे सूत इजिप्त, अर्जेटिना, बांगलादेश, तनुशिया व कोलंबिया या देशात निर्यात केलेले आहे. तसेच स्थानिक बाजारात १००८.५६ लाख रुपयेचे सूत विक्री केलेली आहे. स्थानिक बाजारात व विदेशात मिळून १२२३.०१ लाख रूपयाची सूत विक्री केलेली आहे.

३) सन २००७-०८ या अहवाल वर्षात सूत गिरणीने एकुण सूत उत्पादन १६४२६०५ पैकी १६१८९८९ किलो सूताची विक्री आपल्याच देशात केलेली आहे. त्याची किंमत १५०५.०७ लाख रुपये तर सरासरी विक्री दर प्रति किलो ९३.०९ मिळालेला आहे. या वर्षात निर्यात बाजारातील दर किफायतशीर नसल्याने सूत निर्यात कमी प्रमाणात ६८८८८२ किलोची केलेली आहे त्याची

किंमत ६२१.५७ लाख रुपये इतकी मिळाली तर सरासरी निर्यात प्रति किलो विक्री दर रु. ९०.२३ पैसे मिळाले.

४) सन २००८-०९ या अहवाल वर्षात सूत गिरणीने एकूण २३६०१३४.५६ किलो सूत उत्पादनापैकी १२५६८४१.४४ किलो सूताची विक्री स्थानिक बाजारपेठेत केलेली आहे. त्याची किंमत रुपये २०२०.२७ इतके तर निर्यात ३२१०२४.०० किलो सूताची निर्यात केलेली आहे. त्याची किंमत ३८२.१२ रुपये इतके परकीय चलन मिळालेली आहे. स्थानिक व विदेशी बाजारात सूत गिरणीने २४०२.३९ लाख रुपये किंमतीच्या सूताची विक्री केलेली आढळते. दररोज ५० ते ६० हजार रुपये रोकड नफा मिळत आहे.

५) सन २००९-१० या वर्षात सूत गिरणीने एकूण सूत उत्पादन २२४४१८८ किलो पैकी स्थानिक बाजारात २३४३८४१ किलो सूताची विक्री केलेली आहे. तर त्याची किंमत रुपये २७११.१६ लाख इतकी आहे. गिरणीने अहवाल सालात २४ कार्डेड होजिअरी, ३० कार्डेड, २० कार्डेड होजिअरी काऊंटचे सुमारे ४५७८२१ किलो सूताची अर्जेटिना, चीन, कोलंबिया, अमेरिका, बांग्लादेश, श्रीलंका, तनुशिया, पेरु या देशात केलेले आहे. स्थानिक व विदेशात सूत गिरणीने २७११.१६ रुपये सूताची विक्री केलेली आहे.

६) सन २०१०-२०११ या वर्षात सूत गिरणीने एकूण सूत उत्पादन २१०१७६७ किलोपैकी स्थानिक बाजारपेठेत २०५३९६१ किलो सूताची विक्री केलेली आहे. त्याची किंमत रुपये ३४२९.७१ इतकी आहे. तर सूताला प्रति किलो १६६.९८ हा दर मिळालेला आहे. सूत गिरणीने ४९४६०५ उत्पादित केलेल्या एकूण सूतापैकी ५४२४११ किलो सूत ३० कार्डेड होजिअरी, ३२ कार्डेड व्हीविंग या काऊंटचे रुपये ७७७.६९ लाख इतक्या रकमेचे सूतअर्जेटिना चायना, जपान व इजिप्त या देशात निर्यात केलेले आहे. स्थानिक व विदेशात एकूण ३४२९.७१ रुपयाची सूत विक्री या वर्षात सूत गिरणीने केलेली आहे.

## सारांश

अहवाल वर्षात सूत गिरणीने २४ ते ३२ होजिअरी, कार्डेड व व्हीविंग या काऊंटच्या सूताचे उत्पादन करुन ते स्थानिक व विदेश बाजारपेठेत विक्री केलेली आहे. स्थानिक बाजारपेठेत ७२५२३६१ इतके किलो व विदेशात २५७९०.९५ सूताची निर्यात केलेली आहे. असे एकूण ६२३०७७८.९५ किलोची सूत विक्री केलेली आहे. स्थानिक बाजारपेठेत विक्री केलेल्या सूतापासून ८७९४.९४ रुपये मिळाले तर निर्यात केलेल्या सूतापासून २४७९.९५ इतके परकीय चलन मिळालेले आहे. अशाप्रकारे स्थानिक व विदेशात विक्री केलेल्या सूतापासून एकूण

११२७४.५२ रुपये सूत गिरणीला मिळालेले आहेत. एकूण उत्पादनाच्या २२.९५% सूत अर्जेंटीना, चयना, ईजिप्त व जपान इ. देशात निर्यात केलेली आहे.

**५.५.५ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले :- रोजगार :-**

भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था समजली जाते. शिवाय वाढती लोकसंख्या असल्यामुळे त्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक असते. प्रचलीत वेतनदरावर ज्याची काम करण्याची इच्छा आहे अशांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्यच समजले जाते. रोजगार निर्मितीत सहकारी सूत गिरण्यांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली आहे. या सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत आहे. महाराष्ट्र राज्यात सहकारी सूत गिरण्यांमुळे १० लाख कामगारांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे.

शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले या सूत गिरणीची स्थापना करीत असताना मा. आमदार गणपतराव देशमुख यांनी ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा हे उद्दिष्ट ठेवलेले होते. त्यानुसार ग्रामीण भागात सूत गिरणी सुरू केलेली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत रोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून सूत गिरणीने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील व समाजातील दुर्बल घटकांना, बेरोजगारांना सतत रोजगार मिळत आहे. यावरून असे स्पष्ट होते की, शेतकरी महिला सूत गिरणीच्या स्थापनेत उत्पादन वाढ व ग्रामीण विकास या उद्देशावरून सांगोला व आसपासच्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त करून देणे व त्या भागाचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश यशस्वी होत आहे.

सन १९९५ मध्ये शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले या सूत गिरणीची स्थापना करण्यात आली. प्रत्यक्ष सूत गिरणी डिसेंबर २००५-०६ पासून सुरू झाली. मार्च २००५-०६ पासून ८०४६ चात्यावर सूत गिरणीत सूताचे उत्पादन सुरू झालेले आहे. सन २००५-२००६ मध्ये एकूण दैनंदिन काम करणाऱ्या कामगारांची संख्या १०० होती. आज संख्या ३०० वर गेल्याचे आढळते. सन २००५-२००६ पासून सन २०१०-२०११ पर्यंत कामगारांच्या संख्येत वाढ होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक ४.५.५ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमाक ४.५.५**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीतील रोजगार**

**(सन २००५-२००६ ते सन २०१०-२०११)**

| वर्ष | कामगारांची संख्या |
|---|---|
| २००१-२००२ | --- |
| २००२-२००३ | --- |
| २००३-२००४ | --- |
| २००४-२००५ | --- |
| २००५-२००६ | १०० |
| २००६-२००७ | २०० |
| २००७-२००८ | २७५ |
| २००८-०९ | ३०० |
| २००९-१० | ३१० |
| २०१०-११ | ३७० |

**आधार :-** शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीतील टाईम विभागाच्या रेकॉर्डवरून.

वरील आकडेवारी वरून असे दिसून येते की, सन २००५-२००६ मध्ये कामगारांची संख्या १०० होती. त्यानंतर सन २०१०-२०११ मध्ये कामगारांची संख्या ३७० इतकी झाली. याचाच अर्थ असा होतो की, या सहा वर्षात कामगार संख्येत वाढ झालेली आढळते. तसेच सूत गिरणीतील प्रत्यक्ष कामगार संख्येत वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरणी मुळे परिसरातील ५०० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले.

स्पिनिंग विभागात काही उपविभाग आहेत. त्यातील कामगारांची संख्या ही डिसेंबर २०११ ची आहे.

**तक्ता क्रमांक ४.५.६**

**शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले**

**स्पिनिंग विभागातील कामगार संख्या**

| **अ. क्र.** | **विभाग** | **कायमची कामगार संख्या** | **बदली कामगार संख्या** |
|---|---|---|---|
| **१.** | स्पीड फ्रेम (कारडींग, ब्लोरूम) | ४६ | १० |
| **२.** | रिंग फ्रेम | १४७ | १०० |
| **३.** | वायडींग (एस.क्यू.सी., पॅकींग) | ९४ | १० |
| **४.** | मेन्टनन्स (जनरल आणि वाचमन) | ३७ | ३० |
| **५.** | इंजिनिरींग | १४ | १० |
| **६.** | कार्यालय | ३२ | -- |
| | **एकूण** | **३७०** | **१३०** |

**आधार :-** शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले टाईम विभागाच्या रेकॉर्ड वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, स्पिनिंग विभागात चार उपविभाग आहेत. वरील विभागापैकी रिंग विभागात कायम व बदली कामगार या दोहोंची संख्या २४७ इतकी आहे. तसेच स्पीड व मेन्टनन्स या विभागात कामगारांची संख्या ८३ आहे. एकूण कामगारांची संख्या पाहिली तर कायम कामगारांची संख्या अधिक असल्याचे दिसते. तसेच वरील तक्त्यात कार्यालयातील ३२ कर्मचाऱ्यांच्या संख्येचा देखील उल्लेख आहे. यावरून सूत गिरणी मधील कायम कामगारांची संख्या ३७० तर बदली कामगारांची संख्या १३० आहे. स्पिनिंग विभागात एकूण कामगारांची संख्या ५०० इतकी आहे. सूत गिरणीतील उत्पादन सध्या १३७२८ चात्यावर सुरू आहे. आणखी १३७२८ चाते बसवून ज्या वेळेस सूत गिरणी २५२०० चात्यावर उत्पादन पूर्ण कार्यक्षमतेने सुरू होईल त्यावेळेस आणखी काही लांकांना रोजगार उपलब्ध होऊन कामगार संख्येत वाढ होईल. असे तथ्य संकलनावरून आढळते.

**४.५.६ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले मधील स्पिनिंग विभागातील कामाचे स्वरूप :-**

सूत गिरणीमध्ये कामाच्या तीन पाळ्या चालतात. यामध्ये त्यांच्या वेळा खालील प्रमाणे सांगता येतात.

१) पहिली पाळी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत.

२) दुसरी पाळी दुपारी ४.०० ते सायंकाळी १२.०० पर्यंत.

३) तिसरी पाळी रात्री १२.०० ते सकाळी ८.०० पर्यंत.

वरील प्रमाणे कामगार तीन पाळ्यांमध्ये काम करतात.

कापसापासून सूत तयार करण्यासाठी निरनिराळ्या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानुसार सूत गिरणीतील स्पिनिंग विभाग हा महत्वाचा आहे. त्याची थोडक्यात माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रथमतः गोडाऊन मधून कापूस मिक्सिंग विभागात येतो तेथून मिक्सिंग केल्यानंतर ब्लोरूम विभागात पिंजणी करण्याचे कार्य केले जाते. पुढे कारडिंग विभागात आल्यानंतर तेथे नको असलेला कचरा काढून स्वच्छ केले जाते. नंतर पुढे स्पीडप्रेम मध्ये वात तयार होते. पुढे गेल्यावर त्या वातीचे बारीक दोरा सूत तयार होते. तसेच पुढे जाऊन वायडींग विभागामध्ये चांगले सूत तयार होते. नंतर हे चांगले तयार झालेले सूत पॅकिंग विभागात पाठविले जाते. तेथे पॅकिंग झाल्यानंतर सूताची विक्री करण्यासाठी ते सूत बाजारपेठेत पाठविले जाते. अशाप्रकारे कापसापासून सूत तयार होईपर्यंतची प्रक्रिया सूत गिरणीमध्ये केली जाते. तसेच स्पिनिंग विभागातील जी यंत्र सामुग्री वापरली जाते त्यांची दुरूस्ती व त्यांची व्यवस्था पाहण्याचे कार्य मेन्टेनन्स विभागाकडून केले जाते. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामाचे स्वरूप आहे. या ठिकाणी सूत तयार होण्याच्या व कामाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४.५.७ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीतील वेतन पद्धती :-**

कामगारांच्या प्राप्तीचा एक प्रमुख मार्ग म्हणून वेतनाचा किंवा मजूरीचा उल्लेख केला जातो. कामगाराला किंवा श्रमिकाला उत्पादन कार्यात त्याच्या श्रमशक्तीचा वापर केल्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला वेतन असे म्हणतात. यामध्ये शारिरीक व बौद्धीक, कुशल व अकुशल अशा सर्व श्रमांचा समावेश होतो. वेतन तासाच्या दरात, दिवसाप्रमाणे, महिन्याप्रमाणे व वस्तूच्या किंवा दोन्ही मिळून दिले जाते.

कित्येकदा वेतन काम केलेल्या कालाप्रमाणे दिले जाते. यास कालानुसार वेतन म्हणतात. तर कित्येकदा वेतन कामगारांने केलेल्या कामाप्रमाणे म्हणजे उत्पादनाप्रमाणे दिले जाते. तर कधी कधी वेतन अमुक काम झाल्यावर दिले जाते त्यास ठेक्याप्रमाणे वेतन म्हणता येईल.

वरील प्रकारापैकी शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कालाप्रमाणे वेतन दिले जाते. अर्थात यासाठी आठ तासांची पाळी नेमून दिलेली आहे. त्याप्रमाणे कामगारांना हुद्यानुसार वेतन दिले जाते. वेतन निश्चिती मुंबई वेतन मंडळ करते. त्याची अंमलबजावणी सूत गिरणी आपल्या कामगारांच्या बाबतीत करते. सूत गिरणीतील कामगारांना वेतन महिन्याला दिले जाते. प्रत्येक महिन्यातील १० तारखेस कामगारांना वेतन दिले जाते. हे अनुसूचितील प्रश्नाच्या उत्तरावरून आढळून आले.

### ४.५.८ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोल कामगार कल्याणकारी योजना :-

**अ) पाळणाघराची सुविधा :-**

शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोला सूत गिरणीने महिला कामगारांच्या सहा वर्षापेक्षा लहान असणाऱ्या मुलांसाठी पाळणाघराची सुविधा केली आहे.

**ब) सकस आहाराची योजना :-**

कामगारांचे आरोग्य सदृढ राहण्याच्या दृष्टीने या योजनेअंतर्गत कामगारांना दररोज सकस आहाराचे वाटप केले जाते. केळी, गुळ, शेंगदाने असा आहार दिला जातो.

**क) उपस्थिती प्रोत्साहन योजना :-**

शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोले या सूत गिरणीत जास्तीत जास्त दिवस कामगारांनी हजर रहावे या उद्देशाने जे कामगार २२ ते २५ दिवस हजर राहतात त्यांना पगाराव्यतिरिक्त रु २६०/- ते ५७५/- जादा रक्कम दिली जाते.

आज अखेर कामगार वर्गाच्या प्रामाणिक प्रयत्नामुळे उत्पादन व सूताचा दर्जा यामध्ये सातत्य राखुन त्याची पातळी सतत उंचावत ठेवण्यात गिरणीला यश आले आहे.

### ४.५.९ शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित सांगोलेला मिळालेले राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार :-

१) सन २००५-०६ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या. मुंबई यांच्याकडून पदार्पनातील उल्लेखनीय कामगिरीचा पुरस्कार मिळवणारी एकमेव सूत गिरणी आहे.

२) सन २००६-०७ व २००७-०८ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या. मुंबई यांचेकडून महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट सूत गिरण्याचा पूरस्कार तसेच आर्थिक व तांत्रिक व्यवस्थापन यामध्ये सुवर्ण पदक त्याचप्रमाणे विशेष लक्षणीय कामगिरीचे कौतुक सूवर्णपदक प्राप्त अशा दोन्ही प्रकारे दोन वर्षाकरीता प्रत्येकी दोन सुवर्णपदकांची मानकरी.

३) सन २००६-०७ करीता अखिल भारतीय सूत कताई महासंघ मर्या., मुंबई यांचेकडून प्रती चाती निव्वळ संचित नफा, प्रती चाती रोकड नफा, प्रती चाती उभारणीतील सहभाग, उत्कृष्ठ तांत्रिक व्यवस्थापन या करीता पारितोषिके प्राप्त.

४) सन २००७-०८ करीता अखिल भारतीय सूत कताई महासंघ मर्या. मुंबई यांचेकडून निव्वळ संचित नफा, प्रति चाती रोकड नफा, प्रती चाती उभारणीतील सहभाग, उत्कृष्ठ तांत्रिक व्यवस्थापन या करीता पारितोषिके प्राप्त.

५) सन २००९-१० करीता राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या. मुंबई यांचेकडून आर्थिक व तांत्रिक व्यवस्थापन यामध्ये प्रथम क्रमाकाचे सुवर्णपदक व विशेष लक्षणीय कामगिरी पुरस्काराचे सुवर्णपदक अशी दोन सुवर्णपदके प्राप्त.

६) सन २००९-१० करीता महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या. मुंबई यांचेकडून संचित निव्वळ नफा यासाठी विशेष लक्षणीय कामगिरी पुरस्काराचे सूवर्णपदक.

ग्रामीण महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी उभारलेला प्रकल्प म्हणून या सूत गिरणीकडे पाहिले जाते. या सूत गिरणीमूळे या परिसराचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होत आहे.

## ४.५.१० सैध्दांतिक पार्श्वभूमी :-

१) सी.आर. फे :- "सहकारी संस्था म्हणजे दुर्बलांनी निःस्वार्थी भूमिकेतून संयुक्तरित्या व्यापार करण्यासाठी स्थापन केलेली संघटना होय. या संस्थेच्या कामकाजाबाबत व संस्था चालविणाऱ्या जबाबदारीच्या प्रमाणात सभासदांना लाभांश मिळेल असे गृहित धरलेले असते."[१]

सी.आर. फे यांच्या मतानूसार दुर्बल व्यक्ती समान हेतू व उद्दिष्ट समोर ठेवुन एकत्र येऊन एखादी संघटना स्थापन करतात. तसेच त्या संस्थेचे कामकाज देखील ते चालवितात संस्था चालविताना स्वार्थ नसतो. तसेच एक सभासद एक मत ऐच्छिक संघटन व लोकशाही मार्गाने चालवितात. संस्थेला मिळणारा नफा हा सभासदांना दिला जातो, असा विचार सी.आर. फे यांनी मांडलेले आहेत.

२) एच कॅलव्हर्ट :- " जेंव्हा माणूस म्हणून अनेक व्यक्ती सामनतेच्या तत्त्वावर एकत्र येऊन स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संघटना स्थापना करतात तेंव्हा त्या संघटनेस सहकारी संघटना असे म्हणतात"[२]

कॅलव्हर्ट यांनी त्यांच्या व्याख्येत सहकारी ही ऐच्छिक संघटना आहे. सहकार म्हणजे व्यक्तीचे एकत्रीकरण होय, सहकारी संस्था या स्वेच्छा आणि समानतेच्या तत्त्वावर आधारीत असतात. तसेच सहकारी संस्था ही सभासदांच्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीच्या उद्देशाने स्थापन झालेली असते. असे त्यांनी सहकाराची व्याख्या केलेली आहे.

३) श्री. वैंकुठलाल मेहता :- "समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी ऐच्छिकरित्या स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी होय."[३]

श्री. वैकुंठलाल मेहता यांच्या व्याख्येनूसार स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने, समान उद्दिष्टे साध्य करण्याच्या उद्देशाने एकत्र आलेल्या व्यक्तिंची आर्थिक संघटना होय. तसेच या संघटनेचे कार्य लोकशाही नियमानूसार चालते. या संघटनेत समान आर्थिक हितसंबंधाचे संवर्धन

करण्यासाठी व्यक्ती एकत्र येतात. आणि संघटनेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात नफ्यात सहभागी होतात.

वरील सैध्दांतीक पार्श्वभूमीनूसार सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सहकाराच्या सर्व तत्त्वाचा स्विकार केलेला. सूत गिरण्यामध्ये सहकाराची वैशिष्टे व तत्त्वाचा स्विकार केलेला आहे. अभ्यासाठी निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांनी ऐच्छिक व खुले सभासदत्व, लोकशाही नियंत्रण, अधिकाराचे वाटप भांडवलावर मर्यादित व्याज, सहकार प्रशिक्षण सहकारांतर्गत सहकार, परस्पर सहाय्यातून स्वावलंबन, रोखीचे व्यवहार, राजकिय आणि धार्मिक तटस्थता, काटकसरीचे तत्व, सेवा तत्व, समतेचे तत्व या तत्त्वाप्रमाणे सूत गिरण्या चालविल्या जात आहेत. या सर्व सहकारी तत्त्वाचा सोलापूर जिल्ह्यातील स्वामी समर्थ वळसंग, शेतकरी सहकारी सांगोले, शरद सहकारी सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले सूत गिरणी वाघोली व शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी सांगोले या सूत गिरण्यांनी स्विकारल्याने या सूत गिरण्यांची प्रगती झालेली आहे.

महाराष्ट्रात आदर्श सहकारी सूत गिरणी म्हणून शेतकरी सहकारी सूत गिरणी सांगोले हिचा उल्लेख केला जातो. तसेच शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी ही महिलांनी चालवलेली आदर्श सूत गिरणी आहे. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी वळसंग या तिन्ही सूत गिरणीला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत.

### ४.५.११ गृहितकांची तपासणी :-

१) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्याची प्रगती होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवड केलेल्या सहकारी सूत गिरण्या मध्ये शेतकरी, स्वामी समर्थ, महात्मा शेतकरी, महिला व शरद या सूत गिरण्यांनी उत्पन्न, नफा यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली आढळते. तसेच या सूत गिरण्यांनी आधूनिक साधनसामुग्री, यंत्रे वापरुन सूत उत्पादनात वाढ केलेली दिसते. तसेच सह सूत गिरण्यांनी मोठ्या प्रमाणात सूत विक्री देशात व विदेशात करीत आहेत. म्हणजे गृहितानूसार सहकारी सूत गिरण्यांची प्रगती होत आहे. परंतू शरद सूत गिरणी मात्र याला अपवाद आहे कारण अनेक कारणांनी शरद सूत गिरणी डबघाईला आलेली आहे.

२) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामुळे रोजगार निर्मिती होत आहे.

गृहितानूसार सहकारी सूत गिरण्यामुळे मोठ्या प्रमाणात बेकार, तरुण-तरुणींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणीत ८०० कामगार काम करतात, शेतकरी सहकारी सांगोले सूत गिरणीमध्ये १४७१ कामगार व शरद सूत गिरणी नान्नज ५४० कामगार,

महात्मा फुले सूत गिरणीमध्ये ७७० कामगार तर शेतकरी महिला सहकारी सूत गिरणीमध्ये ५०० कामगार काम करतात म्हणजे सर्व सूत गिरण्यामध्ये मिळुन ४०१० कामगार करतात. म्हणजेच ४०१० इतक्या लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झालेला तसेच सहकारी सूत गिरण्याच्या परिसरात अनेक छोटे-छोटे उद्योग उभारल्याने अप्रत्यक्षरित्या ५००० लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. म्हणजेच सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमूळे रोजगार निर्मिती होत आहे हे गृहित लागू झालेले आहे.

३) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामुळे आसपासच्या ग्रामीण भागाचा विकास झालेला आहे.

:- सहकारी सूत गिरण्या स्थापन झाल्याने त्या भागातील तरुण व बेरोजगारांना रोजगार मिळालेला आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारलेला आहे. तसेच सूत गिरण्याच्या स्थापनेमूळे त्या परीसराचा विकास होत आहे. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणीच्या स्थापनामूळे वळसंग या ग्रामीण भागाचा विकास झालेला आहे. या सूत गिरणीमुळे त्या भागातील शेतकऱ्यांनी कापूस या पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेत आहेत. तसेच त्या कापसाची खरेदी सूत गिरणीमार्फत केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य किंमत मिळू लागली आहे. त्यामुळे सूत गिरण्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर, राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे. सूत गिरण्यामुळे या भागात पक्के रस्ते, निर्माण झालेत सूत गिरण्यांच्या परिसरात अनेक लघु व कुटीरोद्योग स्थापन होत आहेत. सांगोला सूत गिरणीच्या स्थापनेमुळे त्या भागात औद्योगिक वसाहत स्थापन झालेली आहे. तसेच या परिसरात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मोठ्या प्रमाणात उपलबध होण्यास मदत झालेली आहे. या सूत गिरण्यामुळे सूत गिरण्याच्या परिसरात आर्थिक व सामाजिक आणि भौगोलिक विकास होण्यास मदत होत आहे. तसेच राजकिय नेतृत्व देखील तयार झालेले आहेत. या सूत गिरण्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होत आहे.

**संदर्भ :-**


१) विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पृष्ठ क्र. २१

२) डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापूर.

३) डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापूर.

४) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी नियमित, वळसंग, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

५) शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, ता. सांगोले, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

६) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

७) महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नियमित, शारदानगर, वाघोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

८) शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित, सांगोले, ता. सांगोले, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

**प्रकरण पाचवे**

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक मूल्यमापन

५.१ प्रस्तावना - व्याख्या

५.२ ढोबळ नफा गुणोत्तर

५.३ निव्वळ नफा व विक्री गुणोत्तर

५.४ तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर

५.५ परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर

५.६ कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर

५.७ एकूण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर

५.८ स्थिर मालमत्ता व उलाढाल गुणोत्तर

५.९ चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर

# प्रकरण पाचवे

# सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक मूल्यमापन

## ५.१ प्रस्तावना :-

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आर्थिक मूल्यमापन करीत असताना सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याकरीता कालावधी २००१-०२ ते २०१०-११ असा घेतलेला आहे. पंरतु अभ्यासासाठी निवडलेल्या काही सूत गिरण्यांचे सूत उत्पादन अलिकडील २००५-०६ या सालापासून सुरु झालेले असल्यामुळे आर्थिक मूल्यमापन करण्याकरीता अलिकडील ५ वर्षे घेतलेली आहेत.

वित्तीय विवरण पत्राच्या अभ्यासावरून व्यवसाय उद्योगाची आर्थिक स्थिती, व्यवसाय उद्योगाची लाभप्रदता आणि आर्थिक भक्कमपणा लक्षात येते. यामध्ये नफ्याचा चढ-उतार, मालमत्ता व्यवसायाचे दायित्व आणि भांडवल त्यामध्ये स्वभांडवल आणि कर्जाऊ भांडवल याचीही माहिती मिळते. या सर्व बाबीचा तुलनात्मक अभ्यास करुन व्यवसाय उद्योगाची स्थिती आणि आर्थिक मजबुती लक्षात येते. वित्तिय विवरण पत्रावरून व्यवसाय उद्योगाच्या व्यवस्थापनाच्या कामाची प्रक्रिया आणि दिशा, कार्यक्षमता यांचेही मोजमाप करता येते. या विश्लेषणाच्या आधारावर त्यांच्या व्यवस्थापनाच्या कामातील दोष-उणीवा लक्षात येतात. आणि त्यामध्ये सुधारणा करता येतात. वित्तिय विवरण पत्राचे विश्लेषण करुन व्यवसाय उद्योगाची कर्जरोखेधारक, व्यापारी बँका इ. धनको यांच्याकडून घेण्यात आलेल्या कर्जफेड क्षमतेचाही अभ्यास करता येतो. वित्तीय विवरण पत्रे सद्यस्थितीची आर्थिक स्थिती तर दर्शवितात त्याच बरोबर व्यवसाय उद्योगाच्या भविष्यातील प्रगतीची वाटचाल कशी आहे हे सुध्दा दर्शवितात. यावरुन व्यवसायाच्या उत्पन्न क्षमतेचा आणि लाभ क्षमतेचा अंदाज करुन नियोजन करता येते. वित्तिय विवरण पत्राच्या विश्लेषणामुळे व्यवसाय उद्योगाच्या वेगवेगळ्या वर्षातील कामकाज पध्दतीची तुलना करता येते. त्यामध्ये विश्लेषणानूसार जर चुकीचे दोष-उणीवा दिसून येत असतील तर त्या उणीवा भविष्यात होणार नाही यांची दक्षता व्यवसाय व्यवस्थापणाला घेता येते. या वित्तिय विश्लेषणावरून कार्यक्षमतेचे मापन करता येते. भविष्यातील निर्णय घेता येतात. तसेच एखाद्या व्यवसायात उद्योगात आर्थिक गुंतवणूक करावी किंवा नाही हे ही समजते. जर एखाद्या व्यवसायाची आर्थिक स्थिती उत्तम असेल, लाभप्रदता उत्तम असेल आणि व्यवस्थापनाची काम करण्याची आर्थिक गुंतणूकदार आर्थिक गुंतवणूक करण्यास तयार असतात. त्याचा फायदा गुंतवणूकदार आणि व्यवसायालाही होतो.

सर्व साधारणपणे एखाद्या उद्योग व्यवसायाची आर्थिक स्थिती, लाभ क्षमता, व्यवस्थापन कार्यपध्दती इत्यादीचा अभ्यास करण्यासाठी पुढील निरनिराळ्या विश्लेषण गुणोत्तराचा उपयोग करतात. या गुणोत्तरावरून एखाद्या व्यवसाय उद्योगाची सर्व दिशा आपल्या लक्षात येतात.

आर्थिक मुल्यमापन २००६-०७ ते २०१०-११ या वर्षाचे केलेले आहे. गुणोत्तर हे वित्तीय विश्लेषणाच्या अनेक साधनापैकी एक सर्वज्ञात आणि मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येणारे साधन आहे. अलिकडच्या काळामध्ये व्यवस्थापनाच्या हातात, व्यवस्थापनास सहाय्य करणारी तसेच त्यावर नियंत्रण ठेवणारी अनेक साधने उपलब्ध आहेत. अशा साधनामध्ये गुणोत्तर विश्लेषणाचा समावेश होतो. ही एक सांख्यिकीय पध्दती असून या पध्दतीमुळे दोन वगेवेगळ्या स्वरुपाच्या आकडेवारीतील परस्पर संबंध मोजता येतो.

वित्तीय गुणोत्तर म्हणजे दोन वित्तीय मूल्यामधील परस्पर संबंध. संबंध हा वित्तीय गुणोत्तर सांख्यिकीय मूल्यांच्या तुलनेचा परिणाम दर्शविते हे स्पष्ट होते. जे लोक सूत गिरण्यांच्या आर्थिक उलाढालीबाबत आणि परिस्थीतीबद्दल सातत्याने जाणण्यास उत्सुक असतात त्यांच्यासाठी गुणोत्तर विश्लेषण पध्दती उपयुक्त आहे. मालक, धनको आणि वित्तीय अधिकाऱ्यांच्या दृष्टीने गुणोत्तर विश्लेषणाची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. या गुणोत्तरावरून दिर्घकालीन तसेच अल्पकालीन स्वरुपाचे निर्णय घेणे सोपे जाते.

### १) कोहलर -

कोहलर यांच्या मते " एका अ रकमेचा ब रकमेशी असलेला संबंध अ शी ब शी चे गुणोत्तर असा दर्शविला जातो."[१]

### २) जेम्स सी. वॅन हॉर्न -

जेम्स सी. वॅन हॉर्न यांच्या मते "गुणोत्तर हा एखाद्या व्यवसाय संघटनेतील दोन वित्तीय माहितीचा परस्परांशी संबंधित असा वित्तीय परिस्थीती आणि कार्यक्षमता मूल्यमापन करण्याचा एक मापदंड आहे."[२]

### ३) एच. जी. गुथ्मन -

एच. जी. गुथ्मन यांच्या मते " गुणोत्तर हे एखाद्या संख्येचा दुसऱ्या संख्येशी असणारा संबंध किंवा प्रमाण असते. ज्यामध्ये पहिली संख्या हि अंश असते तर दुसरी संख्या छेद असते"[३]

वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की गुणोत्तर हे दोन संख्या, घटक किंवा फरक यांच्यातील संबंध दर्शविते. ज्यावेळी हे गुणोत्तर वित्तीय माहितीच्या संबंधात वापरले जाते त्यावेळी असे गुणोत्तर वित्तीय परिस्थिती आणि कार्यक्षमता दाखविण्यास मदत करते.

## तक्ता क्र. ५.१


## सोलपूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा ढोबळ नफा

| अ. क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ शेतकरी सूत गिरणी, वळसंग | | शेतकरी सह. सूत गिरणी, सांगोले | | शरद सह. सूत गिरणी, नान्नज | | महात्मा फुले शेतकरी सूत गिरणी, वाघोली | | शेतकरी महिला सह. वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ढोबळ नफा (कोटीत) | गुणोत्तर % | ढोबळ नफा (कोटीत) | गुणोत्तर % | ढोबळ नफा (कोटीत) | गुणोत्तर % | ढोबळ नफा (कोटीत) | गुणोत्तर % | ढोबळ नफा (कोटीत) | गुणोत्तर % |
| १. | २००६-०७ | ३८३४९८० | ५.४९ | ९११२०४६७ | १५.६४ | -०२१०३९१ | -०.४७ | २३१०००४७ | १०.९९ | २२१३४५५० | २०.३८ |
| २. | २००७-०८ | २९९७४६० | ५.४९ | ७१२८३६३८ | ११.२८ | -३१३११८४ | -१०.५० | ११३४५६०२ | ५.०४ | १८३७०६७५ | ९.६९ |
| ३. | २००८-०९ | २७८५१३५ | ३.०७ | ७५२४१५६९ | ८.५० | - १३४९५९४ | -६.०२ | ८६३७१६० | ३.९५ | ३५४१४४२० | १३.८१ |
| ४. | २००९-१० | १३६२०३३ | ४.२७ | ९२५३२२२५ | ९.२७ | -३१०८८१२ | -४९.४५ | २६२९७२३४ | ११.८० | ३४४६१५७८ | ११.५५ |
| ५. | २०१०-११ | ३५८०४६२ | ८.०३ | १४२६६३०८१ | १३.२७ | - २१७०७७० | -२४.३३ | ३०८६९५८० | १०.४९ | ६४५४२७८२ | १८.२६ |

**आधार : सूत गिरण्यांच्या सन २००१ त २०१०-११ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवालावरून**

## आलेख क्र.१४

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा ढोबळ नफा गुणोत्तर




**आधार : ढोबळ नफा तक्ता क्र. ५.१ चा स्तंभालेख**

## ५.२ ढोबळ नफा

वरील कोष्टकात पाच सूत गिरण्यांच्या पाच वर्षाच्या ढोबळ नफ्याचे विश्लेषण केले आहे. या ढोबळ नफा गुणोत्तराचा अभ्यास केल्यानंतर प्रथमदर्शनी ठळकपणे आपल्या लक्षात येते की, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज चा ढोबळ नफा सतत ऋण अवस्थेत आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित, सांगोले यांच्या ढोबळ नफ्याचे प्रमाण इतर तिन सूत गिरण्यापेक्षा जास्त आहे.

२००६-२००७ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ५.४९%, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले १५.६४%, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ९.४७%, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली १०.८९% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले २०.३८% ढोबळ नफ्याचे विक्रीशी प्रमाण आहे. या आर्थिक वर्षात शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी ही एकच सूतगिरणी ढोबळ नफा प्राप्तीच्या बाबतीत तोट्यात आहे.

सन २००७-०८ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ५.४९%, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले ११.२८% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज १०.५०%, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ५.०४%, तर शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ६.६९%, विक्रीच्या प्रमाणात ढोबळ नफ्याचे प्रमाण आपणास दिसूनयेते. यावर्षी शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीने मागच्या वर्षीचा संचित ढोबळ तोटा खर्ची टाकल्यामुळे ढोबळ नफा उने दाखविणाऱ्या पाच सूत गिरण्या ढोबळ नफ्याच्या गुणोत्तर प्रमाणाचा विचार केला तर २००७-२००८ या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले याचे प्रमाण अत्यंत अनुकुल आणि लक्षणीय आहे.

सन २००८-०९ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ३.०७%, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले ८.५०%, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ६.०२%, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ३.९५%, तर शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या गिरणीचा ढोबळ नफा १३.८१% असा आहे. उत्पादन खर्च आणि विक्री याचे प्रमाण या गुणोत्तरावर समजते. या वर्षी शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूतगिरणीने आपला उत्पादन खर्च कपात यावर लक्ष ठेवुन काम केल्यामुळे त्यांचे ढोबळ नफ्याचे प्रमाण १३.८१%, इतके दिसूनयेते.

२००९-१० या आर्थिक वर्षात श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ढोबळ नफ्याचे प्रमाण ४.२४ आहे. ते गत वर्षीच्या तुलनेत जास्त आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले ढोबळ नफ्याच्या प्रमाणात ८.५०% ते ९.२७, अशी वाढ आपणास दिसूनयेते तसे शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ढोबळ नफ्याचे प्रमाणसुध्दा -६.०२% टक्क्यावरून -२४.४५% पर्यंत वाढले आहे. पण मागच्या वर्षीच्या तुलनेत शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले यांचे ढोबळ

नफ्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. या शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ढोबळ नफा गेल्या वर्षी १३.५% होता तर चालु वर्षी तो ११.५५% असा आपणास दिसूनयेतो.

आर्थिक वर्ष २०१०-२०११ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ढोबळ नफ्याचे विक्रीशी असणारे प्रमाण ८.०३% इतके आहे. हे प्रमाण श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग मागील चार वर्षाच्या ढोबळ नफ्याची तुलना केली तर ते दुप्पट इतके दिसून येते. तसेच इतर नफ्यात असणाऱ्या सहकारी सूत गिरण्याच्या गुणोत्तर नफ्याच्या प्रमाणाचा विचार केला तर ते कमी आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले प्रथमपासूनच नफ्यात आहे पण मागच्या दोन वर्षाचा विचार केला तर मिळणाऱ्या ढोबळ नफ्याचे प्रमाण दिडपट झालेले दिसून येते आणि सोलापूर जिल्ह्यातील इतर सूत गिरण्याच्या ढोबळ नफ्याचा विचार केला तर ती सर्वात पुढे आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ढोबळ नफा कर्ज फेड व मुळ भांडवल परत फेड अशा अवस्थेत असल्यामुळे आणि सतत तोट्यात असल्यामुळे उणे -२४.३३% इतका नफा दिसूनयेतो. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले यांचा १०.४९% आणि १८.२६% प्रत्येकी ढोबळ नफा दिसूनयेतो. मिळणाऱ्या ढोबळ नफ्याचे प्रमाण लक्षात घेतल्यास आपणास एक गोष्ट लक्षात येते ति म्हणजे शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्याचे व्यवस्थापन अत्यंत व्यवसायिकपणे करण्यात येते.

## सारांश

शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले व श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग या सूत गिरण्या नफ्यात आहेत. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, ही सूत गिरणी नफ्याच्या बाबतीत सर्व सूत गिरण्यापेक्षा आघाडीवर आहे.

### तक्ता क्र. ५.२


## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा निव्वळ नफा गुणोत्तर

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ वळसंग | शेतकरी सहकारी सांगोले | शरद शेतकरी नान्नज | महात्मा फुले वाघोली | शेतकरी महिला सांगोले |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर |
| १. | २००६-०७ | ६९.४७% | ७०.१२% | -४०.४६% | -१३.४३% | -१.३२% |
| २. | २००७-०८ | ४५.३७% | १.२४% | -६५.५८% | -१३.५७% | -१३.७५% |
| ३. | २००८-०९ | -३.२४% | -१.५८% | -१४७.२% | -१३.८४% | -१.७४% |
| ४. | २००९-१० | ५.६९% | ०.१५% | -२६१.८७% | -२.६६% | -२.५८% |
| ५. | २०१०-११ | ९.१% | ४.४१% | -२३६.८६% | ०.५८% | -१.८५ |

**आधार : सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून**

### आलेख क्र.१५

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा निव्वळ नफा गुणोत्तर




**आधार :** निव्वळ नफा गुणोत्तर तक्ता क्र. ५.२ चा स्तंभालेख

## ५.३ निव्वळ नफा व विक्री गुणोत्तर :-

या गुणोत्तरावरून एखाद्या व्यवसायाचा नफा क्षमता आपणास तपासता येतो. यामध्ये विक्रीच्या प्रमाणात नफा किती आहे हे समजते. नफ्याच्या बाबतीत संशोधनातुन असे सिध्द होते की श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग वगळता बाकी सूत गिरण्या या त्या-त्या वर्षात काही प्रमाणात नफ्यात असल्यातरी त्यांच्या संचित तोट्यामुळे त्या सतत तोट्यातच दिसतात.

वर्ष २००६-०७ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग विक्रीशी नफ्याचे प्रमाण हे ६९.४७% आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले ७०.१२% आहे. मग शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज हेच प्रमाण उणे ४०.४६% आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली सुध्दा तोट्यातच आहे. त्यामुळे त्याचाही उणे १३.५७% नफ्याचे प्रमाण आहे. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ही उणे प्रमाण आहे ते १३.७५% इतके आहे. वर्ष २००७-०८ ते वर्ष २०१०-११ या सर्व वर्षात संचित तोट्यामुळे सर्व सूत गिरण्या या तोट्यात दिसूनयेतात. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज तर आपल्या उत्पादनामध्ये फारच कपात केलेली दिसून येते.

### सारांश

श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे गुणोत्तर प्रमाणावरून या सूत गिरण्या निव्वळ नफ्यात आहेत. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचे निव्वळ नफा गुणोत्तर प्रमाण तोट्यातच असल्याने या सूत गिरणीने उत्पादनामध्ये कपात केल्याचे आढळते.

## तक्ता क्र. ५.३


# सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ शेतकरी सूत गिरणी, वळसंग | | शेतकरी सह. सूत गिरणी, सांगोले | | शरद सह. सूत गिरणी, नान्नज | | महात्मा फुले शेतकरी सूत गिरणी, वाघोली | | शेतकरी महिला सह. वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तरल मालमत्ता व तरल देयता | गुणोत्तर % | तरल मालमत्ता व तरल देयता | गुणोत्तर % | तरल मालमत्ता व तरल देयता | गुणोत्तर % | तरल मालमत्ता व तरल देयता | गुणोत्तर % | तरल मालमत्ता व तरल देयता | गुणोत्तर % |
| १. | २००६-०७ | ५३३०९१११<br>६२७८९७४२ | ०.८५:१ | ९१४२२२६०<br>१६३०१५०२३ | ०.५६:१ | १९७८७३३१<br>९७२२९५९२ | ०.२०:१ | ४३५७०३११<br>१३४७०४०९४ | ०.३२:१ | २३१२०९४१<br>७०६३७८५ | ३.२७:१ |
| २. | २००७-०८ | ३८२६६५३५<br>८६३३९०३६ | ०.४४:१ | ७५८७८६६७<br>६५४०२१०३ | १.१६:१ | १९७८७९८२<br>१०१९११११३ | १.९४:१ | १२१६१७५०<br>६३१९१३४६ | ०.१९:१ | ३८७०८७५<br>१०८५६४८० | ३.५६:१ |
| ३. | २००८-०९ | ३९२४०८८७<br>९७०८५१४३ | ०.४०:१ | १०६४६७५३५<br>७०२०१९०९ | १.५१:१ | १९२११०३३७<br>१०८०२४३७२ | १.७७:१ | २०६८७३९९५<br>८३०९२२५८ | २.४८:१ | ६१२१४३६५<br>१२६०५९३३ | ४.८५:१ |
| ४. | २००९-१० | ५६८१०९०३<br>५१२२६९७१ | १.१०:१ | ९२६७२३७०<br>२०६९३०५३२ | ०.४५:१ | ३१८३९३३८८<br>११५५१६८४४ | ०.२७:१ | ५७३५५६५८<br>७९०८९८७९ | ०.७३:१ | १०४३७४६४६<br>१०७६३७११ | ९.६९:१ |
| ५. | २०१०-११ | ५०५७५४२६<br>१३४३६१०६२ | ०.३८:१ | ३३९९५८४६०<br>२६५४१६९०९ | १.२८:१ | ३५१४५५६२<br>१२०९७७४७७ | ०.२९:१ | ६८२०९५५१<br>१००५२३५२४ | ०.६८:१ | ५७९९४६८७<br>२०८६११४४ | २.७८:१ |

**आधार :** सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

## आलेख क्र.१६

### तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर




**आधार :** तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर तक्ता क्र. ५.३ चा स्तंभालेख

## ५.४ तरल मालमत्ता व तरल देयता गुणोत्तर / चालु तरलता गुणोत्तर :

या गुणोत्तराच्या साहाय्याने आपण एखाद्या व्यवसायिकाचे चालु देयता जबाबदारी अथवा देणी देण्याची क्षमता याचे मापन करु शकतो. या गुणोत्तराचे प्रमाणित प्रमाण १:१ असावसास पाहिजे आणि जर यामध्ये वाढ झाली तर त्या व्यवसायाची चालु देयता भागविण्याची क्षमता अत्यंत चांगली आहे असे म्हणता येईल. याऊलट जर प्रमाणित प्रमाणापेक्षा जर घट झाली तर अशा व्यवसायाची चालु देयता भागविण्याची क्षमता कमी आहे किंवा नाही असे म्हणता येते.

श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सुतगिरणीचे गुणोत्तराचे प्रमाणित प्रमाण २००९-१० या वर्षात ठेवण्यात यश मिळवले आहे. परंतु इतर २००६-०७, २००७-०८, २००८-०९ आणि २०१०-११ या वर्षात तरल मालमत्ता आणि तरल देयता याचे प्रमाण राखण्यात श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सुतगिरणीचे अपयश दिसून येते. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले सूत गिरणी या गुणोत्तराचे प्रमाण हे प्रमाणित प्रमाण पातळीच्या खाली फक्त २००६-०७ (८५:१) दिसून येते. बाकी सर्व वर्षात मात्र या गुणोत्तराचे प्रमाण प्रमाणित दर्जापेक्षा जास्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुन आपणास शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले या सूतगिरणीची चालु देयता भागविण्याची क्षमता चांगली आहे असे म्हणता येईल. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या गुणोत्तराचे प्रमाण ही २००६-०७ मध्ये फारच असामाधानकारक आहे (२०:१) २००७-०८ (१.९४:१) आणि २००८-०९ (१.७७:१) या दोन वर्षात गुणोत्तराचे प्रमाण राखले आहे परंतु पुढील दोन वर्षात २००९-१० (२७:१) आणि २०१०-१० (२९:१) या दोन वर्षात या गुणोत्तराचे प्रमाण राखले आहे. परंतु पुढील दोन वर्षात २००९-१० (२७:१) आणि२०१०-१० (२९:१) हे प्रमाण फारच प्रतिकुल दर्शविते. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली सूत गिरणीचे या गुणोत्तराचे प्रमाण सतत प्रतिकुलच दिसूत येते यामध्ये २००८-०९ या वर्षाचा अपवाद (२:४८:१) आहे. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले सूत गिरणी यांचे तरल मालमत्ता देयता याचे गुणोत्तर प्रमाण अत्यंत उच्चतम ठेवण्यात यश मिळवले आहे. २००६-०७ (३:२७:१), २००७-०८ (३:५६:१), २००८-०९ (४:८५:१) तर २००९-१० (९:६९:१) आणि २०१०-११ मध्ये (७:७८:१) असे या गुणोत्तराचे प्रमाण दिसूनयेते.

या विश्लेषण अभ्यासामध्ये शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणी आणि महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या दोन सूत गिरण्यांची तरल देयता तरल मालमत्तेतून भागविण्याची क्षमता ही प्रमाणित प्रमाणापेक्षा फारच कमी दिसते. तेंव्हा त्यांना याचे गुणोत्तर प्रमाणित प्रमाण दराबरोबर ठेवणे आवश्यक आहे.

# सारांश

पाच वर्षात सन २००६-०७ ते २०१०-११ चालु तरलता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालू तरलता देयता उत्तम आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज व महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरण्यांची तरल मालमत्ता भागवण्याची क्षमता प्रमाणित प्रमाणापेक्षा फारच कमी दिसते.

## तक्ता क्र. ५.४


## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ शेतकरी सूत गिरणी, वळसंग | | शेतकरी सह. सूत गिरणी, सांगोले | | शरद सह. सूत गिरणी, नान्नज | | महात्मा फुले शेतकरी सूत गिरणी, वाघोली | | शेतकरी महिला सह. वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खर्च व विक्री | गुणोत्तर % | खर्च व विक्री | गुणोत्तर % | खर्च व विक्री | गुणोत्तर % | खर्च व विक्री | गुणोत्तर % | खर्च व विक्री | गुणोत्तर % |
| १. | २००६-०७ | ५०६६०९५२ ३८८४५१६१२ | १२.७१ | ५९००१३६८ ५८३३९४२८ | १०.०० | १७०४७६०१ ४४६१९०८८ | ३८.२० | ५४४१७५६९ २०१२६९५५११ | २७.०३ | २९२७१४५१ १०८५८९६६२ | २६.९५ |
| २. | २००७-०८ | ७००५९००६ ३२४४१५९२६ | २१.५९ | ७४७५३४८६ ६१५५५४८७ | ११.८४ | १६७०७७८४ २९८००४२९ | ५६.०६ | ४४८४१४०८ २२५०७६९८४ | १९.९२ | ५०५९३९२२ १८९४१२६०४ | २९.७१ |
| ३. | २००८-०९ | ५०११४२५५ ४७५२९११५९२ | १०.५५ | ८७५५०८३७ ८८४६१६४३४ | ०९.८९ | ३६३७१३५४ २२३९६१५५ | १६२.२ | ४३११२३७१ २१८३७६१५३ | १९.७४ | ४५९०५३५४ २५६४२७६८८ | १७.९० |
| ४. | २००९-१० | ६१४८९०५६ ५१२३०५४८९ | १२.०० | १०२६८७००० ९९७१६८४२५ | १०.२९ | १६२२२९०० ६२८६०९७ | २५८.०० | ३६९४४७६२ २२२८२१५५७ | १६.५८ | ४८३२७८८८ २९८१२७४८१ | १६.२१ |
| ५. | २०१०-११ | ६२३५९३१८ ६०७२६१६७० | १०.२६ | ११०१८७१५६ १०७४५७७३१२ | १०.२५ | १९०५३२९६ ८९१९८२४ | २१३.०६ | ३७७६६९५४ २९४०५१६५१ | १२.८४ | ६०३३३४०४ ३५३३९३५७८ | १७.०७ |

**आधार** : सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

## आलेख क्र.१७

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर




**आधार :** परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर तक्ता क्र. ५.४ चा स्तंभालेख

## ५.५ परिचलन खर्च व विक्री गुणोत्तर -

आर्थिक वर्ष २००७ या वर्षामध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सहकारी सूत गिरणीच्या २१.५९% शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा ११.८४% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचा ५६.०६% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली सूत गिरणीचा १९.९२% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा २६.७१% इतका आहे. असे व्यवसाय परिचलन खर्चाशी विक्रीशी असणारे प्रमाण आहे.

आर्थिक वर्ष २००८-०९ या वर्षामध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सूत गिरणीच्या १०.५५% शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा ९.८९% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचा १६२.२% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली १९.७४% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा १७.९०% इतका आहे. असे व्यवसाय परिचलन खर्चाशी विक्रीशी असणारे गुणोत्तराचे प्रमाण आहे.

आर्थिक वर्ष २००९-१० या वर्षामध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सहकारी सूत गिरणीच्या १२% शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा १०.२९% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचा २५८% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली १६.५८% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले १६.२१% इतका आहे. असे व्यवसाय परिचलन खर्चाशी विक्रीशी असणारे गुणोत्तराचे प्रमाण आहे.

आर्थिक वर्ष २०१०-११ या वर्षामध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सहकारी सूत गिरणीच्या १०.२६% शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा १०.२५% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचा २१३% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली १२.८४% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले सूत गिरणीचा १७.०७% इतका आहे. असे व्यवसाय परिचलन खर्चाशी विक्रीशी असणारे गुणोत्तर प्रमाण आहे.

## सारांश

वरील आर्थिक वर्षात श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सूत गिरणी व शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचा व्यवसाय परिचलन खर्चाचे विक्रीशी असणारे प्रमाण हे सर्वात कमी आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे व्यवसाय परिचलन खर्चाशी गुणोत्तर प्रमाण सर्वात जास्त आहे.

## ५.५ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर

**तक्ता क्र. ५.५**


**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर**

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ शेतकरी सूत गिरणी, वळसंग | | शेतकरी सह. सूत गिरणी, सांगोले | | शरद सह. सूत गिरणी, नान्नज | | महात्मा फुले शेतकरी सूत गिरणी, वाघोली | | शेतकरी महिला सह. वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज व सामान्य भागभांडवल | गुणोत्तर % | कर्ज व सामान्य भागभांडवल | गुणोत्तर % | कर्ज व सामान्य भागभांडवल | गुणोत्तर % | कर्ज व सामान्य भागभांडवल | गुणोत्तर % | कर्ज व सामान्य भागभांडवल | गुणोत्तर % |
| १. | २००६-०७ | १३८५९५०००<br>५४६०७५०० | २.५३:१ | १६९७५०४३०<br>१५२७३९१६० | १.११:१ | १७४६४४५४९<br>७५५७९००० | २.३१:१ | २१७४६०५००<br>२२८२१२००० | ०.९५:१ | ४३९५७४४०<br>२१६३९५०४० | ०.२०:१ |
| २. | २००७-०८ | २१८२५४०००<br>५११५२५०० | ४.२६:१ | ३५२२२७०२३<br>१४९२५४७६० | २.३६:१ | ८८५६०८१०<br>७५६६४००० | १.१७:१ | २१७००३०००<br>२२८२१२००० | ०.९५:१ | ११८४०००००<br>२१६३९५०४० | ०.५६:१ |
| ३. | २००८-०९ | १९८७४८०००<br>४८२००००० | ४.१२:१ | २५८०२१५००<br>१४७९४९६० | १.७४:१ | ९१२३२२०२<br>९९८८३००० | ०.९१:१ | २२८२११०००<br>२२८२१३००० | ०.९९:१ | १३६९१४३३२<br>२२३८९५०४० | ०.६१:१ |
| ४. | २००९-१० | १३३५६४०००<br>४७६७९५२० | २.८०:१ | ३४२०२९५००<br>१४४२३२९६० | २.३७:१ | ९२४१४६०४<br>११२९०९००० | ०.८२:१ | २२८२११०००<br>२२८२१३००० | ०.९९:१ | २३६४७३१९०<br>२२६३९५०४० | १.०४:१ |
| ५. | २०१०-११ | १६११७८०००<br>४१३५९००० | ३.९०:१ | ३४४१६१११७<br>१४३१०९४६० | २.४०:१ | ८९९०१७६०<br>१३२९०९००० | ०.६७:१ | ८२८२११०००<br>२५८१९३००० | ०.८८:१ | २४५३३६७७१<br>२७१५७५०१० | ०.९०:१ |

**आधार :** सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

## आलेख क्र.१८

## कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर




**आधार :** कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर तक्ता क्र. ५.५ चा स्तंभालेख

## ५.६ कर्ज व सामान्य भाग भांडवल गुणोत्तर :

हे गुणोत्तर व्यवसायाने विक्री केलेल्या भाग विक्री भांडवलाने व उभा केलेल्या दिर्घमुदती कर्जाचे प्रमाण दर्शविते. कोणताही व्यवसाय उभारण्याकरीता आणि चालविण्यासाठी या दोन मार्गातून भांडवल उभे करावे लागते. व्यवसाय, उद्योग सुरळीतपणे चालवण्यासाठी या भाग विक्री भांडवल आणि कर्ज यांच्यात योग्य तो मेळ असला पाहिजे. या गुणोत्तराच्या साह्याने व्यवसाय उद्योगावर नेमके कोणाचे वर्चस्व व नियंत्रण आहे लक्षात येते. कर्ज व सामान्य भाग भांडवल गुणोत्तर काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केलेला आहे.

कर्ज सामान्य भाग भांडवल गुणोत्तर = दिर्घ मुदती कर्जरुपी भांडवल / वसुल सामान्य भाग भांडवल

वरील सुत्राच्या रुपाने आपणास एखाद्या व्यवसाय उद्योगाच्या व्यवस्थापनावरील नियंत्रण अथवा वर्चस्व आपणास अभ्यासता येते.

वरील कोष्टक ५.५ मध्ये दिर्घ मुदती कर्जरुपी भांडवल व वसुल भागभांडवल याचे एकमेकाशी असणारे गुणोत्तर दर्शविण्यात आले आहे. वरील कोष्टकाचा अभ्यास केल्यावर आपणास असे दिसूनयेते की, आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग २.५:३:१ शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले १.११:१, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज

१.३१:१,  महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ९५:१ आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले २०:१ असे दिसून येते. या अभ्यासामध्ये फक्त श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचे प्रमाण प्रमाणित प्रमाणापेक्षा जास्त आहे. त्याची दिर्घ मुदतीकर्ज भागविण्याची क्षमता चांगली आहे. परंतु शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज , महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली, आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले यांचे प्रमाण हे प्रमाणित प्रमाणापेक्षा फारच कमी आहे. २००७-०८ ते २०१०-११ च्या कालावधीत श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग  ने हे प्रमाण अत्यंत उत्तम दर्जाचे ठेवले आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले या सूत गिरणीने गुणोत्तराचे  प्रमाण राखण्याचा प्रयत्न केला आहे. पण शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सततचा तोटा आणि त्यांचे इतर काही कारणे यामुळे शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज  याचे प्रमाणित प्रमाण राखता आले नाही. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली सुध्दा प्रमाणित प्रमाणाच्या खाली आहे त्याचे मात्र गुणोत्तर प्रतिकुल असल्याचे आपणास दिसून येते. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले तर गुणोत्तराचे प्रमाण दर्जापेक्षा फारच खाली असल्याचे दिसून येते. यामध्ये शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज , महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले यांनी आपल्या दिर्घ मुदतीकर्जाचे प्रमाण कमी करावयास पाहिजे नाही तर त्यांच्या व्यवस्थापनास त्याचे वाईट परीणाम भोगावे लागतील.

२००६-०७ ते २०११ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग गुणोत्तर प्रमाण हे २.५३:१, ४.२६:१, ४.१२:१, २.८०:१ आणि ३.९०:१ असे उच्च दर्जाचे दिसूनयेते. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले चे प्रमाण २००६-०७ आणि २००८-०९ या दोन वर्ष प्रमाणित गुणोत्तरापेक्षा जास्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज २००७-०८ या वर्षाच्या अपवाद (१.१७:१) सोडता सतत अत्यंत प्रतिकुल असे गुणोत्तर ठेवले आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले गुणोत्तराचे प्रमाण सुध्दा पाच वर्षाच्या कालवधी मध्ये सतत प्रतिकुल प्रमाण दर्शविते.

## सारांश

श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग व शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित,  सांगोले  या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर चांगले आहे. महात्मा

फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली व शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर प्रमाण प्रतिकुल आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज  या सूत गिरणीचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तराचे प्रमाण अत्यंत प्रतिकूल आहे.

## ५.६ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर

**तक्ता क्र. ५.६**


**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर**

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ वळसंग | शेतकरी सहकारी सांगोले | शरद शेतकरी नान्नज | महात्मा फुले वाघोली | शेतकरी महिला सांगोले |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर | एकुण मालमत्ता उलाढाल गुणोत्तर |
| १. | २००६-०७ | ७०.६४% | ०६.४४% | ०९.५३% | २४.९७% | २९.१५% |
| २. | २००७-०८ | ०५.०२% | ०५.५९% | ०७.६१% | २९.९७% | ४०.७३% |
| ३. | २००८-०९ | ७७.४४% | ८२.५६% | ०५.४१% | २६.७३% | ४९.४७% |
| ४. | २००९-१० | ८१.३१% | ७९.२३% | ०१.४२% | २६.७२% | ४६.५१% |
| ५. | २०१०-११ | ८१.९२% | ८०.९१% | १.८९% | ३२.४६% | ४७.०७% |

**आधार :** सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

**आलेख क्र.१९**

**एकूण मालमत्ता व उलाढाल गुणोत्तर**




**आधार** : एकुण मालमत्ता व उलाढाल गुणोत्तर तक्ता क्र. ५.६ चा स्तंभालेख

## ५.७ एकूण मालमत्ता उलाढाल व विक्री गुणोत्तर :-

या गुणोत्तराच्या सहाय्याने व्यवसाय उद्योगाच्या एकुण मालमत्ता आणि विक्री उलाढाल याचा संबंध शोधला जातो. व्यवयास उद्देशाच्या एकुण मालमत्तेच्या किमतीच्या संदर्भात विक्री किती झाली हे पाहता येते. २००६-०७ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ची विक्री ही एकुण मालमत्तेच्या ७०.६४% होती. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ६.४४% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ची ९.५३% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली २४.९७% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले विक्री २९.१५% इतकी होती. या गुणोत्तरावरून आपल्या लक्षात येते की, श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीची विक्री आणि एकुण मालमत्ता याचे गुणोत्तर इतर सूत गिरण्यापेक्षा जास्त आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणीचे गुणोत्तर फारच असमाधानकारक आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे गुणोत्तर फारच असामाधानकारक जास्त आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या दोन गिरण्या फक्त २५% च्या जवळ येऊ शकल्या आहेत.

वर्ष २००७-०८ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणीचे गुणोत्तर फारच कमी झाले आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणीने आपल्या मागच्या उपक्रमशिलतेत वाढ करु शकली नाही. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज तर मागच्या वर्षीच्या तुलनेत पुन्हा खाली घसरली आहे. तर महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले २९.५७% आणि ४०.७३% इतके प्रमाण गाठुन पुर्वीपेक्षा जास्त सुधारणा केली आहे.

वर्ष २००८-०९ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांनी आपल्या मालमत्तेचा पुर्ण वापर करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ७१.४४% आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले ८२.५६% इतकी क्षमता सिध्द केली आहे. पण शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज आपल्या मागच्या वर्षाच्या तुलनेत पुन्हा आपली क्षमता गमावून बसली. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली यांचे या गुणोत्तराचे प्रमाण २६.७३% असुन ते मागच्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या बाबतीत गुणोत्तर ०९% ने वाढले आहे.

वर्ष २००९-१० मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांनी ८१.३१% आणि ७९.२३% असे राखले आहे तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे गुणोत्तराचे प्रमाण पुन्हा खाली घसरुन १.४२% वर आले आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या गुणोत्तर प्रमाणात काही बदल नाही तर शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणीचे गुणोत्तराचे प्रमाण मागच्या वर्षाच्या तुलनेत ३% नी कमी झाले आहे.

वर्ष २०१०-११ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचे प्रमाण वाढले असुन ते ८१.९२% आणि ८०.९१% इतके आहे. पण शरद शेतकरी सहकारी सूत गिरणीचे गुणोत्तर प्रमाण केवळ ०१.८९% इतकेच आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीचे प्रमाण ३२.४७% असुन शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणीचे गुणोत्तर प्रमाण ४७.०७% आहे.

या गुणोत्तराच्या बाबतीत श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचे एकुण मालमत्तेच्या प्रमाणात विक्रीचे प्रमाण हे ८०% जवळ आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोलीचे गुणोत्तर प्रमाण ३०% च्याजवळ आहे. तर शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोलेचे गुणोत्तर प्रमाण वाढत जाऊन ५०% जवळ आहे.

## सारांश

एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरण्यांचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ८० टक्क्याजवळ आहे. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ५० टक्क्याजवळ आहे. तसेच महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ३० टक्क्याजवळ आहे. या चारही सूत गिरण्यांनी एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण राखलेले आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण फारच कमी आहे ते २ टक्केपेक्षाही कमी आहे.

## ५.७ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे स्थीर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर

**तक्ता क्र. ५.७**


**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे स्थीर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर**

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ वळसंग | शेतकरी सहकारी सांगोले | शरद शेतकरी नान्नज | महात्मा फुले वाघोली | शेतकरी महिला सांगोले |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर | स्थीर मालमत्ता गुणोत्तर |
| १ | २००६-०७ | १३.७७% | ३६.८१% | ४१.६५% | ४६.३०% | ६२.९५% |
| २. | २००७-०८ | ६५.३४% | ३८९.६६% | २७.५७% | ४७.०२% | ६६.७२% |
| ३. | २००८-०९ | ९७.२७% | ५१७.६०% | २२.६८% | ४९.८०% | ७२.९५% |
| ४. | २००९-१० | १०४.७८% | ५७०.४६% | ६.३६% | ५०.५४% | ६६.०८% |
| ५. | २०१०-११ | १२४.६५% | ६४२.३२% | ८.५६% | ६४.७२% | ६२.८५% |

**आधार :** सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

आलेख क्र.२०

**स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर**




**आधार :** स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर तक्ता क्र. ५.७ चा स्तंभालेख

## ५.८ विक्री आणि स्थीर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर :-

हे गुणोत्तर काढताना विक्री आणि फक्त स्थीर मालमत्ता यांचा संबंध तपासण्यात आला आहे. यामध्ये एकुण स्थिर मालमत्तेच्या प्रमाणात विक्री किती झाली आहे हे तपासण्यात आले आहे. यामध्ये उत्पादनाच्या प्रक्रियेत स्थीर मालमत्तेचा किती उपयोग करण्यात आला हे पाहण्यात आले आहे.

वर्ष २००६-०७ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंगने फक्त १३.७७% विक्री केली आहे. तर शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ३६.८१% शरद शेतकरी

सहकारी सूत गिरणी, नान्नज ४१.६५% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ४६.३०% आणि ६२.९५% शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोलेने या प्रमाणात विक्री केली आहे.

वर्ष २००७-०८ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग ६५.३४% इतकी स्थीर मालमत्तेच्या प्रमाणात विक्री केली आहे. ३८९.६६% विक्री शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले केली आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज २७.५७% इतकी विक्री केली आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ४७% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ६६.७२% इतकी विक्री केली आहे. या वर्षात शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले जवळजवळ स्थीर मालमत्तेच्या किमतीच्या ४००% विक्री करण्याचा प्रयत्न केला आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नजने आपली थोडी क्षमता गमावली आहे.

वर्ष २००८-०९ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग विक्रीचे प्रमाण ९७.२७% शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ५१७.६०% शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज २२.६८% महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोलीचे ४९.८०% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोलेचे ७२.९५% इतके आहे. या वर्षात श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले यांनी वाढ केली आहे. पण शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज मात्र पुन्हा खाली घसरली आहे. याही वर्षात शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ५००% पुढे स्थीर मालमत्तेच्या प्रमाणात विक्री केली आहे.

वर्ष २००९-१० मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग १०४.७८% विक्री केली आहे. आपल्या स्थीर मालमत्तेच्या किंमतीच्या पूर्ण वापर केला आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ५७०.४६% पर्यंत जाऊन मागच्या वर्षीचा विक्रम स्वतःच मोडला आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज मात्र पुन्हा ६% पर्यंत खाली आली आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोलीने ५०.५४% आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ६६.०८% पर्यंत क्षमता निर्माण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. या वर्षात महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोलीने थोडी वाढ केली पण शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले थोडी खाली घसरली आहे.

वर्ष २०१०-११ मध्ये श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग १२४.६५% इतकी विक्री केली आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले तर ६४२.३२% म्हणजे साडेसहापट स्थीर मालमत्तेच्या किमतीच्या प्रमाणात विक्री करण्याचा प्रयत्न केला आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज पुन्हा ८% पर्यंत आपली क्षमता वापरु शकली तर महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली ६४.४२% क्षमता सिध्द करु शकली. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले ६२.८५% पर्यंत जाऊ शकली. हे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे.

### सारांश

अभ्यासासाठी निवडलेल्या पाच वर्षात विक्री आणि स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरणीचे गुणोत्तराचे प्रमाण अतिशय उत्तम आहे. तसेच श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांनी देखील गुणोत्तरांचे प्रमाण चांगले ठेवले आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे विक्री आणि स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तराचे प्रमाण इतर सूत गिरण्यापेक्षा फारच कमी आहे.

## ५.८ सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर

**तक्ता क्र. ५.८**


**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर**

| अ.क्र. | वर्ष | श्री. स्वामी समर्थ वळसंग | शेतकरी सहकारी सांगोले | शरद शेतकरी नान्नज | महात्मा फुले वाघोली | शेतकरी महिला सांगोले |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर | चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर |
| १. | २००६-०७ | ३.०२% | १.१९% | ०.२८% | ०.६२% | १७.६७% |
| २. | २००७-०८ | २.१२% | १.९९% | ०.२०% | ८.०३% | १४.१२% |
| ३. | २००८-०९ | २.२२% | २.५६ | ०.१८% | १.१७% | १०.८५% |
| ४. | २००९-१० | २.७५% | १.३६% | ०.२५% | ७.८२% | ७.६७% |
| ५. | २०१०-११ | १.८९% | १.०७% | ०.२७% | १.५९% | २.६२% |

**आधार :** सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सन २००६-०७ ते २०१०-११ या वार्षिक अहवालावरून

**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर**

**आलेख क्र.२१**




**आधार :— तक्ता क्र. ५.८**

## ५.९ चालु मालमत्ता व चालु देयता गुणोत्तर :

या गुणोत्तराच्या विश्लेषणामध्ये चालु मालमत्ता व चालु देयता यांचा परस्पराशी असणारा संबंध शोधला जातो. या गुणोत्तराचे प्रमाणित प्रमाण हे २:१ असुन यामध्ये कोणत्याही व्यवसायाकडे चालु मालमत्ता ही चालु देयतेपक्षा दुप्पट असावी लागते. हे गुणोत्तर जर प्रमाणित दरापेक्षा कमी दिसून येत असेल तर त्या व्यवसायाची आर्थिक स्थिती चांगली नाही असे समजावे किंवा हा दर जर प्रमाणित दरापेक्षा जास्त असेल तर त्या व्यवसायाची आर्थिक स्थिती मजबुत आहे असे समजावे.

वरील स्तंभालेखावरून २००६-२००७ या आर्थिक वर्षाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग (०३.०२%), शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले (१७.६७%), त्यानंतर शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले (१.१९%) असे प्रमाण दिसून येते. यामध्ये वरील तिन सुत गिरण्याचे आर्थिक स्थिती समाधानकारक पणा पेक्षा चांगली आहे. परंतू शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज (०.२८%) तर महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली (०.६२%) असे प्रतिकुल प्रमाण दिसून येते. या दोन सूत गिरण्यांनी चालु मालमत्ता व देयता या गुणोत्तरकडे लक्ष देण्याची गरज आहे. नाही तर त्यांना भविष्यकाळात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.

आर्थिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११ या सर्व वर्षाच्या या गुणोत्तराचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले यांनी या गुणोत्तराचे प्रमाण प्रमाणित दरापेक्षा चांगले ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतू शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज प्रत्येक वर्षामध्ये आर्थिक समस्यामध्ये जास्त जात आहे. तर महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली याचा दोन वर्षाचा अपवाद सोडला तर त्यांनी सुध्दा हा दर प्रमाणित दराशी निगडीत राहील याची दक्षता घ्यावी.

### सारांश

चालु मालमत्ता व देयता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालु मालमत्ता ही चालु देयतेपेक्षा जास्त आहे त्यामुळे या तीन्ही सूत गिरण्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे तर शरद व महात्मा फुलेची आर्थिक स्थिती चांगली नाही.

**संदर्भ :-**


१) डॉ. संजय पाठनकर(वर्ष १९९९), व्यवस्थापकीय लेखाकर्म, निराली प्रकाशन, पुणे.

२) पातकर एम.जी. (वर्ष २००५) व्यवस्थापकीय लेखाकर्म, फडके प्रकाशन कोल्हापूर.

३) एन.के. प्रसाद (वर्ष १९९२) परिवेय लेखाकर्म, हिमालय पब्लीकेशन, नई दिल्ली.

४) डॉ. चौधरी (वर्ष २००३) व्यवस्थापकीय लेखाकर्म, सेठ प्रकाशन, मुंबई.

५) डॉ. कविमंडन विजय, (वर्ष १९९६) कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) प्रा. देव सु.पां., प्रा. झामरे ग.ना. (वर्ष १९८८) मुद्रा उत्पन्न व रोजगार सिध्दांत, प्रकाशक मनोहर पिंपळापूरे, ॲन्ड कंपनी पब्लीशर्स, रामदास पेठ, नाग मुद्रणालय, नागपूर.

७) डॉ. प्रा. पाटील लीला, प्रा. डांगे अशोक, (वर्ष १९९७) भारतीय अर्थव्यवस्था, रचना व समस्या भाग-१, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

८) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, (वर्ष २००१-११) वळसंग यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

९) शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, (वर्ष २००१-११) सांगोले यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

१०) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, (वर्ष २००१-११) नान्नज यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

११) महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, (वर्ष २००१-११) वाघोली यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

१२) शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, (वर्ष २००१-११) सांगोले यांचे आर्थिक वार्षिक अहवाल.

## प्रकरण ६ वे

## सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगारांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण

६ अ निवड कामगारांची सर्वसाधारण माहिती

६ ब निवड कामगारांची सामाजिक परिस्थिती

६ क निवड कामगारांची आर्थिक परिस्थीती

६ ड कल्याणकारी सुविधा

६ इ कामगार संघटना

# प्रकरण सहावे

# सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगारांचे

# सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती. प्रस्तुत प्रकरणाची अ, ब, क, ड व इ या पाच गटात विभागणी केली आहे.

अ) निवड कामगारांची सर्वसाधारण महिती.

ब ) निवड कामगारांची सामाजिक परिस्थिती.

क) निवड कामगारांची आर्थिक परिस्थिती.

ड) कल्याणकारी सुविधा.

इ) कामगार संघटना.

६.१ सैध्दांतिक पार्श्वभूमी

६.२ गृहितकांची तपसणी

**६.१ प्रस्तावना :-**

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूतगिरण्यामधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे हा एक प्रमुख अभ्यासाचा हेतू डोळ्या समोर ठेवला आहे. यासाठी कामगारांची प्रत्यक्ष माहिती प्राप्त करणे हे देखील आवश्यक आहे. सध्या सूत गिरणीमध्ये सूत उत्पादनाशी निगडीत असलेल्या विभागात ३५४७ अशी एकूण कामगारांची संख्या आहे. अभ्यासासाठी सूत उत्पादनाशी निगडीत असलेल्या विभागातील कामगारांची निवड केलेली आहे. निवड करताना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी सोयीस्कर व लॉटरी पद्धतीचा वापर केला आहे.

अशा एकूण ३५४७ कामगारांच्या १० टक्के हे प्रमाण निश्चित करून ३५४ कामगारांची यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा अवलंब करून कामगारांची निवड केली. व त्यांची अनुसूचिद्वारे प्रत्यक्ष कामगारांच्या मुलाखती घेऊन तथ्य संकलन केले आहे. कामगारांनी माहिती देण्यासाठी चांगलाच प्रतिसाद दिला. शिवाय विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे अधिक मुक्तपणे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हा प्रतिसाद समाधानकारक वाटतो. मुलाखतीसाठी तयार केलेली अनुसूची ही प्रामुख्याने मराठी भाषेतून असल्याने कामगारांना सहज आणि सूलभ उत्तरे देणे शक्य झाले. अर्थात नमुना पद्धतीच्या नियमानुसार व पाहणीनुसार येणारे निष्कर्ष कमी अधिक प्रमाणात सर्व कामगारांच्या बाबतीत लागू करता येतील. म्हणून शक्यतेच्या मर्यादेत या केलेल्या पाहणीवरून येणाऱ्या निष्कर्षांची सर्वसामान्यकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ६.२ (अ) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगारांची सर्व साधारण माहिती :-

नमुना निवड पद्धतीने सर्वेक्षण करताना प्रथमतः कामगारांच्या एकूण प्रवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी कामगारांची वैयक्तिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचे वर्गीकरण, त्यांचे वयोमानानुसार वर्गीकरण, त्यांचे शिक्षण व प्रशिक्षण, त्यांची भाषा व धर्म व त्यांचे कौटुंबिक आकारमान इत्यादी. तसेच कुटुंबाचा आकार पाहत असताना विवाहित व अविवाहित त्यांच्या रोजगारीचे स्वरूप, त्यांचे भरती करण्याचे मार्ग इत्यादी सर्व माहितीचा आढावा घेतला आहे.

वरील सर्व माहितींचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

### १. निवड कामगारांचे राहण्याच्या ठिकाणावरुन वर्गीकरण :-

उत्पादनाच्या प्रक्रियेतील भूमी, भांडवल, श्रम व संयोजन या चार घटका पैकी श्रम हा घटक जीवंत व नाशवंत असतो. त्यासाठी इतर घटकापेक्षा त्याची काळजी घेणे आवश्यक असते. एखाद्या उद्योगसंस्थेत काम करणारा कामगार हा कोठून येतो, त्याचे राहण्याचे ठिकाणआणि कामाचे ठिकाण याचा विचार करणे अत्यंत आवश्यक असते. त्यानुसार सूत गिरण्यामधील कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणाचा विचार करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.१ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१**

**निवड कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणावरून वर्गीकरण**

| **अ. क्र.** | **तपशील** | **निवड कामगार संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| **१.** | स्थानिक कामगार | १९७ | ५५.५६ |
| **२.** | बाहेरील कामगार | १५७ | ४४.४४ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरुन.

कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणावरूनच्या तक्त्यावरून असे दिसून येते की, ३५४ कामगारापैकी १९७ कामगार हे स्थानिक भागातील सूत गिरणीच्या जवळच्या परिसरातील असून १५७ कामगार हे बाहेरील आसपासच्या भागातून येणारे आहेत. याचाच अर्थ असा की, स्थानिक भागातील ५५.५६ टक्के कामगार व बाहेरील ४४.४४ टक्के कामगार सूत गिरणीमध्ये कामासाठी येतात. म्हणजेच सूत गिरणीमध्ये निम्म्यापेक्षा अधिक स्थानिक कामगारांना रोजगार उपलब्ध झाला असला तरी तो सूत गिरणीच्या जवळच्या परिसरातील कामगारांना रोजगार मिळालेला आहे. मात्र स्थानिक आणि बाहेरील कामगार यात फार मोठी तफावत दिसत नाही.

## २. निवड कामगारांचे वयोमानानुसार गटवारी :-

उत्पादकता अधिक वाढण्यासाठी कामगारांच्या वयोमानाचा देखील विचार करणे आवश्यक असते. अर्थात उत्पादन कार्यक्षमता वाढीसाठी केवळ कामगारांचा वयोगटच विचारात घेतला जातो असे नाही, तर उत्पादन कार्यक्षमता वाढीसाठी अन्य घटक देखील कारणीभूत असतात. यामध्ये कामगारांच्या वयोमानानुसार चार गट पाडलेले आहेत. ते तक्ता क्रमांक ६.२ मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता क्रमांक ६.२**

**निवड कामगारांची वयानुसार गटवारी**

| **अ. क्र.** | **वयोगट** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | १५ ते २५ वर्षे | १२५ | ३५.१९ |
| २. | २६ ते ३५ वर्षे | १५१ | ४२.५९ |
| ३. | ३६ ते ४५ वर्षे | ५२ | १४.८१ |
| ४. | ४५ वर्षावरील | २६ | ७.४१ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, वयोमानानुसार पाडलेल्या चार गटामधील ३५४ कामगारापैकी १२५ कामगार १५ ते २५ वर्षे वयोगटातील आहेत. तर १५१ कामगार २६ ते ३५ वर्षे वयोगटातील आहेत. ५२ कामगार ३६ ते ४५ वर्षे वयोगटातील तर २६ कामगार ४५ वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत. म्हणजे यावरून असे दिसते की, २६ ते ३५ या वयोगटातील कामगारांची संख्या ही इतर गटापेक्षा अधिक आहे. म्हणजेच ती ४२.५९ टक्के इतकी आहे. अर्थात हा वयोगट म्हणजे अधिक तरूण वयोगट समजला जातो. त्यानुसार कार्यक्षमतेची तुलना करता हा वयोगट अधिक कार्यक्षम व कर्तव्यदक्ष असतो. अशा कामगारांची संख्या सूत गिरणीमध्ये अधिक असेल तर एकूण सूत गिरणीच्या उत्पादन वाढीला चालना मिळण्यास हरकत नाही. अर्थात वयानुसार केलेल्या वर्गिकरणावर केवळ कार्यक्षमतेचे मापन करणे म्हणजे एका बाजूचा विचार करणे होय. कारण कामगारांच्या शारिरीक व मानसिक कार्यक्षमतेबरोबर सूत गिरणीतील इतर अनेक घटकांचा म्हणजे भांडवल, व्यवस्थापन, कच्चा मालाचा पुरवठा, विद्युत पुरवठा, यंत्रसामुग्री, वाहतूक व्यवस्था, सभोवतालची परिस्थिती, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीचाही परिणाम उत्पादन वाढीवर होत असतो. त्यादृष्टीने त्याचाही अभ्यास करणे अवश्यक ठरते.

## ३. निवड कामगारांचे शिक्षण व प्रशिक्षणावरून वर्गीकरण :-

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कामगारांचे शिक्षण आणि प्रशिक्षण यांचाही उत्पादकतेशी निकटचा संबंध असतो. कामगार सुशिक्षित व प्रशिक्षित असेल तर त्याचा निश्चित परिणाम उत्पादन वाढीवर होतो. त्यानुसार सूत गिरण्यातील कामगारांचे शिक्षण व प्रशिक्षणानुसार एकूण पाच गटात वर्गीकरण केले आहे. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.३ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.३**

**शिक्षण व प्रशिक्षणानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण**

| अ. क्र. | शिक्षण | निवड कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ६५ | १८.५२ |
| २. | प्राथमिक शिक्षण | ५९ | १६.६७ |
| ३. | माध्यमिक शिक्षण | १११ | ३१.४८ |
| ४. | उच्च माध्यमिक शिक्षण | ८५ | २४.०७ |
| ५. | महाविद्यालयीन शिक्षण | ३२ | ९.२६ |
| ६. | पदव्युत्तर शिक्षण | २ | --- |
| | **एकूण :-** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरुन.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी अशिक्षित कामगारांची संख्या ६५ आहे. तर प्राथमिक शिक्षण घेतलेले ५९ कामगार आहेत. मात्र माध्यमिक शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या १११ आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांची संख्या ८५ आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या फक्त ३२ आहे. थोडक्यात वरील वर्गिकरणावरून असे दिसून येते की, माध्यमिक शिक्षण घेतलेले कामगार हे संख्येने सर्वाधीक आहेत. ते म्हणजे १११ एवढे आहेत. याचा अर्थ या कामगारांना एक तर माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर तातडीने रोजगार प्राप्त करणे आवश्यक वाटत असावे. कारण त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही त्यांना पुढील शिक्षण देऊ शकत नसावी. तर काही कामगार उच्च माध्यमिक म्हणजे १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. असे ८५कामगार आहेत. त्यांनी देखील पुढील शिक्षण न घेता नोकरी स्विकारलेली आढळते. तसेच काही कामगारांना असे वाटत असेल की, महाविद्यालयीन शिक्षण प्राप्त करून पुन्हा रोजगारीचा शोध घेण्यापेक्षा अल्पवेळेत नोकरी मिळविणे आवश्यक वाटत असल्याने त्यांनी पुढील शिक्षण घेतले नाही. त्यामुळे किमान आवश्यक

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणानंतर नोकरी मिळविणे हाच उद्देश त्यांच्या मुलाखतीतून दिसून आला. सूत गिरणीत अशिक्षित कामगारांची संख्या कमी असली तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यासारखे नाही. सूत गिरणीच्या स्पिनिंग विभागातील उपविभागानुसार नमुन्यासाठी घेतलेल्या ३५४ कामगारांपैकी ३०० कामगार कुशल तर ५४ कामगार अकुशल असल्याचे दिसून आले. परंतू हे अकुशल असलेल्या कामगारांना सूत गिरणीतर्फे प्रशिक्षण देवून कुशल करण्याचे कार्य व्यवस्थापना मार्फत केले जात असल्याने सर्व कामगार कालांतराने कुशल होतात. या सर्व शिक्षित व कुशल कामगारामुळे सूत उत्पादन वाढण्यास मदत होत आहे.

**४. निवड कामगारांची कौटुंबिक आकारमानानुसार विभागणी :-**

कुटुंबाच्या आकारमानानुसार व उत्पन्नानुसार कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा ठरत असतो. मात्र त्याच बरोबर कुटुंबातील मिळवत्या आणि न मिळवत्या व्यक्तिंची संख्या पाहणे देखील अवश्यक असते. एकंदरीत सूत गिरण्यातील कामगारांच्या कुटुंबातील आकार खालील तक्ता क्रमांक ६.४ वरुन दिसून येईल.

**तक्ता क्रमांक ६.४**

**निवड कामगारांचे कौटुंबिक आकारमान**

| **अ. क्र.** | **कुटुंबाचा आकार** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | ३ ते ५ व्यक्ती | २२३ | ६२.९६ |
| २. | ६ ते ८ व्यक्ती | १०५ | २९.६३ |
| ३. | ९ व्यक्ती पेक्षा अधिक | २६ | ७.४१ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सूत गिरण्यामधील कामगारांचा कुटुंबाचा आकार ३ ते ५ व्यक्ती असलेले कुटुंबाचे प्रमाण ६२.९६ टक्के ६ ते ८ व्यक्ति असलेल्या कुटुंबाचे प्रमाण २९.६३ टक्के तर ९ पेक्षा अधिक व्यक्ति कुटुंबात असलेले ७.४१ टक्के आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, कमी व्यक्ती असलेल्या कुटुंबाची संख्या सर्वात जास्त आहे. म्हणजेच त्याचे प्रमाण ६२.९६ टक्के आहे. याचाच अर्थ कामगारांना देखील कुटुंब नियोजनाचे महत्व पटलेले दिसून येते. त्यामुळे मर्यादित कुटुंबाची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे. तसेच लहान कुटुंब असल्याने राहणीमानाचा दर्जा देखील चांगला ठेवता येतो, याची जाणीव सूत गिरण्यातील कामगारांना आहे, हे मुलाखतीच्या चर्चेतून स्पष्ट झाले.

**५. निवड कामगारांच्या विवाहित /अविवाहिता संबंधी :-**

सूत गिरण्यामधील कामगारांच्या विवाहित व अविवाहिता संबंधीची माहिती खालील तक्त्यावरून दिसून येईल.

**तक्ता क्रमांक ६.५**

**निवड कामगारांच्या विवाहीत/ अविवाहित दर्जानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | दर्जा | निवड कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विवाहीत | २२९ | ६४.८१ |
| २. | अविवाहित | ३३ | ९.२६ |
| ३. | विधूर | ६६ | १८.५२ |
| ४. | घटस्फोटीत | २६ | ७.४१ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नमुन्या दाखल घेतलेल्या ३५४ कामगारापैकी २२९ कामगार विवाहित तर ३३ कामगार अविवाहित असल्याचे दिसून आले. तसेच विधूर कामगारांमध्ये ६६ कामगार आहेत व घटस्फोटीत २६ कामगार आहेत. विधूर व घटस्फोटीत कामगारामध्ये महिला आहेत. या कामगारांना सूत गिरणीमुळे उत्पन्नाचा आधार मिळालेला आहे. असे विधूर व घटस्फोटीत महिला कामगारांच्या मुलाखतीतून दिसून आले. विवाहितापेक्षा यांचे प्रमाण तसे कमीच आहे. जवळ जवळ ९४.८१ टक्के कामगारावर कौटुंबिक जबाबदारी पडलेली आहे. मात्र कौटुंबिक जबाबदारीची जाणीव नसणारे ७ टक्के कामगार हे आपल्या नोकरी विषयी व उत्पन्नाविषयी अधिक काळजीपूर्वक निर्णय घेताना मुलाखतीत आढळून आले.

**६. निवड कामगारांच्या रोजगारीचे स्वरूप :-**

कामगारांच्या रोजगारीचे स्वरूप दोन प्रकारचे असते. एक म्हणजे कायमचे कामगार दुसरे बदली किंवा हंगामी कामगार अर्थात याला सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगार अपवाद असतील असे मात्र नाही. एकंदरीत सूत गिरण्यामधील कामगारांच्या रोजगारीचे स्वरूप खालील तक्ता क्रमांक ६.६ वरून दिसून येईल.

**तक्ता क्रमांक ६.६**

**रोजगारीचे स्वरूप**

| अ.क्र. | रोजगारीचे स्वरूप | निवड कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | कायम कामगार | २८३ | ८०.०० |
| **२.** | हंगामी / बदली कामगार | ७१ | २०.०० |
| **३.** | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून निवडलेल्या ३५४ कामगारांपैकी २८३ कामगार हे कायम स्वरूपी नोकरीत तर हंगामी किंवा बदली कामगारांची संख्या फक्त ७१ आहे. कायम कामगारांची संख्या ८० टक्के आहे तर हंगामी किंवा बदली कामगारांची संख्या २० टक्के असल्याचे दिसते. कामगारांच्या कायम स्वरूपावरून असे दिसते की, कामगारांमध्ये स्थलांतर करण्याची प्रवृत्ती किंवा वारंवार रोजगार बदलण्याची प्रवृत्ती फारशी दिसत नाही. म्हणजेच कामगारांच्या स्थलांतराचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते.

**७. कुटूंब पद्धती :-**

पूर्वी भारतात एकत्र किंवा संयुक्त कुटुंब पद्धती मोठया प्रमाणात अस्तित्वात होती मात्र अलिकडे संयुक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण घटू लागले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील ३५४ निवड कामगारापैकी ६३ टक्के कामगार विभक्त कुटूंब पद्धतीत राहतात तर ३७ टक्के कामगार संयुक्त कुटूंब पद्धतीत राहत असल्याचे दिसून येते.

## ६.३ (ब) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील निवड कामगारांची सामाजिक परिस्थिती :-

कामगारांची आर्थिक परिस्थिती पाहत असताना कामगाराला मिळणाऱ्या पैशातील वेतनाचा विचार केला जातो. परंतू कामगारांच्या वास्तविक वेतनात पैशातील उत्पन्नाबरोबर इतर मिळणाऱ्या सामाजिक सुविधांचा विचार करणे आवश्यक ठरते. वास्तविक पाहाता कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा हा त्याला मिळणाऱ्या केवळ पैशातील उत्पन्नवर अवलंबून नसतो तर इतर मिळणाऱ्या सोईसवलतींचा देखील प्रभाव त्यावर पडत असतो. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करताना त्यांना विचारलेल्या विविध प्रश्नांवरून सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**१. कामगार-कामगारामधील संबंध :-**

अनुसूचिद्वारे विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरावरून असे दिसते की, सूत गिरण्यामधील नमुन्यादाखल निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी ३०१ कामगार मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध ठेवणारे आहेत. फक्त

कामापुरते संबंध ठेवणाऱ्या कामगारांची संख्या ५३ एवढी आहे. म्हणजेच जास्तीत जास्त कामगारांचे आपआपसातील संबंध मित्रत्वाचे आणि सहकार्याचे असल्याचे दिसून येते.

**२. अडीअडचणींच्या वेळी मदत :-**

३५४ निवड केलेल्या कामगारांपैकी ९० टक्के कामगार अडचणीच्यावेळी एकमेकांना मदत करतात. तर १० टक्के कामगार अडीअडचणीच्यावेळी एकमेकांना मदत करीत नाहीत. सारांश जास्तीत जास्त कामगारांमध्ये सहकार्याची भावना आहे. त्यांच्यात काम अडवून ठेवण्याची प्रवृत्ती दिसत नाही. थोडक्यात आपल्या सहकाऱ्यांना अडीअडचणीच्यावेळी मदत करण्याची त्यांची मानसिक तयारी आहे.

केवळ सूत गिरण्यामध्ये हे कामगार एकमेकांना मदत करतात असे नाही तर सूत गिरणीच्या कामाव्यतिरिक्त अडीअडचणी वेळी देखील मदत करतात. कामाव्यतिरिक्त इतर वेळी एकमेकांना मदत करणाऱ्या कामगारांचे प्रमाण ९० टक्के आहे. तर मदत न करणाऱ्या कामगारांचे प्रमाण केवळ १० टक्के आहे. याचाच अर्थ सूत गिरणीच्या कामाशिवाय बाहेर देखील कामगार एकमेकांना अडीअडचणीच्यावेळी मदत करतात. मात्र अशा कामगारांसाठी सूत गिरण्यांनी ग्राहक भांडाराची सोय केलेली आहे. हे ग्राहक भांडार सहकारी तत्वावर चालविले जाते. हे भांडार स्थापन करण्यामध्ये सूत गिरण्यांचा महत्वाचा वाटा आहे. या भांडारातून कामगारांना स्वस्त दरामध्ये जीवनावश्यक वस्तू पुरविल्या जातात.

अनुसूचिच्या तथ्य संकलनावरून सूत गिरण्यामधील ३५४ नमुन्यादाखल घेतलेल्या कामगारांपैकी ६० टक्के कामगार स्थलांतर करीत नसल्याचे दिसून आले. तर ४० टक्के कामगार नोकरी शोधण्यासाठी जन्मगावी जमीन नसल्याने, कमी उत्पन्न असल्याने, कुटूंबातील संघर्षामुळे आणि कुटूंबाच्या आकारामुळे इत्यादी कारणाने स्थलांतर केल्याचे आढळून आले. म्हणजेच वरील सर्व कारणांपैकी जवळ जवळ ४० टक्के कामगार इतर ठिकाणाहून नोकरीसाठी सूत गिरणीमध्ये स्थलांतर केल्याचे निदर्शनास आले.

**३. भाषा व धर्मानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण :-**

भारत हा अनेक भाषांनी व धर्मांनी व्यापलेला देश आहे. त्यामुळे देशाच्या ऐक्याला बाधा येऊ लागली आहे. जरी अनेक भाषा अनेक धर्म असले तरी आम्ही सर्व भारतीय आहोत अशी जर भावना नागरिकांनी व कामगारांनी ठेवली तर देशाचे ऐक्य कायम राहील व त्यामुळे औद्योगिक शांतता निर्माण होऊन उत्पादकता वाढेल. सूत गिरण्यातील एकंदरीत पाहणीवरून त्यांच्यात ऐक्याची व सहकार्याची भावना कामगारांमध्ये निर्माण झालेली आहे. सूत गिरण्यामध्ये असलेल्या कामगारांची भाषा व धर्मानुसार केलेले वर्गीकरण तक्ता क्र. ६.७ मध्ये दर्शविलेला आहे.

**तक्ता क्रमांक ६.७**

**भाषावार निवड कामगारांचे वर्गीकरण**

| अ. क्र. | भाषा | निवड कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी | ३०२ | ८५.१८ |
| २. | हिंदी | २० | ५.७२ |
| ३. | कन्नड | २० | ५.७२ |
| ४. | उर्दू | १२ | ३.३८ |
| ५. | इतर | --- | --- |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्ता क्रमांक ६.७ मध्ये मुख्यतः मराठी भाषिक कामगारांची संख्या अधिक म्हणजे ८५.१८ टक्के आहे. हिंदी भाषिकांचे प्रमाण ५.७२ टक्के तर कन्नड भाषिकांचे प्रमाण देखील ५.७२ टक्के आहे. इतर ३.३८ टक्के यामध्ये सर्वात जास्त कामगारांची भाषा मराठी आहे. अर्थात बहुसंख्य कामगारांची भाषा एकच असल्याने विचारांची देवाणघेवाण सहज सुलभ होऊ शकते. त्यांच्या मध्ये आपले पणाची व एकोप्याची भावना निर्माण होऊ शकते. एकमेकांबरोबर प्रसंगी तडजोड करण्यास कामगार तयार होतात. कामगारांतील अंतर्गत कलह व तंटे केव्हाही कोणत्याही कारखान्याला किंवा सूत गिरणीला धोकादायक ठरतात. परंतु येथे मात्र असा अंतर्गत कलह फारसा असेल असे वाटत नाही. उलट कामगार संघटेमध्ये एकीचे बळ वाढविण्यास एकोप्यामुळे मदत होते.

**५. धर्मानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण :-**

**तक्ता क्रमांक ६.८**

**धर्मानुसार निवड कामगारांचे वर्गीकरण**

| अ. क्र. | धर्म | निवड कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | २८४ | ८०.०० |
| २. | मुस्लिम | ३५ | १०.०० |
| ३. | इतर | ३५ | १०.०० |
| | **एकूण :-** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

भारतात धर्म हा शब्द जसा आदरणीय वाटतो तसाच तो धोकादायक देखील वाटू लागला आहे. कारण धर्माच्या नावाखाली धर्माचा पोकळ अभिमान आणि त्यातून निर्माण होणारे दोष व संघर्ष वाढण्याला अलिकडील काळात चालना मिळू लागली आहे. त्यामुळे देशातील सामाजिक शिस्त बिघडत जाऊ लागली आहे. सूत गिरणीमध्ये धर्मानुसार भेदभाव पाहयचा नाही. परंतू तक्ता क्रमांक ६.८ वरून असे दिसते की,

८०.०० टक्के कामगार हिंदू धर्माचे, १०.०० टक्के कामगार मुस्लिम धर्माचे तर १०.०० टक्के कामगार इतर धर्मीय आहेत. मुलाखती मध्ये ज्या पद्धतीने कामगारांनी प्रतिसाद दिला त्यावरून असे वाटते की, धर्म किंवा भाषा जात  हे कामगारांच्यामध्ये मतभेदाचे कारण दिसत नाही.

**तक्ता क्रमांक ६.९**

**जातीनुसार निवड कामगारांचे वर्गीकरण**

| **अ.क्र.** | **जाती** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | मराठा | ७१ | २०.०० |
| २. | हरिजन | ७१ | २०.०० |
| ३. | मुस्लिम | ७० | २०.०० |
| ४. | लिंगायत | ७१ | २०.०० |
| ५. | इतर | ७१ | २०.०० |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यामध्ये एकाच विशिष्ट जातीचे कामगार नाहीत. तर सर्व जातीचे कामगार काम करीत आहेत. तरीपण सर्व जाती धर्मातील लोकांना एक रोजगाराची संधी मिळावी या प्रेरणेने ह्या सूत गिरण्या स्थापना झालेल्या आहेत. देशात अनेक जातीचे लोक राहतात. केवळ जातीवरून एखादी व्यक्ति श्रेष्ठ की कनिष्ठ मानण्याचा प्रघात काही काळ होता. परंतू अलीकडे या विचाराला फाटा दिला जातो. सद्य परिस्थितीत एखाद्या व्यक्तिचे श्रेष्ठत्व हे तिच्या अंगी असलेल्या गुणांवरून, त्याच्या कर्तुत्वावरून ओळखले जाते. अर्थात सूत गिरण्यामध्ये कामगारांच्या अशा प्रकारच्या गुणांवरून कामगार श्रेष्ठ मानला जातो. त्या ठिकाणी त्याच्या जाती, धर्माचा विचार केला जात नाही. तक्ता क्रमांक ६.९ वरून असे दिसून येते की, सूत गिरणीमध्ये मराठा जातीच्या कामगारांचे प्रमाण २०.०० टक्के, हरिजन कामगारांचे प्रमाण २०.०० टक्के, लिंगायत २०.०० टक्के, मुस्लिम २०.०० टक्के तर इतर कामगारांचे प्रमाण २०.०० टक्के असल्याचे आढळते. २०.०० टक्के इतर जातीच्या कामगारांमध्ये विशेषतः मांतग, होलार, चांभार, धनगर, कोळी, कुंभार, माळी, भोई, परीट, ब्राम्हण इत्यादींचा समावेश होतो.

## ६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील निवड कामगारांच्या भरतीचे मार्ग :-

सूतगिरण्यामध्ये नोकर भरतीसाठी निरनिराळया मार्गाचा अवलंब करण्यात आला. सूत गिरण्यामध्ये विविध माध्यमातून कामगारांची भरती करण्यात आली. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.१० मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१०**

**निवड कामगारांच्या भरतीचे मार्ग**

| **अ.क्र.** | **निवड कामगार भरतीचे मार्ग** | **एकूण संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| **१.** | जाहिराती द्वारे | २० | ५.५६ |
| **२.** | उद्योग विनिमय केंद्राद्वारे | ३२ | ९.२६ |
| **३.** | सुपर वायझर /जॉबरद्वारे | ४६ | १२.९६ |
| **४.** | सूत गिरणीतील मित्र, नातेवाईका द्वारे | १६४ | ४६.२९ |
| **५.** | व्यवस्थापनास विनंती अर्ज करून | ९२ | २५.९३ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, मित्र मंडळी व नातेवाईक यांच्या साहय्याने ४६.२९ टक्के कामगारांची भरती केलेली आहे. तसेच त्या परिसरातील बेरोजगारांनी व्यवस्थापनेस विनंती अर्ज करून २५.९३ टक्के कामगारांची भरती करण्यात आलेली आहे. मित्र व नातेवाईक आणि व्यवस्थापनेस विनंती अर्ज करून भरलेल्या कामगारांची संख्या ७० टक्के आहे. जाहिरातीद्वारे ५.५६ टक्के, उद्योग विनिमय केंद्राद्वारे ९.२६ टक्के तर सुपरवायझर व जॉबर द्वारे १२.९६ टक्के असे एकंदरीत सूत गिरण्यातील कामगार भरतीचे स्वरूप दिसते. अर्थात वरील प्रमाण हे १०० टक्के निवड कामगारापैकी आहे. सूत गिरण्या मधील कामगार भरती मध्ये जाहिरात व उद्योग विनिमय केंद्राद्वारे भरती झालेल्या कामगारांचे प्रमाण कमी आहे. मित्र मंडळी व नातेवाईक तसेच प्रशासनास विनंती अर्ज करून भरलेले कामगार अधिक आहेत. ही वैशिष्टयपूर्ण बाब आहे.

अलिकडील काळात कोणत्याही नोकर भरतीच्या ठिकाणी अनेक गोष्टींची अमिषे दाखविली जातात. तसेच देणगी, डोनेशन, इत्यादींचा वापर करून नोकर भरती केली जाते. परंतू सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये अशा कोणत्याही मार्गाचा अवलंब करून नोकर भरती केल्याचे आढळून आले नाही. सूत गिरणीमधील नोकर भरतीच्या बाबतीत एक बाब प्रशासनात जाणवते ती म्हणजे ३५४ कामगारांपैकी फक्त ५.५६ टक्के कामगार जाहिरातीद्वारे तर ९.२६ टक्के कामगारांची भरती उद्योग विनिमय केंद्राद्वारे केल्याचे तथ्य संकलनावरून आढळून आले. विशेषतः नोकर भरतीसाठी सरकारने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उद्योग विनिमय केंद्राची स्थापना केली असताना व जाहिरातीद्वारे कामगारांची भरती केली जावी अशा प्रकारचे नियम व अटी असताना देखील सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये ७० टक्के कामगारांची भरती ही अन्य मार्गाने केल्याचे आढळते. अशा प्रकारची भरती केल्याने संबंधित कामगार प्रशिक्षित, कुशल, कार्यक्षम असेलच असे नाही, कारण तो थोडक्यात वशिल्यानेच भरलेला

असतो. त्यामुळे अशा कामगारांच्या भरतीचा प्रतिकूल परिणाम उत्पादन घटण्यावर झाल्याशिवाय राहणार नाही.

जर सूत गिरण्यांनी जाहिरात देऊन व उद्योग विनिमय केंद्राद्वारे कामगारांची भरती केली तर सूत गिरण्यांना चांगले कुशल, प्रशिक्षित, अनुभवी व कार्यक्षम कामगार मिळू शकतील. तसेच सहकार महाविद्यालय व प्रशिक्षण संस्थेतून माहिती मिळवून कामगारांची भरती करु शकतात.

**११. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगारांच्या समस्या**

अलिकडील काळात कामगारांच्या अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सर्व समस्यांचे निराकरण करणे केवळ कामगारालाच नव्हे तर व्यवस्थापकांना, सरकारला, संचालक मंडळांना कुटूंबातील व्यक्तिंना शक्य नसते. परंतु किमान जीवनमान जगण्यासाठी त्यांना किमान वेतन देणे आवश्यक असते. त्यासाठी सरकारने किमान वेतनाचे कायदे केले आहेत. परंतू एवढयानेच या समस्या सुटत नाहीत. सूत गिरण्यामधील कामगारांच्या ज्या काही समस्या आहेत त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.११ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.११**

**निवड कामगारांचे समस्यानुसार वर्गीकरण**

| **अ.क्र.** | **सूत गिरणीमधील कामगारांच्या समस्या** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | निर्वाह वेतन समस्या | २१० | ५९.२६ |
| २. | बढतीची संधी नाही | २६ | ७.४१ |
| ३. | सहकार्याचा अभाव | ३९ | ११.११ |
| ४. | इतर समस्या | ७९ | २२.२२ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, कामगारांना वरील विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. वरील विविध समस्यांपैकी विशेषतः निर्वाह वेतन समस्या असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ५९.२६ टक्के आहे. इतर समस्या असणाऱ्या कामगारांचे प्रमाण २२.२२ टक्के आहे. तर बढतीची संधी मिळत नाही असे म्हणणारे ७.४१ टक्के कामगार आहेत. सहकार्य मिळत नाही असे म्हणणाऱ्या कामगारांचे प्रमाण ११.११ टक्के आहे. यामध्ये विशेषतः सर्वच कामगारांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागते. तसेच कामगारांनी आरोग्यविषयक व शैक्षणिक सुविधेबद्दल काहीही प्रतिक्रीया व्यक्त केलेली नाही.

**१२. बढतीच्या संधी :-**

कामगार सेवे मध्ये असताना त्यांना सेवा काळात बढती दिली जाते. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये कामगारांना कोणत्या निकषावर बढती दिली जाते. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.१२ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१२**

**निवड कामगारांच्या बढतीच्या बाबी**

| **अ.क्र.** | **बढतीच्या बाबी** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| **१.** | सेवा ज्येष्ठता | २४९ | ७०.३७ |
| **२.** | शिक्षण | २६ | ७.४१ |
| **३.** | उत्कृष्ठ कार्यक्षमता | ३२ | ९.२६ |
| **४.** | जातीय प्रभाव | ४७ | १२.९६ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सूत गिरण्यामध्ये मुख्यत: सेवा जेष्ठतेवर बढती मिळते. याला जवळ जवळ ७०.३७ टक्के कामगारांनी पाठींबा दर्शविला आहे. १२.९६ टक्के कामगारांचे असे मत आहे की, जातीय प्रभावानुसार बढती दिली जाते. उत्कृष्ठ कार्यक्षमतेवर बढती मिळते असे म्हणणारे केवळ ९.२६ टक्के कामगार आहेत. तर शिक्षणावर बढती दिली जाते असे म्हणणारे केवळ ७.४१ टक्के कामगार आहेत. सूत गिरण्यामध्ये कामगारांना त्यांच्या शिक्षणावर बढती मिळण्याचे प्रमाण कमी आहे. म्हणूनच कदाचित सूत गिरण्यामध्ये उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या कमी आढळते. तसेच नोकरी करता करता शिक्षण घेतले तरी केवळ त्यामुळे बढती मिळत नाही. ही जाणीव कामगारांच्यामध्ये निर्माण झाल्यानंतर ते शिक्षणाच्या पाठीमागे लागत नसावेत असे म्हणता येईल.

**१३. कामगारांच्या आरोग्याविषयी सोई :-**

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांधमील कामगारांसाठी प्राथमिक उपचार केंद्राची सोय केलेली आहे. तसेच कामगार राज्य विमा कंपनीतर्फे कामगारांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सूत गिरण्यांमध्ये कामगारांना किरकोळ अपघात झाल्यास प्रथमोपचार करण्याची सोय आहे. एकंदरीत आरोग्याच्या सर्व सुविधा सूत गिरण्यांनी केलेल्या आहेत. मात्र त्यामध्ये कामगार राज्य विम्याचा वाटा महत्वाचा समजला जातो. म्हणूनच सूत गिरण्यामधील ८५ टक्के कामगारांच्या मते आरोग्याच्या सोई सूत गिरणीमध्ये उपलब्ध केल्या आहेत. तर १५ टक्के कामगारांना त्या पुरेशा वाटत नाहीत. तसेच ९२ टक्के कामगारांच्या मते काम करण्याची जागा, प्रकाश, धूळ, उष्णता, आर्द्रता याबाबतीत सोईची आहे. तर ८

टक्के कामगारांचे मत सदर परिस्थिती सोईची नाही असे आहे. ९५ टक्के कामगारांच्या मते प्रामुख्याने कायमचा किंवा तात्पुरता आजार झालेला नाही तर ५ टक्के कामगारांच्या मते तात्पुरता आजार झालेला आहे असे मत आहे. येथे बहुसंख्य कामगारांच्या मते काम करण्याची जागा स्वच्छ व प्रकाशमय अशी आहे. त्यामुळे बहुसंख्या कामगार हे सदृढ व निरोगी आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातर्फे सर्व कामगारांना कामावरून घरी जातेवेळी फळामध्ये केळीचे, शेंगा, गुळ मोफत वाटप केले जाते. त्यामुळे कामगारांच्या दररोज आहारामध्ये केळीचा समावेश झाल्याने त्यांचे शरीर निरोगी व सुदृढ असल्याचे आढळते. एखाद्या व्यसनामुळे देखील कामगारांना आजार जडला आहे असे वाटत नाही. कारण ९० टक्के कामगारांना कोणतेही व्यसन नाही तर १० टक्के कामगारांना जे व्यसन आहे. तेही पान, तंबाखू याचेच आहे. तसेच एकाही कामगाराला दारूचे व जुगाराचे व्यसन नाही हे विशेष आहे. सूत गिरण्यामधील ९० ते ९५ टक्के कामगारांना व्यसन नसल्याने व निरोगी शरीर आणि आजारी न पडण्याचे कारण म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमध्ये २ ते ३ महिन्याला सर्व कामगारांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाते. तसेच आरोग्य विषयक तज्ञ डॉक्टरांचे व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच व्यसनाचे दुष्परिणाम यावर देखील तज्ञाचे मार्गदर्शन व व्याख्याने सूत गिरण्यामध्ये आयोजित केली जातात. त्यामुळे सूत गिरण्यांमधील कामगारांमध्ये जागरुकता निर्माण झालेली आढळते. त्यामुळे बहुसंख्य कामगार निरोगी व सुदृढ असल्याचे आढळते.

शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले या सूत गिरणीतर्फे वर्षाला आरोग्य विषयक शिबीरे घेतली जातात. तसेच अनेक कामगार व त्या परिसरातील गरजु व्यक्तींच्या मोतींबिंदू शस्त्र क्रिया सूत गिरणीतर्फे केलेल्या आहेत.

**६.४ क)सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील निवड कामगारांची आर्थिक परिस्थिती :-**

श्रम हा उत्पादनाच्या चार घटकांपैकी एक महत्वाचा जीवंत घटक समजला जातो. कारण केवळ निसर्गाच्या विपूल देणगीमुळे काही निर्माण होत नाही. त्याचा उपयोग करून घेण्यासाठी श्रम हा घटक उपयुक्त ठरतो. शेवटी मानवाच्या प्रयत्नातूनच त्या नैसर्गिक देणगीतून विविध वस्तूंची निर्मिती होते. अशाप्रकारे श्रम हा एक उत्पादनाचा घटक म्हणून महत्वाचा आहे. परंतू तोच श्रम हा घटक दुसऱ्या बाजूने विचार करताना राष्ट्राची मानवी संपत्ती आणि विविध वस्तूंचा उपभोग घेणारा उपभोक्ता ठरतो. अर्थात उत्पादन आणि त्याला असलेली बाजारपेठ या दोन्हींचीही व्याप्ती उपभोक्त्याच्या मागणीवरून निश्चित होते. ही मागणी या असंख्य श्रमिकांना मिळणाऱ्या उत्पन्नावरून ठरते. म्हणूनच एका बाजूला श्रमीक हा उत्पादनाचा एक महत्वाचा उत्पादक घटक तर दुसऱ्या बाजूला तो एक ग्राहक असतो.

सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यामध्ये काम करणारा हा श्रमीकच आहे. परंतू बाजार पेठेत सूती कापडयांची खरेदी करताना तो एक ग्राहक बनतो. अर्थात ती त्याची मागणी ही संपूर्ण त्याच्या श्रमाला मिळणाऱ्या मोबदल्यावरून ठरते. म्हणजेच अशा कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे हे अधिक क्रमप्राप्त ठरते. कारण कामगारांच्या आर्थिक जीवनावरून त्यांच्या राहणीमानाची कल्पना येते. असंख्या कामगार दारिद्रयात जीवन जगत असतील तर उत्पादनाला केवळ एक अडचण नव्हे तर एक मोठा धोका देखील ठरतो. म्हणूनच कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः सूत गिरण्यामधील कामगारांना विचारलेल्या अनेक प्रश्नांना जी उत्तरे मिळालेली आहेत. त्या उत्तरातूनच त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे दर्शन घडते.

**१. निवड कामारांच्या दरमहा उत्पन्नाची गटवारी :-**

कोणत्याही कामगारांचे वेतन रूपी उत्पन्न महत्वाचे असते. कारण कामगारांचा त्यावरच उदरनिर्वाह अवलंबून असतो. श्रमिकांना वेतनाशिवाय अन्यमार्गाने फारसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे त्यांना निकृष्ठ प्रतिचे जीवन जगावे लागते. भाववाढीच्या काळात प्राप्त वेतनातून उदरनिर्वाह खर्च भागविणे श्रमिकांना अशक्य होते. सूत गिरण्यातील कामगारांच्या दरमहा वेतनाचा तपशील तक्ता क्रमांक ६.१३ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१३**

**दरमहा वेतनाचा तपशील**

| **अ.क्र.** | **दरमहा वेतन** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| **१.** | ४००० ते ६००० रुपये | ७३ | २०.३७ |
| **२.** | ५००० ते ७००० रूपये | १३१ | ३७.०४ |
| **३.** | ६००० ते ९००० रूपये | ९८ | २७.७८ |
| **४.** | १०,००० ते १५,००० रूपये | ५२ | १४.८१ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, रू. ४००० ते ७००० वेतन असलेल्या कामगारांची संख्या २०४ एवढी आहे. याचाच अर्थ सर्व साधारणपणे सूतगिरणीमध्ये ५७ टक्के कामगार दारिद्र्यात जीवन जगतात व ४३ टक्के कामगार दारिद्र्यरेषेच्या वरील जीवन जगतात असे आपल्याला म्हणता येईल. ६००० रूपयांपासून ते १५,००० रुपये प्राप्ती असणाऱ्या कामगारांची संख्या १५० एवढी आहे. याचाय अर्थ असा की, ३५४ पैकी १५० कामगार उच्च प्रतीचे जीवन जगतात.

## २. पूरेसे वेतन :-

कामगारांना विचारलेल्या प्रश्नात वेतन पुरेसे वाटते का?

या प्रश्नाचे उत्तर ९५ टक्के कामगारांनी वेतन पुरेसे नाही असे उत्तर दिले तर ५ टक्के कामगारांनी वेतन पुरेसे आहे असे उत्तर दिलेले आहे. असे तथ्य संकलनावरून आढळून आले. वेतन पुरेसे नाही याची कारणे अनेक असू शकतात. त्यापैकी वाढती महागाई हे प्रमुख कारण असू शकते. कुटुंबाची संख्या जास्त असणे हे दूसरे कारण असू शकते. तसेच काही कामगारांना पान, तंबाखू व दारू याचे व्यसन आहे. त्यामुळे वेतनातील काही रक्कम हे कामगार व्यसनावर खर्च करतात. ९० टक्के कामगारांना व्यसन नसल्याने ते व्यसनावर खर्च करीत नाहीत असे अढळून आले.

## ३. बोनस :-

कामगारांच्या उत्पन्नाचा एक महत्वाचा मार्ग बोनस समजला जातो. सूत गिरण्यामधील सर्व कामगारांना नियमानुसार बोनस दिला जातो. बोनस म्हणजे कामगारांच्या उत्पन्नात पडलेली एक प्रकारची भर असते. सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यामध्ये सूत गिरणीच्या आर्थिक उत्पन्नानुसार कामगारांना बोनस दिला जातो. बोनस अधिनियम कायदा १९६५ या कायद्याची अंमलबजावणी सूत गिरण्यांनी केलेली आढळते. बोनससाठी कामगारांना व संघटनेला एकदाही व्यवस्थापनाशी संघर्ष करावा लागलेला नाही ही विशेष बाब आहे. सूत गिरणीच्या व्यवस्थापनेने स्थापनेपासून कामगारांना बोनस देण्याचे धोरण अवलंबिलेले असल्याचे आढळून येते. विशेषतः सूत गिरणीला विविध अडचणींना सामोरे जावे लागत असले तरी देखील सन २००१-२००२ पासून बोनसचा दर ८.३३ टक्के ठेऊन कामगारांना बोनस दिलेले आहे. एकंदरीत सन २०१० ते २०११ अखेर बोनस रूपाने वाटलेल्या रकमेचा तपशील तक्ता क्रमांक ६.१४ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१४**

**बोनस रूपात कामगारांना वाटलेली रक्कम (सन २००१ ते २०१०-११ अखेर)**

| अ.क्र. | वर्ष | स्वामी समर्थ | शेतकरी | शरद | म. फुले | महिला |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २००१-२००२ | १५०७१० | २८४०५५० | ३९५१५ | १३०८०० | --- |
| २. | २००२-२००३ | १५०७१० | ३१६०८४० | ३९५१५ | १३१८०० | --- |
| ३. | २००३-२००४ | १५०७१० | ३५९४९२५ | ५११५०० | २१३६०० | --- |
| ४. | २००४-२००५ | १५०७१० | ४०१८७४४ | ४७४९०० | ३६२१२५ | --- |
| ५. | २००५-२००६ | १५०७१० | ४२७१५०० | ४७४९०० | १०३८३१८ | २००००० |
| ६. | २००६-२००७ | १३१२७१० | ४६२६५४१ | ४७४९०० | ६६२७९८ | २९८००० |
| ७. | २००७-२००८ | २४०४८६० | ५४९३५३५ | ४७४९०० | ८१८००० | ५५८६३९ |
| ८. | २००८-२००९ | २४०४८६० | ५८१७२१७ | Nil | ७२००० | ८०६२७३ |
| ९. | २००९-२०१० | २४०४८६० | ६५६९८३२ | Nil | ७२००० | १०८३२८२ |
| १०. | २०१०-२०११ | २४०४८६० | ६१५८५०० | Nil | ११७०१८५ | १३१५३३९ |
| | **एकूण** | ११६८५७०० | ४६५५२१८४ | २४९०१३० | ४६७१६२६ | ४२६१५३३ |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती व सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या ताळेबंद पत्रकावरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २००१-०२ ते २०१०-११ पर्यंत बोनसच्या रकमेत वाढ झालेली आहे. विशेषतः सुरवाती पासून बोनसच्या रकमेत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. एकंदरीत ८.३३ टक्के बोनसचे प्रमाण कायम असले तरी बोनसच्या रकमेत वाढ झालेली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कामगारांच्या वेतनात वाढ झाल्याने बोनसच्या रकमेत देखील वाढ झालेली आढळते. ८.३३ टक्के बोनस म्हणजे जवळ जवळ कामगारांचे एका महिन्याचे वेतन होय, त्यामुळे वेतनवाढ झाली की बोनसमध्ये देखील वाढ होते. विशेषतः सन २०१० ते २०११ पर्यंत कामगार संख्येत वाढ झालेली आहे. तसेच सूत गिरण्यांच्या आर्थिक उत्पन्नात देखील सतत वाढ होत आहे. त्यामुळे कामगारांच्या वेतनात व बोनस रकमेत वाढ झाल्याचे आढळून येते. निवडलेल्या दहा वर्षात ६९६६११७३/- रूपये बोनस वाटलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी सांगोले या सूत गिरणीने ८.३३ टक्के पेक्षाजास्त टक्केवारी १० ते १३ टक्क्यपर्यंत बोनसची रक्कम वाटलेली आहे. कामगारांच्या मालमत्तेचे विश्लेषण करता असे दिसून येते की, ६० टक्के कामगारांना स्वतःचे घर आहे. तर १० टक्के कामगारांना शेतजमीन आहे. १४ टक्के कामगारांना जमीन असून ती ओसाड स्वरूपाची आहे. १६ टक्के कामगारांना इतर मालमत्ता (पडीक घर, सायकल, मोटारसायकल, टी.व्ही., छोटया स्वरूपाची अवजारे इ.) आहे. अर्थात अशा प्रकारची मालमत्ता असली तरी देखील ९५

टक्के कामगारांचे मत वेतन पुरेसे नाही असेच आहे. म्हणजे ही मालमत्ता अगदी खूप चांगली प्रकारची आहे. किंवा या कामगारांना ती उत्पन्न मिळवून देणारी नाही असे वाटते.

**४. निवड कामगारांची कर्ज विषयक स्थिती :-**

कामगारांचा कर्ज घेण्याशी संबंध कितपत आहे याचा विचार करणे देखील आवश्यक आहे. सोलापूर जिल्ह्यातील गिरण्यांनी कामगारांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी काही सोई केलेल्या नाहीत. परंतू कामगारांना एकमेकांच्या अडचणीवेळी मदत करण्याच्या वृत्तीमुळे कामगार मित्रमंडळी व नातेवाईक यांच्या कडून कर्ज व इतर मदत योजना घेताना आढळतात. तुम्ही कर्ज घेता काय? या प्रश्नाचे उत्तर असे मिळाले की, आम्ही गरज भासल्यास मित्र मंडळी, नातेवाईक, सहकारी बँका, पतसंस्था, व्यापारी बँका, सावकार, भिशी, पिग्मी इत्यादी द्वारे कर्ज घेतो. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६.१५ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ६.१५**

**निवड कामगारांचे कर्ज घेण्याचे मार्ग**

| **अ.क्र.** | **कर्जाचे मार्ग** | **निवड कामगारांची संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | मित्र व नातेवाईक | ७३ | २०.३७ |
| २. | सावकार | ३३ | ९.२५ |
| ३. | व्यापारी बँका/ राष्ट्रीय बँका | ५९ | १६.६७ |
| ४. | सहकारी बँका/ पतसंस्था | १२४ | ३५.१९ |
| ५. | इतर वित्त संस्था (भिशी) पिग्मी वगैरे | ६४ | १८.५२ |
| | **एकूण** | **३५४** | **१००.००** |

**आधार :-** सर्वेक्षण माहिती वरून.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नमुना पद्धतीने निवडलेल्या ३५४ कामगारांनी आपल्या गरजा भागविण्यासाठी विविध कर्जाच्या मार्गांचा अवलंब केलेला आहे. सूत गिरण्यामधील कामगारांचे मित्र आणि नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेण्याचे प्रमाण २०.३७ टक्के आहे. तसेच मित्र आणि नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेण्याचे प्रमाण आधुनिक काळात कमी झालेले आढळते. कारण मित्र आणि नातेवाईका कडे कर्जाची मागणी करणे तसेच सुलभ नसते. त्यातून मतभेद वाढण्याची शक्यता असते. हे टाळयासाठी कर्ज न दिलेले बरे असे नातेवाईक मित्र मंडळींना वाटते त्यामुळे कर्ज देण्याची टाळाटाळ केली जाते.

**६.१५.१ सावकार :-**

सूत गिरण्यातील कामगार गरज भासल्याबरोबर पारंपारीक सावकाराकडून कर्ज घेतात. निवड केलेल्या कामगारापैकी सावकाराकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ९.२५ टक्के असल्याचे आढळते. विशेषतः

सावकारांचे व्याजाचे दर अधिक असतात. तसेच फसवणूक व गैरव्यवहार होतात. त्यामुळे या मार्गाने कर्ज घेण्याचे प्रमाण कमी आढळते.

**६.१५.२ व्यापरी बँका :-**

व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण होईपर्यंत व्यापारी बँकानी कामगारांना व्यक्तिगत कर्ज दिलेले नव्हते. राष्ट्रीयीकरणानंतर कामगारांना बँकानी कर्ज देण्याचे धोरण स्विकारले आहे. व्यापारी बँकांकडून कर्ज घेतलेल्या कामगारांचे प्रमाण १६.६७ टक्के आहे.

**६.१५.३ सहकारी बँका/ सहकारी पतसंस्था :-**

शहरातून व ग्रामीण भागात गरीब आणि मध्यम वर्गियांना योग्य व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यासाठी शहरात सहकारी तत्वावर नागरी सहकारी बँका स्थापन झालेल्या आहेत. तसेच ग्रामीण भागात देखील सहकारी बँका व पतसंस्था स्थापन झालेल्या आहेत. या सहकारी बँकाकडून कामगारांनी मोठया प्रमाणात कर्जे घेतल्याचे आढळते. निवड केलेल्या कामगारांपैकी सहकारी बँका व पत संस्थेकडून कर्ज घेतलेल्या कामगारांचे प्रमाण ३५.१९ टक्के आढळते. तसेच ज्या कामगारांच्याकडे शेती आहे अशा कामगारांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्राथमिक सहकारी बँकेच्या शाखेतून व सोसायटी कडून कर्ज घेतल्याचे तथ्य संकलनावरून आढळून आले. यावरून सहकारी बँकाचे महत्व वाढलेले आढळते. या सहकारी बँकांचा व्याजाचा दर इतर पतपुरवठा करणाऱ्या संस्थाच्या तुलनेत कमी असतो.

**६.१५.४ इतर कर्जाचे मार्ग :-**

सराफी पेढीवाले, भिशी, पिग्मी इत्यादी कामगारांना अडचणीच्या वेळी पैशाची आवश्यकता भासल्यास कामगार स्वतः जवळचे सोने, दागिने, सराफाकडे व पेढीवाले यांच्याकडे गहाण ठेवून कर्ज घेतल्याचे आढळते. तसेच काही कामगारांनी पिग्मीच्या माध्यमातून कर्जे घेतल्याचे आढळते. तसेच काही कामगार स्वतः एकत्र येऊन विशिष्ट वर्गणी जमा करून हा जमलेला निधी दरमहा चिठ्ठी टाकून ज्या कामगारांचे नाव असेल त्या कामगाराला खर्चासाठी दिला जातो. या पद्धतीला भिशी पद्धत म्हणतात या पद्धतीने दर महिन्याला भिशीच्या सभासदापैकी एका सभासदाला एक मोठी रक्कम मिळते. त्याचा विनियोग तो कामगार (सभासद) स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करू शकतो. अशा प्रकारे सूत गिरणीतील कामगार आर्थिक अडचणी सोडवितात. सराफ, पेढीवाले, भिशी व पिग्मी या माध्यमातून कर्ज घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण १८.५२ टक्के असल्याचे तथ्य अनुसूची संकलनावरून आढळते

**६.१५.५. स्वतःचे घर :-**

स्वतःच्या मालकीचे घर असणे श्रमीकांच्या दृष्टीने अभिमानाची बाब असते. परंतू नोकरी करून भाडयाच्या घरात श्रमिक राहात असतील तर मात्र त्याच्या खर्चामध्ये आणखीन भर पडते. सोलापूर

जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील ३५४ निवडक कामगारांपैकी ४५ टक्के कामगारांना स्वतःच्या मालकीचे घर आहे. मात्र ५५ टक्के कामगारांना भाडयाच्या घरात राहावे लागते. त्यामुळे त्यांच्या खर्चात घरभाडयामुळे भर पडते. सूत गिरण्यांनी निवासाच्या सोयी उच्च पदावरील व्यक्तीसाठीच उपलब्ध केल्या आहेत. म्हणजेच कामगारांसाठी निवासाचा अभाव असल्याचे आढळते.

## ६.५ ड) कल्याणकारी सुविधा :-

**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगारासाठी राबविलेल्या कल्याणकारी योजना :-**

**प्रस्तावना :-**

कामगारांना कामाबद्दल आपुलकीची भावना निर्माण व्हावी, कामगारात निराशेचे वातावरण निर्माण होऊ नये, व्यक्तिगत आणि कुटुंबाच्या चिंता दूर व्हाव्यात, त्यांचे जीवनमान सुधारावे, आरोग्यमानात सुधारणा व्हाव्यात, व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा आणि त्यांचा दृष्टीकोन व्यापक व्हावा या हेतूने ज्या सुधारणा घडवून आणल्या जातात त्या सर्वाचा समावेश कामगार विषयक कल्याणामध्ये केला जातो.

कामगार कल्याण योजनामुळे औद्योगिक क्षेत्रात शांतता निर्माण होते. कामगारांची कार्यक्षमता वाढून त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण होते. नवीन कारखान्यात व सूत गिरणीत काम करण्याची स्थलांतर वृत्ती कमी होते. कामगारांना शारिरीक व मानसिक स्वास्थ्य मिळू शकते. तसेच कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारून त्यांची वैचारीक पातळी उंचावण्यास मदत होते.

विशेषतः कामगारांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, कामगार संघटना, सहकारी संस्था, व्यवस्थापक, मालक व इतरही संस्था विविध योजना राबवितात.

कारखाना कायदा १९४८ नुसार व सहकारी संस्था अधिनियम १९६० व १९६१ नुसार प्रत्येक कारखान्याला व सहकारी संस्थांना काही मुलभूत सोई कामगारांना पुरवाव्या लागतात. कारखान्यात कॅन्टीनची सोय करणे, निवासगृह बांधणे, पाळणागृहे ठेवणे, वैद्यकीय उपचारांची सोय करणे, शैक्षणिक सुविधा पुरविणे व करमणूकीची साधने उपलब्ध करणे इत्यादींचा त्यात समावेश होतो.

कामगार हा कोणत्याही व्यवसाय संस्थेच्या अनेक उत्पादन घटकापैकी एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. कामगार हाच व्यवसायाच्या इतर संसाधनाचे उत्पादन करणारा घटक किंवा १ शक्ती आहे. किंवा असे म्हणता येईल की, या घटकाशिवाय आपण इतर घटकांचा वापर करुन वस्तु किंवा उत्पादन निर्मिती करु शकत नाही. म्हणून उत्पादनाच्या सर्व घटकामध्ये कामगार या घटकास विशेष महत्व आहे. कामगार हा घटक सजीव असून बाकीचे घटक हे निर्जिव आहेत. कामगारांना त्यांच्या कामाचा किंवा श्रमाचा मोबदला म्हणून वेतन मिळते. इतर बाकीच्या घटकांना मोबदला म्हणून नफा, व्याज, खंड अशा रुपात मिळत असतो. कामगाराचे वेतन किंवा मोबदला ठरविताना आपणास अनेक घटकांचा विचार

करावा लागतो. कामगारांच्या वेतन निश्चितीमध्ये कामगारांची उपलब्धता, मागणी, पुरवठा, त्यांची निर्वाह पातळी, त्यांच्या आवश्यक गरजांची पुर्तता, व राहणीमानाचा दर्जा राखण्याची आवश्यकता अशा अनेक घटकांना विचारात घ्यावे लागते. कोणत्याही व्यवसाय संस्थेपेक्षा कामगारांची शक्ती कमी असते. श्रम हेच त्यांचे भांडवल असते, त्यामुळे ते पुर्णपणे मालकावर अवलंबुन असतात. कामगारांना मालक ठरवील त्या वेतनावरच काम करावे लागते. कामारांनी आणि मालक यांचे संबंध जर चांगले असतील किंवा मालकाचा दृष्टीकोन जर कामगाराप्रती मानवतावादी असे तर, मालक कामगारांना रास्त वेतन देण्याची व्यवस्था करतो. आणि जर मालक हा आपले स्वतःचे हित पाहणार असेल तर तो कामगारांना कमी वेतन देऊन त्यांचे शोषण केल्याशिवाय राहत नाही. अशा शोषणामुळे कामगारांना आपले जीवन जगणे असहाय्य होते. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यामधूनच कामगार कल्याण या संकल्पनेचा उदय झाला. आजच्या काळात कामगार कल्याण संदर्भात अनेक देशात विविध कायदे करण्यात आले आहेत. यातूनच व्यवसाय उद्योगातील औद्योगिक कलह दुर करण्यासाठी कामगार कल्याणावर भर देण्यात येत आहे. त्यामुळेही व्यवसाय विकास करणेही शक्य झाले आहे.

**कामगार कल्याण संकल्पना :**

औद्योगिक क्रांतीनंतर अनेक समस्या निर्माण झाल्या. या अनेक समस्यामध्ये अत्यंत समस्या म्हणून कामगार शोषण समस्या समजली जात होती. यातून कामगारांना आपले जीवन जगने किंवा आपल्या गरजांची पुर्तता करता यावी याच विचारातून कामगार कल्याण या संकल्पनेचा उदय झाला. कामगार कल्याण या संज्ञेचा वापर करुन कामगारांच्या असणाऱ्या विविध रास्त गरजांची पुर्तता करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. कामगार कल्याण ही संकल्पना देशपरत्वे, कालपरत्वे, व्यक्तीपरत्वे भिन्न आहे. यामध्ये विविध देशातील विविध पर्यावरणात्मक घटकांचा यामध्ये समावेश होतो.

भारतामध्ये कारखाना कायदा १९४८ मध्ये लागु करण्यात आला. या कायद्यात कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे हित कसे साधले जाईल याचा प्रयत्न केला आहे असे आपणास दिसून येते. सूत गिरण्यात काम करताना कामगारांना कामाबद्दल, सूत गिरणीबद्दल आत्मीयता वाटावी, त्यांना काम करण्यास उत्साह वाटावा, त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी, त्यांना त्यांच्या समस्या सोडविता याव्यात, त्यांना स्वतःचा व कुटुंबाचा सर्वांगिण विकास करता यावा, त्यांच्या राहणीमानात व व्यक्तीमत्वामध्ये सुधारणा करता यावीत अशा घटकांचा विचार करुन वेतन रचना करण्यात येते. त्यास कामगार कल्याण असे ढोबळ मानाने मानले जाते. यामुळे कारखान्यातील औद्योगिक संबंध शांततामय राहण्यास मदत होते. व त्यातून कामगारांचा व कारखान्याचा विकास होतो.

कामगारासाठी राबविण्यात आलेल्या कल्याणकारी योनजेमुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये शांतता निर्माण होते. यातून त्यांच्यार सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची जाणीव होते. या जाणीवेतून कार्यक्षमता वाढत जाते. यातून आपआपल्या कर्तव्याची जपणूक केली जाते. यामुळे स्थलांतराची वृत्ती नाहिशी होते, बदली होत नसल्यामुळे कामगारांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारतो. यातून कामगारांच्या वैचारिक पातळीत वाढ होते. वैचारिक पातळी बदलल्यामुळे कामगारांची वेशभुषा, सामाजिक सुरक्षितता व स्वच्छता, विज्ञाननिष्ठा यामध्ये वाढ होऊन कामगारवर्ग सुधारणावादी बनतात. वास्तवतेचा विचार केला जातो. यातून नवनवीन संशोधनाला प्रोत्साहन मिळते यामुळे उत्पादन पातळीत वाढ होते.

**कामगार कल्याणाच्या व्याख्या :-**

कामगार हा सजीव घटक असल्यामुळे त्यांच्या शारिरीक, नैतिक, मानसिक, भावनीक अशा घटकांचा विचार यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे त्यांच्या सुरक्षीतता, स्वास्थ्य, आरोग्य सोई-सुविधा, अन्य करमणूक घटक, नोकरीची शाश्वती अशा अनेक घटकांचाही समावेश कामगार कल्याणात होतो. कामगारांच्या वेतनात त्यांच्या नोकरीविषयक, स्वास्थ्य विषयक, कौटुंबिक, निवास, विश्रांती, वाहतूक, विमा व सेवानिवृत्ती इत्यादींचा समावेश कल्याणात होतो. कामगार कल्याण ही संज्ञा फारच व्यापक आहे. तरी पण कामगार कल्याण या संज्ञेचा अर्थ समजुन घेण्यासाठी अनेक विद्वानांनी दिलेल्या व्यांख्यांचा आपणास आढावा घ्यावा लागेल.

१) **रॉयल कमिशनच्या मते :-**

"कामगारांच्या बौध्दिक, कलात्मक, आरोग्यविषयक आणि कामगारांच्या आकांक्षाना पुरक अशा सर्व बाबींचा समावेश कामगार कल्याणामध्ये केला जातो."

२) **श्रम संशोधन समिती :-**

"कामगार कल्याणात मालकाने कामगारासाठी केलेल्या बौध्दिक, भौतिक व आर्थिक सुधारणा होय."

३) **आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते :-**

"काम करण्याच्या ठिकाणी किंवा त्यांच्या जवळ खाण्यापिण्याच्या सुविधा, निवास, करमणूकीच्या सुविधा व ज्या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक अपूरी असेल त्या ठिकाणी वाहतूकीची व्यवस्था करणे इ. कार्याचा समावेश कल्याणामध्ये होत असतो."

४) **डॉ. पानंदीकर यांच्या मते :-**

"कामगार कायद्याने घालून दिलेल्या किमान दर्जापेक्षा अधिक चांगला दर्जा मिळवून देण्यासाठी कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता, सर्वसामान्य हित व कार्यक्षमता यामध्ये सुधारणा करण्यासाठी केलेले कार्य म्हणजे कामगार कल्याण होय."

वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात असे येते की, कामगार कल्याण ही संकल्पना फारच व्यापक आहे. यामध्ये कामगारांचे संपुर्ण जीवनमान सुधारण्यासाठी त्यांच्या आर्थिक, राजकिय, सामाजिक, स्थान तसेच त्यांच्या सेवेच्या अटी जसे कामाचे तास, कामाचे पर्यावरण, सुरक्षितता अशा अनेक घटकात सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

डॉ. प्रभाकर देशमुख यांच्या शब्दात "कामगारांना सुखी, संपन्न, संस्कृत जीवन जगता यावे यासाठी योजण्यात आलेल्या सर्व उपाययोजनाचा समावेश कामगार कल्याणात होतो." औद्योगिक कामगारांची कामाची स्थिती, राहण्याची स्थिती, आरोग्य, शिक्षण, कार्यक्षमता, कामगारांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या सर्व प्रयत्नास कामागर कल्याण असे म्हणतात.

भारतामध्ये १९४८ मध्ये भारत सरकारने कारखाना कायदा पास करुन लागु केला. या कायद्यानूसार देशातील कारखान्यात काम करणाऱ्या कामगार कल्याणासाठी तसेच त्यांच्या संपूर्ण विकासासाठी अनेक मुलभुत तरतुदी आमलात आणल्या. तसेच कारखान्याच्या मालकावर कामगार कल्याण करण्यासाठी अनेक बंधने घातली. या कायद्यानूसार केवळ कारखान्यात काम करणाऱ्या कामगारासाठीच नाही तर उपहारगृहे, चित्रपट, मळे, दुकाने, सहकारी संस्था, औद्योगिक संस्था अशा अनेक ठिकाणी कामगार कल्याणाच्या विविध सुविधा कामगारांना द्याव्यात. जसे उपहारगृह, विश्रांतीगृह, आरोग्यविषयक सोई, पाणी पुरवठा, करमणूकीच्या सुविधा, संस्कृतिक गृहे, निवासाच्या सुविधा, शिक्षणाच्या सुविधा या अशा अनेक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात असे बंधन घालण्यात आले. त्यामुळे कामगारांना चांगले जीवन जगणे शक्य झाले. या सर्व सुविधांना कामगार कल्याण असे म्हटले जाते.

इ.स. १९४८ मध्ये भारत सरकारने कारखाना कायदा केला. या कायद्यानूसार देशातील कारखान्यांनी कामगारांच्या कल्याणासाठी किंवा त्यांचा विकास व्हावा यासाठी काही मुलभूत सोयी उपलब्ध करुन देण्याचे बंधन घालून दिले आहे. कारखान्यामध्ये उपहारगृहे, विश्रांती स्थाने, आरोग्याच्या सोयी, पाणी पुरवठा, स्नानगृहे, करमणूकीच्या सोयी, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम व वाहतूक व्यवस्था इ. सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतात. या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वर सांगितलेल्या घटकांनी पुढाकार घ्यावा लागतो. सन १९५६ मध्ये म्युनिच शहरात समाज कल्याणावर चर्चा करण्यासाठी एक अंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये कामगार कल्याणाबाबत असे मत मांडले की, "एखाद्या

कारखान्याने कामगार व त्यांच्या कुटुंबियासाठी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर जर मदत केली, त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी सहाय्य केले तर ती कल्याणकारी सेवा समजली जावी."

सन १९५६ मध्ये म्युनिच शहरात समाज कल्याणावर चर्चा करण्यासाठी एक अंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये कामगार कल्याणाबाबत असे मत मांडले की, "एखाद्या कारखान्याने कामगार व त्यांच्या कुटुंबियासाठी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर जर मदत केली, त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी सहाय्य केले तर ती कल्याणकारी सेवा समजली जावी."

वरील सर्व प्रकारच्या सुविधा सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सूतगिरण्यांनी आपल्या कामगारांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत की नाहीत याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यांनी आपल्या कामगारांसाठी विविध कामगार कायद्यांचा फायदा व १९४८ चा कारखाना कायद्याचा फायदा करून देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या कल्याणकारी सुविधा खालील प्रमाणे सांगता येतील.

**१. निवास व्यवस्था :-**

सूत गिरण्यांनी कामगारांच्या निवासाची अडचण लक्षात घेऊन काही थोडया कामगरांसाठी निवासाची सोय केली आहे. त्यासाठी स्वतंत्र कामगार वसाहत सूत गिरणी जवळच स्थापन केलेली आहे. यामध्ये ३५४ कामगरांपैकी १० टक्के कामगारांना याचा लाभ झाला आहे. एकंदरीत माहे डिसेंबर २०११ मध्ये सूत गिरण्यामध्ये ३५४७ कामगार आहेत. त्यापैकी १०० कामगारांना निवास व्यवस्थेचा फायदा झाला आहे. सूत गिरण्यांनी जरी २० टक्के कामगारांसाठी निवासाची व्यवस्था केली असली तरी त्यामध्ये सूत गिरण्यातील उच्च पदावरील अधिकारी, ड्रायव्हर, वॉचमन यांना देखील याचा फायदा झाला आहे. विशेषतः सोलापूर जिल्ह्याील सहकारी सूत गिरण्यांतील कामगार संघटना यांच्या मागणीवरून काही कामगारांच्या निवासाचा प्रश्न सूत गिरण्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात जरी सर्वच कामगारांसाठी निवासाची व्यवस्था केलेली नसली तरी कामगारांना सूत गिरण्यांनी घरभत्ता म्हणून काही प्रमाणात रक्कम देत आहे.

**२. मोफत बस सेवा :-**

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या विकासामध्ये कामगारांचे योगदान व सहभाग मोलाचे असल्याने सूत गिरण्यांच्या व्यवस्थापनेने कामगारांना जास्तीत जास्त सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कामगारांना ने-आण करण्याकरीता महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती सहकारी सूत गिरणीने मोफत बससेवा दिली आहे. ही बससेवा कामगारांना त्यांच्या गावातून सूत

गिरण्यांपर्यंत आणणे व नेऊन सोडण्याचे काम करते. तिन्हीही पाळीत ही मोफत बस सेवा सूत गिरणी तर्फे दिली जात आहे.

**३. कॅन्टीन सुविधा (उपहार गृह) :-**

कारखाना कायदा १९४८ नुसार सूतगिरण्यांनी कामगारांसाठी कॅंन्टीनची सोय उत्तम प्रकारची केली आहे. कॅन्टीनमध्ये चांगल्या प्रकारचा जेवण विभाग असून त्यामध्ये फर्निचर व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर टेप, फॅन, लाईट, पिण्याच्या पाण्याची सोय, इ. सुविधा करण्यात आल्या आहेत. कॅन्टीनमधून कामगारांना अतिशय स्वस्त दरामध्ये जेवण, चहा, कॉफी, ब्रेड, भजी, वडा, चिवडा, पापडी व शाबू चिवड इ. पदार्थ पुरविले जातात. त्यामुळे कॅन्टीन सध्या ना नफा ना तोटा या तत्वावर चालविले जात आहे. थोडक्यात कॅन्टीनमधून कामगारांना स्वस्त दरामध्ये पदार्थ पुरवून कामगारांचे हित जपण्याचा प्रयत्न सूत गिरण्यांनी केलेला आहे.

**४. पाळणागृह**

स्त्री कामगार ज्या ठिकाणी काम करीत असेल त्या ठिकाणी त्यांच्या बालकांसाठी एका स्वतंत्र खोलीमध्ये पाळणागृहाची सुविधा केलेली आहे. त्यासाठी सूत गिरण्यांनी अशा स्त्री कामगारांच्या बालकांसाठी पाळणागृहाची सोय केलेली आहे. त्यासाठी एका परिचारीकेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सूत गिरण्यांनी जरी ही सोय केलेली असली तरी बालकांची संख्या अलीकडील काळात कमी होऊ लागली आहे. सध्या ३० बालके या पाळणागृहात असल्याने त्यांची देखील देखभाल संबंधीत परिचारीकेतर्फे केली जाते.

**५. वैद्यकीय सुविधा**

कामगारांची शारिरीक स्थिती आणी मानसिक स्थिती चांगली असेल तर उत्पादनामध्ये देखील चांगली वाढ होऊ शकते. त्यासाठी कामगारांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे हे कोणत्याही व्यवस्थापक मंडळाचे कर्तव्यच असते. त्यानुसार सूत गिरण्यांनी वैद्यकीय लाभ कामगारांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कामगारास कामावर असताना दुखापत, इजा झाल्यास त्यास मोफत वैद्यकीय औषधोपचार केला जातो. कामगारांसाठी वर्कमेन्स कॉम्पेनसेशन अ‍ॅक्ट खाली पॉलिसी घेतली असून या योजनेतून कामगारांना अपघात झाल्यास नुकसान भरपाई दिली जाते. तसेच कामगारांचे सर्व रोग निदान आरोग्य तपासणी सूत गिरण्यांतर्फे केली जाते. तसेच कामगारांना राज्य कामगार विमा योजनेतर्फे देखील वैद्यकीय सुविधा दिल्या जातात. वैद्यकीय लाभ कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सर्व व्यक्तिंना मिळत आहेत. प्राथमिक उपचाराच्या सोई सूत गिरण्यांनी प्रत्येक विभागात उपलब्ध केलेल्या आहेत.

## ६. स्वच्छतागृहे व शौचालय ची सुविधा

सूत गिरण्यांनी पुरुष आणि महिला कामगारांसाठी स्वतंत्र शौचालय व मुतारीची व्यवस्था केली आहे. यासाठी सूत गिरण्यांनी ५ कोटी रूपयांची गुंतवणूक केलेली आहे. शौचालय आणि मुतारी वेळोवेळी स्वच्छ केली जाते. त्याचा परिणाम डास किंवा अन्य किटकाचा प्रादुर्भाव होत नाही. याशिवाय सूत गिरण्यांनी प्रत्येक विभागाच्या ठिकाणी हातपाय धुण्यासाठी पाण्याच्या नळाची सोय केली आहे. तसेच स्वच्छतागृहांची सोय केलेली आहे.

## ७. कामगार प्रशिक्षण सुविधा

महाराष्ट्र सरकारच्या कामगार शिक्षण योजनेनुसार सूतगिरण्यांनी स्थापनेपासून कामगारांना शिक्षण देण्याची सोय केली आहे. त्यासाठी एकावेळी १०० कामगारांना सूत गिरण्यांच्या कामाच्या संदर्भात शिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण कामगारांना त्यांच्यातील अनुभवी कामगारांमार्फत देण्यात येते. याचा कालावधी साधारणपणे ४० दिवसांचा ठेवण्यात आला आहे. तसेच अधून मधून औद्योगिक सुरक्षिततेविषयी काही व्याख्याने देण्याचे व काम करतेवेळी कोणत्या दक्षता घ्याव्यात यांचेही मार्गदर्शनपर व्याख्याने घेतली जातात. त्यामुळे सूत गिरण्यांमध्ये अपघात झाल्याचे आढळत नाही. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमध्ये सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो.

## ८. विश्रांतीसाठी सोई

कामगारांना सतत आठ तास उभे राहून काम करणे अशक्य असते. त्यासाठी कामगारांच्या कामात सातत्य व त्यांची कार्यक्षमता कायम टिकून राहावी यासाठी सूत गिरणीने कामगारांच्या कामाच्या ठिकाणी थोडया विश्रांतीसाठी स्टूल्सची, खूर्चीची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे कामगारांच्या कामात सातत्य टिकून राहण्यास मदत झाली आहे.

## ९. इतर सुविधा

कामगारांचे आरोग्य सुदृढ राहण्याच्या दृष्टीने त्यांना दररोज सकस आहार दिला जातो. तसेच कामगारांच्या मुलांना वह्या, पुस्तके व शालेय ड्रेस सूत गिरण्यांतर्फे मोफत दिले जातात. तसेच ९ वी च्या पुढे शिक्षण घेणाऱ्या मुलांना कामगार कल्याण केंद्राकडून स्कॉलरशिप मिळवून दिली जाते. कामगारांना प्रॉव्हीडंड फंड, फॅमिली पेन्शन, लाईफ इन्श्युरन्स कार्पोरेशन पुणे मार्फत एम्लॉईज ग्रुप ग्रॅज्युएटी कम ॲश्योरन्स योजना, पगारी हक्क रजा, एकंदरीत सूत गिरण्या तर्फे कामगारांसाठी वरील प्रकारच्या चांगल्या कामगार कल्याण योजना राबवित असल्याचे आढळून येते. तसेच सामादुयीक विवाह, मोतीबिंदु शस्त्रक्रिया, जनारवरांच्या छावण्या अशा समाजोपयोगी योजना राबविलेल्या आहेत.

### ६.६ इ) कामगार संघटना

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगार संघटना या एकी हेच बळ या तत्वावर कामगार संघटना स्थापन झालेल्या आहेत. कामगारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या स्वतःच्या कल्याणासाठी कामगारांनी स्वयंस्फूर्तीने काढलेल्या कायम स्वरूपी संस्था म्हणजे कामगार संघटना होय. या संघटनेमुळे सामुहिक सौदाशक्ती वाढते. मनुष्य म्हणून आणि समाजाचा एक उत्पादक घटक म्हणून कामगारांना व्यक्तिगत आणि सामूहिक प्रतिष्ठा मिळवून देणे हे कामगार संघटनांचे सर्वोच्च उद्दिष्ट असते. वेतनवाढ, कामाच्या परिस्थितीत आणि राहणीमानात सुधारणा ही उद्दिष्टे साध्य करण्याची ती साधने आहेत. ती साध्य होणेच पुरेसे नाही. समाजात आणि उद्योगात कामगारांना आपल्या व्यक्तिमत्वाचा आणि गुणांचा संपूर्ण विकास करून घेण्याची संधी मिळाली पाहिजे. सामाजिक सुव्यवस्था आणि प्रगती यांना हातभार लावण्याची संधी मिळाली पाहिजे. ते होण्यासाठी केवळ त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याने भागणार नाही. उद्योगातील त्याच प्रमाणे समाजातील त्यांचा दर्जा मूलतः बदलला पाहिजे तसेच शिक्षण आणि प्रशिक्षण याद्वारे त्यांच्या अपेक्षित नविन दर्जाला आवश्यक असणारी पात्रताही त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे. कामगार संघटनांच्या उद्दिष्टांची आणि कार्यपद्धतीची ही एक महत्वाची बाजू आहे. अशा प्रकारे एकदा कामगार संघटनेचे महत्व लक्षात आल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगार संघटनेचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

या ठिकाणी ज्या माहितीचे विवेचन करण्यात आले आहे. त्या माहितीचा आधार मुख्यतः सूत गिरण्यामधील कामगार संघटनेच्या अध्यक्षांशी झालेल्या मुलाखतीतून माहिती मिळालेली आहे. तसेच अनुसूचितील काही प्रश्न कामगार संघटनेशी निगडीत आहेत. त्यावरून ही काही माहिती संकलित केलेली आहे.

### १. कामगार संघटनेची सर्वसाधारण माहिती

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील सेवक व कामगार संघटनेची इंटक प्रणित संघटना स्थापन झालेली आहे. सध्या संघटनेची सभासद संख्या ३५०० एवढी आहे. तर मागील वर्षी संघटनेची सभासद संख्या २५०० होती. म्हणजे दिवसेंदिवस कामगार संघटनेच्या सभासद संख्येत वाढ होत चालली आहे. याचाच अर्थ कामगार संघटनेचे महत्व कामगारांना पटलेले आहे. प्रत्यक्ष नमुना पाहणीवरून देखील असे दिसून आले की, ३५४ कामगारांना विचारलेल्या प्रश्नात जवळ जवळ ९५ टक्के कामगार हे संघटनेचे सभासद आहेत. संघटनेच्या अध्यक्षांचे महत्वाचे कार्य म्हणजे कामगारांचे संघटनेद्वारे प्रश्न सोडविणे, त्यांना आपल्या हक्काविषयी माहिती देणे व कामगारांना संघटनेद्वारे न्याय मिळवून देणे हे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या कामगार संघटनेच्या सभासदासाठी कामगारांकडून प्रत्येक महिन्याला ५०/- रू. या प्रमाणे रू. ६००/- वार्षिक वर्गणी व रू. १००/- बोनस असे एकूण रू. ७००/- घेतले जातात.

**२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगार संघटना आणि कार्ये :-**

विशेषतः कामगार संघटनेचे प्रमुख कार्य म्हणजे कामगारांचे दैनंदिन प्रश्न सोडविणे, बदली कामगारांना काम मिळवून देणे, कामगारांच्या विविध समस्यांची सोडवणूक करणे, वेतनाची अंमलबजावणी होते की नाही ते पाहणे जनरल मॅनेजरशी, कार्यकारी संचालक व व्यवस्थापक मंडळ यांच्या बरोबर विविध समस्यावर चर्चा करणे, कामगारांना सरकारच्या कामगार धोरणांची माहिती देणे इत्यादी कार्ये कामगार संघटना पार पाडीत असते. वाटाघाटी, संप, मंदगतीने काम करणे, घेराओ, मोर्चे ही सर्व संघटनेची हत्यारे असतात.

सूत गिरण्यामधील ३५४ नमुन्यादाखल घेतलेल्या कामगारांपैकी ९७ टक्के कामगारांचे असे मत आहे की, कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी संघटनेने व्यवस्थापकाशी वाटाघाटी आणि तडजोड हा मार्ग स्विकारून आपले प्रश्न सोडवावेत. आजपर्यंत कामगारांचे सर्व प्रश्न वेतन, बोनस, रजा, सुट्टी व इतर समस्या संघटनेने व्यवस्थापनाशी चर्चा, वाटाघाटी, तडजोड या माध्यमाने सोडविलेले आहे. विशेष म्हणजे संघटनेला कामगारांच्या प्रश्नावरून संप, मोर्चा वगैरे मार्गाचा अवलंब करावा लागला नाही म्हणजेच सर्व प्रश्न तडजोडीने सोडविले जातात.

**३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगार संघटना व आर्थिक, सामाजिक सुविधा :-**

प्रत्यक्षात सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगारांच्यासाठी कल्याणकारी सुविधा पुरविलेल्या आहेत. या व्यतिरिक्त संघटनेद्वारे देखील काही योजना राबविल्या जातात. त्यामध्ये कामगारांच्या मुलांना वह्या पुस्तके वाटणे, कामगारांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत देणे, खेळाडू कामगारांना प्रोत्साहन देणे, १ मे कामगार दिना दिवशी गुणवंत कामगार पुरस्कार देणे, विविध जयंत्या साजऱ्या करणे, त्यामध्ये महात्मा फुले सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे, गणेशोत्सव व शिवजयंती इत्यादी तसेच रक्तदान शिबीरे घेणे अशा प्रकारचे कार्यक्रम संघटना आयोजित करते. कामगारांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच कामगारांना कामगार विषयक प्रश्नांमध्ये मार्गदर्शन केले जाते. अशाप्रकारे कामगार संघटना आर्थिक व सामाजिक कार्य करीत असल्याचे अनुसूची वरून आढळते.

## ४. कामगार संघटना व वैयक्तिक कामगार

गरजेनुसार कामगार संघटना सभासद कामगारांची मिटींग बोलावतात त्यामध्ये विविध समस्यावर चर्चा केली जाते. उदा. बोनस, वेतन, ग्रॅज्युएटी, विमा, प्रॉव्हीडंड फंड, फॅमिली पेन्शन इत्यादी. याशिवाय कार्यकारी मंडळाची तीन महिन्यातून एकदा मिटींग होते. या मंडळाने ठरवून दिलेल्या विविध विषयावर त्यामध्ये चर्चा केली जाते. तसेच कामगारांच्या समस्या या संघटना आणि व्यवस्थापक मंडळ यांच्या चर्चेतून सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. जर एखाद्या कामगाराला अन्य कारणाने कामावरून कमी केले तर संघटना त्याला परत कामावर घेण्याविषयी प्रयत्न करते. मात्र कामगारांने नियमबाह्य वर्तन केल्यास व कामगाराला कामावरून कमी केले तर मात्र संघटना त्यासाठी काहीही करू शकत नाही. उदा. बदली कामगार सलग १० दिवस गैरहजर राहीला तर. कायम कामगार ६० दिवस गैरहजर राहीला तर त्याला कामावरून कमी केले जाते. अर्थात कमी करण्यापूर्वी त्याला सूचना, नोटीस, दिल्या जातात. दुसरे म्हणजे कायम कामगारांचे गैर हजेरीचे प्रमाण वाढले तर त्याला एक दोन वेळा नोटीस दिली जाते. तसेच त्याला प्रत्यक्ष बोलावून ताकीद दिली जाते. यातूनही तो ऐकत नसेल तर शेवटी त्याला कामावरून कमी केले जाते. अशावेळी संघटना काहीही करू शकत नाही. यावरून असे दिसून येते की, कामगार संघटना बेशिस्त कामगारांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ शकत नाही. विशेषतः कामगारांमध्ये जबाबदारीची व शिस्तिची जाणीव निर्माण करणे हे कामगार संघटनेचे प्रमुख कार्य आहे. तेच महत्वाचे कार्य सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगार संघटना करीत असल्याचे आढळते.

## ५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगार संघटना आणि व्यवस्थापन मंडळ :-

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगार संघटना आणि व्यवस्थापन मंडळ या दोहोंचे संबंध संघर्षात्मक समोपचाराचे व समन्वयाचे परिस्थितीनुसार असू शकतात. काही प्रश्न कोर्टात केसेस घालून सोडवावे लागतात. अशावेळी संघर्षाचा उपयोग करावा लागतो. थोडक्यात कामाच्या स्वरूपावरून संघटना व व्यवस्थापक मंडळ यांचे संबंध निश्चित केले जातात. अर्थात हा उपक्रम महाराष्ट्र सरकारचाच आहे. संघर्षात्मक परिस्थिती सूत गिरणीमध्ये अल्प किंवा जवळ जवळ होत नसावेत असे दिसून येते.

एकंदरीत पाहता सूत गिरण्यातील कामगार संघटना कामगारांची आर्थिक बाजू उचलून धरण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक व आरोग्यविषयक सुविधांबाबतीत संघटनांनी फारशी भरीव कामगीरी केलेली नाही. परंतू बहुसंख्य कामगार संघटनेचे सभासद असल्याचे आढळते. नमुना पाहणीत ३५४ कामगारांपैकी ७५ टक्के कामगारांची संघटनेविषयी काहीही तक्रार नाही. तर २५ टक्के कामगारांची संघटनेविषयी तक्रार

आहे. तसेच ८० टक्के कामगार सर्व सभांना हजर राहतात. १५ टक्के कामगार काही सभांना हजर राहतात व केवळ ५ टक्के सभासद कामगार कोणत्याही संघटनेच्या सभेला हजर राहत नाहीत. यावरून असे दिसून येते की, कामगार संघटनेचे सभासद होण्याचे महत्व काही कामगारांना पटलेले नाही.

## ६.१ सैध्दांतिक पार्श्वभूमी :-

१. **रॉयल कमिशनच्या मते** :- "कामगारांच्या बौध्दिक, कलात्मक, आरोग्य विषयक आणि कामगारांच्या आकांक्षाना पूरक अशा सर्व बाबींचा समावेश कामगार कल्याणमध्ये केला जातो."[२]

रॉयल कमिशनच्या व्याख्येनुसार कामगारांच्या बौध्दिक सुविधांचा समावेश कल्याणकारी योजनामध्ये गृहित धरलेला बौध्दिक कौशल्य म्हणजे कामगारांना प्रशिक्षण देणे, बौध्दिक व्याख्याने आयोजित केल्याने कामगारांच्या बौध्दिक पातळीत वाढ होण्यास मदत होते. तसेच कामगारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम घेणे, गणेशोत्सव, कामगार दिन, इत्यादी आरोग्य विषयक पुरविण्यात येणाऱ्या सुविधाचा देखील समावेश कल्याणीकारी सुविधामध्ये रॉयल कमिशनने केलेला आहे. या सिध्दातांनूसार सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये कामगारांसाठी आरोग्य तपासणी, धुम्रपानावर व्याख्याने आयोजित केली जातात तसेच एड्स वरील व्याख्याने, बौध्दिक व्याख्यानमाला असते. नविन तंत्रज्ञानाबद्दल माहिती व प्रशिक्षण दिले जाते. तसेच कामगारांच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्याचे कार्य सूत गिरण्या मार्फत केले जाते. तसेच कामगार दिनादिवशी उत्कृष्ट काम करणाऱ्या कामगारांचा पूरस्कार देऊन सत्कार केला जातो. तसेच या व्यतिरीक्त अनेक कल्याणकारी योजना सोलापूर जिल्ह्यातील स्वामी समर्थ, शेतकरी सहकारी, शरद, महात्मा फुले, शेतकरी महिला सहकारी सूत गिरण्यातर्फे राबविल्या जातात.

२. **श्रम संशोधन समिती :-** "कामगार कल्याणात मालकाने कामगारांसाठी केलेल्या बौध्दिक, भौतिक व आर्थिक सुधारणा होय"[३]

श्रम संशोधन समितीच्या व्याख्येवरून असे म्हणता येते की, कामगार कल्याण ही संकल्पना खुप लवचिक स्वरुपाची आहे. कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती, कामाचे तास, कामाची परिस्थिती, कामगारांचे आरोग्य सुरक्षितता व कार्यक्षमता सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे कल्याणीकारी सुविधा होय.

अभ्यासासाठी निवड केलेल्या जिल्ह्यातील पाच ही सहकारी सूत गिरण्यात कामगारासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनामुळे कामगारांचे जीवनमान उंचावत आहे तसेच कामगारांचा विकास होऊन सामाजिक सुधारणामध्ये वाढ होत आहे

**३) आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते :-**

"काम करण्याच्या ठिकाणी किंवा त्यांच्या जवळ खाण्यापिण्याच्या सुविधा, निवास, करमणूकीच्या सुविधा व ज्या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक अपूरी असेल त्या ठिकाणी वाहतूकीची व्यवस्था करणे इ. कार्याचा समावेश कल्याणामध्ये होत असतो."[१]

अंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते काम करणाऱ्या कामगारांच्या काम करण्याच्या ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, स्वच्छ हवा, प्रकाश तसेच चहा, नाष्टा व जेवन अल्पदरात उपलब्ध करुन देणे. राहण्यासाठी निवासाची सोय करणे, तसेच कामगार बाहेरगावावरुन येत असेल तर कामगारांना ये-जा करण्यासाठी मोफत वाहनांची सोय करणे या सर्व सुविधांचा समावेश कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनामध्ये होतो. या सर्व सुविधा दिल्यास कामगारांचे आरोय चांगले राहते असे वरील व्याख्येवरून स्पष्ट होते. सोलापूर जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यामध्ये वरील कल्याणकारी योजना राबविल्या जातात. हे कामगारांकडून अनुसूचीद्वारे भरुन घेतलेल्या तथ्य संकलावरून स्पष्ट झालेले आहे.

## ६.२ गृहितकाची तपासणी :-

१) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या आहेत. :-

हे गृहित सूत गिरण्यातील कामगारांसाठी लागू झालेले आहे. निवड केलेल्या सूत गिरण्यातील कामगारांना वरील समस्या आहेत. निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी  आर्थिक इतक्या कामगारांना सामाजिक समस्या आहेत. आर्थिक समस्यामध्ये - दरमहा उत्पन्न यामध्ये ५७% कामगार दारिद्र्याचे जीवन जगतात. पुरेसे वेतन नाही असे निवड कामगारापैकी ९५% कामगारांनी सांगितलेले आहे. तसेच मिळालेल्या वेतनापासून सर्व गरजा भागविता येत नसल्याने कामगार कर्ज घेऊन इतर गरजा भागवितात. निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी मित्र व नातेवाईकाकडून ७३ कामगारांनी कर्ज घेतलेले आहे हे प्रमाण २०.३७% आहे, सावकांराकडून ३३ कमगारांनी कर्ज घेतलेले आहे हे प्रमाण टक्केवारीत ९.२५% व्यापारी बँका / राष्ट्रीय बँकाकडून ५९ कामगारांनी सहकारी बँका / पतसंस्थेकडून १२४ कामगारांनी कर्ज घेतलेले आहे. टक्केवारीत हे प्रमाण ३५.१९% आहे  इतर वित्त संस्थेकडून देखील कामगारांनी कर्ज घेतल्याचे अनुसूची संकलनावरून आढळुन आले आहे.

२) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या आपल्या कामगारासाठी विधि कल्याणकारी योजना राबवितात. सोलापूर जिल्ह्यातील अभ्यासाठी निवडलेल्या सहकारी सूत गिरण्या कामगारासाठी निवास, वाहतूकीची व्यवस्था, आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण कामगारांचे जीवनमान उंचाविण्याच्या सर्व सुविधा पुरवितात तसेच सूत गिरण्या कामगारांना उपहारगृहे विश्रांती स्थाने, आरोग्याच्या सोयी, पाणी पुरवठा, पाळणागृहे, स्नानगृहे, करमणूकीच्या सोयी, चर्चा सत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम व वाहतूक व्यवस्था या सुविधा पुरविल्या जातात. या व्यतिरिक्त अनेक कल्याणकारी योजना या सूत गिरण्या राबवित आहेत.

**संदर्भ :-**


१) डॉ. प्रभाकर देशमुख, (वर्ष १९८७) श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. १६९.

२) डॉ. प्रभाकर देशमुख, (वर्ष १९८७)श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. १७०.

३) डॉ. प्रभाकर देशमुख, (वर्ष १९८७) श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. १७१.

४) डॉ. दि. के. देशपांडे, (वर्ष १९९०)औद्योगिक अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) डॉ. डी.एस. मनवर, प्रा. डॉ. सौ. अंजली जोशी (२००७), औद्योगिक समाजशास्त्र, अरुणा प्रकाशन लातुर. पृष्ठ क्र. २०२.

६) उपाध्ये ना.धो., (वर्ष २००५)कारखाने अधिनियम १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम १९६३, प्रकाशक :- गो. य. राणे, पुणे.

७) श्री. वसंत भगवंत कर्णिक, (वर्ष २००१)कामगार संघ आणि औद्योगिक संबंध, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

८) डॉ. बी.पी. ठाकुर, मे २०१० लातुर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास, पी.एच.डी. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ,)

९) श्री. बगाराम तुळतुळे, (वर्ष २००३)कामगार आकांक्षा आणि अवाहन, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

१०) सर्वेक्षण माहितीवरून

११) अनुसूचीवरून

१२) निरीक्षणावरून

१३) V.V. Giri, Labour Problems in Indian Industry, Asia Publishing House, Mumbai.

## प्रकरण ७ वे
## पंचवार्षिक योजना व जागतिकीरणाची आव्हाने

७.१ स्वातंत्रोत्तर काळातील भारतीय सहकारी चळवळीचा विकास

७.१.१ पहिली पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.२ दुसरी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.३ तीसरी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.४ चौथी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.५ पाचवी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.६ सहावी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.७ सातवी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.८ आठवी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.९ नववी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.१० दहावी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

७.१.११ आकरावी पंचवार्षिक योजना व सहकारी सूतगिरण्यांचा विकास

**७.२ महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण**

७.२.१ सहकारी सूत गिरण्या : भागभांडवल

७.२.२ यंत्रमाग

७.२.३ व्याज सवलत योजनेचे सनियंत्रण

७.२.४ कामगारासाठी सुधारणा

७.२.५ दिर्घ मुदती कर्जावर सवलत योजना

७.२.६ केंद्र पुरस्कृत TuFS योजनेशी निगडीत व दिर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना

७.२.७ विदर्भ मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील घटकांना १०० टक्के भांडवली अनुदान

**७.३ जागतिकीकरणाची आव्हाने**

७.३.१ जागतिकीकरणाचा अर्थ

७.३.२ जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्था

७.३.३ जागगिकीकरण व सहकारी सूत गिरण्या

७.३.४ जागतिकीकरणाची आव्हाने

७.३.५ जागगिकीरणानंतर सहकारी सूत गिरण्यांची आवश्यकता

**७.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी**

**७.८ गृहितकांची तपासणी**

# प्रकरण सातवे

# पंचवार्षिक योजना व जागतीकीकरणाची आव्हाने

## ७.१ स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय सहकारी चळवळीचा विकास :

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले लोकशाही सरकार अधिकारारुढ झाले. भारतीय सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीतून ही एक महत्वपुर्ण घटना होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या आर्थिक विकासासाठी सहकारी चळवळीस मदत करण्याचे सरकारचे धोरण पुढे चालूच राहिले. या काळात निर्वासितांचे पुनर्वसन आणि निवृत्त सैनिकांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सरकारने गृहनिर्माण, औद्योगिक आणि सहकारी शेती विकासाला अधिक चालना दिली. या कालावधीत गृहनिर्माण सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था आणि सहकारी शेतीचा मोठया प्रमाणात विकास झाला. तसेच सहकारी चळवळीचे क्षेत्र विस्तारले. याच काळात उत्तर प्रदेश, मद्रास, मुंबई आणि म्हैसूर राज्यातून बहुउद्देशीय सहकारी संस्थाचा मोठया प्रमाणत विकास झाला.

स्वतंत्र भारतातील जनतेच्या आशा-आकांक्षा पुर्ण करण्यासाठी देशाच्या सर्वांगीण विकासाच्या योजना आखणे तसेच कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे सरकारची पहिली महत्वाची जबाबदारी होती. त्या अनुषंगाने भारताच्या घटनेत देखील पुढील मार्गदर्शक तत्वे घालून देण्यात आली.

१) देशातील प्रत्येक नागरिकास वाजवी जीवनमान जगता यावे या दृष्टीने साधन सामग्रीचा अधिकार.

२) जास्तीत जास्त सर्वसाधारण कल्याण साधण्यासाठी राष्ट्रीय साधनसंप्पतीचा वापर करणे.

३) सर्वसाधारण हिताला बाधक ठरू शकेल असे संपत्तीचे केंद्रीकरण टाळणे. घटनेतील या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने देशातील नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करुन देशातील सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने सरकारने आर्थिक नियोजनाचा मार्ग अंगीकारला. आतापर्यंत १२ पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या आणि त्यातील ११ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या. देशाचा जलद आर्थिक विकास घडविणे आणि लोकशाही पध्दतीने न्याय आणि समता यावर आधारीत अशा समाजवादाची निर्मिती करणे हे आर्थिक नियोजनामधील महत्वाचे उद्दीष्ट होते. नियोजनाद्वारे मिश्र अर्थव्यवस्थेची निर्मिती करण्यामध्ये खाजगी क्षेत्र आणि सरकारी क्षेत्राला सारखे महत्वाचे स्थान देण्यात आले आणि आर्थिक विकासामधील या दोन क्षेत्रांकडून राहणाऱ्या त्रुटी किंवा उणीवा दूर करण्याचे कार्य सहकारी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.

### ७.१.१ पहिल्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास.

"लोकशाही पध्दतीने आणि नियोजनाच्या आधारे देशाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने पहिल्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्राबाबत पुढीलप्रमाणे धोरण ठरविण्यात आले.

१) सहकार हे लोकशाही नियोजनाचे एक साधन आहे हे लक्षात ठेवून स्वयंप्रेरणा, परस्पर हितसंवर्धन आणि सामाजिक हेतू या त्रिसूत्रीच्या आधारे सहकारी क्षेत्राच्या विकासाचा कार्यक्रम ठरविणे.

२) ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचा पंचायतीशी निकटचा संबंध निर्माण करणे.

३) ग्रामीण भागातील जनतेच्या बहुतेक गरजा पुर्ण करता येतील अशा बहुउद्देशीय भांडांराचा विकास करणे.

४) पहिल्या योजनेत देशातील ५० टक्के खेडी आणि ३० टक्के ग्रामीण जनता सहकारी क्षेत्राखाली आणणे.

५) शेतीतील उत्पादनवाढीसाठी दरसाल रु.१३० कोटी रुपयांचा पतपुरवठा करणे.

६) सहकारी शेतीचा विकास करणे.

७) सहकारी चळवळीचा आदर्श आणि वेगवान विकास व्हावा यासाठी सहकारी सेवकवर्गाच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

८) शेती उत्पादनास योग्य किंमत मिळवण्यासाठी पतपुरवठयाच्या जोडीला सहकारी खरेदी विक्री संस्थाचा विकास करणे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सहकारी पतपुरवठा क्षेत्राने केलेल्या प्रगतीचा अंदाज खालील आकडेवारीवरुन येईल"[१].

**तक्ता क्र. ७.१**

**७.१ सहकारी क्षेत्राचा विकास**

| अ.क्र | सहकारी क्षेत्र | १९५०-५१ | १९५५-५६ |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक शेती सहकारी पतपुरवठा संस्था | १,१५,४६२ | १,५९,९३९ |
| २) | सभासद संस्था (लाखांत) | ५१.५४ | ७७.९१ |
| ३) | प्रत्येक संस्थेची सरासरी सभासद संख्या | ४५ | ४९ |
| ४) | ग्रामीण जनतेचे या क्षेत्राशी प्रमाण % | १०.३ | १५.६ |
| ५) | दिलेली कर्जे (कोटी रु) | २२.९० | ५०.१६ |
| ६) | प्रत्येक सभासदास सरासरी कर्जे (रु) | ४५ | ६४ |
| ७) | प्रत्येक संस्थेचे सरासरी भांडवल (रु.) | ७२७ | १०५१ |
| ८) | खेळते भांडवल सरासरी (रु) | ३५४७ | ४९४६ |
| ९) | प्रत्येक संस्थेकडील सरासरी ठेवी (रु.) | ३९१ | ४४१ |
| १०) | थकबाकीचे प्रमाण | २.१० | २५.९ |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २१६

वरील आकडेवारीचा विचार केला तर असे आढळते की, पहिल्या योजनेत ग्रामीण भागातील १५.६ टक्के जनता सहकारी क्षेत्राखाली आली. कर्जाच्या रक्कमेत लक्षणीय वाढ झाली पण त्याचबरोबर थकबाकीचे प्रमाण वाढले. ठेवीच्या प्रमाणात फारशी वाढ झाली नाही. थोडक्यात पहिल्या योजनेत सहकारी क्षेत्रात प्रगती समाधानकारक झाली असे म्हणता येणार नाही. पहिल्या योजनेत ठरविण्यात आलेली सहकारी क्षेत्राबाबतची उद्दीष्ट्ये खालील कारणांमुळे साध्य होऊ शकली नाहीत.

१) सहकारी संस्थांचा कमकुवतपणा हे महत्वाचे कारण होय. अनेक संस्थांची रचना बरोबर नव्हती. तसेच अपुरी सभासद संख्या, अपुरे भांडवल, थकबाकीत वाढ आणि ठेवी मिळविण्यातील अपयश यामुळे सहकारी संस्था अधिक कमकुवत बनल्या.

२) या काळातील राज्य सरकारांचे सहकारी क्षेत्राबाबतचे धोरण स्पष्ट नव्हते.

३) विविध राज्यांतील सहकारी क्षेत्राच्या उद्दीष्टांबाबत एक वाक्यता व सुसूत्रीकरणाचा अभाव हे आणखी एक महत्वाचे कारण होय.

४) सर्व देशांच्या दृष्टीने व्यापक अशी सहकारी क्षेत्राची उद्दीष्टे ठरविली गेली नाहीत.

५) पतपुरवठयावर भर दिला गेला पण पतपुरवठा आणि सहकारी खरेदी विक्री यात सांगड घातली गेली नाही.

## अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती.

पहिल्या योजना काळातील एक महत्वाची घटना म्हणजे रिझर्व्ह बँकेने १९५१ मध्ये श्री.ए.डी.गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली वरील समितीची केलेली स्थापना होय. या समितीने सहकारी क्षेत्राच्या विकासाची पाहणी केली आणि या क्षेत्राच्या मंद विकासाबद्दलची कारणे नमूद केली. तसेच सहकारी चळवळीचा अधिक चांगल्या प्रकारे विकास व्हावा म्हणून कांही शिफारशीही केल्या. देशातील ग्रामीण भागाला कर्जपुरवठा करण्यात सावकारांचा हिस्सा सर्वात मोठा असून सहकारी क्षेत्रामार्फत फक्त ३.५ टक्के इतकी गरज भागविली जाते असे या समितीला आढळले. देशातील ग्रामीण भागाला रु.७५० कोटी गरज असल्याचे समितीने नमूद केले. या समितीने आपल्या अहवालात परस्परसंबंधीत ग्रामीण पतपुरवठा योजना सुचविली, की ज्यामध्ये सरकारने सहकारी संस्थांच्या भांडवलात भागीदारी करणे, पतपुरवठा आणि खरेदी विक्री यात संबंध निर्माण करणे आणि सहकारी संस्थांचे व्यवस्थापन शिक्षीत सेवकवर्गातून करण्याची अशी ही योजना होती.

## ७.१.२ दुसरी पंचवार्षिक योजना आणि सहकारी क्षेत्राचा विकास

"अखिल भारतीय पतपुरवठा पाहणी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुरोधाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची उद्दीष्ठये ठरविण्यात आली ती पुढीलप्रमाणे.

१) मोठया आकाराच्या पतपुरवठा संस्थाचा विकास करणे.

२) प्रत्येक जिल्हयात अर्थक्षम मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्याच्या दृष्टीने सहकारी बँकींग रचनेची पुनर्रचना करणे.

३) प्राथमिक खरेदी विक्री सस्थांची पुनर्रचना करणे.

४) ज्या राज्यात मध्यवर्ती भू-तारण बँका नाहीत तेथे त्यांची स्थापना करणे.

५) प्रक्रिया संस्थाचा विकास करणे, गुदामांचा विकास करणे.

६) सहकारी संस्थाचे निरीक्षण, तपासणी आणि हिशोब तपासणी अधिक बळकट करणे.

७) राज्य पातळीवर मदत आणि हमी निधी निर्माण करणे.

८) सहकारी सेवकांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी क्षेत्राने केलेल्या प्रगतीचा अंदाज खालील आकडेवारीवरुन येऊ शकेल"[२].

**तक्ता क्र. ७.२**

**दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी क्षेत्राने केलेली प्रगती**

| **अ.क्र** | **तपशील** | **१९५५-५६** | **१९६०-६१** |
|---|---|---|---|
| १) | सहकारी संस्थाची संख्या (लाखांत) | २.४० | ३.३२ |
| २) | सभासद संख्या (लाखात) | १७६ | ३४२ |
| ३) | भांडवल (कोटी रु.) | ७७ | २२१ |
| ४) | खेळते भांडवल (कोटी रु) | ४६९ | १३१२ |
| ५) | प्राथमिक संस्थानी दिलेली कर्जे (कोटी रु) | ५० | २०३ |
| ६) | समाविष्ठ जनसंख्येचे प्रमाण | १२ | २४ |
| ७) | सरासरी ठेवी | ४४१ | ६८८ |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २१७

### ७.१.३ तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास :

"देशाच्या आर्थिक विकासासाठी सहकारी क्षेत्राच्या विकासावर अधिक भर देण्याचे ठरविण्यात आले. विशेषतः कृषी क्षेत्राचा विकास करणे, पतपुरवठयात वाढ करणे, लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगांचा विकास करणे, उत्पादन, विक्री, वितरण आणि सेवा संस्थाचा विकास करणे यावर भर देण्याचे ठरविण्यात आले. तिसऱ्या योजनेतील सहकारी क्षेत्राबाबतची उष्ट्यिे खालीलप्रमाणे ठरविण्यात आली आहेत.

१) भारतातील सर्व खेडी सहकारी पतपुरवठयाखाली आणणे आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या जनतेपैकी ६० टक्के जनता सहकारी क्षेत्राखाली आणणे.

२) प्राथमिक शेतीला अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था अधिक सुदृढ करण्यासाठी त्यांची पुनर्रचना करणे.

३) शेतीस सहकारी संस्थांमार्फत रु.५३० कोटी अल्प आणि माध्यम मुदतीची १५० कोटी रुपयांची दीर्घ मुदतीची कर्ज पुरविणे.

४) तिसऱ्या योजनेअखेर भारतातील सर्व खेडी सहकारात समाविष्ठ होतील अशाप्रकारे सहकारी संस्थांचा विकास करणे.

५) खरेदी-विक्री आणि प्रक्रिया संस्थांचा विकास करणे आणि खरेदी-विक्री संस्थांशी पतपुरवठयाची सांगड घालणे.

६) ग्रामीण आणि नागरी भागात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करता येण्याच्या दृष्टीने ग्राहक भांडारांचा विकास करणे.

७) सहकारी तत्वावर लघुद्योगांचा विकास करणे.

८) सहकार क्षेत्रातील विविध पातळ्यावरील सेवक वर्गाची कार्यक्षमता वाढविणे.

**तिसऱ्या योजनेतील प्रगती :** तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेरीस भारतात ३,४६,१८५ सहकारी संस्था होत्या व त्यातील २,१४,०१२ पतपुरवठा संस्था होत्या. सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या पाच कोटींच्या वर होती. खेळते भांडवल २४०० कोटी रुपये होते. या योजनेअखेरीस पुनर्रचनेचे कार्य केले गेल्यामुळे सहकारी संस्थांच्या संख्येत नंतर घट झाली या काळात पतपुरवठा संस्थांनी रु.४२७ कोटींची कर्जे दिली. खरेदी विक्री संस्थाची संख्या ३१०८ वरुन ३१९८ वर पोहोचली. या संस्थांनी तिसऱ्या योजनेत रु.३०९ कोटींची उलाढाल केली"[३].

### ७.१.४ चौथ्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास :

"चौथ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्राच्या विकासासाठी रु.१७८.५७ कोटींची तरतूद करण्यात आली. देशातील सहकारी क्षेत्राचा सुसूत्र विकास घडवून आणण्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत पुढील कार्यक्रम ठरविण्यात आला.

१) प्राथमिक सहकारी संस्थांचे जाळे आर्थिकदृष्ट्या आधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने त्या संस्थांची पुनर्रचना करणे, मध्यवर्ती बँकांचे पुनर्वसन करणे, प्राथमिक संस्थाना प्रत्यक्ष कर्जपुरवठा करणे, थकबाकीचे प्रमाण कमी करणे, कृषी पतपुरवठा स्थैर्य निधी मजबूत करणे, संस्थाच्या देखरेख आणि निरीक्षणाची व्यवस्था करणे आणि ग्रामीण भागातून बचती गोळा करण्यासाठी सहकारी बँकांचे जाळे ग्रामीण भागात निर्माण करणे.

२) सहकारी संस्था आणि भू-विकास बँकांची धोरणे लहान शेतकऱ्यांना अनुकूल ठरतील अशा प्रकारे आखणे.

३) खरेदी विक्री संस्थाद्वारे रु.९०० कोटी उलाढाल करणे. रु.२५ कोटी आंतरराज्यीय व्यापार आणि रु.१० कोटी आयात-निर्यात करणे.

४) सहकारी संस्थांमार्फत रु.६५० कोटी खते, रु.५० कोटी बी-बियाणे, ५० कोटी रुपयांची कीटकनाशके आणि १५ कोटी रुपयांच्या अवजारांचे वाटप करणे.

५) सहकारी संस्थाची गोडाऊन क्षमता २० लक्ष टनांनी वाढविणे आणि ग्राहक भांडारांमार्फत ५०० कोटी रुपयांच्या वस्तूंचे वाटप करणे.

६) योजना काळात १६०० शेतीमाल प्रक्रिया संस्था निर्माण करणे व इतर सहकारी संस्थाचाही विकास करणे"[४].

**चौथ्या योजना काळातील प्रगती.**

चौथ्या योजना काळात सहकारी क्षेत्रात केलेली प्रगती संमिश्र स्वरुपाची आहे. खालील आकडेवारीवरुन चौथ्या योजना काळात केलेल्या प्रगतीची कल्पना येईल.

**तक्ता क्र. ७.३**

**चौथ्या योजना काळातील प्रगती.**

| अ.क्र. | तपशील | परिमाण | स्थिती १९६८-६९ | स्थिती १९७३-७४ |
|---|---|---|---|---|
| १. | सहकारी संस्था | रु.लाखात | ३.३ | ३.३ |
| २. | प्राथमिक संस्था सभासद | रु.कोटीत | ५.७० | ६.७८ |
| ३. | भागभांडवल | रु.कोटीत | ६६.३ | १०५१ |
| ४. | कार्यकारी भांडवल | रु.कोटीत | ४०८९ | ८५८५ |
| ५. | समाविष्ठ लोकसंख्या | टक्के | ३४ | ४१ |
| ६. | प्राथमिक संस्थाचे भांडवल | रु.कोटीत | १६३.३१ | २७१.०६ |
| ७. | प्राथमिक संस्था कर्ज वाटप | रु.कोटीत | ५०३.९७ | ७६०.४६ |
| ८. | कर्ज वाटपापैकी मध्यम मुदत कर्ज | रु.कोटीत | ४७.४८ | ७१.१५ |
| ९. | प्राथमिक संस्थांकडील सरासरी ठेवी | रुपयांत | ३३९० | ५८०० |
| १०. | सरासरी प्रत्येक सभासदामागे कर्ज | रुपयांत | १७३ | २१७ |
| ११. | कर्ज थकबाकी | टक्के | ३५ | ४२ |
| १२. | भू-विकास बँक | | | |
| | (अ) मध्यवर्ती | संख्या | १९ | १९ |
| | (ब) प्राथमिक | संख्या | ७५० | ८५७ |
| १३. | भू-विकास बँकांचे कर्ज वाटप | रु.कोटीत | १४८.१८ | १५८.०९ |
| १४. | थकबाकी (भू-विकास बँक) | टक्के | १६.८ | ३३.७ |
| १५. | शेती उत्पादन संस्थानी केलेली विक्री | रु.कोटीत | ५८८.४६ | १२१४.९१ |
| १६. | शेती उत्पादन संस्थाद्वारे वाटप (खते, बियाणे, हत्यारे, जंतुनाशके) | रु.कोटीत | २५३.०२ | ७५७.७१ |

आधार :- डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २१९

**अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती (१९६९)**

भारतीय रिझर्व्ह बँकेने सेवानिवृत्त डेप्युटी गव्हर्नर श्री.वेंकटय्या यांच्या अध्यक्षतेखाली वरील समिती नेमली. या समितीने पुढील शिफरशी केल्या. १) शेती पत मंडळाची स्थापना करणे २) लहान शेतकऱ्यांच्या विकासासाठी विकास एजन्सी निर्माण करणे. ३) ग्रामीण भागात शेती आणि लघुउद्योगांच्या विकासासाठी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ स्थापन करणे ४) कृषी पुनर्पतपुरवठा महामंडळाचे आकारमान आणि कार्याची व्याप्ती वाढविणे. ५) शेतीला पुरेशा प्रमाणात आणि वेळेवर व्यापारी बँकाकडून कर्जपुरवठा होण्याची सोय करणे या शिफारशीची बऱ्याच प्रमाणात अंमलबजावणी करण्यात आली.

### ७.१.५ पाचव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास :

"पाचव्या योजनेत शेतकरी, कामगार, कारागीर आणि ग्राहक यांच्या गरजांची पुर्तता करण्याच्या दृष्टीने आर्थिकदृष्ट्या बळकट आणि भक्कम अशा सहकारी क्षेत्राची उभारणी करण्याचे ठरविण्यात आले. सामाजिक न्यायासाठी विकास या राष्ट्रीय धोरणची अंमलबजावणी करण्यासाठी सहकारी क्षेत्राचा वापर या योजनेत केला जाणार होता. तसेच, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत स्थैर्य निर्माण करुन समाजाच्या मुलभूत गरजा भागविणे आणि त्यासाठी ग्राहकांच्या सहकारी संस्थांचा विकास करण्याचे निश्चित करण्यात आले इतर उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१) पतपुरवठा, वितरण, विक्री, प्रक्रिया इत्यादी शेती विकासाला मदत करणाऱ्या सहकारी संस्थांचे जाळे भक्कम करणे.

२) आर्थिकदृष्ट्या बळकट आणि भक्कम ग्राहक सहकारी चळवळ उभारणे.

३) सहकारी चळवळीच्या विकासातील आणि विशेषतः पतपुरवठयातील विषमता दूर करणे.

४) लहान शेतकरी आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांना अधिक उपयोग होईल अशा प्रकारे सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे या योजनेत सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी ४२३ कोटी रुपयांची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले"[५].

**तक्ता क्र. ७.४**

**पाचव्या योजनेतील सहकारी क्षेत्राची उद्दीष्ट्ये व साध्य**

| अ.क्र. | कार्यक्रम | १९७३-७४ ची स्थिती (कोटी रु.) | ५ वी योजना उद्दीष्ट (कोटी रु.) | ५ वी योजना साध्य (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|
| १) | अल्प मुदतीची कर्जे | ७०० | १२०० | १२६२ |
| २) | मध्यम मुदतीची कर्जे | २०० | ३५० | ७५३ |
| ३) | दीर्घ मुदतीची कर्जे | ११०० | १५०० | १०९५ |
| ४) | शेतमाल विक्री (लक्ष रु) | ११०० | १६०० | १३३४ |
| ५) | सहकारी प्रक्रिया संस्था (माल रु.) | १५०० | १९०० | १९०० |
| ६) | खत विक्रीचे लक्ष्य | ३०० | १००० | ९०० |
| ७) | बी-बियाणे, जंतुनाशके व अवजारे | १०० | २०० | ११५ |
| ८) | सहकारी गुदाम क्षमता (लक्ष टन) | ३३ | ५० | ४५ |
| ९) | ग्राहकोपयोगी वस्तू वाटप (नागरी आणि ग्रामीण भाग) | ३८० | १२०० | १२५० |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २२०

### ७.१.६ सहाव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास (१९७६-८१)

"सहाव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्रासाठी खालील उद्दिष्टे निश्चीत करण्यात आली.

१) सभासदांच्या सर्व गरजांची पुर्तता करता येईल इतपत प्राथमिक संस्था सुदृढ करणे की, ज्यामुळे भविष्यकाळात त्या बहुउद्देशीय संस्थाप्रमाणे कार्य करतील.

२) सहकाराच्या धोरणाचा आणि पध्दतीचा ग्रामीण भागांतील गरीब व्यक्तींच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने पुनर्विचार करणे.

३) पतपुरवठा संस्थांबरोबर फळबाग प्रक्रिया उद्योग, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मच्छेमारी, पशुपालन इत्यादींचा पतपुरवठा, वस्तू पुरवठा, विपणन आणि इतर सेवांच्या साहाय्याने विकास करण्याच्या दृष्टीने सहकारी संघीय संस्थांची पुनर्रचना करणे व त्या सबळ बनविणे.

४) सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी प्रशिक्षीत, व्यावसायिक व्यवस्थापकांचा वर्ग तयार करणे.

५) सहाव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी कर्ज वाटप नियोजन, कार्यक्रम आखणी आणि कार्यवाहीसाठी कृषी आणि ग्रामीण विकास राष्ट्रीय बँकेची सन १९८२ मध्ये स्थापना करण्यात आली. १९८२-८३ या काळात देशात ९४.०८९ प्राथमिक सहकारी संस्था कार्य करीत होत्या व त्यातील ३४०० संस्था नुकसानीत होत्या"[६].

**तक्ता क्र. ७.५**

**सहाव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे व साध्य**

| अ.क्र. | **कार्यक्रम** | **उद्दिष्ट (कोटी रु)** | **साध्य (कोटी रु)** |
|---|---|---|---|
| १ | अल्प मुदतीचे कर्ज वाटप | **२५००** | **२५००** |
| २ | मध्यम मुदतीचे कर्ज वाटप | **२४०** | **२५०** |
| ३ | दीर्घ मुदतीचे कर्ज वाटप | **५५५** | **५००** |
| ४ | वस्तू विपणन | **२५००** | **२७००** |
| ५ | खत वाटप | **१६००** | **१५००** |
| ६ | ग्राहकोपयोगी वस्तू वाटप (ग्रामीण भाग)<br>ग्राकोपयोगी वस्तू वाटप (शहरी भाग) | **२०००**<br>**१६००** | **१४००**<br>**१४००** |
| ७ | सहकारी साखर कारखाने उभारणी (संख्या) | **१८५** | **१८५** |
| ८ | सहकारी सूत गिरणी उभारणी (संख्या) | **८०** | **९०** |
| ९ | शीतगृहे उभारणी (संख्या) | **२७५** | **१८५** |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २२१

या ९४,०८९ संस्थांची सभासद संख्या ६३.५ दशलक्ष होती. त्यांनी रु.२५६८ कोटी कर्जाचे वाटप केले.

### ७.१.७ सातव्या पंचवार्षिक योजनेतील सहकारी क्षेत्राचा विकास

"सातव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठा क्षेत्रासंबंधी खालील गोष्टी ठरविण्यात आल्या आहेत.

१. प्राथमिक सहकारी संस्थांचा त्यांनी बहुद्देशीय संस्था या स्वरुपाचे कार्य करावे अशाप्रकारे विकास करणे.

२. ग्रामीण भागातील दुर्लक्षित वर्गास सहकारी संस्थांद्वारे अधिक सेवा देणे.

३. देशाच्या उत्तर भागात सहकारी क्षेत्राचा विकास करणे.

४. देशाच्या शहरी व ग्रामीण भागांत वस्तू वितरणाचे कार्य अधिक प्रभावीपणे बनविण्याच्या दृष्टीने ग्राहक सहकारी चळवळीचा विकास करणे.

५. सहकारी प्रशिक्षणाचे कार्य प्रभावी बनविणे.

सातव्या योजनेत रु.५५४० कोटी अल्प मुदतीची कर्जे रु.५०० कोटी मध्यम मुदतीची कर्जे, रु.१०३० कोटी दीर्घ मुदतीची कर्जे वाटपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यता आले होते.

तसेच, सहकारी क्षेत्रामार्फत २५०० कोटी रुपये कृषी मालाचे विपणन करणे, रु.३४०० कोटी खताचे वाटप करणे आणि ग्रामीण आणि शहरी भागात प्रत्येकी रु.३५०० कोटी ग्राहकोपयोगी वस्तूंचे वाटप करण्याचे ठरविण्यात आले होते. तसेच ३५ नवीन साखर कारखाने व ४० सूत गिरण्या उभारण्याचे ठरविण्यात आले होते"[७].

**तक्ता क्र. ७.६**

**सातव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे व साध्य**

| अ.क्र. | **योजना कार्यक्रम** | **आधार १९८४-८५** | **योजना उद्दिष्ट १९८९-९०** | साध्य १९८९-९० |
|---|---|---|---|---|
| १ | अल्प मुदतीची कर्जे (कोटी रु) | **२५००** | **५५४०** | **४९०९** |
| २ | मध्यम मुदतीची कर्जे (कोटी रु | **२५०** | **५००** | **७७०** |
| ३ | दीर्घ मुदतीची कर्जे (कोटी रु) | **५००** | **१०३०** | **६७१** |
| ४ | कृषी माल विपणन (कोटी रु) | **२७००** | **५०००** | **५९२९** |
| ५ | खत विक्री (दशलक्ष टन) | **३.६३** | **८.३३** | **५.३** |
| ६ | ग्राहकोपयोगी वस्तू वाटप<br>(अ) ग्रामीण भाग (कोटी रु)<br>(ब) नागरी भाग (कोटी रु) | <br>**१४००**<br>**१४००** | <br>**३५००**<br>**३५००** | <br>**२८५०**<br>**२३३२** |
| ७ | गुदाम क्षमता (संख्या) | **८.००** | **१०.००** | **१३.००** |
| ८ | सहकारी साखर कारखाने उभारणी (संख्या) | **१८५** | **२२०** | **२२४** |
| ९ | सहकारी सूत गिरणी उभारणी (संख्या) | **९०** | **१३०** | **११३** |
| १० | शीतगृहे उभारणी (संख्या) | **१४५** | **२५०** | -- |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर
पृष्ठ क्र २२२

### ७.१.८ आठव्या पंचवार्षिक योजना काळातील सहकारी क्षेत्राचा विकास

"ग्रामीण भागात उत्पादनवाढ आणि अधिक रोजगार निर्माण व्हावेत यासाठी सहकारी चळवळ ही स्वयंशासित आणि स्वयंपूर्ण अशी असावी असे ठरले. राष्ट्रीय योजनांना अग्रक्रम देणे आणि दारिद्र्यनिर्मूलन यासाठी सहकारी क्षेत्रास पुरेसा अर्थपुरवठा करण्याचे ठरले. योजना काळात ग्राहक सहकारी संस्था आणि सार्वजनिक वाटप यात जवळीकता निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच प्रशिक्षण कार्याकडे लक्ष देण्याचे ठरविण्यात आले. आठव्या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली"[८].

**तक्ता क्र. ७.७**

**आठव्या पंचवार्षिक योजनेतील सहकार पतपुरवठा क्षेत्राची उद्दिष्टे**

| अ.क्र. | **योजना कार्यक्रम** | **आधार १९९१-९२** | **स्थिती १९९६-९७** |
|---|---|---|---|
| १ | अल्प मुदतीची कर्जे (कोटी रु) | **४३५०** | **७०२५** |
| २ | मध्यम मुदतीची कर्जे (कोटी रु | **३६०** | **६१५** |
| ३ | दीर्घ मुदतीची कर्जे (कोटी रु) | **९६५** | **१६२५** |
| ४ | कृषी माल विपणन (कोटी रु) | **७१३०** | **७५००** |
| ५ | ग्राहकोपयोगी वस्तू वाटप<br>(अ) ग्रामीण भाग (कोटी रु)<br>(ब) नागरी भाग (कोटी रु) | **२७२५**<br>**२७००** | **४५००**<br>**५०००** |
| ६ | गुदाम क्षमता (संख्या) | **१२१** | **१४२** |
| ७ | सहकारी साखर कारखाने उभारणी (संख्या) | **२२०** | **२६८** |
| ८ | सहकारी सूत गिरणी उभारणी (संख्या) | **१३०** | **१५८** |

**आधार :-** डॉ. जोशी सी.ए. (जुन २००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र २२३

**नवव्या पंचवार्षिक योजना काळातील स्थिती**

"भारतात नववी पंचवार्षिक योजना सन १९९५-९६ ते २००१-२००२ या काळात पूर्ण झाली. देशातील कृषी क्षेत्र आणि कृषी उद्योगाच्या विकासासाठी नाबार्ड बँकेवर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यामुळे सरकारने सहकारी क्षेत्रातील आपली भूमिका कमी करण्याचे धोरण सुरु ठेवले. सन १९१२ साली सरकारने सहकार क्षेत्राबाबतचे आपले धोरण निश्चित केले होते. त्यामुळे सहकार क्षेत्रात लोकशाही खऱ्या अर्थाने नांदावी यासाठी सरकारचे हस्तक्षेप आणि नियंत्रण कमी करण्याचे धोरण अवलंबण्यात आले. त्यामुळे सहकारी क्षेत्र अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना करणे, सहकारातील महिला वर्गाचा सहभाग वाढविणे, सहकारी क्षेत्राखाली अधिकाधिक खेडी आणि लोकसंख्या आणणे, कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधणे, पतपुरवठा अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीची कर्जे एकाच संस्थेमार्फत मिळण्याची सोय करणे, व्यवस्थापनात व्यावसायिकता आणणे, थकबाकीचे प्रमाण कमी करणे, अल्पभूधारक, भूमिहीन मजूर, कारागीर आणि कुटीरउद्योग इत्यादींच्या विकासासाठी लक्ष देणे इत्यादी बाबींवर भर देण्याचे ठरविण्यात आले.

नवव्या पंचवार्षिक योजनेअखेर देशात ९८,२४७ संस्था कार्य करीत होत्या आणि त्यांची सभासद संख्या १,०२,१४१ एवढी होती. या संस्थांचे भांडवल रु.४,३८,९५३ लाख होते आणि एकूण राखीव निधी

रु.२,४६,५५० लक्ष एवढा होता. या संस्थांनी रु.३०,७६,९९९ लक्ष एवढी कर्जे दिली. याच काळात देशात ३० राज्य सहकारी बँका आणि ३७२ जिलहा मध्यवर्ती सहकारी बँका कार्य करीत होत्या"[९].

**७.१.९ दहाव्या पंचवार्षिक योजना काळातील स्थिती (२००२ ते २००७)**

"दहाव्या पंचवार्षिक योजना काळात सहकारी क्षेत्राच्या विकासास प्राधान्य देण्याची आणि विशेषतः पतपुरवठा संस्थांच्या कार्यात कार्यक्षमता आणि तत्परता आणणे तसेच ग्रामीण भागात रोजगार वाढीला अधिक प्राधान्य देण्याचे निश्चित करण्यात आले. दहाव्या पंचवार्षिक योजनेची सहकारी पतपुरवठा क्षेत्राबाबतची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

१. सहकारी क्षेत्रातील पतपुरवठा संस्थांना अधिक गतिमान बनविणे.

२. सहकारी संस्थांचा खर्च कमी करणे.

३. पतपुरवठा संस्थांद्वारे होणाऱ्या पतपुरवठा संस्थात कार्यक्षमता आणणे.

४. जिल्हा मध्यवर्ती बँकांना बिगर कृषी क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्यास सांगणे आणि त्याद्वारे रोजगारात वाढ करणे, ग्रामीण गरीब, लहान भागातील शेतकरी, भूमिहीन शेतकरी, मागासवर्गीय लोक आणि महिला यांच्यासाठी विकास कार्यक्रमाची आखणी करणे.

योजना काळात रु.७,५००/- कोटीची अल्पमुदती कर्ज वाटपाचे उद्दिष्टे होते, प्रत्यक्षात रु.५०४९ कोटीची कर्जे देण्यात आली. तसेच रु.६२५ कोटी मध्यम मुदती आणि रु.१४३० कोटी दीर्घ मुदती कर्जे वाटपाचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात रु.२९१.५० कोटी मध्यम मुदती आणि रु.३५७.४९ कोटीची दीर्घ मुदती कर्जे वाटण्यात आली. शेतकरी वर्गाला कृषी उत्पादनासाठीच्या साहित्य खरेदीत पतपुरवठ्याची अडचण येऊ नये म्हणून नाबार्ड बँकेने शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना सुरु केली. त्यात १५ लक्ष किसान क्रेडीट कार्डे पतपुरवठा संस्थांमार्फत वितरीत करण्यात आली"[१०].

**७.१.१० अकरावी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२)**

"अकराव्या पंचवार्षिक योजनेत सहकारी पतपुरवठ्याबाबत खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली.

१. सहकारी पतपुरवठा संस्था अधिक सक्षम करणे की, ज्यामुळे या संस्था आपली पतपुरवठा कार्ये अधिक कार्यक्षमपणे आणि परिणामकारकपणे पार पाडतील.

२. शेतकऱ्यांना अल्प, मध्यम मुदती आणि दीर्घ मुदती कर्जाचा पुरवठा "एक खिडकी" योजनेखाली म्हणजे एके ठिकाणीच करणे.

३. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या पतपुरवठा संस्था अधिक सक्षम बनविणे.

४. ग्रामीण भागात रोजगारवाढीसाठी प्रयत्न करणे, त्यासाठी अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतकऱ्यांना उद्योग आणि कुटीरोद्योगासाठी मदत करणे.

५.	सीमांत शेतकरी, भूमिहीन शेतकरी, भटक्या आणि ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या पिछाडीस असलेल्या गटांना लघुउद्योग आणि स्वयंरोजगारासाठी मदत करणे"[११].

## सारांश

भारतात सहकारी प्रक्रिया संस्थांची सुरुवात १९१७ मध्ये म्हैसूर येथे कापूस पिंजणे, गठ्ठे बांधणे यासाठी गिरणीची स्थापना झाली. गुजरातमध्ये १९२१ मध्ये कापूस संस्था अस्तित्वात आल्या, तर १९३३ मध्ये सुरतमध्ये सहकारी जिनिंग व प्रोसेसिंग संस्थेची स्थापना करण्यात आली. १९३० मध्ये आंध्रात व १९३३ मध्ये मद्रास व उत्तर प्रदेशात सहकारी साखर कारखाने सुरु करण्यात आले.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत प्रक्रिया संस्थांच्या विकासाकडे लक्ष दिले गेले नाही. मात्र दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अशा संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात आले व आर्थिक मदतही देण्यात आली. या योजनेत १६६ प्रक्रिया संस्था सहकारी क्षेत्रात स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ७८३ सहकारी प्रक्रिया संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. त्यात कापूस पिंजण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या ४८ गिरण्या, ३६ भात गिरण्या, तागाचे गठ्ठे बांधण्याच्या २९ गिरण्या, ३३ तेल गिरण्या, ७७ फळ प्रक्रिया संस्था, ६३ शेंगदाणा प्रक्रिया संस्था, ४११ भात सडण्याच्या गिरण्या आणि ८६ इतर संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस देशात एकूण २११० प्रक्रिया संस्था अस्तित्वात होत्या. त्यात ८७ साखर कारखाने, १५५ कापूस पिंजणे व गठ्ठे बांधणाऱ्या गिरण्या, ३२९ भात गिरण्या, १२२ तांदूळ सडणाऱ्या गिरण्या, २९८ तेल गिरण्या, २२ फळफळावळ प्रक्रिया संस्था आणि ११०६ इतर संस्था होत्या.

चौथ्या योजनेत प्रक्रिया संस्थांनी बरीच प्रगती केली. योजना काळात १९०० संस्था निर्माण करण्यात आल्या. त्यातील २२५ संस्था आकाराने मध्यम व मोठ्या होत्या.

पाचव्या योजनेत नवीन ६५० प्रक्रिया संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात ७६ साखर कारखाने, ४५ कापूस पिंजणे व गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या, ४० तेल गिरण्या, १५५ भात गिरण्या आदींचा समावेश होतो. १९७६-७७ अखेर देशात २२०४ प्रक्रिया संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात १२० साखर कारखाने कार्यरत होते. १९८६-८७ अखेर देशात २६१ साखर कारखाने सहकारी तत्त्वावर कार्य करीत होते. तसेच ९० सूत गिरण्या सहकारी क्षेत्रात कार्यरत होत्या. सातव्या योजनेत ३५ साखर कारखाने आणि ४० सूत गिरण्या सहकारी क्षेत्रात स्थापन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

सहाव्या पंचवार्षिक योजना काळात १३,९३५ विणकरांच्या संस्था कार्यरत होत्या. तसेच २४६ कापूस जिनिंग व प्रोसेसिंग संस्था, २०४० तेल गिरण्या, ४७८ खांडसरी, २४० साखर कारखाने आणि १३०

सूत गिरण्या सहकारी क्षेत्रात कार्य करीत होत्या. २००३ मध्ये देशात ३१३ सहकारी साखर कारखाने, १६९ सूत गिरण्या कार्यरत होत्या.

भारतात सध्या २५०० सहकारी कृषी प्रक्रिया संस्था कार्यरत आहेत.

## ७.२ महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण सन २०११-२०१७

**प्रस्तावना :-**

"केंद्र शासनाने सन २००० मध्ये सुधारीत वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. त्याद्वारे देशातील वस्त्रोद्योग क्षेत्र विकसित करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे व राज्यांना कापड निर्मितीशी संलग्न उद्योगात वाढ/विकास करण्यास संधी प्रदान करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या धोरणाचा अधिक लाभ घेता यावा यासाठी देशातील अन्य काही राज्यांनी राज्याचे स्वतंत्र वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. सन २००६ मध्ये राज्याचे प्रचलित उद्योग धोरण जाहीर करण्यात आले, त्यामध्ये वस्त्रोद्योगासाठी सर्वसमावेशक स्वतंत्र धोरण तयार करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले होते. वस्त्रोद्योग शेती व्यवसायानंतर महत्वाचा व्यवसाय आहे. शेती व्यवसायानंतर या उद्योगामध्ये जास्तीत जास्त रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. राज्यातील कापड उद्योगात वाढ, रोजगारामध्ये वाढ आणि कापूस उत्पादक क्षेत्रात प्राध्यान्याने दीर्घ मुदतीच्या आश्वासक विकासासाठी कापूस ते तयार वस्त्र निर्मितीच्या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकांच्या उभारणीवर विशेष भर देणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणाद्वारे पुढील पाच वर्षात राज्यात शिल्लक राहणाऱ्या ४५ लाख गाठी रुईवर विविध स्तरावरील मूल्यवर्धनाच्या प्रक्रिया करणारे वस्त्रोद्योग घटकाच्या उभारणीसाठी या क्षेत्रात एकूण रु.४०,०००/- कोटीची गुंतवणूक आकर्षित करणे आणि त्याद्वारे ११ लाख नवीन रोजगार निर्मिती करणे हे या धोरणाचे साध्य आहे. राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण कसे असावे यासाठी मागील तीन वर्षापासून वेगवेगळ्या स्तरावर बैठका/चर्चासत्रे आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये प्राप्त सूचना विचारात घेऊन राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता"[१२].

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ खालीलप्रमाणे निश्चित करुन शासन मान्यता देण्यात आली आहे.

**राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता**

**४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित**

राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी १२ व्या पंचवार्षिक योजनेत (वर्ष २०१६-१७ पर्यंत) एकूण २,१११ कोटी रुपये खर्च

अपेक्षित आहे. या धोरणांतर्गत सवलतीमुळे राज्यात वस्त्रोद्योग क्षेत्रात ४० हजार कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक तसेच ११ लाख नवीन रोजगार निर्मिती होईल.

**७.२.१ सहकारी सूतगिरण्या :**

"विदर्भ/मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांना सध्याच्या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्याची योजना चालू ठेवावी. (५:४५:५०), ज्या तालुक्यात सहकारी तत्वावरील सूत गिरण्यांना यापूर्वी शासनाकडून भाग भांडवल स्वरुपात मदत करण्यात आलेली आहे. अशा तालुक्यात सहकारी तत्वावरील नवीन सूत गिरणी उभारण्यास ५:४५:५० या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येणार नाही"[१३].

**७.२.२ यंत्रमाग(वार्पीग/विव्हींग/सायझिंग/डाईंग/प्रिटींग/गारमॅटींग/निटींग युनीट इ.)**

शटललेस यंत्रमाग/वार्पीग/सायझिंग/यार्नडाईंग/डाईंग/प्रोसेसिंग/ गारमॅटींग इत्यादीच्या सहकारी तत्वावरील संस्थांच्या प्रकल्पांना सध्याच्या आकृतीबंधानुसार अर्थसहाय्य देण्याबाबत गुणानुक्रमे विचार करावा. (१०:४०:५०), अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक समाजाच्या सहकारी तत्वावरील यंत्रमाग संस्थांना स्वभाग भांडवल, शासकीय भाग भांडवल व कर्ज १०:४०:५० ऐवजी ५:५:४०:५० या आकृतीबंधानुसार अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु करावी. अशा संस्थांच्या शासकीय भाग भांडवलातील ५% वाढीव हिश्याच्या रकमेवरील खर्चासाठी संबंधित विभागाच्या मंजूर नियतव्ययातून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक समाजाच्या यंत्रमाग घटकाचे आधुनिकीकरणासाठी दीर्घ मुदती कर्जाचे प्रकल्प प्रस्ताव तयार करणे, ते प्रस्ताव बँकेकडे सादर करणे आणि बँकेकडून कर्ज मंजूर करुन घेणे यासाठी शासनाकडून काही व्यावसायिक संस्था नेमून मदत करण्याची योजना सुरु करण्यात यावी. अशा व्यावसायिक संस्थांची फी त्यांनी तयार केलेले प्रकल्प प्रस्ताव बँकेने यशस्वीरीत्या मंजूर केल्यानंतरच अनुज्ञेय राहिल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक समाजाच्या ज्या यंत्रमाग घटकाच्या आधुनिकीकरणाच्या प्रकल्पास बँकेची मान्यता प्राप्त झाली असेल अशा घटकांना इतर स्त्रोताकडून मिळणाऱ्या सवलती व्यतिरिक्त यंत्रसामग्रीवरील भांडवली गुंतवणूकीच्या (TUFS मध्ये मान्य होणाऱ्या प्रकल्पाकरीता व्याज सवलतीसाठी अनुज्ञेय गुंतवणूकीच्या) १०% अनुदान देण्याची योजना सुरु करण्यात येईल.

वरील योजनांवरील खर्च अनुक्रमे सामाजिक न्याय, आदिवासी विकास व अल्पसंख्याक विकास विभागाच्या मंजूर नियतव्ययाच्या मर्यादेत ठेवण्यात येईल. या योजना सहकारी व खाजगी घटकांना लागू राहतील.

**७.२.३ व्याज सवलत योजनेचे सनियंत्रण :**

व्याज सवलत योजनेचे सनियंत्रण ऑनलाईन करण्यात येईल. यासाठी विभागामार्फत स्वतंत्र सॉफ्टवेअर तयार करण्यात येईल. ही योजना संपूर्णतः वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाशी निगडीत राहील. सदर योजनेअंतर्गत देय लाभ तरतूदीच्या मर्यादेत इतर स्त्रोताकडून प्राप्त होणाऱ्या सवलती व्यतिरिक्त राहील. या योजनेअंतर्गत देय व्याज अनुदान ८ वर्षासाठी राहील. (२ वर्ष मोरीटोरीयम कालावधी वगळून) प्रस्तावित योजनेअंतर्गत अनुज्ञेय लाभ फक्त महाराष्ट्रामध्ये उभारण्यात आलेल्या प्रकल्पासाठी राहील. केंद्र शासनाची TUF योजना बंद झाल्यास सदर योजनेचे पुनर्विलोकन करण्यात येईल. या धोरणांतर्गत सवलती वस्त्रोद्योगाशी संबंधित खालील घटकांना अनुज्ञेय राहील.

१) Cotton Ginning and Pressing

२) Spinning/Silk Reeling and Twisting/Intregrated Silk Park/ Synthetic Filament/Yarn Texturising, Crimping and Twisting.

३) Wool Scouring, combing and carpet industry.

४) Manufacturing of viscose filament yarn and viscose staple fibre.

५) Weaving / Knitting

६) Technical Textiles and non-wovens

७) Garment/Made-up manufacturing

८) Processing of Fibre/Yarn/Fabrics/Garments/made-ups.

९) Modernisation / Expansion / Rehabilitation of existing textile units.

१०) Textile Parks (as approved by GoI under SITP)

११) Energy saving and process control equipments for various sectors.

१२) Skill Development Activities.

विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील TUFS अंतर्गत मंजूर होणाऱ्या वस्त्रोद्योग घटकांना मिळणाऱ्या व्याज सवलती शिवाय TUFC अंतर्गत व्याज सवलतीसाठी मूळ प्रकल्प किंमतीमधील अनुज्ञेय गुंतवणूकीच्या १०% भांडवली अनुदान देण्यात येईल. प्रकल्प किंमतीमधील वाढीव गुंतवणूकीवर १०% भांडवली सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

विशेष घटक व आदिवासी उपयोजनेअंतर्गत निम्न मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यामध्ये टेक्सटाईल पार्क उभारण्यासाठी अर्थसहाय्य देता येईल किंवा कसे, याबाबतच्या स्वतंत्र प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**७.२.४ कामगारांसाठी सुधारणा :**

वस्त्रोद्योग क्षेत्रात उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहाय्याने कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येईल. वस्त्रोद्योग क्षेत्रातील कामगारांसाठी घरकुल योजना, आरोग्य विमा योजना इत्यादी कामगार कल्याण योजना राबविली जाईल. कामगार विषयक व प्रदुषण नियंत्रण कायद्यातील वस्त्रोद्योग उद्योगाला मारक ठरणाऱ्या तरतूदीमध्ये सुधारण करणे/शिथिलता आणण्यात येईल.

**७.२.५ दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना :**

"दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेसाठी १२.५% किंवा बँकेचे प्राईस लेंडीग रेट यापैकी जे दर कमी असेल तेवढा उच्चतम व्याजदर अनुज्ञेय राहील. यापेक्षा जास्त दराने कर्ज घेतले असेल तर त्याचा परतावा संबंधित घटकांना करावा लागेल. सर्व स्त्रोतातून (केंद्र पुरस्कृत TUFS, उद्योग विभाग इत्यादी) मिळणारी व्याज सवलत धरुन ०% व १% एवढे व्याजदर पुढील घटकांना पडेल"[१४].

**तक्ता क्र. ७.८**

**महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग व्याज सवलत धोरण सन २०११—२०१७**

| अ.क्र. | ०% व्याज दर | २% व्याज दर |
|---|---|---|
| १ | विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील सर्व पात्र वस्त्रोद्योग घटक. | विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील क्षेत्र वगळता इतर क्षेत्रामध्ये खाजगी सूतगिरणी |
| २ | पूर्ण राज्यांत गारमेटींग | ----------------- |
| ३ | पूर्ण राज्यात अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित नवीन यंत्रमाग उद्योग | खाजगी प्रोसेसिंग युनिट |
| ४ | पूर्ण राज्यात यंत्रमाग आधुनिकीकरण | खाजगी निटींग युनिट |
| ५ | पूर्ण राज्यात सर्व प्रकारचे रेशीमचे प्रकल्प | खाजगी टेक्सटाईल पार्क |
| ६ | पूर्ण राज्यात वस्त्रोद्योगाचे अनुषंगाने कौशल्य विकासाचे प्रकल्प | इतर सर्व खाजगी पात्र वस्त्रोद्योग घटक |
| ७ | सहकारी क्षेत्रामधील सर्व पात्र वस्त्रोद्योग घटक | |

**आधार :-** महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण, महाराष्ट्र शासन, मुंबई.

सदर धोरणांतर्गत योजनांच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाच्या TUFS च्या धर्तीवर बँकांचा समावेश राहील. सदर नोडल बँकांची जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील :-

कर्ज पुरवठ्यासाठी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची पात्रता तपासणे, कर्ज मंजूर करणे, वितरीत करणे, प्रकल्पात अनुज्ञेय व्याज सवलतीचे क्लेम शासनास सादर करणे. या योजनेअंतर्गत

क्लेमची पूर्तता करण्यासाठी शासन प्रथम प्रत्येक नोडल बँकेत बँक खाते उघडेल. नोडल बँकांकडून प्राप्त झालेल्या व्याज सवलतीच्या क्लेमची रक्कम शासनाच्या बँकेतील खात्यात जमा करेल. सदर जमा झालेली रक्कम नोडल बँक संबंधित प्रकल्पाच्या कर्ज खात्यावर जमा करेल.

वस्त्रोद्योग क्षेत्रातील घटकांना स्पर्धा करण्यासाठी त्यांचेकडे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे. या कारणामुळे टफ प्रमाणे राज्य योजनामध्ये कोणकोणती यंत्रसामुग्री सदर धोरणांतर्गत सवलतीसाठी पात्र राहील ते निश्चित करणे आवश्यक आहे. सुरुवातीला केंद्र शासनाच्या टफ योजनेमध्ये निर्धारित केलेली यंत्रसामुग्री निर्धारित करण्यात येईल. त्यानंतर आवश्यकता भासल्यास विभागामार्फत नवीन अद्यावत यंत्रसामुग्री निर्धारित करण्यात येईल.

या सवलती, सहकारी व खाजगी क्षेत्रातील, सर्व पात्र वस्त्रोद्योग घटकांना लागू राहतील.

**७.२.६ केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना :-**

"अ) राज्यातील वस्त्रोद्योग घटकांच्या नवीन प्रकल्पांच्या तसेच अस्तित्वातील घटकांच्या आधुनिकीकरणाच्या/विस्तारीकरणाच्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी वित्तीय संस्था व बँकाकडून घेतलेल्या दीर्घ मुदती कर्जावरील केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत व्याज सवलत योजना सुरु करण्यात येईल. याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.

ब) टेक्सटाईल पार्कसाठी व्याज सवलतीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील"[१५].

**७.२.७ विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील घटकांना १०% भांडवली अनुदान :-**

"विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन वस्त्रोद्योग घटकासाठी अनुदान देण्याची नवीन योजना सुरु करण्यात येईल.

योजनेची वैशिष्टे, पात्रतेबाबत निकष, पात्र घटक आणि अनुदान वितरणांच्या कार्यपध्दतीबाबतचे सविस्तर आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

**५.** विशेष घटक व आदिवासी उपयोजनेअंतर्गत निम्न मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यामध्ये टेक्सटाईल पार्क उभारण्यासाठी अर्थसहाय्य देता येईल किंवा कसे, याबाबतचा स्वतत्र प्रस्ताव संबंधित विभागाच्या सहमतीने विचारात घेण्यात येईल.

**६.** वस्त्रोद्योग क्षेत्रात उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहाय्याने कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येईल.

७. वस्त्रोद्योग क्षेत्रातील यंत्रमाग कामगारांसाठी घरकुल योजना, आरोग्य विमा योजना, कामगार कल्याण योजना इत्यादी संबंधित विभागाच्या सहाय्याने राबविण्यात येतील"१६.

## ७.३ जागतिकीकरणाची आव्हाने

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तत्वांना सध्या खुपच महत्व प्राप्त झाले आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या निर्हस्तक्षेप धोरणामध्ये या तत्वांचे मुळ सापडते सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करु नये. बाजारयंत्रणेनुसार अर्थव्यवस्था चालविली जावी. बाजारयंत्रणा किंवा किंमतयंत्रणा अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या समस्या सोडवू शकते असे मत त्यांनी मांडले होते. याच विचारांचा आधार घेऊन जगातील बहुतेक सर्व देशांमध्ये जागतिकीकरणाचे तत्त्व स्वीकारण्यात आले. भारतात जुलै १९९१ मध्ये सरकारने नवीन आर्थिक, धोरण जाहिर केले. त्यानुसार उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नव्या तत्वांचा अंगीकार केला. त्यामुळे भारतातासुद्धा मुक्त अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर परिणाम होत आहेत. प्रस्तुत प्रकरणात आपण जागतिकीकरणाचे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूतगिरण्यावरील परिणाम व आव्हाने यांचा अभ्यास केलेला आहे.

### ७.३.१ जागातिकीकरणाचा अर्थ

१. श्री.दिपक नय्यर यांच्या मते, "राज्यांच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तर करणे म्हणजे जागतिकीकरण होय"[१७].

२. श्री.सी.टी.कुरियन यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे विविध प्रकारच्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. एकमेकांच्या व्यवहारातून आणि राष्ट्राची व्यक्तिगत उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेतून अस्तित्वात येणाऱ्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्था असे म्हणतात[१८]"

३. प्रा.विश्वजित चटर्जी यांनी सांगितल्याप्रमाणे "जगातील विविध देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापरांवरील सर्व नियंत्रणे दूर करुन भांडवल व इतर प्रकारच्या उत्पादक घटकांची गतिक्षमता वाढविणे म्हणजे जागतिकीकरण होय[१९]".

४. श्री.श्रवण कुमारसिंग यांच्या मते, "जगातील सर्व देशांची एक सामूहिक बाजारपेठ निर्माण करणे व त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे व उत्पादन घटकांचे सहजपणे स्थानांतर होईल अशी व्यवसथा करणे म्हणजे जागतिकीकरण होय[२०]".

वरील विविध व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, आयात-निर्यात व्यापारावरील सर्व निर्बंधे दूर करणे व देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न करणे या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हणले जाते. जागतिकीकरणात मुक्त अर्थव्यवस्था अभिप्रेत असते. म्हणजे आयात-निर्यात व्यापारावरील सर्व बंधने सरकारने दूर करावयाची असतात विविध देशांतील वस्तू व सेवा इतर देशांकडे निर्यात होतात व इतर देशांकडील वस्तू व सेवा त्या देशांकडे आयात होत हा व्यापार मुक्तपणे चालतो. जागतिकीकरणात सरकारी हस्तक्षेपाला वाव नसतो. त्यामुळे सरकारी उद्योगधंद्यांचे टप्प्याटप्प्याने खाजगीकरण केले जाते.

सरकारकडून निरनिराळया क्षेत्रांना दिली जाणारी अनुदाने कमी केली जातात. अनुदानाचे धोरण पूर्णतः रद्द करणे हे अंतिम उद्दिष्ट असते. तसेच देशांतर्गत उद्योगांच्या हितासाठी संरक्षणाचे धोरण स्वीकारता येत नाही. सरकारला मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारावे लागते. मुक्त व्यापारामुळे भांडवल, तंत्रज्ञान, उत्पादन घटक, वस्तू इत्यादींचा सुलभतेने व्यवहार होतो. त्यामुळे प्रत्येक देशाला व्यापक विदेशी बाजारपेठा उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय बाजारात तीव्र स्पर्धा निर्माण होते. स्पर्धेतून उत्पादनक्षमता व कार्यक्षमता वाढीस लागते. स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार केला जातो. जागतिक पातळीवर सर्व देशांची मिळून एक विशाल अर्थव्यवस्था निर्माण होते.

### ७.३.२ जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्था

भारतात १९९१ मध्ये नविन आर्थिक धोरणाचा स्विकार करण्यात आला. त्यानुसार जागतिकीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आले. आधुनिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणा या तत्वांचीसुध्दा कार्यवाही करण्यात आली सरकारने औद्योगिक परवाना पद्धती रद्द केली विदेशी गुंतवणुकीवरील निर्बंध शिथिल केली. विदेशी तंत्रज्ञानाची मुक्तपणे आयात करता येईल असे जाहिर केले. सार्वजनिक उपक्रमांना महत्व देण्याचे धोरण मागे घेण्यात आले. उलट, सार्वजनिक क्षेत्राचा भविष्यात संकोच करण्याचा निर्णय घेण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगधंदे टप्याटप्याने खाजगी क्षेत्राला विकण्याचा निर्णय घेतला गेला. उद्योगाच्या स्थान निश्चितीबाबत सुध्दा उदारतेचे धोरण स्वीकारले गेले. मक्तेदारी कायद्यात शिथिलता आणली गेली. सरकारने स्वीकारलेल्या या जागतिकीकरणाच्या धोरणाचे अर्थव्यवथेच्या सर्व क्षेत्रांवर जागतिकीरणाचे परिणाम घडून आले. सहकारी सूत गिरण्यांचे क्षेत्रसुध्दा याला अपवाद राहिले नाही.

"भारतात १९९० च्या सुमारास प्रचंड वित्तीय तुट, प्रतिकूल व्यवहारतोल, निर्यात आघाडीवरील अपयश, समाजवादी धोरणाबाबत पुर्नविचाराची आवश्यकता, दारिद्रय, बेरोजगारी इत्यादी समस्यांमुळे काहीशी अस्थिरता निर्माण झाली होती. विदेशी गंगाजळीचा साठा संपत आल्यने गंभीर पेच निर्माण झाला होता. जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर हळूहळू विदेशी चलनाची गंगाजळी वाढत गेली २००१ पर्यंत हा साठा १,८०,००० कोटी रुपयांपेक्षाही जास्त झाला. विदेशी गुंतवणुकीत वाढ झाली. विदेशी व्यापारावरील नियंत्रणे दूर झाल्याने आयात-निर्यात व्यापारात वाढ झाली. शेती, उद्योग, व्यापार, पायभूत सुविधा इत्यादी क्षेत्रांतील गुंतवणूक वाढली तथापि आणि जागतिकीकरणामुळे शेतीक्षेत्र व पायाभूत सोईचा म्हणावा तितका विकास झाला नाही. स्पर्धाक्षमता व कार्यक्षमतेच्या दृष्टीने मागे राहणाऱ्या सहकारी सूत गिरण्यांपुढे स्वतःच्या अस्तित्वातचा प्रश्न निर्माण झाला. अनेक उद्योगधंदे बंद पडले, तर अनेकांचे एकत्रीकरण करण्यात आले. जागतिकीकरणामुळे बाजारात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली"[२१].

सहकारी सूत गिरण्यांना या तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते असे म्हटले जात असले, तरी भारतातील ग्रामीण भाग याबाबतीत उपेक्षित राहिला. तसेच नव्या तंत्रज्ञानामुळे बेकारीचा प्रश्न गंभीर बनला. प्रादेशिक विषमतेत वाढ झाली. एकंदरीत जागतिकीकरणाचे अनुकूल व प्रतिकुल असे परिणाम घडून आल्याचे आढळते.

### ७.३.३ जागतिकीकरण व सहकारी सूत गिरण्या :-

भारतात १९०४ मध्ये सहाकरी चळवळ खऱ्या अर्थाने सुरु झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारने सहकारी चळवळीच्या विकासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने या सूतगिरण्यांचा नियोजनबद्व, विकास घडवून आणला. सहकारी पतपुरवठा संस्थामुळे आज सहकारी चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. शेती, उद्योग, बँका, व्यापार, सूत गिरण्या, साखर कारखाने या सर्व क्षेत्रांत ही चळवळ पोहोचली आहे. सरकारच्या आर्थिक साहाय्यामुळे सहकारी सूतगिरण्यांच्या विकासाचा वेग वाढला. सरकारने स्वीकारलेले समजावादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यात सहकारी सूत गिरण्यानी महत्वाची भूमिका बजावली. भांडवलशाही व समाजवाद यामध्ये योग्य समन्वय साधण्याची जबाबदारी सहकारी क्षेत्राने पार पाडली. सहकारी सूतगिरण्यांच्या विकासामुळे समाजातील दुर्बल व गरीब व्यक्तींना फार मदत झाली. सहकारी उद्योग व प्रक्रिया संस्थामुळे ग्रामीण विकासाला गती मिळाली. सूत गिरण्यांमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली. सर्वसामान्य व्यक्तींच्या आर्थिक कल्याणात वाढ झाली.

"१९९१ मध्ये नविन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर विविध क्षेत्रांवर त्याचे परिणाम घडून आले. सहकारी सूत गिरण्यावर सुध्दा त्याचा प्रभाव पडला. जागतिकीकरणाच्या युगात सहकार टिकून राहिल किंवा नाही. अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली. जागतिकीकरणात भांडवलशाही व स्पर्धा याला अधिक महत्व असते. याउलट, सहकारात परस्पर सहकार्याला अधिक महत्व दिले जाते. जागतिकीकरणात नफाप्रेरित व्यवस्था अभिप्रेत असते. सहकारात नफ्याऐवजी सभासदांचे कल्याण महत्वाचे मानले जाते. जागतिकीकरणामुळे भांडवलदारवर्गाचे वर्चस्व निर्माण होण्याचा धोका असतो. मुठभर उद्योजकांची मक्तेदारी निर्माण होऊ शकते. समाजातील मुठभर श्रीमंत व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी साधनसामग्री वापरली जाण्याची भिती असते. चैनीच्या व सुखद वस्तुंच्या उत्पादनावर अधिक भर दिल्याने जीवनावश्यक वस्तुंची टंचाई निर्माण होते. तसेच भांडवलप्रधान तंत्राच्या वापरामुळे बेकारी वाढण्याचा धोका असतो. भांडवलदारवर्गाला किंवा गुंतवणुकदारांना ग्रामीण विकासात स्वारस्य नसल्याने ग्रामीण विकासामध्ये दुर्लक्ष होते बळी तो कान पिळी या न्यायाप्रमाणे भांडवलदारांचा वर्ग दुर्बलांची पिळवणुक करतो. ग्राहकांचेही शोषण होते. साधन सामग्री उपलब्ध असलेल्या भागाच्या विकासाला चालना मिळते. पण इतर प्रदेशांकडे दुर्लक्ष होते. यातून प्रादेशिक असमतोल निर्माण होतो"[२२].

सहकारांमध्ये भांडवलदारांचे वर्चस्व असत नाही. उलट गरीब व सर्वसामान्य व्यक्ती एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. यामुळे सहकारात सामान्य नागरिकाला अधिक महत्व असते. सहकारामध्ये सर्वांकडील साधनसामग्री एकत्र आणली. जाते व त्यंचा वापर सर्वांसाठी केला जातो. संसाधने मूठभर लोकांच्या गरजा भागविण्यासाठी वापरली जाण्याची भिती नसते. सहकार हे दुर्बलांचे संघटन असल्याने दुर्बल व गरीबाच्या गरजा भागविण्यावर भर दिला जातो. सहकारी संस्था प्रमुख्याने मानवी श्रमाच्या वापरावर भर देतात. यामुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळते. सहकारी सूतगिरण्यांच्या विस्ताराने ग्रामीण विकासाला प्रोत्साहन लाभते. बळी तो कन पिळी या तत्त्वाऐवजी सर्वांना समान न्याय हे तत्त्व वापरले जाते. ग्राहक हिताला प्राध्यान दिले जाते. सहकारी संस्था स्थनिक साधनांच्या वापराद्वारे विकासकार्याला मदत करतात. यामुळे प्रादेशिक समतोल प्रस्थापित होतो.

वरीलप्रमाणे सहकारी सूतगिरण्यांची जागतिकीकरणाची तुलना केल्यास सहकाराचे तत्त्व जागतिकीरणाच्या उलट स्वरुपाचे असल्याचे दिसते. जागतिकीकरणात सरकारी हस्तक्षेपाचा अभाव असतो. सहकारी संस्थांच्या विकासाठी मात्र सरकारी हस्तक्षेप आवश्यक ठरतो. भारतात सरकारने सहकारी चळवळीच्या विकासात मात्र सरकारी सहभाग घेतला आहे. सहकारी सूतगिरण्यांना सर्व प्रकारची मदत केली आहे. जागतिकीकरणामुळे सरकारला भविष्यात अशी मदत करण्यावर मर्यादा पडतील. भारतात जागतिकीकरण सुरु होऊन एक दशक लोटले. असले तरी अद्यापही जागतिककरणाने म्हणावा तितका वेगा घेतलेला नाही. जागतिकीकरणाचा वेग वाढल्यास सरकारला हस्तक्षेपाच्या धोरण्याचा त्याग करावा लागेल. त्यामुळे सहकारी सूतगिरण्यांना फारशी मदत मिळणार नाही. भविष्यात सहकारी सूतगिरण्यांना स्वबळावर विकास साधावा लागेल. इतकेच नव्हे तर खाजगी क्षेत्रांशी यशस्वीपणे स्पर्धा करावी लागेल. त्यासाठी सहकारी सूतगिरण्यांची कार्यक्षमता व स्पर्धाक्षमता वाढवावी लागेल. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूतगिरण्यांनादेखील जागतिकीकरणाचे आव्हान स्विकारावे लागेल.

### ७.३.४ जागतिकीकरण आणि सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यापुढील आव्हाने

१९९१ नंतर भारताने बदलत्या आर्थिक घडामोडींचा सर्वकष पातळीवर विचार करुन नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण ही या धोरणाची ३ प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. त्यामध्ये जागतिकीकरणाच्या धोरणाचा सर्वंकर्ष पातळीवर विचार करुन देशाचे स्पर्धासामर्थ्य वाढविण्यासाठी स्वीकार करण्यात आला. जागतिकीकरणाचा साधा अर्थ आपली अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर खुली करणे होय. अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक, खाजगी व सहकार क्षेत्रावर जागतिकीकरणाचा होणारा परिणाम विचारात घेणे उचित ठरते. याच काळात भारत सरकारने सहकारी संस्थाच्या विकासासाठी एक विशेष समिती नियुक्त करुन सहकारी संस्थाची वास्तव स्थिती अभ्यासली.

जानेवारी १९९६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने (ICA) जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यासाठी एक व्यापार मसुदा तयार केला. या मसुद्यातील तरतुदीनुसार नव्या आर्थिक धोरणास सामोरे जाण्यासाठी सहकारी संस्थाचे आर्थिक व्यवहार व व्यवस्थापन अधिक निकोप ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नैतिक मूल्ये व सामाजिक न्यायावर आधारित सहकारी चळवळीचा विकास स्वेच्छापूर्वक घडवून आणणे आवश्यक आहे. भारताने या मसुद्यातील तरतुदीची अंमलबजावणी केल्यास सहकारी सूत गिरण्या आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्वाची भूमिका बजावू शकतात. तथापि सहकारी सूत गिरण्यांची देशातील सद्याची स्थिती पाहिली असता, जागतिकीकरण हे या पुढील एक जबरदस्त आव्हान आहे. जागतिकीकरणाने देशातील सहकारी सूत गिरण्यापूढे अनेक आव्हाने निर्माण केली आहेत.

१) जागतिकीकरणांमुळे विकसित देशातील उद्योजकांच्या उत्पादनास विकसनशील देशाच्या बाजारपेठा उपलब्ध होणार आहेत. तसेच अशा विकसनशील देशातून आपल्या कंपन्यांच्या शाखा सुरु करणे शक्य होणार आहे. त्यामुळे अशा बहुद्देशीय कंपन्यांची विकसनशील देशातील व्यावसायिक संस्था आणि सहकारी संस्थांशी स्पर्धा सुरु होणार आहे. अशा परिस्थितीत सहकारी सूत गिरण्यांना आपले अर्थव्यवस्थेतील स्थान भक्कम ठेवणे हे एक आव्हान च आहे.

२) बहुद्देशीय कंपन्या उत्पादनांचा दर्जा आणि गुणवत्तेस महत्व देत असल्याने बाजारपेठेत त्यांच्या उत्पादनास निश्चित स्वतंत्र स्थान मिळण्यास मदत होणार आहे. अशा परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील सहकरी सूतगिरण्यांना आपल्या उत्पादनांचा दर्जा वाढवीने तसेच गुणवत्ता वाढविणे, आणि सूताची गुणवत्ता अंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्पादनाप्रमाणे ठेवणे ही आवाहाने आहेत..

३) बहुद्देशीय कंपन्या आपल्या उत्पादनांना उपलब्ध असणाऱ्या बाजारपेठांचा विस्तार करण्याचा प्रयत्न करीत असतात. या परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी सांगोले सहकारी सूत गिरण्यांनी मागे न राहता आपल्या उत्पादनात व सेवेत वाढ करुन त्यांना उपलब्ध असणाऱ्या बाजारपेठेचा विस्तार करणे हे आव्हान आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यांना आपल्या उत्पादनासाठी इतर देशांत बाजारपेठ निर्माण करण्याचे आव्हान आहे.

४) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत नवीन तंत्रज्ञानाचा आणि पध्दतीचा वापर उद्योग आणि व्यावसायिक संस्थांद्वारे केला जाणार असून त्यामुळे उत्पादनाची गती वाढून खर्चात कपात होणार आहे. अशा

परिस्थितीत श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी सांगोले सहकारी सूत गिरण्यांना मागे न राहता आपल्याकडील जुन्या उत्पादन पध्दतीऐवजी नवीन पध्दती आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच त्या दृष्टीने उत्पादनात बदल करण्याचे आव्हान आहे.

५) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्याद्वारे वर्षानुवर्षे श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर केला जात आहे. परंतु या तंत्रज्ञानात सुधारणा होणे आवश्यक आहे. सहकारी सूत गिरण्यांनी बेरोजगारी निर्माण होणार नाही. परंतु कार्यक्षमपणे आणि किफायतशीर उत्पादन करण्याचे आव्हान आहे. श्रमप्रधान तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्च कमी राहतो आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उत्पादने स्पर्धा करु शकतात ती बदलने देखील आव्हान च आहे.

६) जागतिकीकरणाच्या बदलत्या परिस्थितीत जगातील विकसनशील देशातून बहुद्देशीय कंपन्या आपल्या कंपन्यांच्या शाखा उघडत आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील लहान आकाराच्या कंपन्या आणि उद्योगांत सामिल करणे व एकत्रीकरणाच्या प्रक्रियेस चालना मिळाली असून अशा परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील सूत गिरण्यांनी मोठ्या संस्थाशी यशस्वी स्पर्धा करण्याचे आव्हान आहे. त्यासाठी सहकारी सूत गिरण्यांनी संघीय स्वरुपात कार्य करणे आणि आपली आर्थिक व उत्पादनाची ताकद वाढविणे आवश्यक आहे.

७) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा विकास झाला परंतु सहकाराची मूल्ये जपणारा निष्ठावाना कार्यकर्त्यांचा गट तयार होऊ शकला नाही. असा गट तयार करणे हे महत्त्वाचे आव्हान सहकारी सूत गिरण्यांपूढे असून त्यावर सहकाराची मदार अवलंबून आहे. त्यासाठी सहकारी संस्था, सहकाराची तत्त्वे आणि पध्दती, इत्यादींवर विश्वास असणारा आणि संस्थेच्या हिताची जपणूक करणारा प्रामाणिक व निष्ठावान कार्यकर्त्यांचा गट सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यात निर्माण झाला पाहिजे. त्यामुळे सूत गिरण्या विकासाच्या मार्गावर येऊ शकतील.

८) जागतिकीकरणाच्या कल्पनेत कार्यक्षम आणि आर्थिक दृष्ट्या बलवान संघटनांना स्थान आहे. त्यामुळे देशातील अकार्यक्षम, मृतवत अगर निष्क्रिय आणि लहान सूत गिरण्यांचे विलीनीकरण करणे, अन्य सूत गिरण्यात सामिलीकरणे करणे, अकार्यक्षम सूत गिरण्या बंद करणे अपेक्षित आहे. अशा स्वरुपाचे बदल स्वीकारणे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यापूढे आव्हान आहे.

९) सोलापूर जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले सहकारी सूत गिरण्यातील व्यवस्थापनात साचेबंदपणा असून कारभार धिम्यागतीने चालत असल्याचे दिसते. त्यात बदल करुन व्यवस्थान कार्यात गतिमानता आणणे हे मोठे आव्हान असून त्यासाठी सहकारातील सर्वच घटकांनी गतिमान बनले पाहिजे. ही गतिमानता व्यवहारात दिसून आली पाहिजे. त्यामुळे व्यवहारांच्या प्रमाणात वाढ होऊन सूत गिरण्यांच्या कारभारात बरेच चांगले बदल होऊ शकतील. व्यवस्थापनाच्या कार्यात आधुनिक पध्दतीचा स्वीकार शक्य होईल.

१०) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये सामूहिक जबाबदारीची भावना रुढ करण्याची समस्या आहे. सूत गिरण्यासंदर्भात सभासदांत उदासीनता असल्याने सामूहिक जबाबदारीची भावना समजत नाही, सहकारी सूत गिरण्यांच्या व्यवस्थापनाने शिक्षण व प्रशिक्षणातून सभासद आणि कार्यकर्त्यांना सामूहिक जबाबदारी पटवून देणे आव्हानाचे आहे. त्यामुळे त्यांच्यात कर्तव्याची जाणीव निर्माण होईल. त्यातून सूत गिरण्यांचा कारभार पारदर्शकपणे चालावा आणि सूत गिरण्यांचा विकास व्हावा अशी भावना सर्व घटकांत निर्माण होणे आवश्यक आहे.

१२) सोलापूर जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी सांगोले, सहकारी सूत गिरण्यांनी बाजारपेठविषयक आपला दृष्टीकोण बदलून आपल्या उत्पादनांना इतर राज्यांत आणि देशांत मागणी येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. बाजारपेठ संशोधनाद्वारे उत्पादनाच्या आकार, प्रकारात व गुणवत्तेत कोणते बदल करावयाचे ते पाहिले पाहिजे. तसेच विदेशी बाजारपेठांचा अभ्यास करुन तिथल्या ग्राहक वर्गाच्या गरजा पुरविता येतील अशा प्रकारची उत्पादने तयार करण्यावर भर देणे ही काळाचे आव्हान आहे. हे आव्हान पेलल्यास सूत उत्पादनाला व्यापक बाजारपेठ मिळून सहाकरी सूत गिरण्यांना पुरेसे यश मिळविता येईल.

१४) "१९९१ नंतर देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर अल्पावधीतच अनेक खाजगी उत्पादक व बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय बाजारपेठेत उतरल्या आहेत. विशेष म्हणजे या आंतरराष्टीय कंपन्या भारतीय बाजारपेठेत उतरल्या आहेत. विशेष म्हणजे या आंतरराष्ट्रीय

कंपन्याचा माल भारतीय मालापेक्षा सुबक असून किंमती तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. अशावेळी देशातील सहकारी सूत गिरण्यांनी आपले कौशल्य विकासित करुन कमी खर्चात उत्पादनवाढ घडवून आणणे आवश्यक आहे. अन्यथा बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय बाजारपेठेत आपले वर्चस्व निर्माण करतील तेंव्हा सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरणी क्षेत्रास वावच राहणार नाही हे मोठे आव्हान आहे.

१५) "जागतिकीकरणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना शासनाकडून देण्यात येणारी वित्तीय मदत यापुढे कमी होईल अशा वेळी जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सहकारी सूत गिरण्यांनी स्वबळावर विकसित केल्याशिवाय पर्याय नाही. मात्र प्राप्त परिस्थितीत सदोष नेतृत्व व अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे सहकारी सूत गिरण्यांना खाजगी व बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करणे दुरापस्त झाले आहे. याचा एक आव्हान म्हणून विचार जिल्ह्यातील सहकारी सूत गिरणी क्षेत्रातील मंडळींनी करणे आवश्यक आहे.

१६) "जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांनी सभासद कल्याणाबरोबर व्यवसायिक दृष्टीकोन स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी कुशल नेतृत्व अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, अद्ययावत उत्पादन तंत्र, जाहिरात तंत्राचा अवलंब, बाजाराभिमुख उत्पादनपध्दती, व किमान खर्चात उत्पादन करण्याचे तंत्र विकसित केले पाहिजे. अर्थात सहकारी सूत गिरण्यांनी मूलभूत बदल घडवून आणल्याशिवाय हे शक्य नाही, म्हणून जागतिकीकरण हे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यापूढे एक आव्हान आहे.

१७) सोलापूर जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले, शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती सहकारी शेतकरी सूत गिरणी वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सहकारी सूत गिरण्यांना जागतिकीकरणाच्या वातावरणात टिकून राहण्यासाठी राजकीय हस्तक्षेप कमी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रासारख्या सहकारक्षेत्रात निपुण असलेल्या घटकराज्यात सहकारी सूत गिरण्यामधील राजकारणी मंडळींचा सहभाग कमी करणे हे एक आव्हान आहे. अर्थात सहकारी सूत गिरण्यांमध्ये लोकशाही व्यवस्थापन व समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी राजकीय हस्तक्षेप कमी करणे

आवश्यक आहे. कारण सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा राजकारणासाठी वापर न करता सभासद कल्याण व दुर्बलांच्या विकासासाठी तो होणे आवश्यक आहे. त्यासाठी सहकारी सूत गिरण्यांचे सभासद अधिक जागृत करण्याची गरज आहे.

१८) "जागतिकीकरणाचा प्रभाव म्हणून भारतात १९९६-९७ पासून अनेक विदेशी वस्तुंचे आगमन होत आहे. यामध्ये चीन, जपान, अमेरिका, इग्लंडमधील वस्तुंचा समावेश होत आहे. या वस्तुंचा दर्जा भारतीय वस्तुंच्या तुलनेने अत्यंत सुबक असून किमती कमी आहेत. अनेक ग्राहकोपया्रगी वस्तू आपल्या देशात बहुराष्ट्रीय कंपन्या विकत आहेत. या वस्तुंना पर्यायी वस्तू म्हणून देशातील खाजगी वा सहकारी सूत गिरणी क्षेत्रातील वस्तुंचा टिकाव लागणे कठीण आहे. प्राप्त परिस्थितीत जागतिकीकरणास केवळ विरोध करण्यापेक्षा स्पर्धासामर्थ्य वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. याची जाणीव सहकारी सूत गिरण्यांना निर्माण करुन देण्याची गरज आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी बाजारपेठेचे संशोधन व ग्राहकांच्या मानसशास्त्राचा विचार करुन उत्पादन वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. अन्यथा सहकारी सूत गिरण्यांचा प्रचलित परिस्थितीत टिकाव लागणे कठीण आहे.

१९) जागतिकीकरणाचे धोरण भारतात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाच्या दबावाखाली राबविले जात आहे. जागतिकीकरण सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांस चांगले की वाईट याचा विचार करण्यापेक्षा हे आव्हान कसे पेलता येईल याचा विचार करावा. तसेच तसा विचार राष्ट्रीय पातळीवर केला जात आहे. सहकाराच्या माध्यमातून हे आव्हान देश पेलू शकतो ही वास्तवता आहे. कारण सहकार ही जनसामान्यांची चळवळ असल्याने तिच्यात प्रभावी सामर्थ्य आहे. अर्थात, त्यासाठी भारतात सहकारी सूत गिरण्यांना वित्तीय मदतीचा हात शासनाने दिला पाहिजे. म्हणूनच २०१०-२०११ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात सहकारी सूत गिरण्यांच्या विकासाठी तरतूद करण्यात आली आहे. तिचा लाभ देशातील व सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी घेऊन आपली आर्थिक स्थिती बळकट करण्याचा प्रयत्न करणे क्रमप्राप्त आहे. तरच सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यां जागतिकीकरणाच्या लाटेत टिकून राहतील.

अशाप्रकारे जागतिकीकरणाचे धोरण संकट/आव्हान न मानता संधी मानून त्यास प्रभावीपणे तोंड देणे आवश्यक आहे. भारतातील सहकारी सूत गिरण्यांचा गेल्या १०० वर्षांचा इतिहास पाहिला असता खाजगी मुक्त अर्थव्यवस्था व समाजवादी अर्थव्यवस्थेतील दोष दूर करुन चांगल्या गुणांचे एकत्रीकरण सहकारात केलेले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देऊ शकतील. आजच्या परिस्थितीत जागतिकीकरण हे

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांपुढील आव्हान वाटत असले तरी त्याचा सामना या सूत गिरण्या करु शकतात. देशाच्या लाखो खेड्यात पसरलेल्या सहकारी सूत गिरण्यांचे सभासद, संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने व शासनसंस्थेच्या सहकार्याने सहकारी सूत गिरण्यांतील मूलभूत दोषांचे निर्मूलन करण्यासाठी व्यापक प्रयत्न करावयास पाहिजे तरच जागतिकीकरणाच्या धोरणात सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या सामोरे जातील. तसेच सहकारी सूत गिरण्यांशी संबंधित सर्व घटकांनी विचार करणे आजच्या परिस्थितीत आवश्यक आहे.

### ७.३.५ जागतिकीकरणानंतर अर्थव्यवस्थेत सहकारी सूत गिरण्यांची आवश्यकता

खरे तर, मुक्त आर्थिक धोरणामुळे सहकारी सूत गिरण्यांना स्वतःचे दोष झटकून, गुणवत्ता, उपयुक्तता व महत्व सिद्व करण्याची एक सुवर्णसंधीच मिळाली आहे. विश्वासार्हता हीच सहकारी सूत गिरण्यांची सर्वोत्तम ओळख होऊ शकते. सूत उत्पादनांचा व सेवांचा उत्तम दर्जा, सेवा-वस्तु पुरवठयातील वेळेबद्दलची जागरुकता, ग्राहकांना दिलेल्या वचनांच्या पूर्ततेची काळजी घेणे, योग्य किंमती व योग्य व्यापार अटी ही सहकारी सूत गिरण्यांची व्यापारी वैशिष्ट्ये नव्या स्थितीत उटून दिसतील. नव्या बाजारप्रणालीत अर्थव्यवस्थेचे काही दोषच सहकारी सूत गिरण्यांची उपयुक्तता सिद्व करणार आहेत. ही नवी व्यवस्था अनेक दोषांना जन्म देणारी आहे. उदारणार्थ, बनावट-नागवला जाईल अशा परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी स्वतःच्या तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून व्यवहार केल्यास त्यांचे असाधारण महत्व स्पष्ट होणार आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी मुक्त अर्थव्यवस्थेची भिती न बाळगता या नव्या संधीचे स्वागतच केले पाहिजे. या नव्या स्थितीत नव्या उमेदीने, पूर्ण निष्ठेने व झोकून देऊन काम करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या नक्कीच एक आदर्श उभा करु शकतील. उदा. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले.

देशाच्या निराशा, उद्विग्न करणाऱ्या आर्थिक चित्राच्या पार्श्वभूमीवर सहकार हाच जनतेचे प्रश्न सोडविण्याचा संयुक्तिक, उपयुक्त मार्ग ठरणार आहे. खाजगी क्षेत्राकडे नसलेली उपयुक्त गुणवैशिष्टये सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांकडे आहेत.

एवढेच नाही तर, मोठया प्रमाणावर बाजारप्रभावी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेसारख्या देशातही बळकट व चांगल्या सहकारी संस्था आजही उत्तम कामगिरी बजावत आहेत. दुग्धोत्पादन व संकलन, शेतीपतपुरवठा, ग्रामीण विद्युतीकरणार, खतनिर्मिती व वितरण या बाबतीत आजही अमेरिकेतील सहकारी संस्था महत्वाची भूमिका बजावत आहेत. जपानमधील सहकारी संस्था एवढ्या भक्कम आहेत की, त्या शेतमाल विपणन, मत्स्योत्पादन, वनोद्योग यांच्या बाजारवर स्वतःचा प्रभाव टाकू शकतात. अनेक युरोपीय देशांमध्ये सहकाराने आपले महत्व आजच्यामितीसही सिद्ध केलेले आहे.

भाजीपाला व फळे पिकविण्याच्या बाबतीत आपल्या देशाचा जगात दुसरा क्रमांक लागतो व मात्र या उत्पादनावर प्रक्रिया करणे व निर्यात करणे या बाबतीत आपल्या देशाचा जगात सर्वात शेवटचा क्रमांक लागतो. तर सहकारी सूत गिरण्यांनी प्रयत्न केल्यास आपला नंबरही जागतिक स्तरावर वरती येऊ शकतो.

## ७.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी :-

१) प्रा. विश्वजित चटर्जी यांनी सांगितल्याप्रमाणे "जगातील विविध देशांनी अंतरराष्ट्रीय व्यापारावरील सर्व नियंत्रणे दूर करुन भांडवल व इतर प्रकारच्या उत्पादक घटकांची गतिक्षमता वाढविणे म्हणजे जागगिकीकरण होय."[२३]

प्रा. विश्वजित चटर्जी यांच्या मतानूसार आयात-निर्यात व्यापारावरील सर्व निर्बंधे दूर करणे व देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न करणे या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हटले आहे. जागतिकीकरणात मुक्त अर्थव्यवस्था अभिप्रेत आहे. म्हणजे आयात-निर्यात व्यापारावरील सर्व बंधने दूर करावयाची असतात, विविध देशातील वस्तू व सेवा इतर देशाकडे निर्यात होतात व इतर देशाकडील वस्तु व सेवा त्या देशाकडे आयात होतात हा व्यापार मुक्तपणे चालतो. सरकारला मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारावे लागते. मुक्त व्यापारामूळे भांडवल, तंत्रज्ञान, उत्पादन घटक, वस्तू इत्यादींचा सुलभतेने व्यवहार होतो. त्यामुळे भांडवल व इतर उत्पादक घटकांची गतिक्षमता वाढते, जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या जागतिकीकरणामुळे बाहेरील देशाला मोठ्या प्रमाणात सूत निर्यात करीत असल्याने आपल्या देशाला सूत निर्यातीतून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळत आहे.

२) श्री. श्रवण कुमारसिंग यांच्या मते "जगातील सर्व देशाची एक सामूहिक बाजारपेठ निर्माण करणे व त्या बाजारपेठेत जगातील साधनसामुग्रीचे व उत्पादन घटकाचे सहजपणे स्थानांतर होईल अशी व्यवस्था करणे म्हणजे जागतिकीकरण होय."[२४]

श्री. श्रवणकुमार सिंग यांच्या व्याख्येनूसार आयात-निर्यात व्यापारावरील सर्व निर्बंधे दूर करणे तसेच जागतिकीकरणात सरकारी हस्तक्षेपाला वाव नसतो. सरकारकडून निरनिराळ्या क्षेत्रांना दिली जाणारी अनुदाने कमी केली जातात. तसेच देशांतर्गत उद्योगाच्या हितासाठी संरक्षणाचे धोरण स्विकारता येत नाही. मुक्त व्यापारामुळे भांडवल, तंत्रज्ञान, उत्पादन घटक वस्तु इत्यादींचा व्यवहार सुलभ होतो. त्यामुळे प्रत्येक देशाला व्यापक विदेशी बाजारपेठा उपलब्ध होतात. अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तीव्र स्पर्धा निर्माण होते. स्पर्धेतून उत्पादन क्षमता व कार्यक्षमता वाढीस लागते. स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार केला जातो आणि अशा अनेक व्यवहारांची जागतिक पातळीवर सर्व देशाची मिळून एक विशाल अर्थव्यवस्था निर्माण होते असे श्री. श्रवणकुमार सिंग यांनी त्यांच्या व्याख्येत म्हटले आहे.

श्रवणकुमार सिंग व प्रा. विश्वनाथ चटर्जी यांच्या व्याख्येच्या सैध्दांतिक पार्श्वभूमीनूसार सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी देखील जागतिकीकरणांचा स्विकार केलेला आहे. या सूत गिरण्यांनी जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान बाहेरील देशातून आयात केलेले आहेत. तसेच सूताची गुणवत्ता सुधारून चांगल्या प्रतिच्या सूताचे उत्पादन घेतले जात आहे. तसेच अमेरिका, चिन, इंडोनेशीया, मलेशिया, कॅनडा, युरोप अशा अनेक देशांना सूत गिरण्यांनी सूताची निर्यात केलेली आहे. तसेच सूताची निर्यात जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सूत निर्यातीमूळे देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होत आहे.

## ७.५ गृहितकाची तपासणी :-

१) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यापुढे जागतिकीकरणाची आव्हाने निर्माण झालेली आहेत. :-

जागगिकीकरणानंतर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यापुढे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. ती म्हणजे जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढली, तसेच सूत गिरण्यांना अंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्पादनाप्रमाणे सूताचा दर्जा व गुणवत्ता ठेवणे हे आव्हान आहे.

बाजारपेठांचा विस्तार मोठ्या प्रमाणात करणे हे सूत गिरण्यासमोरील आव्हान आहे. नविन तंत्रज्ञान स्विकारणे, संघटनात्मक बदल, व्यवस्थापनेत गतिमानता आणणे, तांत्रिक संशोधन करणे, बाजारपेठेविषयक संशोधन, उत्पादन खर्च कमी करणे, वित्तिय मदत कमी झाली, सदोष नेतृत्व व अकार्यक्षम व्यवस्थापन, राजकीय हस्तक्षेप कमी करणे अशा अनेक आव्हानांना सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या सामोरे जात आहेत.

**संदर्भ :**


१) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २१६)

२) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २१७)

३) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २१८)

४) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २१८)

५) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २२०)

६) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २२१)

७) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २२२)

८) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २२२)

९) डॉ. सी.जे. जोशी. (२००५), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र २२३)

१०) भारतीय नियोजन मंडळ, इंटरनेट.

११) भारतीय नियोजन मंडळ, इंटरनेट.

१२) महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. (पृष्ठ क्र१)

१३) महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. (पृष्ठ क्र२)

१४)महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. (पृष्ठ क्र३)

१५)महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. (पृष्ठ क्र४)

१६) महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. (पृष्ठ क्र५)

१७) प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

१८)प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

१९) प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

२०)प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

२१) प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११४)

२२)प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर.

(पृष्ठ क्र११४-१५)

२३) प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

२४) प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी, (२००५) सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पृष्ठ क्र११३)

२५) डॉ. सी.जे. जोशी, (२००५) सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२६) प्रा. अशोक डांगे, डॉ. विजय ककडे (१९९९), जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२७) प्रा. अजहरखान आणि प्रा. श्रीकांत जोशी (२००४), वित्तीय संस्था-१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

२८) प्रा. भोसले के.एम., प्रा. काटे के.बी. (१९९७), सहकार-फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२९) कामत गो.सो. (१९७९), सहकार; तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन विद्या प्रकाशन पुणे, (महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळसाठी)

३०) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात (२००२ आणि २००३).

३१) सराफ मोहन, (१९८५) सहकार, नवविद्या प्रकाशन, पुणे.

३२) विकास संकल्पना आणि मार्ग (२०१०), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## प्रकरण आठवे

## निष्कर्ष व शिफारशी

### ८.१ निष्कर्ष

### ८.२ शिफारशी

# प्रकरण आठवे

# निष्कर्ष व शिफारशी

## प्रस्तावना :-

ग्रामीण विकासात सहकारी चळवळीला महत्वाचे स्थान आहे. पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळ यशस्वी झालेली आहे. शेतीत उत्पादन झालेल्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगात साखर कारखाने, सूत गिरण्या, कापड गिरण्या, भात गिरण्या इत्यादींचा प्रक्रीया उद्योगात समावेश होतो. महाराष्ट्रात साखर कारखाने आणि सूत गिरण्यांमुळे ग्रामीण विकास झालेला आहे. तसेच ग्रामीण औद्योगिकीकरण होण्यास मदत झालेली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यां देखील ग्रामीण भागातच सुरू झाल्या आहेत. तेव्हापासून त्या परिसरात विकासाला गती मिळाली आहे. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्या केवळ सूत गिरण्या म्हणून राहिलेल्या नाहीत तर त्या एक औद्योगिकरणाच्या आणि सहकाराच्या वैभव बनलेल्या आहेत. हेच त्यांचे वैभव कायम टिकावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

औद्योगिक प्रगती ही देशाच्या विकासाची गुरुकिल्ली समजण्यात येते. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये औद्योगिक विकासाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. औद्योगिकरणाच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात साध्य होतो हे विकसीत राष्ट्रांनी (इग्लंड, अमेरिका, जपान, रशिया व फ्रान्स) दाखवून दिले. त्यामुळे विकसनशील राष्ट्रांनीही देशाचा आर्थिक विकास घडूवून आणण्यासाठी औद्योगिकरणावर भर दिला. भारतासारख्या विकसनशिल राष्ट्राने आर्थिक नियोजन व शासकीय योजनाद्वारे देशात वेगवेगळ्या क्षेत्राचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या क्षेत्रामध्ये उद्योगाचा विकास आणि विस्तार करण्याचे ठरविण्यात आले. यातुन देशात अनेक लहान-मोठे उद्योग स्थापन केले. लघु उद्योगाचा विकास प्राचीन काळापासून झाला. परंतू मोठे उद्योग १९व्या शतकाच्या उत्तरार्धात विकसीत होत गेले. यामध्ये कापड, साखर, लोखंड व पोलाद, पेट्रोकेमिकल्स व अभियांत्रिकी इ. उद्योगाचा समावेश होतो. या उद्योगामध्ये सूत उद्योग दुसऱ्या क्रमांकाचा व महत्वाचा उद्योग म्हणून ओळखला जातो. रोजगार, मूल्यवृध्दी, सरकारच्या उत्पन्नाचे साधन व परकीय चलनाची प्राप्ती या दृष्टीने सहकारी सूत उद्योगाची भूमीका महत्वाची आहे.

भारतातील अनेक राज्यामध्ये महाराष्ट्र हे आद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. असे असले तरी महाराष्ट्राच्या विकासामध्ये असमतोल असलेला दिसून येतो. पश्चिम महाराष्ट्राचा विकास अवर्णनीय आहे. उद्योग व सेवा क्षेत्रामुळे विकासाला गती मिळते. व्यक्तीच्या कर्तत्वाला संधी मिळते. उद्योगाचा विकास हा मानवाच्या कर्तबगारीवर उत्पादकतेवर, बुध्दिमत्तेवर व धाडसावर अवलंबुन असतो हे लक्षात घेऊन पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी औद्योगिकरणाला सुरुवात झाली. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सहाकरी सूत गिरण्याकडे पाहिले जाते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक उद्योगामध्ये सहकारी सूत गिरण्यांचे स्थान महत्वाचे आहे. कारण जिल्ह्यात सन १९६४ पासून सहकारी सूत गिरण्यांच्या उभारणीला सुरुवात झाली. गेल्या ५० वर्षात सहकारी सूत गिरण्यांच्या प्रगतीला गती मिळाली. त्यासाठी अनेक सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये माजी खासदार गंगाधरपंत कुचन, आमदार श्री. गणपतरावजी देशमुख, माजी आमदार वि.गु. शिवदारे, आमदार लक्ष्मणराव ढोबळे, आमदार विजयसिंह मोहिते पाटील इ. समावेश होतो. या सर्वांच्या प्रयत्नामुळे सहकारी सूत गिरण्यांचा विकास झ ाला. याचा फायदा शेतकरी सभासद, सूत गिरण्यात काम करीत असलेले कामगार व सूत गिरण्याशी कारखान्याशी संबंधीत असलेल्या घटकांना झाला.

सोलापूर जिल्ह्यामध्ये आज ०६ सूत गिरण्या आहेत. त्यापैकी ०५ सहकारी सूत गिरण्याच्या संदर्भात सर्वांगिन आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये सूत गिरण्याचे कार्यक्षेत्र, सभासद संख्या, सूत गिरण्याचे भांडवल, सूत गिरण्याचे सूत उत्पादन, सूत विक्री, सूत गिरण्यांचे आर्थिक मुल्यमापन, रोजगार, कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या इ. चा अभ्यास करण्यात आला आहे. आद्योगिकरणाचे महत्व पटल्यामुळे जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांची संख्या वाढत गेली. या सहकारी गिरण्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केले. याचे लाभ विविध घटकांना मिळाले. यामुळे ह्या सूत गिरण्या फक्त सूत गिरण्या न राहता औद्योगिकरणाचे वैभव बनले. सहकारी सूत गिरण्यांनी लोकांच्या मनामध्ये जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आशावादी बनविला. लोकांचा हा आशावाद दिर्घकाळापर्यंत टिकवूण ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतू याला यश आले नाही. कधी नैसर्गिक तर कधी मानवनिर्मित कारणामुळे सहकारी सूत गिरण्यांना अडचणी येत गेल्या. त्यामुळे काही सूत गिरण्या कधी बंद तर कधी चालु अशा स्थितीत आहेत. याचा विपरीत परिणाम परिसरातील विविध घटकावर होत आहे. इतर घटकापेक्षा सूत गिरण्यातील कामगारांना मात्र या परिणामाची जास्तच झळ सहन करावी लागत आहे. सूत गिरण्यांना व कामगारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधनामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे सभासद संख्या, भागभांडवल, सूत उत्पादन, सूत विक्री, रोजगार, कामगार कल्याणकारी योजना व कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये विशेषत:

कामगारांची कौटुंबिक स्थिती, साक्षरता, कामगारांच्या नोकरीचे स्वरुप, कामगारांना मिळणारे दरमहा वेतन, कामगागरांचा दरमहा खर्च, दिला जाणारा बोनस, कामगारांची कर्जसंबंधीची स्थिती, ही सर्वसाधारण असलेली दिसून आली. याचा परिणाम त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व अरोग्यावर होऊन राहणीमान निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचे दिसून येते. कामगारांमध्ये धार्मिकता, दैववाद, देवभोळेपणा व अंधश्रध्दा असल्यामुळे काळानूसार बदलांना सामोरे जाण्यास अनेक अडचणी येतात. यामुळे कामगारामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीचा वेग मंद असल्याचे दिसून येते.

"सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास." या विषयाशी संबंधीत विविध घटकाच्या अभ्यासाची सविस्तर मांडणी या अगोदरच्या सात प्रकरणामध्ये करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणाचा गोषवारा हा अहवाल लेखनाचा महत्वाचा भाग आहे.

प्रस्तूत अभ्यासाद्वारे काढलेले निष्कर्ष व शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

**८.१ निष्कर्ष :-**

१. सोलापूर जिल्हा हा विकासात्मक जिल्हा आहे. जिल्ह्यात कृषी, औधोगिक व सहकारी तत्वावर साखर कारखाने, सूत गिरण्या, बँका, शैक्षणिक संस्था हॉस्पिटल असे अनेक उदयोगांची निर्मिती सहकारी तत्वावर झालेली आहे.

२. सोलापूर जिल्ह्यात सहकारी सूत गिरण्यातील सभासद संख्येत सातत्याने वाढ झालेली आहे.

३. सोलापूर जिल्ह्यात सहकारी सूत गिरण्यातील कामगार संख्या व रोजगार देखील सातत्याने वाढलेला आहे.

४. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सर्व सूत गिरण्यांना हँकी हँड यार्न सक्तीचे केलेले आहे.

५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना कच्चा माल कापूस विदर्भातून खरेदी करावा लागतो.

६. सोलापूर जिल्ह्यात सर्व सूत गिरण्यांना कच्चा माल म्हणून आवश्यक असणाऱ्या कापसाचे उत्पादनाचे प्रमाण जिल्ह्यात कमी घेतले जाते.

७. कापसाच्या किंमतीत नेहमी अस्थिरता असल्याने शेतकरी कापसाऐवजी ऊसाचे पिक घेतात.

८. निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांना वाढत्या विजेचे दरामूळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे. औधोगिक दराने वीज आकारणी केली जाते. मात्र सहकारी साखर कारखान्यांना विज दरात सवलत दिली जाते.

९. सहकारी साखर कारखान्यांना वरचेवर अनुदान देण्याचे धोरण शासन राबविते तसे अनुदान सहकारी सूत गिरण्यांना दिले जात नाही.

१०. सूताचे दर देशात नेहमी अस्थिर राहतात. तसेच सूताची खरेदी सरकारकडून केली जात नाही.

११. सरकारचे सूत निर्यातीचे धोरण नेहमी अस्थिर व बदलते असल्याने निर्यातीवर परिणाम झालेला आढळतो.

१२. जागतिकीकरणामूळे बहूराष्ट्रीय कंपन्या देशात येत असल्याने सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना देखील स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्ता व कार्यक्षमता वाढविण्याचे आव्हान आहे.

१३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणानंतर अधुनिकीकरणावर खर्च केलेला आहे.

१४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणानंतर सूताचा दर्जा व गुणवत्ता सुधारलेला आहे.

१५. निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी कामगारांना ने आण करण्यासाठी महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली मोफत वाहन व्यवस्था केलेली आहे.

१६. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांमूळे परिसरातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे.

१७. सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज , महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सहकारी सूत गिरण्यामूळे सूत गिरणीच्या परिसराचा सामाजिक, आर्थिक व राजकिय विकास होण्यास मदत होत आहे.

१८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या परिसरात कृषी व सहकार प्रशिक्षण महाविद्यालय नाही.

१९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधून फक्त सूताचीच निर्मिती केली जाते इतर उपपदार्थ निर्माण केले जात नाहीत.

२०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्या कामगारांसाठी अनेक चांगल्या प्रकारच्या कल्याणकारी योजना राबवितात. उदा. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित साांगोले, श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्या चांगल्या योजना राबवितात.

२१. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या पाचही सहकारी सूत गिरण्यांमध्ये इंटकप्रणित कामगार संघटना आहे.

२२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातर्फे कृषी सल्ला, मेळावे, शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजनाचे प्रमाण कमी आहे.

२३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांपैकी सांगोला येथील शेतकरी सहकारी सूत गिरणीने औद्योगिक वसाहत उभी केलेली आहे.

२४. सोलापूर जिल्ह्यात महिलांची शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी सांगोल्यात आहे.

२५. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या तीन्ही सूत गिरण्या सूरवातीपासून नफ्यात आहेत.

२६. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांना अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.

२७. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी सांगोला येथील शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या स्वच्छ व कार्यक्षम व्यवस्थापन, कूशल निस्वार्थी नेतृत्व यामुळे विकासात प्रगती करीत आहे.

२८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांपैकी सांगोले येथील शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले ही भारत देशात तसेच आशिया खंडात मोठी व आदर्श सूत गिरणी आहे.

२९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमध्ये बाजारपेठांचा शोध घेण्यावर संशोधन केले जात नाही.

३०. सोलापूर जिल्ह्यातील निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांपैकी नान्नज येथील शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज ही सूत गिरणी तोट्यात आहे.

३१. सरकारने आजपर्यंत आकरा पंचवार्षिक योजना राबविल्या त्यामध्ये सहकारी सूत गिरण्या वाढविण्यासाठी म्हणावी तशी तरतूद केलेली नाही.

३२. महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या भाग भांडवलामध्ये गिरणीच्या सर्व प्रकारच्या सभासदांचा आणि व्यवस्थापनाचा ५ टक्के वाटा आहे. तर ९५ टक्के भागभांडवल हे शासनाचे आर्थिक सहाय्य, समाजकल्याण विभागाचे कर्ज, विविध वित्तीय संस्थांचे कर्ज आणि शासनाचा भाग भांडवलात सहभाग आहे.

३३. सोलापूर जिल्ह्यातील सर्व पाच सहकारी सूत गिरण्यामध्ये मुख्यतः सूताचे उत्पादन केले जाते. त्यामध्ये २०, ३०, ३४, ३८, ४०, ६२, ६४ सिंगल कोम्बड-कार्डेड आणि होजिअरी विव्हींग सूताचे

उत्पादन घेतले जाते. या सूताची विक्री भारतीय स्थानिक बाजार पेठेत तसेच विदेशात निर्यात केली जाते.

३४. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्या स्थापनेपासून नफ्यात चालू आहेत. संशोधनाच्या कालावधीत सूत गिरणीच्या नफ्यात सातत्याने वाढ होत गेली आहे.

३५. संशोधनाच्या कालावधीत सूत गिरण्यांच्या सूत विक्रीत सातत्याने वाढ होत गेली. भारतीय बाजार पेठेत सूताच्या विक्रीत सातत्याने वाढ होत गेलेली आहे. त्याच बरोबर निर्यातीत देखील वाढ झालेली आहे. सूताची निर्यात बांग्लादेश, पाकिस्तान, चीन, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, मलेशिया, इंडोनेशीया, अमेरीका इत्यादी देशात केली जाते.

३६. सूत गिरण्यांनी बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशंसनिय कामगिरी बजावली आहे. सन २००१-०२ मध्ये सूत गिरणीमध्ये १००० कामगार होते. सन २०१०-११ मध्ये १५००० कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

३७. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या स्थापनेनंतर परिसरातील ६५ टक्के शेतकरी सूत गिरण्यांच्या सभासदांचा शेतीकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात सकारात्मक बदल झाला आहे.

३८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी पाचही सूत गिरण्यांच्या स्थापनेमुळे ६० टक्के कापूस उत्पादक शेतकरी सभासदांच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे.

३९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कापूस खरेदी केंद्रे महाराष्ट्रात अंबेजोगाई, बिड, नागपूर, अकोला तसेच सूत गिरण्यांच्या साईटवर आणि विदर्भात स्थापन केलेली आहेत.

४०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगार भरती करताना सभासदांची मुले, बेरोजगार, मुलांना प्राधान्य दिले जाते. भारतीनंतर त्यांना यंत्रसामुग्रीची ओळख करून देण्यासाठी व यंत्रसामुग्री हाताळण्यासाठी तीन महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते.

४१. सोलापूर सूत गिरण्यातील सूत गिरण्यांच्या व्यवस्थापनाने आणि वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी आधुनिकीकरण प्रकल्प (एस.क्यू.सी) अतिशय नियोजन पद्धतीने पूर्ण केल्यामुळे चांगल्या व उच्च गुणवत्तेच्या सूताची निर्यात पूर्व युरोपातील काही देशात आणि आखाती देशाकडे सूताची निर्यात केली जावू लागली आहे.

४२. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले व श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग या सूत गिरण्या नफ्यात

आहेत. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, ही सूत गिरणी नफ्याच्या बाबतीत सर्व सूत गिरण्यापेक्षा आघाडीवर आहे.

४३. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे गुणोत्तर प्रमाणावरून या सूत गिरण्या निव्वळ नफ्यात आहेत. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचे निव्वळ नफा गुणोत्तर प्रमाण तोट्यातच असल्याने या सूत गिरणीने उत्पादनामध्ये कपात केल्याचे आढळते.

४४. पाच वर्षात सन २००६-०७ ते २०१०-११ चालु तरलता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालू तरलता देयता उत्तम आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज व महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरण्यांची तरल मालमत्ता भागवण्याची क्षमता प्रमाणित प्रमाणापेक्षा फारच कमी दिसते.

४५. वरील आर्थिक वर्षात श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सूत गिरणी व शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचा व्यवसाय परिचलन खर्चाचे विक्रीशी असणारे प्रमाण हे सर्वात कमी आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे व्यवसाय परिचलन खर्चाशी गुणोत्तर प्रमाण सर्वात जास्त आहे.

४६. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग व शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर चांगले आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली व शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर प्रमाण प्रतिकुल आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तराचे प्रमाण अत्यंत प्रतिकूल आहे.

४७. एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरण्यांचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ८० टक्क्याजवळ आहे. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ५० टक्क्याजवळ आहे. तसेच महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण ३०

टक्क्याजवळ आहे. या चारही सूत गिरण्यांनी एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण राखलेले आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण फारच कमी आहे ते २ टक्केपेक्षाही कमी आहे.

४८. अभ्यासासाठी निवडलेल्या पाच वर्षात विक्री आणि स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तर शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरणीचे गुणोत्तराचे प्रमाण अतिशय उत्तम आहे. तसेच श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांनी देखील गुणोत्तरांचे प्रमाण चांगले ठेवले आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे विक्री आणि स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तराचे प्रमाण इतर सूत गिरण्यापेक्षा फारच कमी आहे.

४९. चालु मालमत्ता व देयता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालु मालमत्ता ही चालु देयतेपेक्षा जास्त आहे त्यामुळे या तीन्ही सूत गिरण्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे तर शरद व महात्मा फुलेची आर्थिक स्थिती चांगली नाही.

५०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण केले असताना देखील एकाही कायम कामगाराला कमी केलेले नाही.

५१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी पर्यावरणाचे प्रदूषण होऊ नये म्हणून आपल्या परिसरात वृक्षारोपण केले आहे.

५२. सूत गिरण्यामधील निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी ५५.५६ टक्के कामगार स्थानिक परिसरातील तर ४४.४४ टक्के कामगार बाहेरील असल्याचे आढळून आले. बाहेर गावाहून येणारे कामगार सूत गिरण्यांच्या ४० ते ५० किलो मिटर अंतरावरून कामगार कामास येतात.

५३. बाहेर गावाहून येणाऱ्या कामगारांसाठी कामगारांना ने-आण करण्यासाठी महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली मोफत बस सेवा उपलब्ध केली आहे. तसेच इतर सूत गिरण्या देखील ही सेवा देत आहेत. व वाहतूक भत्ता देत आहेत.

५४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये वयोमानाचा विचार करता २६ ते ३५ या वयोगटातील कामगारांची संख्या ४२.५९ टक्के आहे. अशा वयोगटातील कामगारांची कार्यक्षमता अधिक असते. परंतू १५ ते २५ या वयोगटातील कामगारांची कार्यक्षमता तुलनेने कमी असते. याशिवाय ४५

वयापेक्षा जास्त वयोगटातील कामगारांची कार्यक्षमता देखील कमी असते. तसेच सूत गिरण्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये बाल कामगार आढळत नाहीत.

५५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामध्ये ५६ टक्के स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तर ४४ टक्के बाहेरील लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

५६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील निवड केलेल्या कामगारापैकी स्त्रियांचे प्रमाण ५५ टक्के आहे.

५७. कामगार जेवढा शिक्षित व प्रशिक्षित असेल तेवढा त्याचा परिणाम उत्पादन वाढण्यावर होतो. सदरच्या अभ्यासावरून ३५४ निवड कामगारांपैकी ६५ कामगार पूर्ण अशिक्षित आहेत. प्राथमिक शिक्षण ५९, माध्यमिक १११ तर महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले ३२ कामगार असल्याचे दिसून आले. याचाच अर्थ सूत गिरणीमध्ये माध्यमिक शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या अधिक आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या कामगारांची संख्या अत्यल्प आहे.

५८. प्रस्तुत अभ्यासासाठी निवड केलेल्या ३५४ कामगारांमध्ये ३ ते ५ व्यक्तिचे कुटुंब असणाऱ्यांचे प्रमाण ६२.९६ टक्के आहे. ६ ते ८ व्यक्तिचे कुटुंब असणाऱ्या कामगारांचे प्रमाण २९.६३ टक्के आहे. यावरून मर्यादित कुटुंबाचे महत्व कामगारांना समजलेले आहे.

५९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी ५.५६ टक्के जाहिरातीद्वारे, ९.२६ टक्के उद्योग विनिमय केंद्राद्वारे, १२.९६ टक्के सुपरवायझर आणि जॉबरद्वारे, ४६.२९ टक्के कामगार मित्र व नातेवाईकाद्वारे तर २५.९३ टक्के कामगार सूत गिरणीच्या व्यवस्थापनेस विनंती अर्ज करून भरती केल्याचे आढळते. यावरून ज्या मार्गाने सरकारने कामगारांची भरती करण्यास सांगितलेले असते (जाहिरात, उद्योग विनिमय केंद्र) या मार्गाने कामगारांची भरती केल्याचे दिसत नाही.

६०. निवड कामगारांच्या वेतनाचा विचार केला असता त्यामध्ये असे आढळून आले की, दरमहा रू. ४००० ते ६००० रूपये वेतन असणाऱ्या कामगारांची संख्या ७३ आहे. तर ५००० ते ७००० रूपये वेतन असणाऱ्या कामगारांची संख्या १३१ आहे. तर ६००० ते ९००० रुपये वेतन असणाऱ्या कामगाराची संख्या ९८ आहे. तर १०००० ते १५००० रूपये वेतन असणाऱ्या कामगारांची संख्या फक्त ५२ आहे. यावरून सूत गिरणीमधील कामगारांचे पैशातील वेतन अधिक अढळते.

६१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील सर्व कामगारांना नियमानुसार बोनस दिला जातो. हा बोनस ८.३३ टक्के दराने दिला जातो. सन २००१-०२ मध्ये बोनसपोटी रू. ३१६१५८०/- तर सन २०१०-११ मध्ये रू. ११०४८८८४/- कोटी रुपये वाटप करण्यात आले.

६२. सहकारी सूत गिरण्यातील निवड कामगारांपैकी ६० टक्के कामगारांना स्वत:चे घर आहे. तर १० टक्के कामगारांना जमीन आहे. १४ टक्के कामगारांना जमीन असून ओसाड पडीक आहे. तर १६ टक्के कामगारांना इतर मालमत्ता (पडीक जमीन, व इतर अवजारे) आहेत.

६३. सहकारी सूत गिरण्यामधील निवड कामगारांच्या बढतीच्या बाबतीत असे अढळून आले की, ७० टक्के कामगारांना सेवा जेष्ठतेवर बढती देण्यात आली आहे.

६४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील निवड कामगारांच्या नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण २०.३७ टक्के, सावकाराकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ९.२५ टक्के, व्यापारी बँका १६.६७ टक्के, आणि सहकारी बँका व पत संस्था ३५.१९ टक्के. तर इतर मार्गाने कर्ज घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण १८.५२ टक्के असे आहे.

६५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील निवड कामगारापैकी ५९.२६ टक्के कामगारांची निर्वाह वेतनाची समस्या आहे. तर बढतीची संधीच मिळत नाही असे म्हणणारे ३ टक्के कामगार आहेत.

६६. प्रस्तूत अभ्यासावरून निवड कामगारापैकी १०० टक्के कामगारांच्या मते सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

६७. औद्योगिकीकरणामुळे कामगारांच्या निवासाचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र बनत चालला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यामधील कामगारांना याच समस्येला तोंड द्यावे लागत आहे. सूत गिरण्यांनी कामगारांच्या निवासाची पूरेशी व्यवस्था केलेली नाही. जी काही केलेली आहे, ती मर्यादीत आहे. त्यात ही उच्चपदस्त अधिकारी, ड्रायव्हर, वॉचमन यांचा समावेश होतो. निवड कामगारांपैकी फक्त ३ टक्के कामगारांना याचा लाभ मिळाला आहे.

६८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कॅन्टीनची उत्तम सोय केलेली आहे. स्वस्त दरात कामगारांना विविध पदार्थ उपलब्ध होतात.

६९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमध्ये सेवक कामगार संघटना फक्त लढाऊ स्वरूपाचे कार्य करीत आहेत.

७०. जागतिकीकरणानंतर सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना अनेक आव्हाने उभी राहलेली आहेत.

७१. सन १९९१ ला भारत सरकारने खुले आर्थिक धोरण स्विकारल्याने जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना महाराष्ट्र शासनाकडून मिळणारी वित्तीय मदत कमी झालेली आहे.

७२. सोलापूर जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवड केलेल्या सहकारी सूत गिरण्यांनी शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी ही सतत तोट्यात आहे. अकार्यक्षम नेतृत्व तसेच अकुशल कामगार अशा अनेक कारणामुळे ही सूत गिरणी आजारी अवस्थेत आहे.

७३. सोलापूर जिल्ह्यातील श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या चारही सूत गिरण्यांनी जागतिकीकरणानंतर सूताची निर्यात वाढलेली आहे.

## ८.२ शिफारशी

१. सन १९४७ नंतर सहकारी चळवळीच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला. म्हणजे आज सहकारी चळवळ ही ६२ वर्षाची झाली. या प्रदिर्घ काळात ही चळवळ आर्थिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शिरली. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विशेषतः शेतीच्या समस्या या चळवळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु या चळवळीला मिळावे तेवढे यश मिळाले नाही. याला अयोग्य व्यवस्थापन, नियोजनाचा अभाव, राजकीय लोकांचा प्रभाव, सरकारचे अवलंबीत्व इ. घटक कारणीभूत आहेत. या घटकामुळे सहकारी चळवळ यशस्वी होऊ शकली नाही. सहकार यशस्वी करण्यासाठी वरील दोष दूर करावेत.

२. सहकाराच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी विविध सहकारी कायदे करण्यात आले. या प्रत्येक कायद्यामध्ये सहकारी चळवळीच्या विकासासाठी विविध उद्दिष्टे निश्चित केली गेली. या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी प्रयत्नही केले गेले. परंतु या प्रयत्नातून उद्दिष्टाची पुर्तता झाली नाही. उलट यामध्ये अनेक दोष दिसून आले आहेत. यामध्ये अशिक्षित सभासद, व्यवस्थापकामध्ये सेवा भावनेचा अभाव, अप्रमाणिकपणा इ. या दोषाचे निराकरण करावे.

३. राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी राज्य शासनाने यापुढेही ग्रामीण भागात वेगवेगळया प्रक्रिया सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन द्यावे, ज्या भौगोलिक प्रदेशात विशिष्ट पिकांचे अधिक उत्पादन होते. त्याच शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांनाच परवानगी द्यावी. तसेच त्याच प्रदेशात त्या विशिष्ट शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या दुसऱ्या कारखान्यास मंजूरी देवू नये.

४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कापूस उत्पादनाविषयी व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित करावी. तशीच ती १० गावामधील एखादया मोठ्या गावात आयोजित करण्याचा प्रयत्न करावा. ज्यामुळे सूत गिरणीच्या सभासदांना आणि परिसरातील शेतकऱ्यांना याचा लाभ घेता येईल.

५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कापसाच्या पिकावर पडणारा बोंड अळीसारखा रोग पडू नये यासाठी आणि पिकावर हा रोग पडल्यास कोणती काळजी घ्यावी, कोणत्या किटकनाशकांचा वापर करावा याचे मार्गदर्शन करावे. तसेच कापसाचे पिक घेत असतानाच, मूग, उडीद, भूईमुग यासारख्या कडधान्य पिकांचे अंतर्गत पीक म्हणून उत्पादन घेण्यास मार्गदर्शन करावे. त्यामुळे एखाद्या वेळेस कापसाचे पिक व्यवस्थित न आल्यास होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण कमी होईल. याशिवाय शेतकऱ्यांना ठिंबक सिंचन पद्धतीने कापूस पिकास पाणी पुरवठयाची सोय

करण्यास मार्गदर्शन करावे. तसेच परिसरातील शेतकऱ्यांना व सभासदांना ठिबक सिंचनाचे संच सूत गिरण्यांनी अल्प दरात पूरविण्याचा प्रयत्न करावा.

६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांतील सूत गिरण्यामध्ये स्त्री कामगारांचे प्रमाण अधिक आहे. तरी सूत गिरण्यांनी महिलांसाठी बचत गट स्थापन करण्यास सहकार्य करावे.

७. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कापूस विकास केंद्र सुरू करावे की, ज्यामुळे लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन देणारा कापूस बियाणाविषयी संशोधन करून ते बियाणे शेतकऱ्यांना पूरविता येतील त्यामुळे सूत गिरण्यांना चांगल्या दर्जाचा कापूस मिळून चांगले दर्जाचे सूत उत्पादन होण्यास मदत होईल.

८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सभासद शेतकरी व परिसरातील शेतकऱ्यांना शेतीमध्ये विविध रासायनिक खताऐवजी जैविक किंवा सेंद्रीय खताचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे की ज्यामुळे शेतजमिनीचा दर्जा दीर्घकाळामध्ये खालावणार नाही.

९. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या एकूण भाग भांडवलातील सुमारे ९५ टक्के वाटा हा शासन आणि समाजकल्याण विभाग आणि इतर वित्तीय संस्थांचा असल्याने, यापुढे स्वतःचे उत्पन्नाचे मार्ग निर्माण करून भांडवलातील वाटा वाढविण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी आहे त्या यंत्रसामग्रीच्या कार्यक्षमतेचा पूर्ण वापर करावा, परिसरात इतर सहकारी प्रकल्प उभे करावेत. विशेषतः कापड निर्मिती प्रकल्प उभा केल्यास उत्पन्नात वाढ होईल आणि लोकांना रोजगार मिळेल, तसेच खत निर्मिती प्रकल्प उभा केल्यास सभासदांना कमी किंमतीत खतांचा पुरवठा होईल.

१०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी ग्राहक भांडार सुरू करून जीवनावश्यक वस्तू पूरवाव्यात. त्यामुळे सभासदांना आणि कामगारांना अल्प दरात वस्तू मिळतील आणि गिरणीच्या उत्पन्नात देखील वाढ होईल.

११. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सूताच्या उत्पन्नात वाढ करीत असतानाच, सूताचा दर्जा उत्तम ठेवून सूताची निर्यात वाढवावी. सूताची निर्यात ही विशिष्ट देशांनाच न करता इतरही देशांना निर्यात वाढविण्याचा प्रयत्न करावा.

१२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी यापुढे परिसरातील जास्तीत जास्त शेतकरी सभासद होतील यासाठी प्रयत्नशील राहावे. त्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी करावी.

१३. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगारांची भरती करीत असताना, जरी परिसरातील सभासदांच्या मुलांना प्राधान्य दिले जात असले तरी त्यामधून विशिष्ट शिक्षण आणि प्रशिक्षण घेतलेल्या तरूणांना अगोदर संधी देण्याचा प्रयत्न करावा.

१४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगारांची भरती करीत असताना २६ ते ३५ वयोगटातील कामगारांची किमान ७० टक्के तरी भरती करावी. कारण या वयोगटातील कामगारांची कार्यक्षमता अधिक असल्याने सूत उत्पादन वाढण्यास मदत होईल. तसेच १५ ते २५ या वयोगटातील कामगारांची ५ टक्के भरती करावी.

१५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांतील निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी ६२ कामगार अशिक्षित आहेत. त्यांच्यासाठी सूतगिरणीने प्रौढ साक्षरतेचे वर्ग सुरू करावेत. शिवाय प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्र सूत गिरणीने व कामगार संघटनेने सुरू करावेत.

१६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी शिक्षित तज्ज्ञ कर्मचारी वर्ग नेमावा टेक्सटाईल मधील पदवीधर कर्मचारी, सहकाराची पदवी प्राप्त अधिकारी, एम.बी.ए. चे व्यवस्थापक एम.एस.डब्ल्यु झालेंले लेबर ऑफिसर नेमल्यास व्यवस्थापन कार्यक्षम होण्यास मदत होते.

१७. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील निवड केलेल्या ३५४ कामगारांपैकी ४० टक्के कामगारांच्या कुटुंबाचा आकार मोठा आहे. कुटुंबात ६ ते ८ पेक्षा जास्त सभासद आहेत. यासाठी सूत गिरण्यांनी कामगारांच्या कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवण्यासाठी व दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुटुंब नियोजनाचे महत्व, मर्यादित कुटुंबाचे महत्व, स्त्री शिक्षण वर्ग, प्रौढ शिक्षण वर्ग, चर्चासत्रे, व्याख्याने, दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्यांना नोकरीत संधी नाही असे उपक्रम राबवावेत.

१८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमधील कामगारांचा विविध व्यसनावरील वाढता खर्च लक्षात घेता सूत गिरणीने आणि कामगार संघटनेने व्यसनमुक्तीचे कार्यक्रम घ्यावेत. निरनिराळया व्यसनापासून निरनिराळे रोग होत असल्याची जाणीव त्यांच्यात निर्माण करावी. शिवाय ज्या कामगारांना, दारू, जुगार, विडी-तंबाखू इत्यादी व्यसने आहेत त्यांच्यावर कारवाई करावी. वेळ प्रसंगी दारू सारखे व्यसन असणाऱ्या कामगाराला नोकरीवरून कमी करण्यात यावे. तत्पूर्वी प्रथम त्याला एक दोन वेळा सूचना देण्यात यावी.

१९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कामगारांच्या मुलांच्यासाठी विद्यार्थी निधीची स्थापना करावी व त्यातून कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक अडचणी सोडवाव्यात. तसेच काही हुशार मुलांचा शैक्षणिक खर्च करण्यासाठी काही मुले दत्तक घ्यावीत.

२०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातर्फे प्रत्येक वर्षी १ मे या कामगार दिना दिवशी उत्कृष्ट काम करणाऱ्या कामगारांचा सूत गिरणीतर्फे सन्मान चिन्ह देऊन सत्कार करावा. आदर्श कामगार पुरस्कार देण्यात यावा. त्यामुळे सूत गिरणीमधील कामगारांमध्ये काम करण्याच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होईल.

२१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमधील निवडलेल्या ३५४ कामगारांपैकी ३ टक्के कामगारांना बढतीची संधी का मिळत नाही याची लेबर ऑफिसरने (कामगार कल्याण अधिकारी) चौकशी करावी व सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करावा. सूत गिरणीने कामगारांना बढती देत असताना प्रथमतः सेवा जेष्ठता व शिक्षण  व प्रशिक्षण विचारात घेऊन कामगारांना बढतीची संधी दयावी.

२२. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमध्ये कामगारांची भरती करीत असताना जाहिरात देऊन उद्योग विनिमय केंद्राकडे प्रशिक्षित कुशल कामगारांची मागणी करूनच भरती करण्यात यावी. अन्य मार्गांनी कामगारांची भरती करण्यात येऊ नये. कारण अन्य मार्गांने भरती केलेला कामगार प्रशिक्षित, कुशल, अनुभवी, कार्यक्षम असेलच असे नाही.

२३. सूत गिरणीमधील कामगारांच्या निवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी सूत गिरणीने तसेच कामगार संघटनेने एखादी गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन करून घरांचे वाटप करावे म्हणजे बाहेरून जो ५५.५६ टक्के कामगार सूतगिरणीमध्ये कामावर येतो त्यांचा येण्या-जाण्याचा वेळ, खर्चात बचत व शारिरीक त्रास कमी होऊन त्यांची कार्यक्षमता वाढेल.

२४. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमधील कामगार हे कर्ज मित्र-नातेवाईक, सावकार, व्यापारी, बँका, सहकारी बँका यांच्या कडून घेतलेले प्रस्तूत अभ्यासावरून दिसून येते. परंतू या सर्व बँकाचे व्याजदर जास्त आहेत. तेव्हा सूत गिरणीतील कामगारांनी आणि कामगार संघटनेने एकीच्या बळावर एखादी सहकारी पतसंस्था स्थापन करावी, म्हणजे कामगारांच्या अडचणींच्या वेळेस त्यांना पतसंस्थे तर्फे कर्ज देता यईल.

२५. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमधील कामगार संघटनेने कामगारांच्या मुलांसाठी मोफत पुस्तके, वह्या वाटप करावे. तसेच मोफत संगणक वर्ग, सुरू करावेत. तसेच कामगार संघटनेने कामगारांचे प्रश्न तर सोडवावेच त्याशिवाय कल्याणकारी कार्ये देखील करावीत. वाचनालय सुरू करावे, निरनिराळया स्पर्धांचे आयोजन करावे, व्यसनमुक्ती, स्त्री मुक्ती चळवळ, राष्ट्रीय एकात्मता दारुबंदी, एडस् इत्यादीवर तज्ञ व्यक्तिंची व्याख्याने आयोजित करावीत. त्यामुळे कामगारांच्या

मनामध्ये परिवर्तन होईल. त्यांना स्वतःचे विचार मांडता येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत. त्यामुळे समाजाचा व कामगारांचा संघटनेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल.

२६. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सोशल क्लबची स्थापना करून त्याद्वारे एकी आणि बंधूभाव व सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न कराव सोशल क्लबने कामगारांना दारूचे व्यसन किंवा अन्य धोकादायक व्यसनापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करावा. त्याचबरोबर कामगारांमधील अंधश्रद्धा नाहीशी करून त्यांचा दृष्टीकोन भावनाप्रधान बनविण्यापेक्षा बुद्धी प्रमाण्यवादी बनविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

२७. सूत गिरण्यांनी कामगारांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी व मागील महिन्यातील सूत उत्पादनाची तुलना पुढील महिन्यातील उत्पादनाशी करता यावी म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी प्रत्येक महिन्याला पत्रिका प्रसिद्ध करावी. त्यामध्ये सूत उत्पादन विषयक आकडेवारी, कामगारांचे लेख, कविता इत्यादी विषय प्रसिद्ध करावेत. ही पत्रिका प्रत्येक कामगाराला प्रत्येक महिन्याला मोफत दिली जावी.

२८. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी प्रति क्विंटल कापसाचा दर वाढविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी गिरणीला कापसाची विक्री केल्यानंतर त्याची किंमत त्वरीत द्यावी. त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या गरजा पूर्ण करता येतील. त्याच प्रमाणे त्याला अधिक कापसाचे उत्पादन घेण्याविषयी प्रोत्साहन मिळेल.

२९. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सर्व कामगारांना निवासाची सोय करून द्यावी. तसेच कामगार आणि सभासदांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी एखादे कृषी महाविद्यालय सुरू करावे. त्याच बरोबर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करावे. या महाविद्यालयात पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी.

३०. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी अस्थायी कामगारांना विशिष्ट कामाचा अनुभव आल्यास त्यांना योग्य असे शिक्षण व प्रशिक्षण देऊन कायम स्वरूपी कामात सामावून घ्यावे. तसेच वाढत्या महागाई आणि सूत गिरणीला होणाऱ्या नफ्यातील वाढीबरोबर कामगारांच्या वेतनात वाढ करण्याच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावा.

३१) सोलापूर जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील आजारी सहकारी सूत गिरण्यांचे विलिनीकरण करावे.

३२) सोलापूर जिल्हा नेहमी दुष्काळग्रस्त असल्याने सिंचनाच्या सोयी कराव्यात म्हणजे शेतकरी मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन घेतील.

३३) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन घेण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दयावे तसेच मार्गदर्शन करावे.

३४) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी शेतकऱ्यांना ऊसाऐवजी कापसाचे पिक घेण्याविषयी मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांनी पिकविलेला कापूस खरेदी करण्याची हमी दयावी. म्हणजे जिल्ह्यात कापसाचे पिक वाढेल.

३५) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कापसाचे पिक वाढविण्याकरीता शेतकऱ्यांना, लांब धाग्याच्या कापसाचे बी पूरवावेत म्हणजे जिल्ह्यात कापसाचे पिक मोठ्या प्रमाणात झाल्यास सूत गिरण्यांना लागणारा कच्चा माल जिल्ह्यात उपलब्ध झाल्याने विदर्भातून देखील बचत होईल.

३६) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी निवडलेल्या सहकारी सूत गिरण्यांनी उपपदार्थाची निर्मिती करावी, तसेच साहाय्यकारी प्रक्रिया उदयोग उभा करावेत, उदा.कापसापासून सरकी काढणे, शेतमालावर प्रक्रिया करणे, कापसाच्या पराठीपासून बुंद्या व फांद्यापासून कागद, हिरव्या पानापासून रसायने, रुईपासून सूत, सरकीच्या टरफलावर तंतू शिल्लक राहतात त्यापासून घन कॉटन व सर्जिकल कॉटन, सरकीच्या टरफलापासून खत, आतिल बियापासून पौष्टीक असे खाद्य तेल व जनावरासाठी ढेप वाळलेल्या झाडापासून पृष्ट, वाळलेल्या पराठ्यापासून रासायनिक प्रक्रिया करुन, बोर्डस् असे २५ ते २६ प्रकारचे उपपदार्थ तयार करावेत.

३७) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सहकारी तत्वावर कृषी तसेच सहकार महाविद्यालय काढावेत, त्यामूळे सहकाराचे प्रशिक्षण घेता येईल.

३८) महात्मा फुले व शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी ढोबळ नफ्यात तोट्यात आहेत. तरी या सूत गिरण्यांनी ढोबळ नफा वाढविण्यासाठी प्रयत्न करावा.

३९) शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीने निव्वळ नफा वाढविण्यासाठी उत्पादन वाढवावे.

४०) शरद शेतकरी सहकारी. सूत गिरणी, नान्नज व महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरण्यांनी तरल मालमत्ता भागविण्याची क्षमता वाढवावी.

४१) शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले व श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग या सूत गिरण्या नफ्यात आहेत. शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले, ही सूत गिरणी नफ्याच्या बाबतीत सर्व सूत गिरण्यापेक्षा आघाडीवर आहे तरी शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी व महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीने आपला नफा वाढवावा.

४२) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे गुणोत्तर प्रमाणावरून या सूत गिरण्या निव्वळ नफ्यात आहेत. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज सूत गिरणीचे निव्वळ नफा गुणोत्तर प्रमाण तोट्यातच असल्याने या सूत गिरणीने उत्पादनामध्ये कपात केल्याचे आढळते. तरी शरद सहकारी सूत गिरणीने निव्वळ नफा गुणोत्तराचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

४३) पाच वर्षात सन २००६-०७ ते २०१०-११ चालु तरलता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालू तरलता देयता उत्तम आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज व महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली या सूत गिरण्यांची तरल मालमत्ता भागवण्याची क्षमता प्रमाणित प्रमाणापेक्षा फारच कमी दिसते तरी शरद सहकारी सूत गिरणी व महात्मा फुले अनुसूचीत जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीने आपली तरल मालमत्ता भागवण्याची क्षमता वाढवावी.

४४) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग सूत गिरणी व शेतकरी सहकारी सूत गिरणी, सांगोले यांचा व्यवसाय परिचलन खर्चाचे विक्रीशी असणारे प्रमाण हे सर्वात कमी आहे. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे व्यवसाय परिचलन खर्चाशी गुणोत्तर प्रमाण सर्वात जास्त आहे तरी शरद सहकारी सूत गिरणीने व्यवसाय परिचलन खर्चाशी गुणोत्तराचे प्रमाण कमी करावे.

४५) श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग व शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर चांगले आहे. महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली व शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तर प्रमाण प्रतिकुल आहे. तर शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे कर्ज व सामान्य भागभांडवल गुणोत्तराचे प्रमाण अत्यंत प्रतिकूल आहे तरी त्यांनी ते सुधारावे.

४६) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे एकूण मालमत्ता उलाढाल विक्री गुणोत्तराचे प्रमाण फारच कमी आहे ते त्यांनी वाढवून २ टक्केपेक्षाही जास्त करण्याचे प्रयत्न करावे.

४७) शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज या सूत गिरणीचे विक्री आणि स्थिर मालमत्ता उलाढाल गुणोत्तराचे प्रमाण इतर सूत गिरण्यापेक्षा फारच कमी आहे. तरी शरद सहकारी सूत गिरणीने ते वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

४८) चालु मालमत्ता व देयता गुणोत्तर श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांची चालु मालमत्ता ही चालु देयतेपेक्षा जास्त आहे त्यामुळे या तीन्ही सूत गिरण्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे तर शरद व महात्मा फुलेची आर्थिक स्थिती चांगली नाही. तरी शरद सहकारी सूत गिरणीने व महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणीने आपली आस्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत.

४९) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणामूळे स्पर्धा वाढलेली आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या सूताचा दर्जा व गूणवत्तेत सूधारणा करावी.

५०) जागतिकीकरणाच्यानंतर सूताला जागतिक बाजारपेठ खूली झाल्याने सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी निर्यात वाढवावी. म्हणजे परकीय चलन आपल्या देशाला मोठ्या प्रमाणात मिळेल.

५१) जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील सहकारी सूत गिरण्यांना शासनाने साखर कारखान्याप्रमाणे सहकारी सूत गिरण्यांना अनुदान दयावे.

५२) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना केंद्र सरकारने हँकी हॅड यार्न पध्दती सक्तीची केलेली आहे. ती त्वरीत रद्द करावी.

५३) केंद्र सरकारने सूत निर्यातीबाबतचे धोरण स्थिर ठेवावे.

५४) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना महाराष्ट्र शासनाने विज दरात सूट (सवलत) दयावी किंवा औधोगिक दराने विज आकारणी करण्याऐवजी सवलतीच्या दरात वीज दर आकारावेत.

५५) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना शासनाने करात सवलती द्याव्यात.

५६) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी अधुनिक यंत्रे, मशिनरी बसवावीत त्यामूळे उत्पादन खर्च कमी येईल व चांगल्या दर्जाचे सूत उत्पादन होईल.

५७) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यातील सूताची खरेदी शासनाने करावी आणि कापड निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना ठरावीक टक्के सूत शासनाकडून किंवा सहकारी सूत गिरण्यांकडून सूत खरेदी करण्याचे बंधन घालावे (सक्तीचे करावे) म्हणजे सहकारी सूत गिरण्यातील सूताला कायम व स्थित बाजारपेठ मिळेल.

५८)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी गारमेंट व टेक्स्टाईल पार्क उभे करावेत.

५९)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सर्व कामगारांना सूत गिरणीच्या परिसरातच राहण्याची व्यवस्था करावी.

६०)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी ९७ व्या सहकारी कायदयाप्रमाणे सर्व सभासदांना सहकाराचे प्रशिक्षण व सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

६१)	१९९१ च्या आर्थिक धोरणानुसार सहकारी सूत गिरण्यामधील शासनाचा भाग कमी होणार असल्याने सोलापूर जिल्ह्यातील निवड केलेल्या सहकारी सूत गिरण्यांनी स्वतःचा निधी (भाग भांडवल) उभा करावा.

६२)	भारत सरकारने पुढील पंचवार्षिक योजनामध्ये सहकारी सूत गिरण्यासाठी भरीव तरतूदी कराव्यात.

६३)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कल्याणकारी व समाजोपयोगी योजना राबवाव्यात.

६४)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी व्यावसायीक झाले पाहिजे.

६५)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी शासनाच्या भांडवलावरील अवलंबित्व कमी करुन स्वतःचे भांडवल उभा करावे.

६६)	सोलापूर जिल्ह्यातील  सहकारी सूत गिरण्यांनी बाजारपेठांचा शोध घेण्यासाठी स्थानिक व जागतिक स्तरावर संशोधन करावे.

६७)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी उत्पादन खर्च कमी करुन नफा वाढविण्याचा प्रयत्न करावा.

६८)	सोलापूर जिल्ह्यातील  सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या आव्हानांना (धैर्याने) सामोरे जावे.

६९)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी कार्यक्षम व भ्रष्टाचार मूक्त प्रशासन व व्यवहार करावेत.

७०)	सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज , महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सूत गिरण्यांनी त्यांचा प्रभाव व ताकद असणाऱ्या क्षेत्रांवर अधिक लक्ष केंद्रित केले.  उदाहरणार्थ, कापुस, सरकी, जनावरांची पेंड, कापड, खते, इत्यादी पण यापुढे जागतिकीकरणाचा मुकाबला करण्यासाठी सहकारी सूत गिरण्यांना आपल्या कार्याचा व्याप वाढवावा.

७१) सहकारी सूत गिरण्यांना व्यावसायिक तत्त्वांचा अवलंब करावा. जागतिकीकरणाला तोंड देण्यासाठी योग्य कौशल्यांचा विकास करावा.

७२) जागतिकीकरणामुळे श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी, वळसंग, शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज , महात्मा फुले अनुसूचित जाती-जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी, वाघोली आणि शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी, सांगोले या सहकारी सूत गिरण्यांतील सरकारी सहभाग कमी होणार आहे. तेव्हा सरकारी साहाय्याशिवाय विकास साधण्याची क्षमता सहकारी सूत गिरण्यांनी निर्माण करावी. सरकारी मदतीची सवय मोडावी.

७३) सहकारी सूत गिरण्यांनी स्पर्धा नसलेल्या किंवा अल्प स्पर्धेच्या ठिकाणी आपल्या व्यवहाराच्या विस्तार केला आहे, पण आता जागतिकीकरणामुळे प्रत्येक क्षेत्र स्पर्धायुक्त बनले आहे. तेंव्हा सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी स्पर्धाक्षमता वाढवावी.

७४) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांमधील राजकीय हस्तक्षेप कमी झाला पाहिजे. त्यासाठी सहकारी सूत गिरण्यांना पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहिले पाहिजे. "राजकारणी व्यक्तींच्या हातातील खेळणे" ही प्रतिमा बदलून स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावे.

७५) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणाशी लढा देण्यासाठी बाजारभिमुख तत्त्वांचा स्वीकार करावा व बदलत्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे.

७६) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी प्रगतीसाठी काटेकोर नियोजन आखावे. सभासद, कर्मचारी, अधिकारी यांना सहकाराच्या शिक्षणाबरोबर व्यावसयिक प्रशिक्षण द्यावे.

७७) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी संघटनात्मक रचना अधिक दृढ करावी. दुर्बल व अर्थक्षम नसलेल्या सहकारी सूत गिरण्यांचे विलिनीकरण करुन मोठ्या, बळकट व अर्थक्षम सहकारी सूत गिरण्यांची निर्मिती करावी.

७८) सहकारी सूत गिरण्यांनी सहकाराची मूल्ये आणि व्यावसायिक मूल्ये जोपासली पाहिजेत. त्यासाठी स्वतःच्या कार्याचे स्वतः मूल्यमापन करुन व्यवसाय क्षेत्रातील आपले स्थान आणि महत्त्व ओळखण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे सूत गिरण्यांना बाजारपेठेत प्रतिष्ठा लाभू शकेल.

७९) सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणाच्या टप्प्यात शेतीमाल प्रक्रिया पतपुरवठा आणि विपणन कार्यापुरते आपले लक्ष मर्यादित न ठेवता तांत्रिक संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ती तयारी करुन कापूस, फळाफळावळ आणि अन्य धान्य उत्पादनाच्या नवीन अधिक

उत्पादने देणाऱ्या जाती शोधणे आवश्यक आहे. कमी पाण्यावर आणि कमी वेळेत उत्पादन देणारी बी-बियाणे तयार करुन उत्पादनवाढीस चालना देणे आवश्यक आहे. तसेच उत्पादन आणि प्रक्रिया तंत्रात संशोधन करुन कमी खर्चाने तंत्र विकसित करणे आवश्यक आहे.

८०) वस्त्रोद्योगातील सूत व तयार कपड्यावरून व्हॅट, जकात व्यवसाय करांच्या रुपाने राज्य शासनास दरवर्षी किमान ३५०० कोटी रुपयांचे तर केंद्र शासनास अबकारी कराचे १००० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. या पार्श्वभूमीवर वस्त्रोद्योग धोरणातील ५ वर्षासाठी २१११ कोटींच्या अनुदानाची तरतुद अपुरी आहे. राज्याच्या औद्योगिक धोरणाअंतर्गत लागु असलेल्या व्हॅट परतावा योजनेचा कोणताही लाभ कापड उत्पादक यंत्रमाग धारकांना घेता येत नाही याचा विचार करुन राज्यातील वस्त्रो प्रकल्पासाठी किमान ३५ टक्के भांडवली अनुदानाची तरतुद करावी.

८१) या वस्त्रोद्योग धोरणामध्ये १० टक्के ही तुटपुंजी भांडवली अनूदानाची सवलत फक्त विदर्भ व मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रापूरती मर्यादित ठेवली आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह इतर भाग या सवलीपासून वंचीत राहणार आहेत. आजपर्यंत पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकांनी खाजगी व सहकारी क्षेत्रामध्ये कापसासारखा कच्चा माल उपलब्ध नसतानाही जिद्दीने व कौशल्याने आपले उद्योग उभे करुन वाढवले आहेत. या ही गोष्टीचा सकारात्मक विचार करुन त्यांनाही भांडवली अनुदानाच्या सवलतीमध्ये सहभागी करुन घ्यावे. तरच प्रादेशिक भेदभावामुळे होऊ घातलेला अन्याय दुर होईल. या सवलतींचा फायदा सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना देखील होईल.

८२) नवीन उद्योग उभारणीसाठी सवलती देण्यात येत आहेत. मात्र सध्या विविध अडचणींना तोंड देत सुरु असलेल्या यंत्रमाग उद्योग आणि सहकारी सूत गिरणी उद्योगासाठी कोणत्याही सवलती लागु केलेल्या नाहीत. गेल्या काही वर्षात अनिश्चित कापूस व सूत निर्यातीच्या धोरणाचा विपरीत परिणाम म्हणून कापूस व सूताच्या झालेल्या भयानक तेजीमंदीमुळे यंत्रमाग लघु उद्योग व सहकारी सूत गिरण्या प्रचंड नुकसानीत आलेल्या आहेत. त्यामुळे या पुर्वी आमदार प्रकाश आव्हाडे समितीच्या शिफारशी नूसार राज्य शासनाने लागु केलेल्या सर्व सवलती पुन्हा एकदा किमान पाच वर्षासाठी लागु कराव्यात.

८३) जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सहकारी सूत गिरण्यांनी भारतात आपले व्यवस्थापन आदर्श ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी सहकारी सूत गिरण्यांच्या सभासदांपासून पदाधिकाऱ्यांपर्यंत सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत म्हणजे सूत गिरण्यात आधुनिक व्यवस्थापन कौशल्य विकसित होईल. त्याचा लाभ सभासदांना जास्तीत जास्त सुविधा प्राप्त करुन देऊन त्यांच्या आर्थिक कल्याणाने वाढ घडवून आणणे शक्य होईल.

अर्थात ही बाब तितकी सोपी नाही. त्यासाठी सूत गिरण्यांत निकोप व निःस्वार्थी लोकांचा सहभाग वाढवावा.

८४) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी बदलत्या काळात स्वतःचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी उत्पादकता व कार्यक्षमता वाढवावी. त्यासाठी नवीन तंत्रज्ञान, उत्पादनाच्या नव्या पध्दती, संशोधनाचा वापर इत्यादींना महत्त्व द्यावे.

८५) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी जागतिकीकरणाच्या पर्वात जागतिक व्यापारात सहभागी व्हावे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारात उतरण्याची क्षमता सहकारी सूत गिरण्यांनी निर्माण करावी. वस्तूच्या दर्जाबरोबर पॅकिंग, योग्य वेळी मालाची पाठवणी (Delivery) इत्यादी बाबींकडे लक्ष द्यावे.

८६) सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी सतत बाजारपेठेचे संशोधन करावे. ग्राहक वर्तणुकीचा बारकाईने अभ्यास करावा. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन सूत पुरविण्याच्या पध्दतींत बदल करावा. प्रामुख्याने सहकारी सूत गिरण्यांनी हे आव्हान स्वीकारावे.

८७) भारतात १९९१ नंतर सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमूळे उद्योग, व्यापार आणि व्यवसायाची क्षेत्रे खुली होत असून स्पर्धा वाढत आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांना या स्पर्धेचे चटके जाणवत आहेत. खाजगी क्षेत्राप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी आपला उत्पादन खर्च कमी करणे व बाजारपेठांचा विस्तार करण्याकडे लक्ष द्यावे.

८८) १९९१ नंतर बदलत्या जागतिक आर्थिक वातावरणात कार्यक्षम सहकारी सूत गिरण्यांच्या निर्मितीसाठी शासनाने प्रत्यक्ष मदत न देता हमी कर्जे देऊन या सूत गिरण्यांचे पुनरुज्जीवन घडवून आणावे. सहकारी सूत गिरण्यांचे आजारपण शासनाच्या मदतीशिवाय दुर होणे शक्य आहे. तरी शासनाने मदत करावी.

८९) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सहकारी सूत गिरणी क्षेत्राला अनन्य साधारण महत्व असल्याने ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठी सहकारी सूत गिरण्या बळकट होण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने राज्याच्या ग्रामीण भागात कृषी व कृषीपूरक सहकारी संस्थाचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावे. नाबार्ड व राज्य सरकारांनी याबाबतीत पुढाकार घ्यावा.

९०) महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कापसाचे उत्पादन करणारे राज्य आहे. पण त्यातील २० टक्केच कापसार प्रकिया होत असून, उर्वरित टक्के कापूस शेजारच्या राज्यात जातो किंवा त्याची निर्यात होते. यापुढील काळात मात्र वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून राज्यात उत्पादीत होणाऱ्या १०० टक्के कापसावर राज्यातच प्रक्रिया करुन त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती आणि महसुल वाढीसाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत.

९१) भारतासारख्या विकसनशील देशाने सहकारी क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पण जागतिकीकरणामुळे संपूर्ण सहकारी सूत गिरण्यांना धोका निर्माण झाला आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया टाळता येणे शक्य नाही. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांनी नव्या व्यवस्थेशी मिळतेजुळते घ्यावे. बाजार तत्वे व ग्राहक, सभासदांचे कल्याण यामध्ये योग्य समन्वय साधावा. श्रमिक, शेतकरी, सामान्य जनता व सहकार क्षेत्रातील नेते या सर्वांनी मिळून सूत गिरण्यांच्या बळकटीसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सरकारी मदतीच्या कुबड्या टाकून देऊन स्वबळावर विकास साधण्याची क्षमता सहकारी सूत गिरण्यांनी निर्माण करावी, तरच भविष्यात हे क्षेत्र टिकून राहील.

*****

## संदर्भ सूची

१. प्रा. भोसले के.एम.
प्रा. काटे के.बी. } (जूलै २००२),सहकार फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. डॉ. जोशी सी. जे., (जुन २००५), (सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. प्रा. अजहरखान
प्रा. श्रीकांत जोशी } (२००४),वित्तीय संस्था-१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

४. कामत गो.स.(१९७९) सहकार तत्व व्यवहार आणि व्यवस्थापन, विद्याप्रकाशन, पुणे.

५. प्रा. शिंदे आर.के.,(१९८०) भारतातील सहकार, सुधा प्रकाशन, सातारा.

६. सहकारी महाराष्ट्राचे विविध अंक(२००१-२०११)

७. प्रा. ए. आर. रायखेलकर,
डॉ. अशोक डांगे (२००२) } सहकार तत्वे आणि व्यवहार, मेहता पब्लिशींग हाऊस,

८. डॉ. दी. के. देशपांडे :- (१९९०),औद्योगिक अर्थ शास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.

९. प्रा. डी. एस. कदम
प्रा. आर. के. दातीर
प्रा. आर. एम. चिंतामणी } भारतीय अर्थ व्यवस्था, निराली प्रकाशन, जोगेश्वरी मंदिर मार्ग, पुणे
प्रा. जि. जे. लोमटे (२००३)

१०. प्रा. सुधाकर देशपांडे
डॉ. गजेंद्र फुके
प्रा. विनोद तक (२०००) } भारताचा आर्थिक विकास व नियोजन, संगम प्रकाशन, नागपूर.

११. भोसले / काटे (२००४), भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. के. एच. ठक्कर (२००४), भारतीय अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१३. डॉ. विजय कविमंडल (१९९६), कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.

१४. नरसिंह गोपाळ देवधर (१९९७-९८), सूती वस्त्रोद्योग, प्रकाशक :- महाराष्ट्र राज्य साहित्य

सांस्कृतिक मंडळ, सचिवाल, मुंबई पृष्ठ. क्र. ७०

१५. डॉ. प्रदीप आगलावे (२००५),संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

१६. डॉ. दि. के. देशपांडे (१९९०),औद्योगिक अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

१७. डॉ. प्रभाकर देशमुख (१९८७),श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

१८. उपाध्ये ना.धो. (१९९२), कारखाने अधिनियम १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम १९६३, प्रकाशक :- गो. य. राणे, पुणे.

१९. श्री. वसंत भगवंत कर्णिक (२००१), कामगार संघ आणि औद्योगिक संबंध, कॉंन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

२०. श्री. बगाराम तुळतुळे (२००३), कामगार आकांक्षा आणि अवाहन, कॉंन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

२१. प्रा. अशोक डांगे (१९९९) जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर १९९९.
डॉ. विजय काकडे

२२. प्रा. सु.पां. देव, प्रा. ग.ना. झामरे (१९८८) मुद्रा उत्पन्न व रोजगार सिद्धांत प्रकाशक, मनोहर पिंपळापूरे. पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, रामदास पेठ, नाग मुद्रणालय, नागपूर

२३. डॉ. बा. म. डोळे, डॉ.स.ना. कुलकर्णी (२००३) ग्रामीण विकासा संबंधी बिनसरकारी सेवाभावी संस्था दृष्टीकोन निर्मिती, श्री. आनंद यादव, व्यवस्थापक ग्रंथनिर्मिती केंद्र, नाशिक.

२४. डॉ. देसाई स.श्री.मु., डॉ. भालेराव निर्मल (१९९२) भारतीय अर्थ व्यवस्था, श्री. दिनेश फुरीया, निराली प्रकाशन, जोगेश्वरी मंदीर मार्ग, पुणे.

२५ डॉ. ज.प्पा. पाटील, डॉ. के. जी. पठाण, प्रा. पी. जे. ताम्हणकर (२००४) अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंड ओळख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०

२६ डॉ. प्रा. लीला पाटील, प्रा. अशोक डांगे (१९९७) भारतीय अर्थव्यवस्था रचना व समस्या भाग-१, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

२७.प्रा. व्ही. आर. माने (१९८५) नवे वस्त्रोद्योग धोरण, समाज प्रबोधिनी प्रस्तूत सेमिनार, इचलकरंजी,

२८ सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे तक्ता आधार.(२००९)

२९ महाराष्ट्र आर्थिक पाहणी सन २०१०-११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३० सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २०११,सांख्यिकी विभाग, सोलापूर.
महाराष्ट्रातील सहकार चळवळ एका दृष्टीक्षेपात, १९९४,प्रकाशक :- सहकार आयुक्त व निबंधक संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १९९४.

३१. प्रा. ठाकुर भागवत.पांडूरंग., (मे-२०१०) "लातूर जिल्ह्यातील साखर कामगारांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास" पीएच.डी.(डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

३२. प्रा. डॉ. रुपा शहा, प्रा. डॉ. बी.एच. दामजी (२००५), सहकार, फडके प्रकाशन कोल्हापूर.

३३. श्री. स्वामी समर्थ शेतकरी व विणकरी सहकारी सूत गिरणी नियमित, वळसंग, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

३४. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले, ता. सांगोले, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०- ११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

३५. शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ा वर्षातील वार्षिक अहवाल)

३६. महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती शेतकरी सहकारी सूत गिरणी नियमित, शारदानगर, वाघोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

३७. शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूत गिरणी मर्यादित, सांगोले, ता. सांगोले, जि. सोलापूर. (सन २००१-०२ ते २०१०-११ या वर्षातील वार्षिक अहवाल)

३८ Baldev Raj Sharma :- The Indian Industrial Worker, Vikas Publishing House Pvt. Ltd, Mumbai.

३९.C.B. Memoria :- Labour Problems and Social Welfare in India, Kitab Mahal, Allahabad, १९६६.

४०.Kamat G. S. :- New Dynamic of Co-operative System.

४१.Kamat G. S :- Marketing the Co-operative way Pune, १९७३.

४२.Mehta S. D. :- The Indian Cotton Textile Industry and Economic Annalysis.

४३.Mehta M. M. :- Structure of Cotton Mill Industries of India Central - Allahabad १९४९.

४४ Mehta V.L. :- Towards a Co-operative Socialistic Commonwealth, १९६५.

४५.Takkar G. K. :- Labour Problems of Textile Industryछ Vora & Co., Mumbai.

४६.V.V. Giri :- Labour Problems in Indian Industry, Asia Publishing House, Mumbai.

## मासिके

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्थमंथन | : | १७ डिसेंबर २००७ |
| २) | अर्थसंवाद | : | १० फेब्रुवारी २००८ |
| ३) | किसान | : | २५ मार्च २००८ |
| ४) | लोकराज्य | : | १३ मे २००८ |
| ५) | योजना | : | १० सप्टेंबर २००८ |
| ६) | किसान | : | २१ मार्च २००९ |
| ७) | अर्थसंवाद | : | २१ एप्रिल २००९ |
| ८) | अर्थमंथन | : | १२ सप्टेंबर २००९ |
| ९) | योजना | : | १० जानेवारी २०१० |
| १०) | लोकराज्य | : | २० ऑगस्ट २०१० |
| ११) | योजना | : | मे २०११ |
| १२) | लोकराज्य | : | सप्टेंबर २०१२ |
| १३) | बिझनेस | : | नोव्हेंबर २०१२ |

## दैनिके

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्र टाइम्स | : | २८ नोव्हेंबर २००७ |
| २) | लोकसत्ता | : | २९ ऑगस्ट २००८ |
| ३) | लोकमत | : | २१ डिसेंबर २००८ / २३ एप्रिल २०१२ |
| ४) | सकाळ | : | ११ फेब्रुवारी २००८ / २७ सप्टेंबर २०११ |
| ५) | पुढारी | : | २५ फेब्रवारी २००८ / १५ ऑक्टोंबर २०११ |
| ६) | संचार | : | २४ सप्टेंबर २००८ |
| ७) | एकमत | : | ५ ऑक्टोंबर २००८ |
| ८) | संचार | : | २० जुलै २००९ |
| ९) | लोकमत | : | २० ऑगस्ट २०११ / १५ ऑक्टोंबर २०११ |
| १०) | लोकसत्ता | : | १२ जुलै २०११ |
| ११) | महाराष्ट्र टाईम्स | : | २३ सप्टेंबर २०११ |
| १२) | पुढारी | : | २६ फेब्रुवारी २०१२ |
| १३) | एममत | : | १४ एप्रिल २०१२ |
| १४) | दिव्य मराठी | : | २ ऑगस्ट २०१२ |
| १५) | सकाळ | : | ९ नोव्हेंबर २०१२ |

## परिशिष्ट १

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## "सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास"

**मार्गदर्शक**
डॉ. सुर्यवंशी ए. बी.
अधिष्ठाता, वाणिज्य विभाग,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**संशोधक**
श्री. मेटकरी एस. एम.
सोलापूर.

---

### ❋ कामगारांची अनुसूची ❋

**१.** कामगाराचे (उत्तरदात्याचे) नाव :- ------------------------------------------------------------------------------------

**२.** गाव :-------------------------------- तालुका :-------------------------------- जिल्हा :----------------------------

**३.** वय :---------------------------- लिंग :---------------------------- (पु./स्त्री)

**४.** धर्म :---------------------------- जात :---------------------------------- पोटजात :----------------------------------

**५.** शिक्षण :---------------------------------------- (अशिक्षित / प्राथमिक/ माध्यमिक/ महाविद्यालयीन)

**६.** मातृभाषा :---------------------------------------- (मराठी, हिंदी, कन्नड, उर्दू)

**७.** वैवाहिक स्थिती :- ------------------------------- (अविवाहीत / विवाहीत / घटस्फोटीत / विधूर)

**८.** मुख्य व्यवसाय :- ---------------------------------------------- पर्यायी व्यवसाय :- --------------------------------

**९.** तुम्ही सद्या काम करीत असलेल्या विभागाचे नाव :- ------------------------------------------------------------

**१०.** तुमचा हुद्दा :- ---------------------------------- रोजगारीचे स्वरूप :---------------------- (हंगामी/ कायम)

**११.** कुशल / अकुशल :- ----------------------------------------------------------------------------------------------------

### ❋ कामगारांची कौटुंबिक माहिती ❋

**१.** तुमच्या कुटुंबाचा प्रकार कोणता ? संयुक्त / विभक्त.
**२.** तुमच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या : मुले :- ________________ मुली :- ________________
**३.** तुमच्या कुटुंबात नौकरीस असणाऱ्यांची संख्या :- ____________________________
**४.** तुमच्या मालकीची मालमत्ता : घर / शेतजमीन / ओसाड जमीन / इतर ------------------------------
**५.** सदर मालमत्तेची बाजारी किंमतीनुसार रक्कम रूपये ____________________________
**६.** तुम्ही स्थलांतर केले आहे काय ? होय / नाही.

केले असल्यास कारण :-

(१) जन्म गावी जमिन नसणे. (२) नौकरी निमित्त कमी उत्पन्न असल्यामुळे.
(३) कुटुंबातील संघर्षामुळे. (४) कुटुंबाच्या आकारामुळे.

**७.** तुमच्या घरी कोणत्या वस्तू आहेत ?
(१) सायकल, (२) टी. व्ही., (३) मोटार सायकल, (४) संगणक.

**८.** तुमच्या घरी स्वयंपाकासाठी कोणते इंधन वापरता ?
(१) चूल, (२) रॉकेल, (३) बायो गॅस

## ❋ कामगार भरती विषयी माहिती ❋

**१.** तुम्ही सूत गिरणीमध्ये कोणत्या वर्षी नोकरीस लागलात ? वर्ष :- ---------------------

**२.** तुम्हाला सूत गिरणीमध्ये कोणत्या मार्गाने नोकरी मिळाली ?
(१) जाहिरात, (२) उद्योग विनिमय केंद्र, (३) सुपरवायझर, जॉबर यांच्यामुळे, (४) सूत गिरणीतील मित्र-मंडळी, नातेवाईक यांच्यामुळे, (५) व्यवस्थापनेस तुम्ही केलेल्या विनंती अर्जावरून.

**३.** तुम्ही उद्योग विनिमय केंद्रात नाव नोंदणी केली आहे काय ? होय / नाही.

## ❋ सामाजिक संबंध आणि सुविधा ❋

**१.** तुमच्याबरोबर काम करणाऱ्या कामगारांशी तुमचे संबंध कसे आहेत ?
(१) मित्रत्वाचे व सहकाराचे, (२) फक्त कामापूरते.

**२.** तुम्ही इतर कामगारांना सूत गिरणीच्या कामानंतर अडी-अडचणीच्या वेळी मदत करता काय ?
(१) होय (२) नाही.

**३.** तुम्हाला इतर कामगार मदत करतात काय ?
(१) होय (२) नाही.

**४.** कामगारामध्ये जातीयता / अस्पृश्यता मानली जाते काय ?
(१) होय (२) नाही.

**५.** तुम्ही स्वतः जातीभेद बाळगता का ?
(१) होय (२) नाही.

**६.** तुमचे व्यवस्थापकाशी व लेबर ऑफिसरशी संबंध कसे आहेत ?
(१) मित्रत्वाचे (२) कामापूरते (३) सहकार्याचे.

**७.** तुमची काम करण्याची जागा स्वच्छ,हवेशीर, पुरेसा प्रकाश इत्यादींची सोय असलेली आहे काय?
(१) होय (२) नाही.

**८.** सूत गिरणीत स्वतंत्र भोजन कक्ष आहे का ?
(१) होय (२) नाही.

**९.** सूत गिरणीत तुमच्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे काय ?

(१) होय (२) नाही.

**१०.** किरकोळ अपघात झाल्यास प्रथमोपचाराची सुविधा आहे काय ?
(१) होय (२) नाही.

**११.** सूत गिरणीत शौचालय व मुतारीची व्यवस्था आहे का ?
(१) होय (२) नाही.

**१२.** तुम्ही अंतर्गत व बाह्य वातावरणाशी समाधानी आहात काय ?
(१) पूर्ण (२) अंशतः (३) असमाधानी.

## ❋ सामाजिक सुरक्षा व कामगार कायदे ❋

**१.** तुम्हाला कामगार विमा योजना (१९४४) लागू आहे काय ?
(१) होय (२) नाही.

**२.** तुम्हाला भविष्य निर्वाह निधी कायदा (१९४४) लागू आहे का ?
(१) होय (२) नाही.
असल्यास तुमचा हिस्सा किती रूपये :- ------------------------------------------
संस्थेचा हिस्सा किती रूपये :- ------------------------------------------------------

**३.** आजपर्यंत या योजनेचा लाभ घेतलात का ?
(१) आजारपणात, (२) अपंग, (३) अवलंबित्व, (४) वैद्यकीय, (५) गरोदरपणात.
नसल्यास कारण :- (१) गरज भासली नाही, (२) सभासद नाही.

## ❋ कामगार संघटना ❋

**१.** तुमच्या सूत गिरणीत (मिल) कामगारांची संघटना आहे काय ? (१) होय (२) नाही.
असल्यास तुम्ही कामगार संघटनेचे सभासद आहात काय ? (१) होय (२) नाही.
नसल्यास कारण :- ------------------------------------------------------------------------------------------------

**२.** तुमच्या कामगार संघटनेचे नाव :- ------------------------------------------------------------------------------
वार्षिक वर्गणी रूपये :- -------------------------------

**३.** तुम्ही संघटनेच्या सभेस हजर राहता काय ?
(१) नाही (२) काही सभांना (३) सर्व सभांना.

**४.** संघटनेच्या कार्यात भाग न घेण्याची करणे -
(१) मालकांची भिती, (२) वेळ मिळत नाही, (३) राजकीय दबाव, (४) कार्याची आवड नाही.

**५.** तुमच्या संघटनेचे स्वरूप कसे आहे ?
(१) जातीय (२) सर्व समावेशक (३) राजकीय.

**६.** तुमच्या समस्ये व्यतिरीक्त संघटनेकडे जाता का ? (१) होय (२) नाही.

**७.** संघटना आर्थिक परिस्थिती सुधारण्याबाबत मदत करते काय ? (१) होय (२) नाही.

**८.** कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी संघटनेने कोणता मार्ग अनुसरला पाहिजे असे तुम्हास वाटते ?
(१) संघर्ष, (२) लढाऊ, (३) निश्चित दृष्टीकोन ठेवून, (४) तडजोड, वाटाघाटी करून.

**९.** संघटना राजकीय पक्षापासून अलिप्त असाव्यात असे वाटते काय ? (१) होय (२) नाही.

**१०.** संघटने बद्दल तुमची तक्रार आहे काय ? (१) आहे (२) नाही.
असल्यास कोणती :- ------------------------------------------------------------------------------------------------

**११.** तुम्ही सध्या तुमच्या कामाबद्दल कितपत समाधानी आहात ?
(१) पूर्ण समाधानी, (२) अंशतः समाधानी, (३) असमाधानी.

**१२.** तुम्हाला कुशल आणि समाधानकारक कार्याबद्दल एखादे बक्षिस दिले जाते का ?
(१) होय (२) नाही.

**१३.** तुमच्या गिरणीत कोणत्या बाबींवर बढती मिळते ?
(१) सेवा जेष्ठता, (२) शिक्षण, (३) उत्कृष्ट कार्यक्षमता, (४) जातीय प्रभाव,
(५) पैसे देऊन, (६) वशिल्याने.

## ❋ कामगारांचे वास्तव्य सोयी व आरोग्य ❋

**१.** तुम्ही कोणत्या प्रकारच्या घरात राहता ?
(१) स्वतःच्या (२) भाडयाच्या (३) गिरणीच्या

**२.** सूत गिरणीने तुमच्यासाठी निवासाची सोय केली आहे काय ? (१) होय (२) नाही
असल्यास घरातील खोल्यांची संख्या :- ------------------

**३.** आपण / तुम्ही राहतो तो परीसर स्वच्छ आहे का ? (१) होय (२) नाही

**४.** घरी वीज आहे का ? (१) होय (२) नाही

**५.** सूत गिरणीने तुमच्यासाठी सरकारी किंवा सहकारी ग्राहक भांडाराची सोय केली आहे काय ?
(१) होय (२) नाही

**६.** तसेच प्रशिक्षणाच्या काही सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय ? (१) होय (२) नाही

**७.** तुमच्या सूत गिरणीतील हवामानामुळे (प्रदुषणामुळे) एखादा कायमचा किंवा तात्पुरत्या स्वरूपाचा आजार झाला आहे का ? (१) होय (२) नाही

**८.** तुम्हाला गिरणीने काही आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत काय ?
(१) होय (२) नाही

**९.** आपणास एखादे व्यसन आहे का ? (१) होय (२) नाही
असल्यास कोणतेः-(१)पान-तंबाखू, (२)दारू, (३)जुगार, (४) बिडी-सिगारेट (५) गुटखा वगैरे.

**१०.** व्यसनावर तुमचा मासिक खर्च किती आहे : रू. ................................

**११.** दोन वर्षात केव्हा आजारी पडलात का ? (१) होय (२) नाही

## ❋ वेतन व अन्य लाभ ❋

**१.** तुम्हाला सूत गिरणीत वेतन किती काळाने मिळते ?
(१) दररोज, (२) आठवडा, (३) महिना.

**२.** तुम्हाला जादा काम दिले जाते का? (१) होय (२) नाही
जर दिले जात असेल तर त्याचा योग्य मोबदला मिळतो का ? (१) होय (२) नाही

**३.** आपले मासिक (उत्पन्न) वेतन किती आहे ? रू. ................................

**४.** वेतन कोणत्या पद्धतीने मिळते (१) काळानुसार (२) कार्यानुसार.

**५.** रजा दिवसाची पगाराची रक्कम वेतनातून कपात केली जाते काय? (१) होय (२) नाही

**६.** तुम्हाला उचल रक्कम (ॲडव्हॉन्स) मिळतो का ? (१) होय (२) नाही
मिळत असल्यास केव्हा मिळतो ? (१) ठरलेल्या दिवशी, (२) जरूर पडेल तेव्हा.

**७.** तुम्हाला मिळणारे वेतन पुरेसे आहे असे तुम्हास वाटते का ? (१) होय (२) नाही
अपुरे वेतन वाटण्याची कारणे :- ................................................................................

## ❋ बोनस अधिनियम कायदा १९६५ ❋

**१.** तुम्हाला सूत गिरणीत बोनस दिला जातो का ? (१) होय (२) नाही
जर दिला जात असेल तर मागील दोन वर्षात किती टक्के बोनस मिळाला :- रू.....................

**२.** बोनस कोणत्या स्वरूपात मिळतो ? (१) वस्तू (२) पैसा.

**३.** याशिवाय खुशाली बोनस मिळतो का ? (१) मिळतो (२) मिळत नाही.

**४.** बोनससाठी संप, टाळे बंदी झाली होती काय ? (१) होय (२) नाही

**५.** बोनस कोणत्या वेळी मिळतो ?
(१) दिवाळी सणाच्यावेळी (२) वर्षातून केव्हातरी (३) दसरा

**६.** फॅमिली पेन्शन योजना आहे का ? (१) होय (२) नाही

## ❋ कर्ज विषयक माहिती ❋

**१.** तुमच्या कामगारांची एखादी सहकारी पतसंस्था आहे काय ? (१) होय (२) नाही.
**२.** असल्यास तुम्ही त्याचे सभासद आहात काय ? (१) होय (२) नाही.
**३.** सदर पतसंस्थेकडून तुम्ही कर्ज घेता काय ? (१) होय (२) नाही.

**४.** अन्य कोणाकडून कर्ज घेता ?

(१) मित्र-नातेवाईक (२) सहकारी पतसंस्था (३) सावकार (४) व्यापारी बँका
(५) सहकारी बँका (६) सराफी पेढीवाले.
तुम्ही किती कर्ज घेतले ? एकूण रूपये________________ परत फेड________________ शिल्लक____________

**५.** तुम्ही कर्ज मुक्त आहात काय ? (१) होय (२) नाही.

**६.** तुम्ही बचत करता का ? (१) होय (२) नाही.

**७.** करीत असल्यास बचतीचा हेतू
(१) भविष्यकालीन संकट (२) सणासुदीसाठी (३) आजारपण.

**८.** दरमहा किती बचत करता ? रूपये ____________________________

**९.** बचत कोठे करता ?
(१) सह पतसंस्था (२) पतपेढी (३) बँका (४) स्वतःजवळ (५) पोष्ट (६) पिग्मी.

**१०.** बचत करीत नसल्यास कारण काय ?
(१) जास्त खर्च (२) क्षमता नाही.

## ❋ <u>इतर माहिती</u> ❋

**१.** गिरणीमध्ये तुम्हाला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

(१) शैक्षणिक सुविधांचा आभाव (२) चांगल्या सहकार्याचा अभाव (३) निर्वाह वेतन समस्या
(४) बढतीची संधी नाही. (५) आरोग्य सुविधांचा आभाव.

**२.** तुम्हाला खालील बाबतीत काही सूचना आहेत काय ?

(१) गिरणीचे व्यवस्थापन सुधारणे (२) कामगार कल्याण सुविधामध्ये वाढ करणे. (३) वेतन वाढ करणे. (४) कामाची परिस्थिती सुधारणे. (५) आरोग्यविषय सुविधामध्ये वाढ करणे.

**उत्तरदात्याची स्वाक्षरी**
**(                    )**

# परिशिष्ट २

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## "सोलापूर जिल्ह्यातील सहकारी सूत गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास"

**मार्गदर्शक**
डॉ. सुर्यवंशी ए. बी.
अधिष्ठाता, वाणिज्य विभाग,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**संशोधक**
श्री. मेटकरी एस. एम.
सोलापूर.

---

## ❋ कामगार संघटना अध्यक्षांसाठी मुलाखत पत्रिका ❋

१. कामगार संघटना अध्यक्षांचे नाव :- ----------------------------------------------------------------

२. वय -------- शिक्षण ---------------------------------------- गाव ----------------------------------------------------

३. तुमच्या कामगार संघाचे नाव ----------------------------------------------------------------------

४. कोणत्या सालापासून संघटनेचे अध्यक्ष आहात ------------------------

५. कामगार संघाचे अध्यक्ष होण्यापूर्वी तुमचा हुद्दा कोणता होता? ----------------------------------------

६. कामगार संघाच्या अध्यक्ष होण्यामागचा तुमचा हेतू कोणता ?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

७. कामगार संघाच्या अध्यक्षांची निवड कशी केली जाते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

८. अध्यक्षांची कामे कोणती?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

९. कामगार संघाचा सभासद होण्यास तुमच्या अटी किंवा नियम कोणते ?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१०. सध्या तुमच्या संघाच्या सभासदांची संख्या किती ? ----------------------------------------------

११. मागील वर्षी ही सभासद संख्या किती होती ?----------------------------------------------------

१२. तुमच्या अध्यक्ष पदाची मुदत किती वर्षांची असते (आहे) ? ----------------------------------------

**१३.** आतापर्यंत गिरणीमध्ये संप किंवा टाळेबंदी घडून आली होती का?

-----------------------------------------------------------------------------------

**१४.** असल्यास संप किंवा टाळेबंदी कशी उठविण्यात आली ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**१५.** कामगार संघाने (संघटनेने) कामगारांसाठी काही आर्थिक व सामाजिक सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**१६.** संघटनेने कामगारांसाठी काही आरोग्यविषयक सुविधा केल्या आहेत काय ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**१७.** संघटनेने सभासद कामगारांसाठी काही प्रशिक्षणाच्या सुविधा केल्या आहेत का ?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**१८.** संघाच्या किंवा टाळेबंदीच्या काळात संघटना कामगारांना काही आर्थिक सहाय्य करते का ?

-----------------------------------------------------------------------------------

**१९.** तुम्ही संघटनेची मिटींग (बैठक) घेता का? घेत असल्यास त्याची कल्पना कामगारांना कशी देता?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**२०.** सभासद कामगारांकडून वर्षाला किती वर्गणी घेता ?

-----------------------------------------------------------------------------------

**२१.** संघटनेचा गिरणीच्या (मिलच्या) व्यवस्थापनामध्ये सहभाग आहे का?

-----------------------------------------------------------------------------------

**२२.** कामगारांच्या समस्या संघटना कशी सोडविते?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**२३.** व्यवस्थापक मंडळ (संचालक मंडळ) आणि संघटना यांचे संबंध कशा प्रकारचे आहेत?

------------------------------------------------------------------------------------

**२४.** एखाद्या कामगाराला अन्य कारणांनी कामावरून कमी केले तर अशा वेळी संघटनेची भूमिका कोणती ?

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**२५.** कामगारांसाठी काही कल्याणकारी योजना राबविता का ?

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**उत्तरदात्याची स्वाक्षरी**

**(                              )**



सहकारी सूत गिरण्यातील कामगारांची मुलाखत घेताना संशोधक विद्यार्थी



सहकारी सूत गिरण्यातील कामगारांची मुलाखत घेताना संशोधक विद्यार्थी